# नाती

चं.गुं.जोशी

९५०२
म. ग्रं. सं. ठाणें
विषय निबंध
सं. क्र. 2296



REFBK-0018411

संदर्भ / ~~चरित्र~~ निबंध
60062 | 9713163
2296 ~~[illegible]~~

17 AUG 1976

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.

सूचना :– खाली दिलेल्या तारखेपर्यंत

अनुक्रम ८०८८२ वि: निबंध
२२९५ नों दि: १९/३/८३
१८७११
REFBK-0018411

# जीवनातली अनेक नाती

चं. गुं. जोशी

'प्रसाद' रौप्यमहोत्सवी प्रकाशन

प्रकाशक :
**मनोहर य. जोशी** B. A., B. Com.
प्रसाद प्रकाशन
१८९२ सदाशिव पेठ, पुणे ३०.

▱

रौप्यमहोत्सवी प्रकाशन १९७२

▱

**किंमत ७ रुपये**

▱

**गं. शं. दाते**
कलागृह छापखाना,
१३५० सदाशिव पेठ, पुणे ३०.

# लेखकाचे मनोगत

"जीवनातली अनेक नाती" या पुस्तकाच्या मदतीने समजून घेताना कोणती सावधगिरी बाळगणे जरूर आहे हे वाचकांना सांगणे मला इष्ट वाटते. या पुस्तकातले बरेचसे विषय असे आहेत की, त्याबद्दल शास्त्रीय संशोधन झालेले आहे. शास्त्रज्ञांमध्ये संपूर्ण एकमत नसले तरी काही प्रस्थापित सिद्धान्त गृहीत धरून विवेचन का केले नाही, अशी शंका काही वाचक घेतील. तसेच काही संबंधांचे ( relationships ) पूर्ण चित्र दिलेले नाही, त्यात अपुरेपणा राहिला आहे असेही वाचकांना वाटेल. पण या पुस्तकाचा हेतु फार मर्यादित आहे, हे आवर्जून सांगितले पाहिजे.

आपल्या जीवनातली जी अनेक नाती असतात, त्यांनी जीवन समृद्ध व सुखी होण्याच्याऐवजी संघर्षमय का व्हावे, हा एकच शोध या पुस्तकात घेतलेला आहे. जीवनाकडे पाहण्याची एक विशिष्ट दृष्टी कृष्णमूर्ती आपल्या प्रवचनांतून व पुस्तकांतून आपणांला दाखवितात. त्यांनी सुचविलेल्या दृष्टिकोणातून आपल्या जीवनातल्या अनेक नात्यांकडे आपण पाहिले तर संघर्ष तर नाहीसा होईलच; पण मुक्त जीवनाचा आनंदही आपणाला प्राप्त होईल, असा संभव आहे. याकरता, कृष्णमूर्तींच्या विचारांची ओळख वाचकांना करून द्यावी, हा लेखकाचा प्रधान हेतु आहे. त्यांच्या विचाराची दिशा लक्षात येण्याकरिता जरूर तेवढेच विषयविवेचन लेखकाने केलेले आहे. यामुळे शास्त्रीय दृष्टीने कोठे अपुरेपणा आढळला तर वाचकांनी क्षमा करावी.

काही ठिकाणी असे आढळेल की, त्या त्या विषयावरचे कृष्णमूर्तींचे

संपूर्ण म्हणणे प्रकरणात आलेले नाही. फक्त त्यांची मुख्य विचारधारा दर्शविली आहे.

या लहान पुस्तकात कृष्णमूर्तींच्या असामान्य प्रज्ञेला जे संपूर्ण दर्शन झाले, ते सर्व आणणे अशक्यच होते.

पुस्तकाचा हेतु दुहेरी आहे. जीवनाकडे या अगदी नवीन अशा पद्धतीने खरोखरच पाहता येते का, याचा पडताळा प्रत्यक्ष प्रयोग करून वाचकांनी घ्यावा, हा एक हेतु. दुसरा हेतु असा की, कृष्णमूर्तींच्या विचारांत काही आगळेपणा आहे असा प्रत्यय वाचकांना आल्यास त्यांनी मुळातूनच त्यांचे संपूर्ण विचारविश्व पाहावे.

कृष्णमूर्तींच्या प्रवचनांचे अथवा पुस्तकांतले उतारे देताना विषयाला जरूर तेवढाच भाग उद्‌धृत केला आहे. यामुळे काही ठिकाणी ते उतारे त्रुटित वाटणे शक्य आहे. या तेजस्वी विचारवंताचे प्रत्येक प्रवचन ही एक अविभाज्य अशी कलाकृति असते. वाचकांना काही उणीव वाटली तर त्यांनी मूळ पुस्तकच काढून संपूर्ण प्रवचन वाचावे, अशी विनंति आहे. बऱ्याच इंग्रजी उताऱ्यांचा मराठीत सारांश दिलेला आहे; पण काही ठिकाणी स्थलाभावी हे शक्य झालेले नाही. यामुळे ज्यांची गैरसोय होईल ते वाचक क्षमा करतील अशी आशा आहे.

हे पुस्तक त्यातील कोणत्याही विषयाचे शास्त्रीय ज्ञान असे वाचकांना देऊ शकणार नाही. तसा हा प्रयत्नच नाही. पण सारखा उलगडत जाणारा असा जो प्रत्येकाचा जीवनपट आहे, त्याकडे कोणत्या कोनातून पाहावे, किती अंतरावरून पाहावे, एवढेच कदाचित या पुस्तकावरून म्हणजे त्यातील कृष्णमूर्ती-विचारांतून समजू शकेल, असे मला वाटते. शास्त्रापेक्षा स्वानुभवाला कृष्णमूर्ती अधिक किंमत देतात.

कृष्णमूर्तींच्या क्रान्तिकारक विचारांची ओळख या नवीन पद्धतीने

मराठी वाचकांना करून द्यावी, ही कल्पनाच मुळी "प्रसाद"चे संपादक श्री. मनोहरपंत जोशी यांची आहे. ती सुचविल्याबद्दल मी त्यांचा ऋणी आहे. पुस्तकाचा काही भाग लेखाच्या रूपाने "प्रसाद" मासिकात त्यांनी प्रसिद्ध केला याबद्दल, तसेच अल्प कालात पुस्तक प्रकाशात आणण्याकरिता त्यांनी आस्थेने जे श्रम घेतले त्याबद्दल, मी त्यांचा आभारी आहे. माझे मित्र श्री. पु. म. शिंत्रे, वकील, पुणे, यांचे प्रेमळ उत्तेजन नसते तर हे काम पार पडलेच नसते, हे सत्य वाचकांना सांगणे मला जरूर वाटते.

चं. गुं. जोशी

▱ ▱ ▱

## अनुक्रमणिका


| | | |
|---|---|---|
| १ | आई-बाप व मुले | १ |
| २ | मित्र का नुसता सोबती ? | ४० |
| ३ | पति-पत्नी | ५३ |
| ४ | श्रेष्ठ व कनिष्ठ | ९५ |
| ५ | व्यक्ति व समाज | ११४ |
| ६ | मी व माझी संपत्ति | १३० |
| ७ | मी व माझा व्यवसाय | १५१ |
| ८ | मी व माझी प्रतिभा | १७० |
| ९ | मी व माझे अेकटेपण | १८९ |
| १० | जेव्हा नाती संपतात | १९९ |

(मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत)
अनुक्रम 50052 वि: निबंध
क्रमांक 2295 नों दि: 19/3/03

जीवनातली अनेक नाती

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
18499
(स्थळ प्रत)

१

# आई-बाप व मुले

'नवीन पिढी व जुनी पिढी यांच्यामधला विसंवाद सारखा वाढतो आहे व दोहोंच्या मधली दरी ( Generation gap ) फारच रुंद होत आहे' या विषयावर अलीकडे बरेच लिहिले व बोलले जात आहे. नव्या-जुन्यांचा संघर्ष, हा तसे म्हटले तर फार जुना विषय आहे. सहा हजार वर्षांपूर्वीचा एक शिलालेख इस्तंबूलमधल्या एका वस्तुसंग्रहालयात जतन करून ठेवला आहे. त्यातही एका नाणावलेल्या विचारवंताने एकच तक्रार केली आहे. ती ही की, नवी पिढी फारच उच्छृंखल होत चालली आहे व त्यामुळे समाज रसातळाला जाईल, अशी भीती वाटत आहे. हल्लीच्या ( किंबहुना प्रत्येक कालखंडातल्या ) जुन्या पिढीचेच विचार तो शिलालेख सांगत आहे.

'समाज रसातळाला जाणे' म्हणजे काय व त्या लेखातला समाज तेथे गेला की नाही, हे समजण्यास मार्ग नाही. परंतु जुनी पिढी जेव्हा अशी तक्रार करते तेव्हा ती अगदीच मोघम असते, असे म्हणता येत नाही. नव्या पिढीचे कोठे चुकते, याबद्दल बराचसा तपशीलही वृद्धांना

देता येतो. जे मुद्दे वृद्धजन मांडतात, त्यांतले दोनतीन तरी ठळक मुद्दे सर्व काळात सारखे असतात, ही एक आश्चर्याची गोष्ट आहे. पहिली तक्रार अशी असते की, नवीन पिढीला वृद्धजनांबद्दल आदर वाटत नाही. याचाच अर्थ असा की, वृद्धांच्या प्रकट अथवा अप्रकट आज्ञांचे पालन नवीन पिढी करीत नाही. दुसरी तक्रार बहुधा तरुणांच्या अनैतिक वर्तनाबद्दल असते. या वर्तनातच दर पिढीबरोबर जो वेषभूषेत बदल होत जातो त्याचा समावेश आपण करू. तिसरी तक्रार अशी असते की, वाडवडिलांचा धंदा सोडून भलत्याच फंदात मुले पडतात; म्हणजे कुळाला बट्टा लावणारे व्यवसाय ते सुरू करतात.

ज्याअर्थी वरील तीनही तक्रारी करण्याचा पायंडा फार पुरातन कालापासून पडलेला आहे, त्याअर्थी त्या तक्रारींच्या मागे वृद्धांच्या काही ठराविक अपेक्षा आहेत, हे उघड आहे. या अपेक्षा कशा उत्पन्न होतात हे जर आपणाला समजले, तर दोन पिढ्यांमधल्या भांडणाचे मूळच सापडले, असे होईल.

"आईबापांनी मुलांकडून अपेक्षा करू नयेत, तर त्या कोणाकडून कराव्या? ज्यांना त्यांनी लहानाचे मोठे केले, त्यांचेवर त्यांचा काहीच हक्क नाही का?" असे काही वाचक विचारतील. या प्रश्नाकडे पाहण्याची हीच सर्वसाधारण रीत आहे. ती एकदा अवलंबिली की मग "तरुण पिढीचे हक्क कोणते? का त्यांना हक्कच नाहीत?" यासारखे प्रश्न उद्‌भवतात; आणि मग प्रश्नांची ही मालिका फारच लांबते व समस्या तशीच शिल्लक राहते. आजपर्यंत हेच होत आले आहे. पण अगदी निराळ्या पद्धतीने या समस्येकडे पाहणे शक्य आहे.

आईबापांचा स्वतःच्या जीवनाबद्दल जो दृष्टिकोण असतो, त्यातच काही चूक होत असली तर? आणि अशीच चूक मुलांकडूनही होत असली तर?

" जीवनात जे मी मिळवू पाहतो, त्याचे स्वरूप तरी काय आहे ?" चालू काळातल्या कुटुंबप्रमुखाने हा प्रश्न स्वतःला केला, तर त्याचे उत्तर काय मिळेल ? मला वाटते, की पुष्कळजणांना नीट उत्तरच देता येणार नाही. कारण जगावे कशाकरता, याबद्दल आपण फारसा विचारच केलेला नसतो; व तो न करताच आपण जगत असतो. तसे जगता येते, हे तर उघडच आहे. पण जीवन अशा तऱ्हेचे जगले गेल्यामुळेच त्यातून समस्या व संघर्ष उद्‌भवतात, असे विधान कोणी केले तर ते आपण कबूल करणार नाही. पण वस्तुस्थिती तशी दिसते. याचे कारण असे आहे की, मग जीवनात अनुकरणाशिवाय दुसरे काही घडतच नाही. मी इतरांप्रमाणेच लग्न करतो, संसार उभा करतो, मुलाबाळांचा पोशिंदा बनतो, आणि समाजात प्रतिष्ठा ( respectability or status ) मिळवतो. ती न मिळाली तर मी स्वतःला अयशस्वी समजतो; आणि थोडीबहुत मिळाली तर इतरांना माझ्यापेक्षा जास्त प्रतिष्ठा का मिळावी, हे असमाधान हृदयात बाळगीत दिवस कंठतो. अनुकरणाचे काही नियम ठरलेले असतात. ' प्रत्येक शहाण्या माणसाने प्रतिष्ठेकरिता धडपडावे. ' हा त्यांतला सर्वांत प्रमुख असा नियम आहे.

' प्रतिष्ठेकरिता जगावयाचे, ' असे मातापित्यांनी ठरविल्यानंतर दोन पिढ्यांमध्ये विसंवाद का निर्माण होतो, हे सहज समजण्यासारखे आहे. अगोदर प्रतिष्ठेला एवढे महत्त्व का, हेच मुळी तरुण पिढीला समजत नाही. प्रतिष्ठेपासून मिळणारे फायदे त्यांच्या लक्षातच येत नाहीत. एखादा मनुष्य धापा टाकीत सारखा धावतो आहे, पण तो कशाकरता हे मात्र लक्षात येत नाही, अशा वेळी आपण जसे आश्चर्याने त्याच्याकडे पाहात राहू, तसे तरुण पिढीचे होते, ते स्तिमित होऊन नुसते पाहात राहतात. तरुण पिढीच्या निरीक्षणाची ही पाहिली अवस्था आहे.

प्रतिष्ठा हाच जीवनहेतू ठरला की मग ती मिळविण्याची साधने सहज

समजू लागतात. धनप्राप्ती, सत्तासंपादन, जाहिरातबाजी वगैरे काही ठळक साधने माणसाला तेव्हाच सुचतात. भोवताली इतकी माणसे या साधनांचा वापर करीत असतात की, मठ्ठातल्या मठ्ठ माणसाच्या डोक्यातही हा विषय तेव्हाच भरतो. तरुण पिढीला वरील माणसे अन्नसंपादनाकरिता जी खटपट करतात, ती सहज समजू शकते. पण 'प्रतिष्ठा' नावाचा पदार्थ इतका आवश्यक का, हे त्यांना समजत नाही. तसेच कित्येक वेळा अन्नसंपादन व प्रतिष्ठासंपादन यांचे बेमालूम मिश्रण कसे झालेले असते, तेही त्यांच्या ध्यानात येत नाहीं.

ते काहीही असो, प्रतिष्ठा हवी हे एकदा निश्चित झाल्यावर जीवनाचा मोहराच बदलतो. 'आपण जे जे करतो ते प्रतिष्ठेच्या चौकटीत बसत आहे ना ?' एवढी एकच पृच्छा मन सदैव करू लागते. कोणाशी बोलावे, काय बोलावे, कोठे बोलावे, हे सर्व हा प्रतिष्ठा सिद्धान्तच ठरवतो. त्यामुळे जीवनात इतक्या निरर्थक कृतींची व उक्तींची भर पडते की बोलता सोय नाही. नैसर्गिक वागणे थोडे, पण देखावाच फार, अशी स्थिती होते. जीवन म्हणजे एक कवाईत, असा प्रकार होतो. ही कवाईत ज्यांच्या अंगवळणी पडलेली नसते त्या तरुणांना ती जमत नाही. "पण ती शिकाच का ?" असा प्रश्न त्यांना सतत सतावीत असतो. शिवाय ही कवाईत करताना बऱ्याच वेळा खोटे बोलावे अथवा वागावे लागते. ते त्यांना सहन होत नाही.

आणखी एक बाजू तरुणांच्या दृष्टीस पडते. प्रतिष्ठा राखताना वडील माणसे कशाला तरी भीत आहेत, असे दृश्य दिसते. जो स्वतः भ्यालेला नसतो, त्याला दुसरा भीतिग्रस्त माणूस हास्यास्पद वाटतो. त्यांच्या सर्व कृती अगदीच चमत्कारिक वाटतात. आईबापांविषयी हल्लीच्या तरुण पिढीत आदराची भावना दिसत नाही, याचे एक कारण हे आहे. तरुणांना जोपर्यंत भीतीने स्पर्श केलेला नसतो तोपर्यंत त्यांना पुढील

उताऱ्यात कृष्णमूर्तींनी दर्शविलेली विविध प्रकारची भीती समजूच शकत नाही.

" There is intelligence when you are not afraid. And when are you afraid ? Fear comes when you think of what people may say about you you, are afraid of being criticized......... If you have fear, you are bound by tradition, you follow some leader or Guru. When you are bound by tradition, when you are afraid of your husband or your wife, you lose your dignity as an individual human being."

( Life Ahead, P. 28–29 )

प्रौढ माणसे सदा भेदरलेली असतात, असे जेव्हा एखाद्या कुटुंबातल्या तरुण मुलांना दिसते, तेव्हा त्यांच्या हृदयातून गुरुजनांविषयीचा आदर पळच काढतो, असे म्हटले तरी चालेल. मुलांच्या चाणाक्ष नजरेतून हे व्यंग सहसा सुटत नाही. विशेषतः खरे बोलण्यास व सरळ वागण्यास आपले आईबाप भितात असे जेव्हा त्यांना कळते, तेव्हा तर कडेलोटच होतो.

थोडक्यात म्हणजे प्रतिष्ठेवर आधारलेली कुटुंबव्यवस्था ( अथवा समाज ) जोपर्यंत चालू आहे, तोपर्यंत जुनी पिढी व नवी पिढी यांचे दरम्यानचा विसंवाद कायमच राहणार. ज्ञात इतिहासाच्या सुरुवातीपासून 'प्रतिष्ठा' हे मूल्य जतन करण्याच्या आधारावरच कुटुंबसंस्था राबविली गेली, असे दिसते. म्हणूनच पुरातन काळातही सुरुवातीस दर्शविल्याप्रमाणे दोन पिढ्यांत हल्लीइतका तीव्र संघर्ष नसला तरी नाराजी होतीच असे दिसते.

श्रीमंत कुटुंबातला एखादा तरुण मुलगा अकिंचन घराण्यातल्या

मुलीशी लग्न करावयाचे जेव्हा ठरवितो, तेव्हा प्रतिष्ठेचा प्रश्न येतो. हे लग्न नामंजूर का हे त्या तरुणाला समजतच नाही. हुंड्याचा विषय भरीस असला तर अडचणी आणखी वाढतात. पण तो नसला तरी "आमच्या तोडीचे हे घराणे नाही," असे सरळ सांगून आई-बाप मोकळे होतात. तरुणाने आपलाच आग्रह चालविला की, "या नव्या पिढीला आमच्याविषयी आदर वाटत नाही. आम्ही सोसलेले कष्ट यांच्या खिजगणतीत नाहीत. कृतज्ञतेचा स्पर्शही यांच्या मनाला नाही." असे उद्गार निघतात. एकूण असे दिसते की, मुलांच्या सुखापेक्षा कुटुंबाची तथाकथित प्रतिष्ठा मातापित्यांना अधिक प्यार असते. हे समजल्यामुळे जो कडवटपणा तरुणांच्या मनात निर्माण होतो, तो हल्लीच्या काळात परस्परांच्या संबंधाला मोठा धोका आहे.

"जे लग्न प्रतिष्ठेच्या चौकटीत बसते तेच खरे लग्न, नाहीतर तो स्वैराचारच!" अशी कल्पना आईबापांची असते की काय, कोणास ठाऊक! पण हे इतक्या स्पष्टपणाने कोणी बोलून न दाखविले तरी 'लग्न' या घटनेसंबंधी दोन पिढ्यांचे दृष्टिकोण कधीच जमत नाहीत. पण विवाहाने कोणते नाते अभिप्रेत असते व प्रत्यक्षात होते कोणते, हा स्वतंत्र विषय आहे. प्रतिष्ठेची कल्पना दोन पिढ्यांमधले संबंध कशी बिघडवते, एवढेच आज आपणांस पाहावयाचे आहे.

"समाजात मला अथवा माझ्या घराण्याला एक विशिष्ट दर्जा असला पाहिजे," असे जेव्हा मी म्हणतो, तेव्हा माझ्या जीवनात किती अनैसर्गिक गोष्टी शिरतात, हे पाहण्यासारखे आहे. माझी नजर सारखी दुसऱ्या कोणाकडेतरी असते. शेजारच्या शेटजीची हवेली, त्याची मोटार, त्याच्याकडची बड्याबड्यांची वर्दळ, हे सर्व पाहून मी सारखी तुलना करू लागतो. घराचा उपयोग निवाऱ्याकरिता आहे. ऑफिसला चालत अथवा सायकलीवरही जाता येते, वगैरे गोष्टी मी विसरतोच.

माझ्या घरात मिळणाऱ्या अन्नाची किंमत ते माझी भूक भागवते यात आहे; ते शेजारच्या घरातल्यासारखे आहे का नाही यात नाही, हेही मी विसरतो. एकूण होते काय, तर माझ्या घरात जे जे होते ते ते सर्व, प्रत्येक वेळी इतर कशाशी तरी ताडून पाहिले जाते. स्वतंत्र अशी किंमत प्रत्येकाच्या जीवनाला आहे, हे लक्षातच येत नाही. माझे जीवन, 'प्रतिष्ठा' या एका असत्य केंद्रबिंदूभोवती फिरत राहिल्यामुळेच मुलांशी खरे संबंध ( real contact ) राहत नाहीत. माझ्या स्वतःच्या प्रतिमेशी ( image ) जुळणारी अशी प्रतिमा, मी माझ्या अपेक्षांच्या मदतीने मुलांबद्दल निर्माण करतो. त्या प्रतिमेत कोठे उणेपणा आढळला की मी अस्वस्थ होतो. या उणेपणाबद्दल फिकीर न करणारा मुलगा असला, तर त्याच्याबद्दलचे माझे प्रेम आटूनच जाते. जर तो मुलगाही प्रतिष्ठेचा पूजक असला, आणि पित्याने हृदयात बाळगलेल्या प्रतिमेबरहुकूम वागत असला, तर संघर्ष निर्माण होत नाही. उलट, 'अत्यंत सच्छील व आज्ञाधारक' अशी बिरुदे त्याला बहाल करण्यात येतात व असा मुलगा असल्यामुळे माझी समाजातली प्रतिष्ठा अधिकच वाढते. 'परस्परं भावयन्तः' असे हे नाते आदर्श समजले जाते. कारण समाजातली सर्वच माणसे प्रतिष्ठेची गुलाम असतात. प्रतिष्ठागंडाने ( Prestige Complex ) मला पछाडले नसते तर, "हल्लीची पिढी फारच बिघडलेली आहे" अशी तक्रार मी इतक्या सहजपणाने केली असती काय, हा विचार करण्यासारखा प्रश्न आहे.

प्रतिष्ठापूजनाबद्दल दोन पिढ्यांत नुसता मतभेदच असता तर इतके बिघडले नसते. पण हे पूजन करणारी माणसे, 'खरी माणसे' अशी राहातच नाहीत मुळी. हे विधान अतिशयोक्तीचे वाटेल. पण अशा माणसांकडे लक्षपूर्वक पाहिले तर काय दिसते? कशातही रस न घेणारी आत्मकेंद्रित माणसे, बहुतेक जुन्या पिढीतच दिसतात. त्यांच्यातला

जिवंतपणा मावळला असला तरी आक्रस्तळेपणा कायम असतो. तरुण पिढीकडून लहानशी जरी चूक झाली तरी ती भयग्रस्त होतात. स्वतः- भोवती उभ्या केलेल्या कवचात थोडीसुद्धा फट त्यांना खपत नाही. या कवचाची जपणूक ते फार काळजीपूर्वक करतात. नव्हे, एवढे एकच ते करतात. यामुळे बाहेर ज्या घटना घडत असतात, त्यांचा अर्थच त्यांच्या लक्षात येत नाही. तरुण पिढीचा त्या नव्या घटनांशी संबंध असतो, म्हणून त्यांचे वर्तनही त्यांना समजत नाही व म्हणूनच खपत नाही. विसंवादाचे हे आणखी एक कारण आहे. वरील कवच कसे निर्माण होते, याबद्दल कृष्णमूर्ती म्हणतात –

" Respectability is a curse; it is " an evil " that corrodes the mind and heart. *It creeps upon one unknowingly and destroys love.* To be respectable is to feel suceessful to carve for oneself a position in the World, to build around oneself a wall of certainty, of that assurance which comes with money, power, success, capacity or virtue...... The respectable are on the defensive, fearful and suspiciou's. *Fear is in their hearts, so anger is their righteousness;* their virtue and piety are their defence. They are as the drum, empty within but loud when beaten. The respectable can never be open to reality, for like the despised they nre enclosed in the concern for their own self-improvement. Happiness is denied to them, for they avoid truth. "

आपणांस समाजात विशेष प्रतिष्ठा आहे असे वाटावयास लावणारा दर्जा ज्यांना लाभला आहे, त्यांचा तरुण पिढीशीं होणारा संघर्ष अधिक

तीव्र असतो. समाज ज्यांना असा दर्जा बहाल करीत नाही ते मुलांशी वागताना कमी कठोर दिसतात असे विधान केले तर ते धाष्ट्र्याचे होईल काय ?

आई-बाप व मुले यांच्या संबंधात आणखी एक महत्त्वाचा धागा आहे. " आत्मा वै पुत्रनामाऽसि " या वचनात त्याचा उल्लेख आहे. वडील माणसे तरुणांच्या उच्छृंखल वर्तनामुळे इतकी घायाळ का होतात, याचे उत्तर वरील वचनात आहे. मुलांना आत्मतृप्तीचे ( Self-fulfilment ) साधन समजणारे आईबाप सर्वत्र आढळतात; व हे अगदी नैसर्गिक आहे असे त्यांना वाटते. शैशवाची अवस्था मागे टाकलेल्या बालकाच्या अज्ञानी आईकडे पाहिले तर आत्मतृप्तीचा उपद्रव ध्यानात येईल. ती सारखे त्याचे मटामट मुके घेत असते व तो तिच्या मिठीतून सुटण्याची धडपड करीत असतो, असे दृश्य पुष्कळदा दिसते. याचा अर्थ काय ? ती आई स्वतःच्या 'तृप्तीचे साधन' म्हणून त्या मुलाला मानते, नाही का ? हे सहज अभावितपणाने घडते. अगदी हाच प्रकार प्रौढ अथवा वृद्ध मातापित्यांच्या जीवनात होतो. तो कसा होतो इकडे वळण्यापूर्वी 'आत्मतृप्ती' म्हणजे काय हे कृष्णमूर्तींच्या मदतीने प्रथम समजून घेऊ.

" To seek fulfilment is to invite frustration. There is no fulfilment of the self, but only the strengthening of the self through possessing what it craves for. Possession at whatever level, makes the self feel potent, rich, active, and this sensation is called fulfilment, but as with all sensations, it soon fades, to be replaced by yet another gratification ......... After all fulfilment is complete identification with something–with children, with property, with

ideas. *Children and property are rateer risky* but ideas offer greater safety and security."

( Commentaries. ) ( P. 81-82)

" मुलांची संगती आत्मतृप्तीकरिता आम्हांला हवी, " असे कोणतेच आईबाप कबूल करणार नाहीत. पण पुष्कळदा हे सत्य असते. फारच थोड्या लोकांच्या जीवनाला स्वतंत्र असा अर्थ असतो. काहीतरी मजजवळ असल्यामुळेच मी स्वतःला सुखी समजू लागलो तर कसल्या भयंकर चक्रात मी अडकतो, हे माझ्या अजिबात ध्यानात येत नाही. मुलांचा सहवास, त्यांचे शब्द, त्यांचे येणे-जाणे, बसणे-उठणे, त्यांनी माझ्याकडे पाहणे व मी त्यांच्याकडे पाहणे यातच माझे सारे जीवन साठले जाते. त्याशिवाय जी मजजवळ उरते, ती फक्त शरीराची यांत्रिक हालचाल, खाणेपिणे, झोपणे वगैरे. ही जी एकरूपता (identficatlion ) मातापित्यांच्या मनात निर्माण होते, ती सुरुवातीस जरी नैसर्गिक वाटली तरी ती जसजशी वाढत जाते तसतसे तिचे स्वरूप इतके हिडीस बनते, की विचारता सोय नाही. विशेषतः वार्धक्यात ही आत्मतृप्तीची वासना कहरच करते. मातापित्यांच्या लक्षात येत नाही की, " मुले आपणाला सारखे टाळीत का आहेत ?" त्यांचे जग निराळे असते, हे सांगूनही त्यांना पटत नाही. मग आपणाकडे त्यांचे दुर्लक्ष होत आहे, अशी बोचणी त्यांच्या मनाला त्रस्त करते व वैफल्याची भावना त्यांना ग्रासते.

'आत्मतृप्ती ' ही एक वासना आहे, अंतःकरणातल्या 'मी'चा तो एक भोग आहे, हे मातापित्यांच्या ध्यानात ज्या दिवशी येईल, तो दिवस जुनी पिढी व नवी पिढी यांच्या संबंधात क्रांती करणारा सुवर्णदिन ठरेल, असे मला वाटते. या दोन पिढ्यांमध्ये जे अनेक प्रकारचे संघर्ष वाढीस लागतात, त्यांचे परिणत स्वरूप पाहिल्यावर आपली बुद्धी कुंठित होते.

त्यांच्यावर उपाय काय हे सुचतच नाही. मग या संभ्रमावस्थेत काही-तरी वरवरचे उपाय केले जातात. पण रोगाचे बीज सापडले तरच तो दुरुस्त होण्याची आशा, नाही का?

'मी' हेच एक असमाधान आहे. पण आश्चर्य असे की, ज्या ज्या घटनेतून अथवा संबंधातून (relationships) त्याला खाद्य मिळते, त्या त्या घटना व ती ती नाती, या 'मी' ला अत्यंत महत्त्वाची वाटतात. "आता मी संतुष्ट होणार," अशी खात्री त्याला वाटू लागते. "या संतोषाच्या मृगजळाकडे मला धावू द्या," अशीच विनवणी आपले मन सदा करीत असते. कशावर तरी चित्ताने विसंबून राहावे, तो आधार म्हणजेच सगळे जीवन समजावे, आणि तो आधार निसटला की पस्तवावे, व जीवनात वैफल्याशिवाय दुसरे काही नाहीच, असे आक्रंदन करावे, अशीच रीत सगळीकडे दिसते. परावलंबन म्हणजेच जीवन अशी आपली व्याख्या आहे. या परावलंबनालाच आपण 'प्रेम' हे नाव दिले आहे; व अवलंबनाची सोय कायम कशी राहील इकडेच आपले सर्व लक्ष आहे. "या प्रेमाची प्राप्ती (म्हणजे सोय) मला झाली नाही, म्हणून माझे जीवन अगदी शुष्क, नीरस व बेचव झाले आहे," अशी तक्रार करणारे सर्वत्र आढळतात. कोणताही आधार कायम टिकणारा नसतो; काळाच्या ओघात तो केव्हा ढासळेल, याचा नेम नसतो. जरी तो बराच काळ कायम राहिला, तरी तो 'पडेल काय?' ही सारखी वाटणारी भीती खरे म्हटले तर त्या आधाराचा आधारपणाच नष्ट करीत असते, हे कोणाच्या लक्षातच नाही.

अवलंबन (dependence) म्हणजेच मुलांबद्दलचे प्रेम, असे एकदा वाटू लागले की मग पुढे काय होते, हे पाहण्यासारखे आहे. मुले ही आत्मतृप्तीची फक्त 'साधने' बनतात, व हीच गोष्ट त्यांना खटकते. नवीन सुनेला बरोबर घेऊन तिला आपल्या मैत्रिणींना दाखवीत हिंड-

णारी सासू नजरेपुढे आणा. त्या दृश्यात सुनेला स्वतःचे असे काही तरी स्थान असते का? मुळीच नाही. एखाद्या उमद्या घोड्यावर बसणारा स्वार, स्वतःलाच सगळे महत्त्व देतो, तो घोडा त्याच्या खिजगणतीत नसतो. अगदी तसाच प्रकार त्या सासूचा असतो. तिची प्रतिष्ठा वाढविण्याकरताच ती सून बरोबर असते, दुसरे काही नाही. हे उदाहरण किरकोळ असले, तरी आत्मतृप्तीचा सूक्ष्म धागा आपणांला त्यात पकडता येतो. हाच धागा, आईबाप आणि मुले यांच्या संबंधात सर्वस्व होऊन बसला, तर मुलांना जो विषाद वाटतो तो समजून घेतला पाहिजे. पण हा अवघड विषय पुढच्या प्रकरणावर सोपवू.

'आत्मतृप्तीचे साधन' म्हणूनच मुलांकडे आईबाप पाहू लागले तर पहिला परिणाम असा होतो की, मुलांना आपल्या कुटुंबाच्या दैनंदिन जीवनात मुळीच रस वाटत नाही. घरात त्यांचे चित्त रमत नाही. ते सारखे बाहेर बाहेर करू लागतात. बाहेरच्या वातावरणात त्यांचा काळ किती जातो, हा प्रश्नही तितका महत्त्वाचा नाही. 'घरात खरे आपले कुणी नाही,' अशी भावना त्यांना घेरू लागते. आईबाप आपल्या आवडीनिवडीकडे अजिबात लक्ष देत नाहीत, अशी पुसट का होईना शंका ज्या क्षणाला मुलांच्या मनात येते तो क्षण मला वाटते, माता-पित्यांच्या व मुलांच्या, दोघांच्याही आयुष्यात फार महत्त्वाचा असतो. कारण, याच क्षणापासून मनाने ते एकमेकांपासून अलग होऊ लागतात. परस्परांची साथ सुटते ती तेव्हापासूनच. गैरसमजाला प्रारंभ येथूनच होतो. कोणतीच पिढी मग दुसरीला समजून घेण्याच्या मनः-स्थितीत राहत नाही.

मुलांना काय आवडावे, जीवनात कोणत्या गोष्टींना त्यांनी महत्त्व द्यावे, याबद्दलचे काही नियम आहेत काय? असलेच तर ते कुणी घालून दिले आहेत?

“ मातापित्यांचा अनुभव, त्यांनी काढलेले जास्त पावसाळे यांचा काहीच उपयोग नाही काय ? ” असा प्रश्न वाचकांच्या मनात उभा राहिला असेल. ‘ विशेषतः व्यवसायाच्या बाबतीत तरी वृद्धांचे तरुणांनी का ऐकू नये ? ’ असे वाटणे स्वाभाविक आहे. ही एक अवघड समस्या आहे. ‘ तरुणांचे जीवन एखाद्या फुलासारखे मानले तर त्या फुलाने वेलीपासून मिळणारा जीवनरस का नाकारावा ? ’ अशी पृच्छा करता येईल, व ‘ त्या फुलाने हा रस झिडकारून, वाळून जाण्याचाच आग्रह का धरावा, ’ असा पुढचाही प्रश्न विचारता येईल. पण मला वाटते की, कोणत्याच दोन मानवांचे जीवन इतके परस्परावलंबी नसते. पित्यापासूनच मुलाला जीवन लाभते हे फक्त अल्पांशाने खरे आहे. प्रत्येक जीवनाला स्वतंत्र असा अर्थ आहे, म्हणूनच प्रत्येकाचा आनंद हा अगदी निराळा आहे, ‘ पिंडे पिंडे मतिर्भिन्ना ’ हे वचन विसरता येत नाही. ”

संघर्षाला सुरुवात का व कशी होते हे आता सहज लक्षात येईल. जुन्या पिढीला वाटते की, मुलांचे पोषण करून त्यांना स्वतःच्या पायावर उभे करणे, हे आपले निसर्गप्राप्त कर्तव्य आहे. पण मुलांनी स्वतःच्या पायावर उभे राहिल्यावर कोणत्या दिशेकडे चालू लागावयाचे, हेही मातापित्यांनीच ठरवायचे काय ? त्यांच्या चालण्याचा वेग कुणी ठरवावयाचा ? आणि हे सर्व आम्हीच मुलांच्या हिताकरिता ठरविणार, असे जर वृद्धजन म्हणत असतील तर अनेक अडचणी दिसू लागतात.

‘ मुलांचे हित कशात आहे ? ’ हा प्रश्नसुद्धा वाटतो तितका सोपा नाही. व्यवसायापासून होणारी धनप्राप्ती इतका संकुचित अर्थ जरी ‘ हित ’ या शब्दाचा घेतला तरी जो व्यवसाय आवडत नाही तो माणसाला किती दिवस करता येईल ? व्यवसायाचे मतभेद हा जुन्या-नव्या पिढीमधल्या वादाचा फारच लहानसा भाग आहे. हे मतभेदसुद्धा

' घराण्याच्या अथवा माझ्या प्रतिष्ठेला अनुरूप व्यवसाय मुलाने केला पाहिजे, ' या आग्रहातून पुढे येत असतील, तर मुलाच्या चरितार्थापेक्षा दुसरीच कशाची तरी काळजी मला आहे हे उघड नाही का ? 'प्रतिष्ठा' जास्त प्रिय का मुले प्रिय, असा प्रश्न यातून उत्पन्न होतो.

' पित्याचा व्यवसाय ' त्याची संपत्ती अथवा मिळकत, यांचेशी निगडित असणारे मुलांबद्दलचे प्रश्न, ' हा विषय मुलांच्या दृष्टिकोणातून पाहणे जास्त सोयीचे होईल, म्हणून तो थोडा वेळ बाजूला ठेवू.

मुलांना स्वतःचे स्वतंत्र जीवन कायम ठेवून कुटुंबात राहता येते का नाही ? या एका प्रश्नाचे ' होय, ' असे उत्तर ज्या कुटुंबातून मिळते, तीच कुटुंबे सुखी असण्याचा संभव आहे. दुसऱ्या प्रकारची कुटुंबेही बाहेरून सुखी दिसतात. ज्या कुटुंबातली शिस्त इतकी कडक आहे की, बापाच्या वाऱ्यालासुद्धा मुलगा उभा राहत नाही, ते कुटुंबही ' सुखी ' वाटते. पण अशा कुटुंबांतली तरुण पिढी ही फक्त रबरी शिक्क्यासारखी असते. तिचे काम वृद्धजनांच्या इच्छांची तामिली करणे एवढेच. अशा कुटुंबांत भांडणे होत नाहीत. आल्यागेल्यांचे स्वागत चांगले होते. सूक्ष्म निरीक्षकांनाही कर्कश शब्द अथवा आदळआपट ऐकू येत नाही. " आज्ञाधारक मुले असणे हे एक भाग्य आहे, " असे उद्‌गार स्वतःशीच काढीत आलेला पाहुणा परत जातो. त्या कुटुंब-प्रमुखाचा त्याला हेवाही वाटतो. हे सर्व ठीक होते. पण एकांतात त्या पित्याची गाठ घ्या व त्याला विचारा, तो खिन्न मुद्रेने सांगेल की, ' काय करावे ? या मुलांना स्वतंत्र कर्तृत्व नाही. नुसते सांगकामे, यांचे पुढे कसे व्हावे ? ' ' एकूण काय, तर जरी संघर्ष नसला तरी आईबाप व मुले यांच्या या संबंधात व्यथा भरपूर असते. ती व्यथा मातापित्यांच्या हृदयात जशी तळाशी असते, तशीच ती मुलांच्याही मनात असते. कोणत्यातरी शिस्तीचे गुलाम झाल्यामुळे, अथवा

आईबापांविषयीचे प्रेम म्हणजे उपग्रहांसारखे त्यांच्याभोवती सारखे फिरत राहणे अशी चुकीची कल्पना करून घेतल्यामुळे. या घरातली तरुण पिढी अगदीच निष्प्रभ अथवा बेचव असे जीवन जगत असते. या संबंधामध्ये क्वचित्प्रसंगी स्फोट होण्याचाही संभव असतो, पण एकदा का हे जीवन अंगवळणी पडले की, मग जन्मभर ही कवाईत बिनबोभाट करणारी मुलेही दिसतात. मुद्दयाची गोष्ट अशी की, या कुटुंबातल्या दोन्ही पिढ्यांना जगण्यात राम वाटत नाही.

एकूण असे दिसते की, वृद्धजनांनी नुसत्या प्रतिष्ठेचीच कदर केली, कल्पनेतून नानाप्रकारची भये उत्पन्न करून भेदरलेल्या अवस्थेत जगावयाचे असे ठरविले, आणि यामुळे जीवन नीरस आणि यांत्रिक बनवून टाकले तर जुन्या पिढीविषयी नव्या पिढीला आत्मीयता न वाटणे अगदी स्वाभाविक आहे. जुन्या पिढीचे हे आत्मकेंद्रित वर्तन नवीनांच्या मनात उबग उत्पन्न करते. रोगाचे बीज इथे आहे. ‘ वृद्ध माणसे ही त्यांना मिळालेल्या शिक्षणाची व त्यांचेवर झालेल्या संस्काराची गुलाम आहेत, ती एकापरीने अगदी असाहाय्य आहेत. त्यांना समजून घेणे अगत्याचे आहे. ’ असा सुविचार प्रत्येक तरुणाच्या मनात उद्भवेलच अशी अपेक्षा का करावी ? मनात उत्पन्न होणारा ‘ उबग ’ एखादा तरुण विवेकाने काही काळ दाबून टाकील. पण बहुतेकांच्या मनात त्या उबगाचे रूपांतर संतापात अथवा द्वेषात होणे शक्य आहे, हे विसरता येत नाही.

“ पुत्र म्हणजे माझी प्रतिमाच. मला जे हवे वाटते ते देणारी व्यक्ती म्हणजे पुत्र ” असा आग्रह जोपर्यन्त मातापित्यांच्या हृदयात आहे, तोपर्यंत त्यांचेविषयी खरा आपलेपणा तरुणांना वाटणे अवघड आहे. याचा अर्थ असा की, स्वार्थी वृत्ती हीच पितापुत्रसंबंधाची वैरीण आहे. ही वृत्ती निःशेष होऊन ‘ मी कोणी नाहीच, ’ ‘ पुत्र माझा ’ असे

म्हणण्यापेक्षा एक स्वतंत्र व्यक्ती म्हणून तो मजपुढे उभा आहे, त्याला वस्तुनिष्ठ पद्धतीने (objectively) मी समजून घेईन. एका अर्थाने 'पुत्र' नावाच्या व्यक्तीशी मी इतका समरस होईन की, जागेवर फक्त 'पुत्र' उरेल किंवा तोच माझा 'आत्मा' होईल. माझा निराळा 'स्व' कायम ठेवून मी त्याच्याकडे पाहणार नाही अशा वृत्तीने जर आईबाप मुलांशी संबंध ठेवू लागले तर एक क्रांतीच होईल. 'आत्मा वै पुत्रनामाऽसि' या वचनाचा अर्थच मग बदलेल.

"घरात आपले कुणी नाही आपणाला ओळखणारे अथवा सहसंवेदना असणारे माझे आईबाप नाहीत." असे उद्गार आतल्या आत तरुणाचे हृदय जेव्हा काढू लागते तेव्हाच. "मला काही हक्क आहेत की नाहीत ?" असाही प्रश्न आतून डोकावू लागतो. हक्काची भाषा सुरू झाली की हृदयाचा आवाज बंद पडतो. जुन्या-नव्या पिढीमधल्या परस्पर संबंधांची ही समस्या, हक्कांच्या क्षेत्रात नेऊन कधीच सुटणार नाही. सर्व हक्क, मग ते कोणाचे का असेनात–कधीही न संपणाऱ्या संघर्षाला जन्म देतात. संवेदनेची लक्ष्मणरेषा ओलांडल्याबरोबरच हक्कांचा प्रांत सुरू होतो. मिळकत, निर्वाहाची तरतूद, संपत्तीचे न्याय्य वाटप, मुलांची कृतज्ञताबुद्धी अथवा आईबापांचे मुलांविषयीचे कर्तव्य, अशा प्रकारच्या दृष्टिकोणातून हे नाते न पाहता, फक्त संवेदनेचाच निकष त्याला लावला पाहिजे.

आधुनिक युगाबद्दल इतर तक्रारी करण्यात अर्थ नाही. संवेदनेचे Sensitivity or affectli0n क्षेत्र आपण वरचेवर अधिक दृष्टीआड करीत आहोत, एवढा एकच रोग या युगाला जडला आहे. जुनी पिढी नव्या पिढीच्या अगोदर जन्माला आली, म्हणून आत्मकेंद्रित होण्याचे तिला विशेष हक्क आहेत, असे समजण्याचे काहीच कारण नाही. सेवा (service) व आज्ञाधारकपणा (obedience) यांची अपेक्षा जेव्हा वृद्धजन

करतात, तेव्हा त्यांच्या शारीरिक दुर्बलतेचाच प्रश्न तेथे नेहमी नसतो. माणसाला आत्मगौरव करून घेण्याचे अनेक मार्ग सुचतात. प्रत्येक प्रौढाने अथवा वृद्धाने स्वत:मधल्या अधिकार गाजविण्याच्या (desire to dominate) हौसेकडे लक्ष दिले पाहिजे. ही हौस कित्येकदा फार सूक्ष्म असते. "फक्त शरीराच्या गरजेतूनच मी सेवेची अपेक्षा करतो," अशी फसवणूक मी स्वत:चीसुद्धा कित्येक वेळा करू शकतो. महत्त्वाची गोष्ट अशी आहे की, हक्क म्हणून जेव्हा सेवा मागितली जाते, तेव्हा सेवकाला तीत किंचितही स्थान नसते. तो एक फक्त हत्यार बनतो. नंतर तरुण पिढीला आपल्या सुखसंपादनाची फक्त 'साधने' बनविण्याच्या आग्रहामुळे अनेक तंटे झालेले लेखकाने पाहिले आहेत.

उपनिषदातली एक गोष्ट येथे आठवते. "आम्ही वयोवृद्ध आहोत, आम्ही या मुलापासून धडे घेणार नाही." असे म्हणणाऱ्या वृद्धांची चूक त्यांच्या पदरात घालून फार मोठे तत्त्व त्या गोष्टीत सांगितले आहे. इसापनीतीतली प्रसिद्ध कथाही तेच सांगते. 'मानाची अपेक्षा सतत करणाऱ्या मनुष्याला मान काही कारणाने मिळेल; पण जिव्हाळा मिळणार नाही,' हे जुन्या पिढीने लक्षात ठेवले पाहिजे. 'जिव्हाळा' हा नेहमी समान दर्जाच्या व्यक्तींमध्ये असतो. उच्चनीच भाव कायम ठेवून प्रेम उत्पन्न करू पाहणे वेडेपणाचे आहे. 'कुटुंब–प्रमुख' यातला 'प्रमुख' शब्दच कुटुंबातल्या सौहार्दाला मारक होतो. सोयीकरिता कामाची वाटणी करताना अनुभव, कौशल्य यांना महत्त्व द्यावे लागेल; पण त्यामुळे मनात श्रेष्ठ–कनिष्ठभाव ( status ) उत्पन्न होता उपयोगी नाही. "कुटुंब सर्वांचे, प्रमुखाचे नव्हे," अशी भावना सतत जागृत असली तरच खरे सहकार्य मिळू शकेल. पण ही भावना शब्दापुरती न ठेवता हृदयात बाळगणे प्रौढांना व वृद्धांना फारच जड जाते. कारण, शेकडो

....२

वर्षांच्या संस्कारांनी, कर्त्यांच्या मोठेपणाकरिता व त्याच्या प्रतिमा-संरक्षणाकरिताच कुटुंब असे ठरून गेले आहे. कृष्णमूर्ती म्हणतात :

" As long as the family is a centre of security, there will be social disintegration. As long as the family is used as *a means to a self-protective end* there must be conflict and misery. Please do not look puzzled, it is fairly simple. As long as I use you or another for my inner psychological security. I must be exclusive. *I am all important, I have the greatest significance, it is my family, my property,* The relationship of utility is based on violence; the family as a means of mutual inward security, makes for conflilict and confusion."

( Commentaries on Living 11, P. 112.)

माझ्या प्रतिमेची रचना व रक्षण करण्याचे एक साधन, – बस्स, यापेक्षा माझ्या कुटुंबाला मी जास्त किंमत देत नाही. याचाच अर्थ असा की, कुटुंबाची अथवा मुलांची मी पर्वा करीत नाही. मी पर्वा करतो ती फक्त आत्मतुष्टीची, ती कुटुंबाच्या मदतीने.

अडचण अशी दिसते की, जीवनाला साचेबंद असा आकार प्राप्त होतो. तो मनात असतो. यालाच वरील उताऱ्यात Psychological security असे म्हटले आहे. आपण ज्या घरात राहतो, त्या घरालाही एक विशिष्ट असा आकार असतो. त्यातल्या खोल्या, अंगण, ठराविक ठिकाणी असतात. फर्निचरची मांडणीही ठरलेलीच असते. पण हा साचा फक्त सोयीकरिता जोपर्यन्त असतो, तोपर्यन्त फारसे बिघडत नाही; एवढेच नव्हे, तर घराचे दार रोज बदलले तर भलतीच अडचण होईल. पण जवळ जवळ अशाच प्रकारचा साचा, कुटुंबसंस्थेमुळे

मनात तयार होतो की काय, याचा शोध घेतला पाहिजे. त्या संस्थेची निर्मिती या हेतूने झालीही नसेल. पण माणसाचे मन ही एक अजब वस्तू आहे. जे मनाला दिले जाते, ते गच्च पकडून ठेवण्याची त्याला मोठी खोड आहे. कित्येक वेळा मन अशी युक्ती करते की, जुन्यालाच नवे रंग ते देते, जुन्याच्याच पायावर सबंध इमारत ते उभी करते; व सांगते की, "पाहा, अगदी पायापासून संपूर्ण नवी अशी वास्तू मी उभी केली आहे." जुन्या वस्तू अगदी 'नव्या,' 'अद्ययावत्' (Brand New) म्हणून खपविण्याची मनाची किमया ओळखली पाहिजे. कुटुंबसंस्थेचेच उदाहरण पाहा ना, अगदी अत्याधुनिक कुटुंबे जरी पाहिली तरी त्यात नवे असे नक्की काय असते? कपडे नवे, पेह-राव नवे, प्रसाधनाची साधने नवी, फार तर बोलण्याची भाषा नवी. बस्स, यापेक्षा काहीच नवे असे त्यांच्या जीवनात नसते. तेच हेवेदावे, आत्मगौरवाकरिता तीच धडपड, सत्ता गाजविण्याची तीच सनातन हौस, – महत्त्वाचे जे असते ते सारे जुनेच असते. इतके जुने की, त्याचा उगम आदिमानवाच्या काळातच सापडेल. कदाचित् पशूंचाही हा वारसा असू शकेल.

मला तर वाटते की, कुटुंबे अथवा समाज सुधारला असला तरी बदललेला नाही. याच कारणामुळे आश्चर्यकारक असे साम्य, कित्येक शतकांपूर्वीच्या समाजामध्ये व आजच्या समाजामध्ये एका प्रश्नापुरते आढळते. तो प्रश्न म्हणजे जुनी पिढी व नवी पिढी यांचे दरम्यानची खोल अशी दरी, हा होय. नवी पिढी ही खरोखर 'नवी' निदान सुरु-वातीस तरी असते; हे लक्षात न आल्यामुळेच वृद्धांना धक्के बसतात. वृद्धांचा प्रयत्न नव्या पिढीला जुनी करण्याचा सारखा चालू असतो. नव्या पिढीने जुनी मूल्ये स्वीकारली की संघर्ष समाप्त होतो.

जुने हे टाकाऊ असते; नव्हे ते केव्हा तरी टाकावेच लागते. पण

शक्य तेवढा अधिक काल ते टिकविण्याचा जो हास्यास्पद प्रयत्न वृद्ध पिढीकडून होत असतो, त्याचे कारण काय असावे ? मनात जो साचा तयार होतो तो कायम टिकविल्याखेरीज मी जगणार कसे, असा प्रश्न वृद्ध पित्याला पडतो. " ही चौकट फार जुनी आहे, कबूल पण मला ती आवडते म्हणून मी ती टाकणार नाही. " असा हट्ट उघड सांगितला तर तो कोण खपवून घेईल ? मग आणखी एक युक्ती केली जाते. ती ही की, जुन्याला सांस्कृतिक मूल्य ( value ) दिले जाते. " या मूल्यांची फक्त जपणूक आम्ही करीत आहो. आम्हांला स्वतःला काही नको. समाजाची धारणा तरी झाली पाहिजे ना ? " अशी बतावणी केली जाते. समाजाची मोडतोड व्हावी, असे लेखकाला म्हणायचे नाही. पण, "सनातन मूल्यांच्या नावाने नव्या पिढीशी युद्ध पुकारण्यात प्रामाणिकपणा आहे काय ? " असा प्रश्न विचारता येईल. युद्धाचे खरे हेतू जर जाहीर झाले, तर दुसरी बाजू फेरविचार करणार नाही का ? मग नवी पिढीही दुसऱ्या टोकाला जाणार नाही. पण हे सर्व ठीक घडून यावे, याकरिता आत्मसंशोधनाची गरज आहे. ती दोन्ही पिढ्यांना सारखीच आहे. खोल विचार केला तर, आत्मपूजनाच्या सोयीकरिताच संस्कृतिरक्षणाचा पुकारा केला जातो, असे दिसते. या सूक्ष्म विचाराचे महत्त्व, उपनिषद्कारांनीही ओळखले होते असे दिसते :–

न वा अरे पुत्राणां कामाय
पुत्राः प्रिया भवन्ति ।
आत्मनस्तु कामाय पुत्राः प्रिया भवन्ति ॥
न वा अरे वित्तस्य कामाय
वित्तं प्रियं भवति ।
आत्मनस्तु कामाय वित्तं प्रियं भवति ॥

न वा अरे क्षत्रस्य कामाय
क्षत्रं प्रियं भवति ।
आत्मनस्तु कामाय क्षत्रं प्रियं भवति ॥
न वा अरे लोकानां कामाय
लोकाः प्रिया भवन्ति ।
आत्मनस्तु कामाय लोकाः प्रिया भवन्ति ॥
न वा अरे देवानां कामाय
देवाः प्रिया भवन्ति ।
आत्मनस्तु कामाय देवाः प्रिया भवन्ति ॥

( बृहदारण्यकोपनिषद् )

" पुत्रांच्या हिताकरताच हे जरूर आहे. संपत्ति-रक्षणाचा आग्रह चुकीचा कसा म्हणता येईल ? आमच्या कुळाची प्रतिष्ठा मी धुळीस मिळू देणार नाही. समाज रसातळाला जावा असे का तुम्ही म्हणता ? देवधर्मनीती यांची अजिबात चाड नसणारा हल्लीचा तरुणवर्ग आहे." असे जुन्या पिढीचे उद्‌गार जेव्हा आपण ऐकतो तेव्हा त्यामागची खरी व्यथा काय असते ? पुत्र, वित्त, क्षत्रियधर्म, लोक ( समाज ) अथवा देव यांच्या रक्षणाची काळजी जेव्हा अशा तऱ्हेने केली जाते, तेव्हा ती खरोखर आत्मरक्षणाचीच असते हे फार स्पष्टपणे वरील उताऱ्यात सांगितले आहे. हे समजून घेणे जरूर आहे. वरून गोंडस दिसणारी मूल्ये ( खरे म्हटले तर निव्वळ शब्दच ! ) पुढे करून माणसाचा स्वार्थ जे शरसंधान सतत करीत असतो, ते नीट पाहिले पाहिजे. वर उल्लेख केलेल्या उताऱ्याच्या शेवटी "आत्मनि खल्वरे दृष्टे श्रुते मते विज्ञाते, इदं सर्वं विदितम् " असे वचन आहे. त्याचा अर्थ असा तर नसेल की, माणसाचा ' अहम् ' किती मोहक रूपे धारण करतो. हे ध्यानी आणा. मगच मनोनिर्मित खोट्या मूल्यांचा अभिनिवेश तुम्हांला भलतीकडे नेणार नाही ! "

वरील उताऱ्यातला ' आत्मा ' हा शब्द कोणत्या अर्थाने घ्याव-याचा याबद्दल मतभेद होणे शक्य आहे. श्रीशंकराचार्यांच्या भाष्यात, ' तस्मादात्मप्रीतिसाधनत्वात् गौणी अन्यत्र प्रीतिरात्मन्येव मुख्या, ' असे एक वाक्य आहे. त्याचा मागोवा घेतला आणि स्वतःचा अनुभव पाहिला तर ' मी ' व ' माझे ' यावर असलेल्या आपल्या प्रेमामुळेच सर्व काही आपणाला प्रिय वाटते असा अर्थ घेणे सरळ वाटते. श्री-शंकराचार्यांना, ही ' स्वार्थी प्रीती ' सुद्धा आत्म्याच्या अस्तित्वाचा पुरावा वाटते. मात्र शुद्ध आत्म्याचा – सर्पाप्रमाणे भासणाऱ्या रज्जूचा – शोध घेतला पाहिजे असे जेव्हा ते म्हणतात, तेव्हा भ्रमातून उत्पन्न होणाऱ्या ' अहम्'चाही शोध घेणे. क्रमप्राप्तच होते. मग त्यांच्या भाष्यांशी कसलाच विरोध येत नाही. कोणता अर्थ बरा हे ज्याचे त्यानेच ठरवायचे आहे.

यापुढचा प्रश्न असा आहे की, वडीलधाऱ्या मंडळींनी कोणताही आग्रह धरला नाही, तर कुटुंब चालू शकेल काय ? शिस्तीचे बंधन सुटले, तर कुटुंब विस्कळीत होणार नाही कां ? का कुटुंबसंस्थेची उप-युक्तताच लेखकाला मान्य नाही ? प्रथमच हे सांगून टाकले पाहिजे की, कुटुंबाची निर्मिती काही नैसर्गिक व मूलभूत प्रेरणांतूनच झालेली आहे. पण ' स्व ' संरक्षणाकरिता (protecting the self ) व 'स्व'संवर्धना-करिता निसर्गाला राबविण्याची कला, फार मागेच माणसाने आत्मसात् केली आहे. निसर्गाचा शुद्ध प्रवाह दूषित करून तो भलतीकडे कसा वळवावा, हेही माणूस शिकला आहे. समाज त्याला या कामात सारखी मदत करीत असतो. देहसंरक्षणापासून सुरुवात झाली. पण तो मुक्काम मानवाने केव्हांच मागे टाकला आहे. त्याला आता प्राणांपेक्षाही कीर्तीचे महत्त्व अधिक वाटते, आणखीही इतर आगंतुक गोष्टी माणसाच्या जीवनात शिरल्या आहेत. आत्मगौरव आढळणाऱ्या या सर्व गोष्टी दूर

फेकून देऊन कुटुंबाची नवी रचना करता येईल काय ? ती करताना कोणती शक्ती आपल्या उपयोगी पडेल ? कृष्णमूर्ती याबद्दलची दिशा दाखवितात ती अशी :

" Using another as a means of satisfaction and security is not love. *Love is never security*; love is a state in which there is no desire to be secure; it is a state of vulnerability; it is the only state in which exclusiveness, enmity, and hate are impossible. in that state a family may come into being. but it will not be exclusive. self-enclosing... Love is, when the cunning, self-enclosing mind is not."

( Commentaries II, p. 112–113 )

प्रेमाच्या पायावर कुटुंबाची इमारत उभी राहू शकेल काय? आपल्याला वाटते की, ही इमारत पक्की ( invulnerable ) होणार नाही. 'भक्कम व मजबूत' हा जुन्या पिढीचा परवलीचा शब्द आहे. 'स्थैर्याशिवाय जमणार कसे ?' असा तिचा ठराविक प्रश्न आहे. देहधारणा तर झालीच पाहिजे, हे कोणीही कबूल करील. पण 'माझ्या मनातल्या अंतर्देहाला ( Image ) जरासुद्धा धक्का लागता कामा नये.' या दुराग्रहातूनच जुन्या पिढीचे नव्या पिढीशी भांडण सुरू होते; व ते एकदा सुरू झाले की कधी संपतच नाही.

आतापर्यंतचे विवेचन वाचून जुन्या पिढीतले वाचक नक्कीच नाराज झाले असतील. काहीजण तर म्हणतील, 'ही चालू युगाची रीतच आहे ! जुन्या पिढीला कुणीही धोपटावे, असा आजचा जमाना आहे. न्याय नव्या पिढीला द्यावयाचा; जुन्यांना विचारतो कोण ? 'उद्योन्मुख पिढीची मुस्कटदाबी करण्याचा गुन्हा' आम्ही करतो ना ? जणू काय

आमचेवर नव्या पिढीचे आक्रमण होत नाही ? आम्हांला तरुण पिढीचा जाच होत नाही, अशी का या अलीकडच्या लेखकांची समजूत आहे ? बरे, आम्ही तो सोसूही, पण तरुणांना मन मानेल तसे वागू दिल्या-मुळेच केवळ त्यांना खरे जीवन लाभेल काय ? साधी माणुसकीची भावना तरी तरुणांत दिसते काय ? ते स्वतः तरी सुखी आहेत काय ? असमाधान, संघर्ष त्यांना हैराण करीत नाही का ? '

वृद्ध वाचकांचे हे प्रश्न फारच महत्त्वाचे आहेत. त्यांची उत्तरे शोधल्याखेरीज ' प्रेमाधिष्ठित कुटुंबाची रूपरेषाही रेखाटता येणार नाही. म्हणून प्रथम नव्या पिढीचे चुकते कुठे, इकडेच वळले पाहिजे.

नव्या पिढीचे चुकते कुठे, हा शोध घेण्यास सुरुवात करण्यापूर्वी कृष्णमूर्तींचे एक महत्त्वाचे वाक्य डोळ्यांपुढे ठेवणे जरूर आहे. ते वाक्य असे :

"As long as I love you because you feed me, you flatter me, you do this or that for me, it is not love."

तुम्ही मजकरता जे करता, त्यातूनच जर माझ्या तुमच्याविषयीच्या प्रेमाची उत्पत्ती होत असेल तर ते खरे प्रेमच नव्हे, असे कृष्णमूर्ती बजावतात. पण अशा स्वार्थी प्रेमावरच कुटुंबसंस्थेची इमारत हल्ली उभी असलेली आपणाला दिसत नाही काय ? देवाण-घेवाणीच्या तत्त्वावर अथवा सौदेबाजीवर आईबाप व मुले यांचे दरम्यानचे संबंधही अवलंबून राहावेत, यासारखी शोकांतिका दुसरी कोणती असू शकेल ? अडचण अशी आहे की, जे सुरुवातीला नैसर्गिक असते तेच पुढे स्वार्थाने गढूळ होते. हे कसे होते, ते कळतसुद्धा नाही. पण आत्मी-यतेच्या प्रवाहात अपेक्षेची थोडी जरी माती मिसळली तरी ती फारच मोठा अनर्थ करते. मग शुद्ध प्रवाह कोणता व कर्दम कोणता, हे

ठाणे ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्वरूप
क्रमांक ८००६२ वि: निबंध
२२९५ दा० दि: ९/३/६३



नीट लक्षातच येत नाही. प्रत्येक बाजूला वाटते की, माझ्या अपेक्षा अगदी नैसर्गिक आहेत. या वाटण्यातूनच मग हक्क उदयाला येतात; व त्यांच्या रक्षणाकरिता कायदे व इतर तरतुदी कराव्या लागतात.

भारतीय समाजाच्या हल्लीच्या परिस्थितीत, आईबाप व मुले यांच्या-मधल्या संबंधांना कोणते स्वरूप प्राप्त झालेले दिसते, हे पाहाणे जरूर आहे. वृद्ध पिढीची नव्या पिढीबद्दलची तक्रार त्याशिवाय नीट समजणार नाही. शेतीची व्यवस्था पाहणारी अशी कुटुंबे ज्या समाजात बहुसंख्य होती, त्या समाजात सर्वत्र एकत्र कुटुंबपद्धती प्रचलित असणे अगदी साहजिक आहे. यामुळे आईबाप व मुले यांच्या राहणीत व विचारात विशेष फरक नसे. व्यवसाय तर पिढ्यान् पिढ्या एकच असे. पित्यावर अवलंबून राहण्यातच आर्थिक सुरक्षितता असे. म्हणून मतभेद झाले, तरी त्यांना संघर्षाचे स्वरूप देणे, दोन्हीही पिढ्यांना परवडत नसे. वडिलार्जित इस्टेटीत अथवा धंद्यात भाग घेता येणे, हे पित्याच्या मर्जीवर अवलंबून असे. शिवाय मातापित्यांचे साहचर्य सहसा न तुटल्यामुळे, स्वतंत्र वृत्तीला फारसा वाव नसे. या जुन्या वातावरणातले संस्कारच असे होते की, मुलांनी आज्ञापालन करावे व त्यात वृद्धांनी स्वतःला कृतकृत्य मानावे. दोन पिढ्यांच्या मतांमध्येही फार मोठा फरक नसे. त्यांचे छंद अथवा मनोविनोदनाचे प्रकार सारखेच असत. जुनी पिढी लैंगिक व्यवहारात अथवा इतर क्षेत्रांत जी नीती अथवा अनीती समजत असे, नक्की तिलाच नीती अगर अनीती तरुण पिढीही मानीत असे. यामध्ये उलटापालट होत नसे; नीतिकल्पनांना थोडी मुरड घालण्याचे सुद्धा धाडस तरुण पिढी दाखवीत नसे. तसेच देवाधर्माबद्दलच्या निष्ठा वृद्धांच्या त्याच तरुणांच्या असा प्रकार निदान सामान्य लोकांतच तरी होता.

हे सगळे पूर्वी ठीक होते. पण आता काय झाले आहे ? विज्ञा-

नाच्या प्रगतीमुळे, परदेशातील वाङ्मय, चित्रपट, रेडिओ, इत्यादी साधनांच्या प्रसारामुळे आणि विशेषतः शहरांच्या आणि कारखानदारीच्या वाढीमुळे, सर्व समाज अगदी ढवळून निघाला आहे. एकत्र कुटुंबपद्धती व वडिलार्जित व्यवसाय यांचे महत्त्व कमी कमी होत आहे. व्यवसायामुळेच मुलांना आईबापांपासून दूर व पृथक् राहणे भाग पडत आहे. वाईट असे की, हे अंतर अभ्यंतरातही बदल घडवून आणीत आहे.

तरुणवर्ग जुने ते सोने मानीनासा झाला आहे. 'बाबावाक्यं प्रमाणम्' हे वाक्य तर हास्यास्पद झाले आहे. प्रश्न असा आहे की, जो एकूण बदल झालेला आहे, त्यातही काही 'जुने' असेच आतून डोकावत आहे काय? सुधारणेच्या नावाखाली, नव्या प्रसाधनांच्या आवरणातून अथवा नव्या नीतीचा उद्घोष करून, 'पशुवृत्ती' तर आपले काम चालू ठेवीत नाही ना?

'पशुवृत्ती' हा शब्द काही वाचकांना फारच कडक वाटेल. पण धनतृष्णा – अगदी अशी कायदेशीर धनतृष्णासुद्धा – पशुवृत्तीचाच परिपाक नाही काय? स्वतः ज्या प्राण्याची शिकार केली त्या प्राण्याला इतरांना स्पर्श करू न देणारा सिंह अनेक शिकाऱ्यांनी पाहिला आहे; व त्याची वर्णने त्यांनी लिहून ठेवली आहेत. त्यांतच एक वर्णन असे आहे की, सिंह आपल्या जोडीदारीण मादीला फक्त त्या शिकारीत हिस्सा देतो. मात्र त्याचे स्वतःचे खाणें संपल्यानंतर तिने सुरुवात केली पाहिजे. मिळविलेल्या अन्नाचा संग्रह करणारेही पशुपक्षी आहेतच. मग, धनतृष्णा अथवा संपत्तीचा हव्यास या गोष्टी नव्या युगाच्या द्योतक नाहींत असें म्हटले तर काय बिघडले?

नव्या पिढीचा नवीनपणा पैशाचा अथवा मिळकतीचा प्रश्न निघाला की कुठे लुप्त होतो कोणास ठाऊक? या प्रश्नाशी वृद्धांचा संबंध अजून

काही वर्षे तरी भारतात येतच राहील. वृद्ध मातापित्यांचे आणि मुलांचे तंटे, जे आपल्या सभोवती दिसतात त्यांत कितीतरी मिळकतीसंबंधी असतात. जो मुलगा स्वतःला आधुनिक व स्वतंत्र विचाराचा म्हणवतो, तो कशात आधुनिक असतो? फक्त बोलण्याचालण्यात, पोषाखात अथवा व्यवसाय नैपुण्यात. जर वडिलार्जित इस्टेट बापाकडे असली तर तिच्यात हिस्सा नको म्हणणारा तरुण – नव्या युगाचा पाईक – शोधूनही सापडत नाही. एवढेच नव्हे, तर वाटणीबद्दल इतका काटेकोरपणा दाखविणारे मुलगे दिसतात की बोलता सोय नाही. "ताटात सांडले काय व वाटीत सांडले काय, एकच" ही म्हण वर्तनाने खरी करून दाखविणारे बाप व मुलगे दोन्हीही भेटत नाहीत. दुःखाची गोष्ट अशी की, जे तरुण स्वतःच्या व्यवसायात भरपूर व जरुरीपेक्षा जास्त पैसा मिळवतात, तेसुद्धा आईबापांना कायद्याची मदत घेऊन किती कमी संपत्ती ठेवता येईल, इकडेच लक्ष देतात. अत्युच्च शिक्षणाने विभूषित झालेले तरुणही वधूपित्याकडून जास्तीत जास्त हुंडा मिळविण्याकरिता ज्या क्लृप्त्या उपयोगात आणतात त्या पाहून चित्त विषण्ण होते. सारांश असा की, जास्तीत जास्त स्वार्थ साधल्याखेरीज चैन पडू न देणारी 'पशुवृत्ती' या नव्या युगातल्या तरुणांतही सगळीकडे दिसते. वृद्धांना मनोदौर्बल्याची सबब तरी आहे. जो साचा त्यांच्या मनात, योग्य-अयोग्य, नीति-अनीती याबद्दल इतकीं वर्षे घर करून राहिलेला आहे, तो टाकू म्हटले तरी टाकता येत नाही. ते त्या बाबतीत अगदी असमर्थ (helpless) आहेत, अशी बाजू मांडता येण्यासारखी आहे. पण ज्यांच्या तरुण मनाचे सामर्थ्य इतर क्षेत्रांत भरपूर दिसते, ते धनतृष्णेपुढे इतके हतबल कां व्हावेत, हा एक अवघड प्रश्न आहे.

आणखी एक समर्थन वृद्धांना उपलब्ध आहे, तरुणांना नाही. वार्धक्यात वरचेवर अधिक दुर्बल होत जाणारे शरीर, मनामध्ये नसत्या

काळज्या व भीतीचे अनेक प्रकार निर्माण करते. वृद्धांच्यांकडून भवितव्याबद्दल त्रस्त होण्यात अतिरेक होत असेल; नाही असे नाही. पण ज्या हिरीरीने स्वतःच्या असाहाय्य बालकाबद्दल, पत्नीबद्दल अथवा तिच्या आप्तांबद्दल तरुण काळजी घेतात, त्यांतली शतांश तरी वृद्धांच्या वाट्याला येते काय ? स्वतःच्या मित्रांशी, ऑफिसमधल्या वरिष्ठांशी, पत्नीशी, अथवा इतरांशी ( strangers ) वागतांना जो समजूतदारपणा तरुण दाखवितात, तोच आईबापांशी बोलता–चालताना प्रत्ययास येतो काय ? हे सर्व प्रश्न मनात येत असताना त्याना दडपून ठेवणे सर्वांनाच साधेल काय ?

एकूण असे दिसते की, स्वतःची लहर, स्वतःचे सुख (pleasure) मग ते किती का हिणकस प्रतीचें असेना–हेच तरुणांना प्रिय आहे. स्वसुखाकरिता धडपडणे हाच त्यांचाही स्थायीभाव आहे. तोच त्यांचा आत्मा आहे. काल जसा बदलतो तशी या आत्म्याला नवीनवी नावे प्राप्त होतात, इतकेच काय ते. हा ‘ स्व ’ जुन्या पिढीला ‘ घराण्याची प्रतिमा ’, ‘ संस्कृतीबद्दलचा आग्रह, ’ ‘ स्थैर्याबद्दलची अवास्तव चिंता ’ अशा रूपांनी दर्शन देतो; तर नव्या पिढीला तो ‘ आमचे हक्क, ’ ‘ जुन्यांच्या हेकटपणापासून समाजाला वाचविण्याची जरुरी, ’ अशा पोषाखात दिसतो.

तरुण पिढीने स्वतःला प्रामाणिकपणाने असा प्रश्न विचारला पाहिजे की, “ मी जे करीत आहे ते माझ्या स्वतःच्या गौरवाकरिता आहे, का ती हृदयाची हाक आहे ? ” पण हृदयाची संवेदनशीलता (sensitivity) म्हणजे काय, हे ओळखणेच अशक्य होऊन बसले आहे. जीवनात इतक्या फालतू गोष्टींनी गर्दी केली आहे की, खरी ‘ भावना ’ कशाला म्हणावे हेच समजेनासे झाले आहे. एका नावाड्याचा भाऊ कुंभमेळ्याच्या गर्दींत चेंगरून मेल्याचे त्याला वृत्तपत्रा-

वरून कळले. त्याच्या प्रेताची विल्हेवाट 'बेवारशी' म्हणून केली जाऊ नये याकरता, लगेच जबर भाडे देऊन तो टॅक्सीने अलाहाबादला गेला व तेथून त्याने ते प्रेत गावी आणले व त्याचा भरमसाठ खर्च करून सर्व विधी केला; "तुझे आपल्या भावावर खूप प्रेम होते, असे दिसते," त्याला एकाने विचारले. प्रांजळपणाने त्याने सांगितले, 'आम्ही एकमेकांचे हाडवैरी होतो. तो दूर पळून गेला म्हणूनच वाचला, नाहीतर मी त्याचा खून केला असता. पण माझा भाऊ 'बेवारशी' म्हणून जाळला गेला असता, तर गावात होणारा दुर्लौकिक मी कसा सहन करीन ?" प्रतिष्ठेच्या या अशा कल्पना तरुण पिढीतही आहेत. त्यांचा संदर्भ निराळा असतो, एवढेच. प्रतिष्टारक्षण अथवा प्रतिष्टासंवर्धन हाच एकदा जीवनहेतू ठरल्यावर, संवेदनेला जागा राहते कुठे ? तरुणांच्या प्रवृत्तीकडे पाहिले तरी, "माझ्यासारख्या बड्या ऑफिसरची मुले माझ्या दरिद्री भावाच्या मुलांत मिसळता कामा नयेत," असा आग्रह दिसतो. खुद्द स्वत:च्या मुलावरही प्रतिष्टानिरपेक्ष असे प्रेम नव्या पिढीत काही वेळा दिसत नाही. "मुलांनी माझ्या लौकिकात भर घालावी याकरताच मी त्यांचेवर प्रेम करतो," असे उघड कोणी म्हणत नाही. पण अशी काहीतरी भावना डोकावत असावी, असा संशय घेण्यासारखी दृश्ये दिसतात.

प्रेमाची संवेदना ही निर्हेतुक असते. खरे पाहिले असता साहचर्याचा अथवा 'स्वकीय' 'परकीय' अशा नात्याचाही तिच्याशी संबंध नाही. पण ज्या परिवारात आपण राहतो त्या मर्यादित क्षेत्रात तरी, "यांना खरोखर मदतीची गरज आहे, या एकाच कारणामुळे त्यांना मी मदत देणार. ते माझ्याशी पूर्वी कसे वागले, अथवा आता कसे वागतात इकडे मी लक्ष देणार नाही." असे ठाम सांगणारे व वर्तनाने दाखवून देणारे तरुण फारसे दिसत नाहीत. सुरुवातीस दिलेले

कृष्णमूर्तींचे विधान म्हणूनच महत्त्वाचे आहे. वृद्धांचे काय, तरुणांचे काय, संवेदनाशीलतेचे क्षेत्र वरचेवर कमीच होत आहे की काय? हा प्रश्न डावलून यापुढे चालणार नाही. कारण, आता वेळच अशी आली आहे की, शिष्टाचार, सुसंस्कार यांची बंधने गळून पडली आहेत. गरजेमुळे, एका घरामुळे अथवा एकत्र व्यवसायामुळे होणारे परस्परावलंबन संपले आहे. मग आता उरणार काय? आत्मकेंद्रित वृत्ती व माणुसकी या दोन्हीपैकी एक. पहिलीचा प्रभाव नव्या पिढीवर अजिबात नाही, असे म्हणता येईल काय? जुनी ध्येये विज्ञानाने कालबाह्य ठरविली. नाही तरी ती आत्मपूजेची साधनेच बनली होती. पण नव्या युगाचा पुकारा करताना, समाजात क्रांती घडवून आणण्यासाठी आम्ही बद्धपरिकर आहोत असा डांगोरा पिटताना, ज्या लहान जगात आपले दैनंदिन जीवन चालू आहे, त्या जगातले वर्तन तरुणांनी तपासून पाहावयास नको का? घरातल्या रोजच्या राहणीत अंतःकरणातले प्रेम, दया अथवा सहानुभूती दिसावयास नको का? पंगू अवस्थेतल्या वृद्ध मातापितरांची देखभाल न करणाऱ्या तरुणाने समाजातल्या कठोर चालीरीतीविरुद्ध बंड करण्यात कोणती वृत्ती दिसून येते? मला तर वाटते की, 'बंड करणें' एका दृष्टीने फार सोपे आहे. मी जेव्हा एखादा बंडखोर सुधारक बनतो, तेव्हा मी नक्की काय करीत असतो? पुष्कळदा या बंडखोरपणाचा अर्थ 'भाषेतला बदल' एवढाच असतो. जुनी माणसे जेव्हा चर्चा करतात तेव्हा 'परमेश्वर,' 'सदाचरण,' 'पापपुण्य,' 'कर्तव्यबुद्धी' वगैरे शब्द त्यांच्या बोलण्यात पुन्हा पुन्हा येतात. तरुणांच्या चर्चा जेव्हा चालतात तेव्हा 'विज्ञान,' 'यंत्रयुग,' 'समाजसुधारणा,' 'नवी नीती,' वगैरे शब्द सारखे ऐकू येतात. परंतु या शब्दांची पूजा आपण का करीत आहोत, याचा विचार जुनी पिढीही करीत नाही; व नवीही करीत नाही. शब्द वापरताना

कोणता हेतू मनात असतो, कोणत्या प्रेरणेततून तो पुढे येतो, इकडे नवेजुने दोघेही पाहात नाहीत. पुष्कळदा या नव्या युगातले काही नवे उपभोग मिळविण्याच्या हक्काला, ‘ स्वातंत्र्य ’ असे नाव तरुणांकडून दिले जाते. उलटपक्षी, दीर्घकालच्या संस्कारामुळे जे सोडावे वाटत नाही, ते नुसते “ मला हवे ” असे म्हणणे चांगले दिसत नाही म्हणून ‘ पाप ’ अगर ‘ पुण्य ’ यांसारखे शब्द उपयोगात आणताना वृद्ध दिसतात. ज्याला आपण ‘ सदाचरण ’ म्हणतो, त्याचा खरा अर्थ ‘ निःस्वार्थी वर्तन ’ असा आहे. प्रत्यक्ष एखादी कृती कशी घडते यापेक्षा ती कोणत्या हेतूने घडते यालाच सर्व महत्त्व आहे हे वयोवृद्ध व ज्ञानवृद्ध माणसेही विसरू लागली आहेत, हे खरे दुर्दैव. शब्दांची व कल्पनांची नुसती पूजा करणे व त्यांचा उपयोग प्रतिपक्षाला नामोहरम करण्यापुरताच करणे, हा रोग सर्वत्र फैलावू लागला आहे. पण याबद्दलची अधिक जबाबदारी तरुण वर्गावर आहे.

तरुणांना त्यांच्या वयामुळेच केवढी अनुकूलता आहे, पाहा. बुद्धीचे तेज, शरीराचे सामर्थ्य, या गोष्टी तर त्यांचेजवळ आहेतच; पण चालू युगातले विचारस्वातंत्र्यही त्यांच्या मदतीला येण्यासारखे आहे. शरीर वार्धक्याने व बुद्धी संस्कारसातत्याने विकलांग झाल्यावर, किती असाहाय्यता सर्वच बाबतीत होते याची त्यांना कल्पना नाही. संवेदनक्षमतेचे ( Sensitivity ) शुद्ध स्वरूप नाहीसे होऊन तिचे जागी सुरक्षिततेची ( Security ) विवंचना येते. वृद्ध, तरुणांबद्दलही काळजी करताना दिसतात. पण ते का ? एक प्रकारच्या भीतीतून ही काळजी उगम पावते. त्यांनी जीवनाबद्दलचा जो आदर्श उराशी बाळगलेला असतो त्यापासून ही मुले फारच दूर चालली आहेत; त्यांचे वाटोळे तर होणार नाही ना ? हा प्रश्न वृद्धांना सतावीत असतो. या प्रश्नामागे कोणत्यातरी साचेबंद जीवनाबद्दल वाटणारी आपुलकी आहे, हे तर उघडच आहे.

कृष्णमूर्तींचे विधान म्हणूनच महत्त्वाचे आहे. वृद्धांचे काय, तरुणांचे काय, संवेदनाशीलतेचे क्षेत्र वरचेवर कमीच होत आहे की काय ? हा प्रश्न डावलून यापुढे चालणार नाही. कारण, आता वेळच अशी आली आहे की, शिष्टाचार, सुसंस्कार यांची बंधने गळून पडली आहेत. गरजेमुळे, एका घरामुळे अथवा एकत्र व्यवसायामुळे होणारे परस्परावलंबन संपले आहे. मग आता उरणार काय ? आत्मकेंद्रित वृत्ती व माणुसकी या दोन्हीपैकी एक. पहिलीचा प्रभाव नव्या पिढीवर अजिबात नाही, असे म्हणता येईल काय ? जुनी ध्येये विज्ञानाने कालबाह्य ठरविली. नाही तरी ती आत्मपूजेची साधनेच बनली होती. पण नव्या युगाचा पुकारा करताना, समाजात क्रांती घडवून आणण्यासाठी आम्ही बद्धपरिकर आहोत असा डांगोरा पिटताना, ज्या लहान जगात आपले दैनंदिन जीवन चालू आहे. त्या जगातले वर्तन तरुणांनी तपासून पाहावयास नको का ? घरातल्या रोजच्या राहणीत अंतःकरणातले प्रेम, दया अथवा सहानुभूती दिसावयास नको का ? पंगू अवस्थेतल्या वृद्ध मातापितरांची देखभाल न करणाऱ्या तरुणाने समाजातल्या कठोर चालीरीतींविरुद्ध बंड करण्यात कोणती वृत्ती दिसून येते ? मला तर वाटते की, ' बंड करणें ' एका दृष्टीने फार सोपे आहे. मी जेव्हा एखादा बंडखोर सुधारक बनतो, तेव्हा मी नक्की काय करीत असतो ? पुष्कळदा या बंडखोरपणाचा अर्थ ' भाषेतला बदल ' एवढाच असतो. जुनी माणसे जेव्हा चर्चा करतात तेव्हा ' परमेश्वर, ' ' सदाचरण, ' ' पापपुण्य, ' ' कर्तव्यबुद्धी ' वगैरे शब्द त्याच्या बोलण्यात पुन्हा पुन्हा येतात. तरुणांच्या चर्चा जेव्हा चालतात तेव्हा ' विज्ञान, ' ' यंत्रयुग, ' ' समाजसुधारणा, ' ' नवी नीती, ' वगैरे शब्द सारखे ऐकू येतात. परंतु या शब्दांची पूजा आपण का करीत आहोत, याचा विचार जुनी पिढीही करीत नाही; व नवीही करीत नाही. शब्द वापरताना

कोणता हेतू मनात असतो, कोणत्या प्रेरणेततून तो पुढे येतो, इकडे नवेजुने दोघेही पाहात नाहीत. पुष्कळदा या नव्या युगातले काही नवे उपभोग मिळविण्याच्या हक्काला, ‘स्वातंत्र्य’ असे नाव तरुणांकडून दिले जाते. उलटपक्षी, दीर्घकालच्या संस्कारामुळे जे सोडावे वाटत नाही, ते नुसते “मला हवे” असे म्हणणे चांगले दिसत नाही म्हणून ‘पाप’ अगर ‘पुण्य’ यांसारखे शब्द उपयोगात आणताना वृद्ध दिसतात. ज्याला आपण ‘सदाचरण’ म्हणतो, त्याचा खरा अर्थ ‘निःस्वार्थी वर्तन’ असा आहे. प्रत्यक्ष एखादी कृती कशी घडते यापेक्षा ती कोणत्या हेतूने घडते यालाच सर्व महत्त्व आहे हे वयोवृद्ध व ज्ञानवृद्ध माणसेही विसरू लागली आहेत, हे खरे दुर्दैव. शब्दांची व कल्पनांची नुसती पूजा करणे व त्यांचा उपयोग प्रतिपक्षाला नामोहरम करण्यापुरताच करणे, हा रोग सर्वत्र फैलावू लागला आहे. पण याबद्दलची अधिक जबाबदारी तरुण वर्गावर आहे.

तरुणांना त्यांच्या वयामुळेच केवढी अनुकूलता आहे, पाहा. बुद्धीचे तेज, शरीराचे सामर्थ्य, या गोष्टी तर त्यांचेजवळ आहेतच; पण चालू युगातले विचारस्वातंत्र्यही त्यांच्या मदतीला येण्यासारखे आहे. शरीर वार्धक्याने व बुद्धी संस्कारसातत्याने विकलांग झाल्यावर, किती असाहाय्यता सर्वच बाबतीत होते याची त्यांना कल्पना नाही. संवेदनक्षमतेचे ( Sensitivity ) शुद्ध स्वरूप नाहीसे होऊन तिचे जागी सुरक्षिततेची ( Security ) विवंचना येते. वृद्ध, तरुणांबद्दलही काळजी करताना दिसतात. पण ते का ? एक प्रकारच्या भीतीतून ही काळजी उगम पावते. त्यांनी जीवनाबद्दलचा जो आदर्श उराशी बाळगलेला असतो त्यापासून ही मुले फारच दूर चालली आहेत; त्यांचे वाटोळे तर होणार नाही ना ? हा प्रश्न वृद्धांना सतावीत असतो. या प्रश्नामागे कोणत्यातरी साचेबंद जीवनाबद्दल वाटणारी आपुलकी आहे, हे तर उघडच आहे.

पण तरुणांचे बरे व्हावे, त्याचे जीवन खरोखरच सुखी व्हावे, ही भावनाही तेथे आहे हे विसरता येत नाही. हृदयाच्या संवेदनक्षमतेचे हे दर्शन पुसट असले तरी महत्त्वाचे आहे. वृद्धांचा दुराग्रह तरुणांना जाच करीत असेल; नाही असे नाही. पण तरुण ज्या दिशेकडे चालले आहेत, ती दिशा तरी कोणती आहे ?

ती दिशा सुखलोलुपतेची ( Pleasure ) आहे की काय, असा संशय प्रथम येतो. चांगले कपडे, भरपूर पैसा व समाजात मिळणारी प्रसिद्धी अथवा मोठेपणा ( म्हणजे सत्ता ), या तीन गोष्टींनी बऱ्याचशा तरुणांना ग्रासले आहे. इतके की, त्या मिळविण्याकरिता इतर कशाचाही बळी देण्यास ते मागेपुढे पाहत नाहीत. विशेषतः प्रसिद्धीकडे आणि सत्तेकडे धावण्याचा हा जमाना आहे. धनाचे आकर्षण कमालीचे आहे. वरील तीन गोष्टींनी ज्यांचे चित्त संपूर्ण व्यापलेले आहे, त्यांना इकडे, तिकडे व वृद्धांकडे पाहण्यास सवड कशी असणार ? शरीराच्या गरजा समजू शकतात, पण सुखाची गुलामगिरी इतक्या निमूटपणाने पत्करणाऱ्या तरुणांना स्वातंत्र्याचे प्रेम आहे असे तरी कसें म्हणावे ? अडचण अशी आहे कीं, देहाची खरी गरज कुठे संपते व मनाने भासविलेली गरज कुठे सुरू होते, हे समजतच नाही. कृष्णमूर्तींनीं याबद्दल एक सोपा दंडक सांगितलेला आहे.

" Now to find out what meditation is, first of all one has to have a very quiet mind. That means that the body has to have its own intelligence. *Generally what we do, is to dictate to the body what we think is pleasurable and painful* .....So the mind is always controlling the body and therefore depriving it of its intelligence, for the body has its own intelligence. So, part of meditation is, to allow the

intelligence of the body to function, which means that the body will become quiet, when necessary, and active when that is demanded.

(1967 Talks–India, p. 135 )

तरुणांना वाटते की, देहाच्या गरजा भागविण्यात व त्याकरिता धडपड करण्यात काही वावगे नाही. ( पापाची कल्पना या युगात गैरलागू आहे. म्हणून तिचा उल्लेखच न करणे बरे.) " मग जी धावपळ आम्ही करतो तिला का उगाच नावे ठेवता ? " असा त्यांचा सवाल आहे. पण ' देहाच्या गरजा ' याचा अर्थ काय ? त्या शुद्ध व नैसर्गिक स्वरूपात राहिल्या आहेत काय ? मनाने सांगावे व देहाने ' हवे ' म्हणावे, असाच प्रकार सगळीकडे दिसत नाही का ?

एका संपादकीण बाईचे हे उदाहरण पाहा. अत्यंत बुद्धिमान , विद्वान् व प्रतिभावान लेखिका म्हणून त्यांचा गौरव सगळीकडे होत आहे. या विज्ञानयुगाचा त्यांना विशेष अभिमान आहे. महिलांच्या स्वातंत्र्याकरिता कितीही छळ सोसण्याची त्यांची तयारी आहे. त्यांनी ज्या तरुणाशी प्रीतिविवाह केला त्याचेबद्दल त्यांची काही तक्रार नाही. पण त्या त्यांचेजवळ राहात नाहीत. त्यांचा चारपाच वर्षांचा मुलगाही बापाकडेच आहे. हे असे का ? त्यांच्या मैत्रिणी सांगतात की, संपादकीणबाईंना नवे नवे उंची कपडे, चैनीच्या वस्तू यांची विशेष आवड आहे. त्या स्वतः म्हणतात की, त्यांचे सासर मराठवाड्यात एका आडवळणी गावात आहे व तेथे त्यांच्या कर्तृत्वाला वाव नाही. ' गुणविकास ' व्हावा आणि शिवाय भारतीय महिलांची उन्नती करण्याचे कामी विशेष कामगिरी हातून घडावी, या हेतूने त्या मुंबईत येऊन राहिल्या आहेत. जास्त बारीक तपास केला तर कळते की, त्यांच्या पतीची व सासू-

....३

सासऱ्यांची ' साधी विचारसरणी ' हीच या समस्येचे मूळ कारण आहे. अर्धांगवायूने गेली वीस वर्षे अंथरुणावर खिळलेल्या आपल्या आईला व वृद्ध पित्याला सोडून जावे, असे त्यांच्या पतीला वाटत नाही. तसेच त्या लहान शहरात ज्या शाळेचा तो चालक व प्राचार्य आहे, तीही त्याला सोडवत नाही. सासूसासऱ्यांची जुनी मते, त्यांच्या पूजा-अर्चा, सोवळे-ओवळे या एकंदर वातावरणाचा या बाईंना आलेला उबग व सार्वजनिक कार्याची हौस यामुळे त्या तेथेच कायम राहिल्या. " लहान मुलाला मुंबईसारख्या ठिकाणी व इतक्या व्यापात कोण सांभाळणार ? म्हणून मी त्याला आणले नाही. " असे त्या म्हणाल्या.

भारतातल्या सुशिक्षित समाजात जे नवे प्रश्न उत्पन्न होत आहेत, त्याचे प्रातिनिधिक असे हे एक दृश्य आहे. विवाहानंतर आपल्याला कोठे व कसे राहावे लागणार याबद्दल बाईंचा अंदाज चुकला, हे तर उघडच आहे. वरील घटनेत अनेक प्रवाह आहेत. पण त्यांपैकी फक्त एकच धागा आपण घेऊ. तो त्या बाईंच्या वृत्तीचा. त्यांच्या अंगी असलेल्या गुणांचा, समाजकार्याच्या हौसेचाही फारसा विचार येथे करता येत नाही. पण तरुण पिढी व इतरांविषयी तिला वाटणारी आस्था अगर प्रेम एवढ्यापुरतेच आपण पाहू. "माझ्या गुणांचे चीज झाले पाहिजे, माझ्या हातून समाजकार्य झाले पाहिजे" या आग्रहाच्या आड काय दडलेले आहे ? " मी माझ्यापुरतेच पाहणार, मला जे सुख देते ते, इतरांच्या सुखाचा बळी देऊनही मी मिळवणार " असे सांगणारे मनच या उदात्त शब्दांच्या मागे नाही का ? चालू कालाशी विसंगत वर्तन करणाऱ्या वृद्धांना समजून घेण्याची तयारी तर नाहीच; पण समवयस्क पतीशीही जमवून घेता येत नाही. एवढेच नव्हे, तर स्वतःच्या फक्त सोईकरिता लहान बालकाचाही त्याग करण्यापर्यंत येथे मजल गेली आहे. अशी उदाहरणे हल्ली बरीच दिसू लागली आहेत, म्हणून इतका

विस्तार केला. स्वतःच्या खाजगी जीवनात इतरांविषयींच्या आपुलकीला रजा देऊन जे सार्वजनिक कार्य केले जाते, त्याचा अर्थ काय याचा शोध घेण्याची वेळ आली आहे.

आणखी एक प्रश्न हल्लीच्या तरुण पिढीने उत्पन्न केला आहे. तो जगाच्या सर्वच भागांत कमीजास्त प्रमाणात दिसत आहे. जुनी समाज-रचना, जुनी मूल्ये, जुने संकेत ( Conventions ) यांना धुडकावून लावणारे व आपल्या लोकविलक्षण चमत्कारिक अशा पोषाखाने व वेष-भूषेने लक्ष वेधून घेणारे तरुणतरुणींचे गट ठिकठिकाणी दिसू लागले आहेत. त्यांना हिप्पी ( Hippies ) अगर इतर नांवांनी लोक ओळख-तात. भारतात परदेशातले हिप्पी येत आहेत, म्हणून या प्रश्नाचा विचार करावयाचा, असे नाहीं. तर ‘ हिप्पी ’ ही एक वृत्ती आहे व ती वृत्ती भारतीय तरुणांतही – जरी पोषाखात वगैरे इतका ठळक बदल न दिसला तरी – मूळ धरू लागली आहे. ही वृत्ती समजून घेणे आवश्यक आहे. पहिली गोष्ट अशी की, हिप्पी वृत्तीचा उदय होण्याला भरपूर कारणे आहेत. समाजातल्या प्रचलित अशा सर्व संस्थांना – कुटुंबरचना, नीतिनियम, अर्थव्यवस्था अगर धर्मसंस्था – अवकळा आलेली आहे; त्या जीर्ण व विकृत अशा झाल्या आहेत. त्या संस्थांच्या साच्यात हल्लीचा समाज पहिल्यासारखा व्यवस्थित बसतही नाही. कारण यंत्रयुगाने त्यांना अनेक खिंडारे पाडली आहेत. पण, “ या सर्व मूल्यव्यवस्थेवर (system of value) आमचा विश्वास राहिलेला नाही.” असे छातीठोक सांगणारे तरुणच आढळतात. वृद्ध अथवा प्रौढ तितके धैर्य दाखवू शकत नाहीत. एक प्रकारचा प्रांजलपणा, प्रामाणिकपणा या वृत्तीमध्ये आहे. जुन्या मूल्यांची सबब सांगून स्वार्थी वृत्तीच कशी धुमाकूळ घालीत आहे, हे त्यांनी ओळखले आहे. त्या मूल्याबद्दल यामुळे त्यांना चीड आली आहे. “ ती फेकून द्या ” असे ते सांगू लागले

आहेत; व स्वतःच्या वर्तनात शिष्टाचाराची कोणतीच बंधने न पाळण्याचा त्यांचा आग्रह आहे. "ठराविक पोषाखच का? पुरुषांचेच केस आखूड का? धनार्जन प्रत्येकाने केलेच पाहिजे असा आग्रह का? सभ्य वर्तन अमक्याच वागणुकीला म्हणावे असा दंडक का?" असे प्रश्न ते मोठ्या आवाजात विचारू लागले आहेत. (हे प्रश्न काही प्रौढ माणसांच्याही मनात येतात; पण त्यांचा आवाज बाहेर ऐकू येत नाही.) हे प्रश्न विचारण्याच्या त्यांच्या धैर्याचे कौतुकच करायला हवे. पण हे प्रश्न विचारताना या तरुणांचे मन खोल विचार करीत नाही. एखादी गोष्ट निरर्थक अगर असत्यावर आधारलेली आहे, एवढे कळून भागत नाही. 'ती टाकाऊ आहे, म्हणून ती मी स्वीकारणार नाही,' एवढा निर्णय करण्याची शक्ती म्हणजे सत्यशोधनाची हमी नव्हे. असत्य कसे निर्माण होते व ते आपल्या चित्तावर कोणत्या प्रेरणांच्या मदतीने पगडा बसविते, हे प्रत्यक्ष पाहता आले पाहिजे. जे प्रचलित आहे त्याचा उबग आल्यामुळे त्याच्या विरुद्ध दिशेला जाण्याची जी प्रतिक्रिया (reaction) होते, तिला बंडखोरवृत्ती (revolt) असे नाव देण्यात येते. पण एका असत्याविषयी तिरस्कार उत्पन्न झाला तरी दुसऱ्या असत्याकडे जाता येते. अगदी हाच प्रकार या हिप्पी वृत्तीच्या तरुणांचा झाला आहे. समाजातले सर्व पुरुष आखूड केस ठेवतात, ते निरर्थक. मग करा काय? तर सर्व हिप्पींनी लांब केस ठेवावयाचे. ठराविक दैनंदिन उद्योगाची गुलामगिरी माणसाचे यंत्र करते. मग करा काय? तर सबंध दिवस नुसत्या लोळण्यात घालवावयाचा. तशी वर्तनपद्धतीच ठरवावयाची; त्या पद्धतीचे गुलाम व्हावयाचे. जुन्या नीतीचे जोखड फेकून द्यावयाचे; 'ठराविक सुखोपभोगांची पुनरावृत्ती केलीच पाहिजे' या प्रेरणेच्या दडपणाखाली मात्र सदैव राहावयाचे. प्रत्यक्ष हिप्पीपंथात दाखल न झालेले तरुणही जेव्हा आम्ही नव्या युगातले बंडखोर आहोत असे म्हणतात,

तेव्हा त्यांचे वर्तन अगदी असेच घडते. जुनी शिस्त झुगारून दिल्यानंतर ‘ स्वतंत्र ’ असे ते होतच नाहीत. कोणत्यातरी नव्या फॅशनेबल बंधनात ते पुन्हा अडकतात; व शृंखलेला ते ‘ स्वातंत्र्य ’ असे नाव देतात. जेवणावळीची जुनी पद्धत जाऊन त्या जागी नवी काटेचमचे-टेबलांची पद्धत आली, म्हणजे क्रांती झाली असे का म्हणायचे ? क्रांती करणारे मन, ‘ नवे ’ या सबबीवर पुन्हा बंधनच स्वीकारण्याची चूक करणार नाही. कृष्णमूर्ती स्पष्टच म्हणतात :

“ Throughout the world there is a revolt against things as they are. But they don’t understand the real depths of what is involved...emotionally, psychologically inwardly...... That revolt is a reaction, which does not bring about the right order.”

( Talks–India, 1967, p. 131 )

स्वातंत्र्याच्या नावाखाली नवी बंधने निर्माण करण्याचा खटाटोप तरुण पिढीकडून सगळीकडे होत आहे. सुखाकडे धावणारे मन बद्धच असते हे तरुणांनीही लक्षात घेणे जरूर आहे. आईबाप व मुले यांच्या मधल्या संघर्षात जुन्या मूल्यांच्या टाकाऊपणावर भर देऊन, “ आपण जे करतो ते सर्व बरोबरच आहे ” असे तरुणवर्गाकडून सांगितले जाते. ही निव्वळ फसवणूक आहे, हे लक्षात येण्यापुरते नव्या नीतीबद्दल थोडेसेच विवेचन केले आहे. हा विषय फारच मोठा असल्यामुळे, त्याच्या सर्व बाजूंचा विचार येथे करता आला नाही.

जुन्या व नव्या पिढीच्या चुका काय कारणाने होतात हे आपण या तीन लेखांत पाहिले. “ चालू कुटुंबरचनेच्या जागी नव्या प्रेमाधिष्ठित कुटुंबाची प्रस्थापना कशी करता येईल ?” असा प्रश्न आता वाचकांच्या मनात उभा राहिला असेल. ‘ कसलीही मागणी स्वतः-

करिता करणार नाही,' अशा वृत्तीने ज्या कुटुंबातली सर्व माणसे वागतात ते कुटुंब 'प्रेमाधिष्ठित कुटुंब' या संज्ञेस पात्र होईल. स्वसुखावर व स्वतःच्या उत्कर्षावर प्रत्येकाचे लक्ष केंद्रित झाले असले तर विसंवाद, भांडणे, द्वेष यांना ऊत येणारच. हल्ली कुटुंबातली माणसे कशी वागतात, याबद्दल कृष्णमूर्ती म्हणतात–

"Now, with regard to human beings, the question is how to establish a relationship between two people both of whom have images about the other. These images are usually contradictory, and so there is confiict between the two people. They may be married and have sex, children and all the rest of it, but each of them, the man and the woman, is working for himself and herself. The man wants a better position, a better job, better housing and more and more he is driven by his ambitions as the woman is also, by her ambitions. They may have children together, live in the same house, but **each is separately working for the self.** You cannot possibly have relationship, when each human being is fighting the others which is the simple fact of what is happening in daily life. So, when, in a family unit – father, mother and children – each is separately working for himself and also separately working for the family, that family unit becomes a danger to society. And *society is built on this danger and is therefore basically founded on disarder*, in which each man is seeking to realize his own ambition through greed and envy………As long as you have no love in yout hearts, you are going to destroy the world."

(Talks-India, 1967, p. 161)

सारांश असा की, आत्मतृप्तीचा ( sel!-fulfilment ) रोग जुन्यांना व नव्यांना सारखाच लागलेला आहे. “ मी प्रथम, मग इतरांचा विचार ,” या सूत्रावर सर्व वागतात. हे सूत्रच असे आहे की, त्यातून बेदिली, संघर्ष व वैर जन्माला येणारच. हे सूत्र कायम ठेवून, किंबहुना त्याच्या आधारावरच कुटुंबात अथवा समाजात सुधारणा घडवून आणण्याचे प्रचंड प्रयत्न जगात चालू आहेत. पण इकडे सुधारणा होत आहे, तर तिकडे असमाधान वाढीस लागत आहे. ‘ स्व ’-चा संपूर्ण निरास करणारे प्रेम, प्रत्यक्ष दैनंदिन जीवनात उदयास आल्याखेरीज वृद्ध-तरुणांचे अथवा इतर कोणतेच प्रश्न सुटत नाहीत. ही दृष्टी कृष्णमूर्तींनी आपणांस दिली आहे. तिच्या प्रकाशात आपण वाट चालू या, एवढेच शेवटी सांगणे आहे.

□ □ □

२

# मित्र का नुसता सोबती ?

माझ्या लहानपणी, ‘ मित्र म्हणजे केवळ गंगेचे पाणी, ’ अशा अर्थाची ओळ असलेले एक लहानसे कवन फार प्रसिद्ध होते. त्याच कवनात ‘ मित्राला केव्हा भेटू ? ’ अशी वाटणारी तळमळ ‘ पंख असते तर उडून आलो असतो, ’ अशा शब्दांनी व्यक्त केली होती. चालू युगात ‘ मित्र ’ या पदार्थाचा भाव बराच उतरला आहे की काय, अशी शंका केव्हा केव्हा येते. सध्या मित्रांची टोळकी रस्त्यांतून दिसत नाहीत, अशातला भाग नाही. पण रस्त्याच्या कडेला अथवा चौकात तासन्तास गप्पा मारून कंटाळा आल्यावर कोणत्यातरी हॉटेलात शिरणे, व तेथून परतल्यावर पुन्हा गप्पांचे सत्र सुरू करणे, एवढाच अर्थ मैत्रीला पूर्वी नव्हता. मित्रामधले सौहार्द हल्लीपेक्षा जास्त खोल व परस्परांच्या जीवनाला आकार देण्याइतके प्रभावी, असे एकदोन पिढ्यांपूर्वी आढळत असे. ‘ हल्ली ते तसे नाही, ’ असे सुचविण्यात मी चुकत आहे की काय, हे शेवटी वाचकांनीच ठरवावयाचे आहे.

‘ समानशीलव्यसनेषु सख्यम् ’ हे सुभाषित, मैत्रीचे नाते समजून

घेण्याकरिता उपयोगी पडेल, अशी पुष्कळांची समजूत आहे. पण ती खरी नाही. या सुभाषितात मैत्रीच्या विशाल जगताचा फक्त एक लहानसा कोपरा दाखविला आहे. ' काही मित्रांचे चारित्र्य वरून सारखे दिसते; व काहींची व्यसने एकच असतात, ' एवढाच अर्थ वरील वचनाचा घेतला पाहिजे. मैत्रीची गरज मनुष्याच्या जीवनात कशी उत्पन्न होते, हा एक अत्यंत मनोवेधक विषय आहे. पण अगोदर मैत्रीमध्ये कोण-कोणत्या नात्यांचा समावेश करता येत नाही ते पाहिले पाहिजे.

यंत्रयुग अवतीर्ण झाले व माणसांमधली जुनी नातीही लोप पावू लागली. अवघा माणूसच बदलला की काय, कुणास ठाऊक ? आता धंद्यातले भागीदार दिसतात, ऑफिसमधले वरिष्ठकनिष्ठ दिसतात, एका पक्षात ( काही वेळ ? ) राहून एकमेकांस निवडून येण्याकरिता मदत करणारे दिसतात. संस्थेतले सहकारी दिसतात पण ' खरे मित्र ' फारसे दिसत नाहीत. ' तो माझा मित्र आहे ', ' आपले ते काम तो करील, ' असे शब्द नेहमी ऐकू येतात. पण त्यांचा अर्थ निराळा असतो. कोणता-तरी लागाबांधा असल्यामुळे एकमेकांची कामे करणारे इसम म्हणजे ' मित्र ' नव्हेत. मित्र ही एक दैवी देणगी आहे. दैवीं याचा अर्थ ते एक अपरूप लेणं आहे. मित्र ज्याला लाभतो, त्याचे भाग्य मोठे, यात शंकाच नाही.

आधुनिक संस्कृतीने काही गोष्टींचे आकर्षण माणसामध्ये उत्पन्न केले. त्या गोष्टीच अशा आहेत की, त्यामुळे ' मित्र ' अंतर्धान पावले. " इतरांच्यापुढे मी केव्हा जाईन ? त्याची बरोबरी लवकरात लवकर मला कशी करता येईल ? " हे दोन प्रश्न आधुनिक माणसाच्या मनात रात्रंदिवस घोळत असतात. सकाळी उठल्यापासून रात्री झोपेपर्यंत ही तुलनाच चालू असल्यावर ' मित्र-लाभ ' कसा होणार ? वरील प्रश्न जे साध्य सुचवितात ते मिळण्याकरिता साधने शोधण्यात व त्यांचा संग्रह

करण्यात मन सदैव व्यग्र असते. त्याला कोणाच्यातरी सहवासाची गरज वाटत नाही, असे नाही. पण तो सहवास फक्त साधनरूप असतो. " माझ्या उत्कर्षाला ज्या व्यक्तीची मदत केव्हातरी होण्याचा संभव आहे, ती मी जवळ करणार. इतरांचा व माझा सबंध काय ? " अशा भूमिकेवरूनच जीवनात जो भेटेल त्याचेकडे पाहिल्यावर खरा मित्र मिळणार कसा ? माझ्या सहवासात जो येईल, त्याची पारख वरील दृष्टीने मी करणार. अशा सहेतुक संगतीला 'मैत्री' म्हणता येत नाही; व या संगतीपासून मित्रप्रेमाचे गंगाजल मिळेल अशी अपेक्षाही करता येत नाही.

तसे म्हटले तर लहानपणापासून माणूस कोणाचीतरी संगत शोधीत असतो. लहान मुले बरोबरीच्या मित्रांच्या सहवासात किती रमतात, भूकतहान विसरतात, हे आपण पाहतो. जगण्याचा आनंद कोणालातरी सहभागी करून लुटावा, अशी त्यांची धारणा असते. ' दुसऱ्याचे दुःख ते आपलेच दुःख ' अशी संवेदना त्यांच्यामध्ये प्रत्यक्ष अशी दिसते. दोघांचे संभाषण हे खरोखर दोघांचे नसते, एकच भावना दोन तोंडांनी बोलत आहे, असा भास त्या निरागस बालकांचे बोल ऐकताना होतो. पण हे फार थोडा वेळ टिकते. दोघांना समाजातल्या आपल्या दर्जाची ( status ) जाणीव होऊ लागताच वरील संवेदना मावळते. पुष्कळदा असे दिसते की, लहानपणी जे जीवश्चकंठश्च मित्र होते ते कळू लागल्यावर एकमेकापासून दुरावतात. पालकांच्याकडून अथवा इतरांकडून केव्हातरी त्यांना सूचना मिळते की, एक श्रीमंत शेटजीचा मुलगा आहे, व दुसरा त्याच्या गुमास्त्याचा आहे. एकाच्या वडिलाला दरमहा हजार रुपये पगार आहे, तर दुसऱ्याचा बाप अजून कायम नोकरीच्या शोधात आहे. या सूचनेची फिकीर न करता आपले संबंध तितक्याच तन्मयतेने चालू ठेवणारी मुले फार

क्वचित् आढळतात. पण झाला तर त्यांनाच खऱ्या मित्रप्रेमाचा लाभ होण्याचा संभव आहे.

समोवताली पाहिले तर असे दिसते की, गट आढळतात, कंपू दिसतात पण मित्रांच्या जोड्या – खऱ्या अर्थाने – अशा फारशा दिसत नाहीत. असे का व्हावे ? सर्वच गोष्टी जीवनदृष्टीवर अवलंबून आहेत, असे मला वाटते. धनलाभ व पैशाने मिळणाऱ्या सुखांचा उपभोग, यांपैकी काहीतरी जास्तीत जास्त कसा होईल ही एकच विवंचना सगळीकडे दिसते. मग दुसऱ्याच्या सुखदुःखात सहभागी होण्याचा प्रश्न येतोच कुठे ? खरा जिव्हाळा दिसणार कसा ? जो माणूस स्वतःच्या हृदयाची खरी संवेदना समजून घेण्याइतकाही मोकळा नाही, तो दुसऱ्याच्या जीवनात केव्हा डोकावणार ? म्हणूनच फक्त सोबती ( Associates ) दिसतात; मित्र दिसत नाहीत. या सोबत्यांचे किती वर्ग पडतात, हे पाहणे मोठे उद्बोधक आहे.

ज्या सोबत्यांना ' मित्र ' म्हणण्याचा नुसता प्रघात आहे, त्यांचा पहिला प्रकार असा :– प्रभाकररावांना ऑफिसमध्ये फक्त चार तास काम असते; कारण ते एक मोठ्या पगाराच्या व जबाबदारीच्या हुद्यावर आहेत. या जागेचा रुबाबच असा आहे की, खालच्या कारकुनांनी तयार केलेल्या प्रकरणावर सह्या करणे, एवढेच त्यांचे काम. अर्थात् ही त्यांची समजूत आहे. पण या समजुतीला अजूनपर्यंत धक्का बसलेला नाही. म्हणूनच एक प्रकरण संपल्यावर दुसरे पुढे येईपर्यन्त जो काळ जातो, त्या वेळात शेजारच्या ऑफिसमधल्या साहेबांशी, जे तेथे नेहमीच बसलेले असतात, त्यांचे गप्पा मारणे चालूच असते. या साहचर्यामुळे हे दोन साहेब ' मित्र ' झाले आहेत; व ऑफिसमधून परत गेल्यानंतर त्यांचे पत्ते जे सुरू होतात ते रात्री आठनऊपर्यन्त चालतात. अर्थात् हा कार्यक्रम कामाच्या दिवसांचा.

सुटीच्या दिवशी हे दोघेजण बारातेरा तास एकत्र काढतात. ‘एकत्र’ याचा अर्थ, एकच पत्त्याच्या डावात ते रमलेले असतात. याप्रमाणे या दोन सोबत्यांमध्ये जे नाते निर्माण झालेले आहे, त्याचे स्वरूप काय आहे ? प्रभाकररावांना त्यांच्या सोबत्याबद्दल नक्की काय वाटते ? हवा तेव्हा मिळू शकणारा ‘एक खेळगडी’ म्हणूनच ते त्याच्याकडे पाहतात, हे उघड आहे. त्यांचे बोलणे इतके मामुली असते की, ‘हवा कशी पडली आहे ? आज तुम्हांला थोडा उशीर झाला ? प्रकृती बरी नाही काय ?” यांसारखे प्रश्नच फक्त त्यांच्या संभाषणाच्या कक्षेत येतात. ( यात प्रत्येक डाव संपल्यानंतरची कोण चुकला ही चर्चा धरलेली नाही. ) अधिक चौकशी कुणी कोणाची करीत नाही, व केलेली कदाचित् पटणारही नाही. वर्षानुवर्षे हा कार्यक्रम चाललेला आहे, व या वीस वर्षात त्यांची कधी कुरबुर कशी झाली नाही, याबद्दल लोकांना आश्चर्य वाटते. पण मला वाटत नाही. दुसऱ्याच्या जीवनात रस घेणे, म्हणजे नसती ढवळाढवळ ( interference ) करणे अशी दोघांचीही समजूत आहे. दोघे एकमेकांच्या लग्नकार्यात, महत्त्वाच्या प्रसंगी न चुकता हजर असतात; पण अंतर ठेवून. एकमेकांची नड ओळखणे, सहानुभूतीने मदत करणे, या गोष्टी कुणाच्या स्वप्नातही येत नाहीत. अशा तऱ्हेचा दीर्घजीवी पण नीरस असा एक सोबतीचा प्रकार आहे.

वरील प्रकारात कुणी कुणाला दुखवीत नाही; पण सुखवीतही नाही. वेळेचा अपव्यय कसा करावा ही एकाची गरज दुसरा पुरी करतो, एवढाच याचा अर्थ आहे. एकमेकांच्या मांडीला मांडी लावून तासन्तास बसलेले असताना देखील, प्रत्येकजण स्वतःबद्दलच सतत विचार करीत असतो. मी, माझा दर्जा व माझे जीवन, याबद्दलच्या विचारांचे कवचच प्रत्येकाने स्वतःभोवती भक्कम बांधलेले असते; व त्या कवचातच तो सदैव राहत असतो. अशा सोबतीत एकाने दुसऱ्याला जीवनामधली एखादी समस्या सोडविण्याला मदत केली, असे कधीच घडत नाही.

सोबत्यांच्या दुसऱ्या प्रकारात निराळे चित्र दिसते. ते नेहमी चर्चा करीत असतात. कुणाला पत्त्याचे व्यसन असते, तसे चर्चा करण्याचे व्यसन यांना असते. किंबहुना, दुसरा कोणीतरी असल्याखेरीज चर्चा करता येत नाही. म्हणूनच मित्र गोळा केलेले असतात. पण या चर्चा नेहमी तात्त्विक विषयावरल्या असतात. जगातल्या राजकारणात प्रवाह आहेत. कोणत्या पक्षाचे धोरण चुकले व ते कसे, समाजात गुन्हेगारी कशी वाढत चालली आहे, लाचलुचपतीचे नवे प्रकार कसे निघत आहेत, वगैरे विषय त्यांच्या चर्चेत निघतात. मतभिन्नता दिसली की कडाडून हल्ला केला जातो; पण 'मैत्री' तुटत नाही. तथापि या चर्चेलाही एक बंधन असते. व्यक्तिगत ( personal ) उल्लेख करावयाचे नाहीत. स्वतःच्या घरातल्या अडचणी कुणी कुणाला सांगायच्या नाहीत, आपल्या मनाची बेचैन उघड करायची नाही, जगाची सुधारणा का होत नाही या विषयाखेरीज इतर विषय काढायचा नाही, असा एक अलिखित संकेत या मित्रांच्या कंपूमध्ये असतो. हे मित्र चर्चेत इतका रस का घेतात, याचे कृष्णमूर्तींनी केलेले निदान पुढीलप्रमाणे आहे :

Most of us who read daily newspapers are filled with gossip, global gossip. It is all an escape from ourselves, from our own pertiness, from our own ugliness. We think that through a superficial interest in world events, we are becoming more and more wise, more capable of dealing with our own lives. *All these, surely are ways of escaping from ourselves, are they not?* In ourselves we are so empty, shallow; we are so frightened of ourselves. We are so poor in ourselves that gossip acts as a form of rich entertainment, an escape from ourselves. "

( First and last Freedom, p. 199 ).

सोबत्यांचा तिसरा वर्गही क्वचित् आढळतो. या वर्गातले सोबती प्रथम कसे, केव्हा भेटले, हे कोणालाच माहीत नसते. पण एकमेकांचा एकमेकांवर इतका जीव असतो की, बोलता सोय नाही. एक दुसऱ्याच्या इतका आहारी गेलेला असतो की, मोहनीविद्येचा तर उपयोग झाला नसेलना, असा संशय इतरांना येतो. एकाने सांगावे व दुसऱ्याने ऐकावे, हे तर त्यांचे वर्तनसूत्रच असते. या नात्याला 'परस्परावलंबन' हा शब्द अपुरा पडतो. एकाने दुसऱ्याचा कबजाच केलेला असतो. दारू, सट्टा वगैरे व्यसनांच्या आहारी गेलेले लोक व हे सोबती यांच्यात मुळीच फरक नाही. पुष्कळांना ती व्यसने व हे मैत्रीचे व्यसन, एकत्र आढळते. एकाच्या अंतःकरणाचा ताबा दुसऱ्याकडे इतका सर्वांशाने गेलेला असतो की, 'कुटुंबात उत्पात घडले तरी हरकत नाही पण ताटातूट होता उपयोगी नाही.' असा हट्ट असतो, "मित्र सांगेल तो धंदा करणार, तो म्हणेल त्या ठिकाणी घर करणार, त्याने सांगितले तर वाटेल तो धोका पत्करणार." अशी जणू प्रतिज्ञा करूनच वागणे चालू असते. या मित्रांच्या जोडीत एकजण प्रभावी ( dominating ) असतो व दुसरा त्याच्या वर्चस्वाखाली असतो. असे दृश्य बऱ्याच वेळा दिसते. पण तसा काही नियम नाही. मुख्य मुद्दा असा की, त्यांच्यापैकी प्रत्येकाच्या जीवनाला दुसऱ्याची संगती ही प्राणभूत असते. जीवाला आकारच तसा आलेला असतो. या मित्रप्रकाराचे वैशिष्ट्य असे आहे की, तो बहुधा अल्पजीवी असतो. कारण, दुसऱ्याचे लक्ष आपल्यावरले कमी होत आहे असा संशय येण्याचा अवकाश, ती मैत्री तुटलीच म्हणून समजावे. प्रत्येक क्षणाला डोळ्यांत तेल घालून एवढेच पाहिले जाते की, 'दुसऱ्याचे शंभर टक्के लक्ष आपल्याकडे आहे ना?' 'आपल्या गौरवाचेच शब्द दुसरा उच्चारीत आहे ना?' अत्यंत आनंद व अत्यंत विषाद या दोन टोकांमध्ये ही मैत्री सारखी हेलकावे खात असते.

सोबत्यांचे हे तीन प्रकारच सर्वत्र आढळतात, नाहीतर एकलकोंडी माणसे दिसतात, असा हा आजचा जमाना आहे. कंपन्यांमधले सहकारी, धंद्यातले भागीदार, व्यवसायामुळे दिवसाचा बराचसा भाग एकत्र काढणारे शिक्षक, वकील असे लोक, तसेच क्रीडागृहात (clubs) तासन् तास बसणारे, हसणारे, खिदळणारे उच्चभ्रू विद्याविभूषित लोक, या सर्वांमध्येच एकत्र येणे, बसणे, बोलणे, चालणे असते. पण त्यांचा विचार आज आपण करीत नाही. आजचा आपला विषय मर्यादित आहे. सोबती आणि मित्र यांच्यामधला फरक समजतो का, एवढेच आपणांस पाहावयाचे आहे.

मैत्रीच्या नावाखाली जीवनात जी बांडगुळे उत्पन्न होतात त्यांचा एवढा विस्तार, खोट्या नाण्यांनाच खरी समजून माणसे कशी चालतात हे दाखविण्यास पुरे, असे मला वाटते. जेव्हा मी स्वतःला विसरण्याकरिता इतर कोणाला तरी जवळ करू पाहतो तेव्हा 'सोबती' हे नाते निर्माण होते. स्वतःला विसरण्याकरिता म्हणून जे जे केले जाते, त्यात स्वार्थ भरपूर असतो. मुख्य हेतू मनातला भकासपणा झाकण्याचा असतो. मनात उद्भवणारी वादळे, संत्रस्त करणाऱ्या समस्या, अथवा एकलेपणाची व्यथा, यापासून पलायन (escape) करण्याची सोय म्हणूनच जो आसरा शोधला जातो, त्याला 'अगदी जिव्हाळ्याचा मित्र' असे नाव दिले म्हणून काय होणार ? त्या संगतीचे कार्य ठरलेले असते, व हेतू निश्चित असतो. आपण अशा संगतीची मागणी का करतो, हे समजून घेणे जरूर आहे, एवढेच मला म्हणावयाचे आहे. अशा प्रकारचे 'सोबती' जवळ करणे कटाक्षाने टाळावे, असे सूचित करण्याचा माझा मानस नाही. जीवनाबद्दल असा कोणताच दंडक घालता येत नाही. नमुनेदार जीवनाची आचारसंहिता (Code of conduct) ठरविल्याने महत्त्वाचे प्रश्न सुटत नाहीत.

माणसापुढे मोठा अवघड पेच आहे. त्याला एकाकी राहणे जमत नाही. सोबती गोळा करावेत तर त्याच्या सहवासाची त्याला इतकी ओढ लागते की, त्याच्या जीवनातला स्वतंत्र असा अर्थच उरत नाही. त्या सहवासाची गुलामगिरी किती जाचक असते, हे हल्लीच्या या आधुनिक समाजात ठिकठिकाणी दिसते. फार थोडी माणसे 'कंपनी-करिता' रात्रीचा दिवस न करणारी आढळतात. माणूस समाजात जितक्या वरच्या थरातला असेल, तितके त्याचे सहवासावलंबन अधिक असते. कशावर तरी स्वसुखाकरिता अवलंबून राहण्याची मनाला जी खोड लागली आहे, तिचे नीट परीक्षण करणे जरूर आहे. "हे अव-लंबन आता प्रमाणाबाहेर चालले, मला ते झटकून टाकले पाहिजे." असा विचार काही माणसांच्या मनात येतो. (अशी जागृत माणसे सध्या फार थोडी आढळतात). पण पुन्हा त्यांना एकलेपणाची भीती वाटू लागते. मग ही भीती आणि सहवासाची ओढ यांचेमध्ये संघर्ष सुरू होतो. हा संघर्ष, हे युद्ध, प्रत्येकाच्या जीवनात अखंड चालूच असते. एकलेपणा नको, म्हणून माणूस हा सारा व्याप जमा करतो. सोबती, क्रीडागृहे, देवळे, कलेची सेवा करणारी मंडळे, सिनेमागृहे, असे हजार प्रकार समाजात चालू असतात. एकलेपणाचा दाह शम-विण्याकरिता माणसे मोठ्या आशेने त्यांचा आश्रय घेतात. पण, "या दाहाचा मागमूसही आता राहिला नाहीं" असे छातीठोकपणे कोणीच सांगत नाही. अग्नी झाकला जातो, संपूर्ण विझत नाही. कुंडातला विस्तव राखेने झाकून ठेवल्यामुळे जिवंत राहतो, तसा तर हा प्रकार नसेल ? या ओढाताणीमुळे उद्विग्न झालेल्या एका इसमाशी कृष्णमूर्तींचा झालेला संवाद पुढीलप्रमाणे आहे :

Questsioner :—I find, I get dreadfully attached to people and dependent on them. In my relationships this attach-

ment develops into a sort of possessive demand, which brings about a feeling of domination. Being dependent, and seeing the discomfort and pain of it, I try to be detached. Then I feel terribly lonely, and unable to face the loneliness, 1 escape through drink and in other ways. Yet I don't want to have merely superficial and casual relationships.

Krishnamurti :—There is attachment, then the struggle to be detached, then out of this comes deeper conflict, the fear of loneliness..... Is it possible to be free, not only of environment and people, *bu: to be free in yourself, so that you don't depend on anything or anyone ?* Can there be joy which is not the outcome of environment or of people ? The environment changes, people change, and if you depend on them you are caught by them or else you become indifferent, callous, cynical, hard. So is it not a matter of whether you can live a life of freedom and joy which is not the result of environment, human or otherwise ?...... Does dependence in any form bring joy ?.....Therefore, one asks : Is there a joy that is not dependent on anything ? Is there a light that is not lit by another ? "

(Conversations. p. 43–45)

एकूण प्रकार असा दिसतो की, आपले दुःख अथवा उदासपणा विसरण्याकरिता अगर कंटाळा ( boredom ) घालविण्याकरिता माणसे

....४

सोबती जवळ करतात. त्यांची मग त्यांना इतकी सवय लागते की, त्यांचेखेरीज चैन पडत नाही. असे नाते निर्माण झाल्यावर या नात्याला 'मैत्री' म्हणून नाव दिले जाते. या मैत्रीच्या बंधनाची गुलामगिरी फारच असह्य होऊ लागली की माणूस मुक्त होण्याच्या खटपटीस लागतो. पण एकलेपणाच्या भीतीशी त्याची गाठ पडते. मग त्या पूर्वीच्या मैत्रीकडे तो पुन्हा वळतो अथवा नवे मित्र जोडतो.

एकलेपणाच्या व्याधीवर मोठ्या आशेने घेतले जाणारे पण खरा गुण न देणारे औषध, एवढेच का 'मैत्री' या नात्याचे स्वरूप आहे ? जी 'मैत्री' आपण बहुशः जवळ करतो, तें अशा प्रकारचे एक फसवे औषधच आहे, जास्त काही नाही. मैत्रीच काय, जीवनातली सर्व नाती आपण आत्मतृप्तीकरिता ( self--fufilment ) वापरतो. मग याचा अर्थ असा का आहे की, कोणाशी कसलेही नाते, अथवा स्नेहसंबंध नसणे, म्हणजेच जीवन ? निर्हेतुक मैत्री ही आकाशपुष्पासारखी माणसाला अप्राप्य का आहे ?

" To be is to be related " हे कृष्णमूर्तींचे एक आवडते सूत्र आहे. माणूस काही पोकळीत राहू शकत नाही. इतर व्यक्तींशी, घटनांशी अथवा कल्पनांशी ( ideas ) त्याचा जो संबंध येतो, त्या संबंधांचे विणलेले एक महावस्त्र म्हणजेच त्याचे जीवन आहे. फक्त प्रश्न एवढाच आहे की, ज्याला आपण परस्परसंबंध ( relationship ) असे नाव देतो त्याचे स्वरूप काय आहे ? जो संबंध व्यक्तीव्यक्तीमध्ये आहें असे आपण म्हणतो तो नक्की कशाचा कशाशी संबंध असतो ? वर ज्यांचे वर्णन केले आहे ते सोबती, एकमेकांच्या अंतःकरणाचा ठाव का घेऊ शकत नाहीत ? का जीवनाची घटनाच अशी नीरस व बेचव आहे ? गंगोदकासारखे पवित्र व शीतल माणसाच्या जीवनात काही नाहीच का ? दोन मित्रांचा सहवास हा, परस्परांच्या जीवनाला

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे
६००८२
२२१८
निबंध
१०।३।८३

उजळून टाकणारा एक जगावेगळा अनुभव, असा कधीच होणार नाही का ?

प्रथम हे लक्षात घेतले पाहिजे की, " मित्र माझ्याशी कसा वागतो, तो अगदी निःस्वार्थीपणाने का वागत नाही, का माझी निवडच चुकली ? " अशी पृच्छा करून या संशोधनाला सुरुवात करता येत नाही. " मी मित्राकडे कशा पद्धतीने पाहतो ? " असा प्रश्न मी स्वतःला विचारला पाहिजे. माझे प्रेम, त्याने काल अथवा पूर्वी काढलेल्या स्तुतीच्या उद्गारांमुळे अथवा त्याच्या विशिष्ट आवडीमुळे – ज्या माझ्याही आवडी आहेत – आहे काय ? मी त्याला भेटताच पहिल्या क्षणात, त्याच्या चालण्या-बोलण्याच्या लकबी, त्याचा आवाज यांनीच आकर्षिला जातो काय ? तो माझ्यासारखा म्हणजे माझ्याइतकाच किंमतीचा माणूस आहे; त्याला वाटणाऱ्या काळज्या सतावणाऱ्या समस्या, याच माझ्याही आहेत, - फक्त त्यांचा तपशील बदलत असेल – असे मला मनापासून वाटते काय ? तो स्वतःच्या दुःखाविषयी बोलत असताना, जणू मीच हेच सारे बोलत आहे, अशी सहसंवेदना मला होते काय ? का त्या वेळी मी स्वतःच्याच कोणत्या तरी चिंतेत गर्क असतो ? अगर तुलनेने ' मी किती सुदैवी आहे ? ' अशी स्वतःचीच पाठ थोपटून घेत असतो ? " But for Fate There go I " ( हे एका साधूचे उद्गार आहेत. ) असे माझे चित्त आतून आक्रंदत उठते काय ? थोडक्यात म्हणजे, ' मी स्वतः कोण व कसा आहे, ' हा मनातला सततचा विचारप्रवाह थांबला आहे काय ? हा सर्व शोध जर मी प्रामाणिकपणाने घेत राहिलो, तर ज्या भावनेचा अनुभव मला येईल तीतच खरे मित्रप्रेम उदयास येईल असे वाटते.

अडचण अशी आहे की, ' एवंगुणविशिष्ट असा मी आहे, ' हे आतून सतत बजावणारी माझी प्रतिमा ( image ) मित्राशी संबंध ठेवू पाहतो.

सोबती जवळ करतात. त्यांची मग त्यांना इतकी सवय लागते की, त्यांचेखेरीज चैन पडत नाही. असे नाते निर्माण झाल्यावर या नात्याला ‘ मैत्री ’ म्हणून नाव दिले जाते. या मैत्रीच्या बंधनाची गुलामगिरी फारच असह्य होऊ लागली की माणूस मुक्त होण्याच्या खटपटीस लागतो. पण एकलेपणाच्या भीतीशी त्याची गाठ पडते. मग त्या पूर्वीच्या मैत्रीकडे तो पुन्हा वळतो अथवा नवे मित्र जोडतो.

एकलेपणाच्या व्याधीवर मोठ्या आशेने घेतले जाणारे पण खरा गुण न देणारे औषध, एवढेच का ‘ मैत्री ’ या नात्याचे स्वरूप आहे ? जी ‘ मैत्री ’ आपण बहुशः जवळ करतो, तें अशा प्रकारचे एक फसवे औषधच आहे, जास्त काही नाही. मैत्रीच काय, जीवनातली सर्व नाती आपण आत्मतृप्तीकरिता ( self--fufilment ) वापरतो. मग याचा अर्थ असा का आहे की, कोणाशी कसलेही नाते, अथवा स्नेहसंबंध नसणे, म्हणजेच जीवन ? निर्हेतुक मैत्री ही आकाशपुष्पासारखी माणसाला अप्राप्य का आहे ?

“ To be is to be related ” हे कृष्णमूर्तींचे एक आवडते सूत्र आहे. माणूस काही पोकळीत राहू शकत नाही. इतर व्यक्तींशी, घटनांशी अथवा कल्पनांशी ( ideas ) त्याचा जो संबंध येतो, त्या संबंधांचे विणलेले एक महावस्त्र म्हणजेच त्याचे जीवन आहे. फक्त प्रश्न एवढाच आहे की, ज्याला आपण परस्परसंबंध ( relationship ) असे नाव देतो त्याचे स्वरूप काय आहे ? जो संबंध व्यक्तीव्यक्तीमध्ये आहे असे आपण म्हणतो तो नक्की कशाचा कशाशी संबंध असतो ? वर ज्यांचे वर्णन केले आहे ते सोबती, एकमेकांच्या अंतःकरणाचा ठाव का घेऊ शकत नाहीत ? का जीवनाची घटनाच अशी नीरस व बेचव आहे ? गंगोदकासारखे पवित्र व शीतल माणसाच्या जीवनात काही नाहीच का ? दोन मित्रांचा सहवास हा, परस्परांच्या जीवनाला

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे
६००५२
२२१८
निबंध
१७।३।८३

उजळून टाकणारा एक जगावेगळा अनुभव, असा कधीच होणार नाही का ?

प्रथम हे लक्षात घेतले पाहिजे की, " मित्र माझ्याशी कसा वागतो, तो अगदी निःस्वार्थीपणाने का वागत नाही, का माझी निवडच चुकली ? " अशी पृच्छा करून या संशोधनाला सुरुवात करता येत नाही. " मी मित्राकडे कशा पद्धतीने पाहतो ? " असा प्रश्न मी स्वतःला विचारला पाहिजे. माझे प्रेम, त्याने काल अथवा पूर्वी काढलेल्या स्तुतीच्या उद्‌गारांमुळे अथवा त्याच्या विशिष्ट आवडीमुळे – ज्या माझ्याही आवडी आहेत – आहे काय ? मी त्याला भेटताच पहिल्या क्षणात, त्याच्या चालण्या-बोलण्याच्या लकबी, त्याचा आवाज यांनीच आकर्षिला जातो काय ? तो माझ्यासारखा म्हणजे माझ्याइतकाच किंमतीचा माणूस आहे; त्याला वाटणाऱ्या काळज्या सतावणाऱ्या समस्या, याच माझ्याही आहेत, - फक्त त्यांचा तपशील बदलत असेल – असे मला मनापासून वाटते काय ? तो स्वतःच्या दुःखाविषयी बोलत असताना, जणू मीच हेच सारे बोलत आहे, अशी सहसंवेदना मला होते काय ? का त्या वेळी मी स्वतःच्याच कोणत्या तरी चिंतेत गर्क असतो ? अगर तुलनेने ' मी किती सुदैवी आहे ? ' अशी स्वतःचीच पाठ थोपटून घेत असतो ? " But for Fate There go I " ( हे एका साधूचे उद्‌गार आहेत. ) असे माझे चित्त आतून आक्रंदत उठते काय ? थोडक्यात म्हणजे, ' मी स्वतः कोण व कसा आहे, ' हा मनातला सततचा विचारप्रवाह थांबला आहे काय ? हा सर्व शोध जर मी प्रामाणिकपणाने घेत राहिलो, तर ज्या भावनेचा अनुभव मला येईल तीतच खरे मित्रप्रेम उदयास येईल असे वाटते.

अडचण अशी आहे की, ' एवंगुणविशिष्ट असा मी आहे, ' हे आतून सतत बजावणारी माझी प्रतिमा ( image ) मित्राशी संबंध ठेवू पाहतो.

मित्राबद्दलही ठराविक प्रतिमा, पूर्वीच्या सहवासातून निर्माण केल्या-खेरीज तिला हा संबंध जोडता येत नाही. जी प्रतिमा माझ्या प्रतिमेला सुख देते अथवा तिचे संवर्धन करते तीच मला आवडते, हे लक्षात ठेवले पाहिजे. ही आवड म्हणजेच ' मित्रप्रेम ' असे मी समजतो. मग होते काय ? या दोन प्रतिमांच्या संरक्षणात व त्या एकमेकांशी जुळत्या करण्यात ( adjustment ) सर्व जन्म निघून जातो. प्रतिमेचा मुख्य गाभा ( Core ) कायम ठेवून तिच्या कडेला दुरुस्ती – देवाण-घेवाण करता येते. ही दुरुस्त करण्यास हरकत न घेणारे असे जे सोबती असतील त्यांचे साहचर्य दीर्घकाळ टिकते. मग लोक त्यांना ' फार जुने मित्र ' असे समजू लागतात. एकमेकांच्या संगतीची लागलेली सवय ही त्यांना एकत्र ठेवते. हे सर्व ठीक होते. पण मित्रप्रेमाचे गंगाजल त्यांना का उपलब्ध होत नाही ? एकमेकांचे जीवन ढवळून काढणारी प्रेम-भावना त्यांच्या अनुभवास का येत नाही ? याचे कारण वर दर्शविलेल्या प्रतिमांचा अंतराय हेच आहे. प्रतिमांच्या मार्फत येणारा प्रेमाचा अनुभव हा हृदयाचा तळ गाठीतच नाही. बालपणी अथवा तरुणपणी प्रतिमा स्थिर अथवा आग्रही बनलेल्या नसतात; म्हणून क्वचित् त्यांचा पडदा बाजूला सरकताच शुद्ध प्रेमाचा प्रवाह एकमेकांच्या हृदयांना भिडत असावा. यामुळेच मैत्रीची उत्कट भावना पूर्ववयात कोठे कोठे दिसते. पण वय वाढू लागताच, ज्या दाराने " मी–माझे " आत शिरते त्याच दाराने खरी मित्रभावना बाहेर पडते; व सगळीकडे फक्त सहकारी अथवा सहचर दिसू लागतात.

□ □ □

३

# पति-पत्नी

स्त्री-पुरुषांमधल्या आकर्षणाचे रूपांतर पतिपत्नी संबंधात केव्हा झाले, हे सांगणे फार कठीण आहे. आदिमानव निर्माण झाल्यानंतर कित्येक शतके अशी लोटली असतील की, जेव्हा फक्त स्त्रिया आणि पुरुषच होते. पती आणि पत्नी असे नाते विवाहसंस्थेच्या निर्मितीनंतर उदयास आले, हे तर उघडच आहे. पण विवाहाचे बंधन जरी मानवाच्या बुद्धीतून पुढे आले असले तरी निसर्गाचा आधार त्याला नाही, असे म्हणता येणार नाही. निसर्गानेच कोणातरी पुरुषाच्या कानात सांगितले असले पाहिजे की, " तुला ही स्त्री सर्वच दृष्टींनी अनुरूप आहे. मग तुझ्या घरातच ती राहील, अशी व्यवस्था का करीत नाहीस ? "

" घर आधी झाले की गृहिणी आधी आली ?" असा सवालही उपस्थित करता येईल. पण ही चौकशी किती लांबविणार ? हल्ली ज्या पद्धतीची कुटुंबसंस्था प्रचलित आहे तिचा उगम शोधण्यापेक्षा या प्रश्नाकडे एका निराळ्या दृष्टीने पाहणे अधिक फलदायी होईल, असे वाटते.

विवाहाच्या बंधनाने एकत्र आल्यानंतर स्त्री-पुरुषांचे जे जीवन सुरू होते, त्या जीवनात कोणकोणत्या प्रेरणा ( urges of action ) असतात, त्यांपैकी नैसर्गिक कोणत्या व निसर्गविरोधी कोणत्या हे पाहता येईल. वैवाहिक जीवनापासून जे मिळावे अशी अपेक्षा असते ते मिळते की नाही, अशा दृष्टीनेही या विषयाचा विचार करता येईल.

विवाहाचे बंधन कशाला म्हणावयाचे, व त्याकरिता निवड कशी करायची हे देशकालावर व ज्या जमातीत विवाह होतो, त्या जमातीवरही अवलंबून आहे. विवाहाचा विधी कोणता यावर वैवाहिक सौख्य अवलंबून दिसत नाही. पण जोडीदाराची निवड कशी होते, ती कोणत्या हेतूने होते हे प्रश्न महत्त्वाचे आहेत. या प्रश्नाची समाजाच्या आर्थिक रचनेचाही संबंध येतो. हल्लीच्या भारतीय समाजात पतिपत्नीसंबंधाचे स्वरूप कसे दिसते, याचा विचार करताना निदान काही वर्षे तरी पत्नीचे गृहिणीपण आपणाला विसरता येत नाही. शहरातली पत्नी अर्थार्जन करणारी असली तरी चूल आणि मूल यांचेशी तिचा निकटचा संबंध अजून काही दिवस तरी राहणारच आहे. हे सर्व जरी खरे असले तरी विवाहाने निर्माण होणाऱ्या नात्याला जीवनात एक विशिष्ट स्थान ( function ) आहे. घरातले काम करणारी स्त्री, असे एक रूप भारतीय पत्नीचे जरी बहुशः दिसत असले, तरी पत्नी म्हणून तिच्या जीवनाला जो एक निराळा अर्थ येतो त्याचाच आपण विचार करू. तसेच, तिचा पालनकर्ता म्हणून पतीची जी कामगिरी आहे तिचा विचार न करता, ' जन्माची सोबतीण ' म्हणून स्त्रीचा स्वीकार करताना त्याच्या मनात काय भावना असतात, कोणत्या अपेक्षा असतात व विवाहानंतर त्यांचे काय होते एवढ्याच दृष्टीने या विषयाकडे पाहू.

' विवाहबंधनाची गरज काय ? ' असा प्रश्न उपस्थित केला जात

आहे. ‘ विवाहाखेरीज संतती झाली तर बिघडले कोठे ? ’ असाही सवाल विचारला जात आहे. या प्रश्नांची उत्तरे शोधण्याचा मानस, निदान आजतरी लेखकाचा नाही. तत्त्वत: जरूर असो अगर नसो, पण विवाहाने जोडले जाणारे संबंध असतात तरी कसे, हे आधी पाहू. कदचित् या संशोधनात वरील प्रश्नांनाही थोडाबहुत स्पर्श होईल.

‘ कामतृप्ती ’ व ‘ प्रजोत्पादन ’ या दोन शब्दांत विवाहासंबंधीचे सार साठविले आहे, असे एक विधान करता येईल. पण एवढ्याने भागत नाही. ‘ माणसे विवाह का करतात ? ’ या प्रश्नापेक्षा ‘ विवाहा-नंतर काय होते ? ’ हा प्रश्न अधिक महत्त्वाचा आहे.

स्त्री-पुरुषांमधले आकर्षण निसर्गनिर्मित आहे, हे तर उघडच आहे. या आकर्षणामुळेच पहिला पुरुष व पहिली स्त्री एकमेकाजवळ आली असतील यातही संशय नाही. इतर प्राण्यांप्रमाणेच मानवाच्या पुनर्नि-र्मितीची ( reproduction ) काहीतरी व्यवस्था करणे निसर्गाला क्रम-प्राप्त होते. एकमेकांविषयीचे आकर्षण प्रथम निर्माण केल्याखेरीज भागतच नव्हते. पण या आकर्षणाचा ब्याप किती वाढेल याची निसर्गाला कदाचित् कल्पना नसावी. निसर्गाचे अंदाज असेच अनेक बाबतींत चुकले आहेत. ‘ धरावे एक व होते भलतेच ’ अशी स्थिती कितीतरी निसर्गप्रेरणांच्या बाबतीत झाली आहे. इतर प्राण्यांनी निसर्गाची सत्ता निमूटपणे कबूल केली आहे. पण मानव हा एकच प्राणी असा आहे की, त्याने निसर्गाशी कधीही न संपणारे युद्ध आरंभिले आहे. मदत निस-र्गाची घ्यावयाची व त्याचेवरच कुरघोडी करावयाची अशी मानवनीती आहे. पण यामुळे तरी मानव अधिक सुखी झाला आहे का ? असे तर नसेल की, ज्या क्षणाला मानवाने आपले तोंड सुखवृद्धीकडे वळविले त्याच क्षणाला दु:खाच्या आगमनाला त्याने वाट करून दिली ?

त्याच क्षणाला संघर्षाचे बीज त्याने पेरून ठेवले ? मानवाची करामत इतर बाबतींत जशी दिसते तशीच ती दुःखोत्पादनातही विशेष ठळक दिसते. इतर आजारी पडतील, भुकेने व्याकूळ झालेलेही दिसतील, पण दुःखाने ते जर्जर झाले आहेत अथवा सुख का मिळत नाही या काळजीने त्रस्त झाले आहेत, असे दिसत नाही.

भुकेचेच उदाहरण घ्या ना. निसर्गाने उत्पन्न केलेली ही गरज आपण किती वाढविली आहे ! शरीर अन्नाची मागणी करते, पण 'अमुक प्रकारचेच अन्न मला पाहिजे' असा आग्रह जेव्हा आपण धरतो, तेव्हा काय झालेले असते ? पूर्वी केव्हातरी कदाचित् खरी भूक लागलेली असताना जिलबी आपण खाल्लेली असते. त्या जिलबीने दोन प्रकारचे कार्य केलेले असते. एक भूक भागविण्याचे व दुसरे, तिची रुची स्मृतीत उतरविण्याचे. मग पुढे होते काय ? लागलेली भूक तृप्त झाली, ही जी महत्त्वाची घटना ती आपण जवळ जवळ विसरतोच. तसे म्हटले तर ती मुद्दाम लक्षात ठेवण्याचे प्रयोजनही नाही. कारण, पुन्हा जरूर तेव्हा भूक लागण्याची व्यवस्था निसर्गाने केलेलीच आहे. पण त्या जिलबीचा तो मधुर स्वाद हाच पुढे कार्यहेतू बनतो; तो आपली स्वतःची निराळी प्रेरणा निर्माण करतो. ही नवी प्रेरणा केव्हा नैसर्गिक भुकेबरोबरच आपले काम सुरू करते, तर केव्हा बऱ्याच वेळा ती अलगपणानेही आपला प्रभाव पाडू लागते. ही नवी प्रेरणा नुसते अन्न मागत नाही, तर मिळालेला स्वाद आणखी हवा, शक्य तेवढ्या अधिक प्रमाणात तो हवा, असा हट्ट धरू लागते. स्मृतियंत्रात शिरलेली अन्नाची रुची खरी भूक नसतानाही, स्वतःच्या पुनरावृत्तीची मागणी करू लागते. यातच सारा अनर्थ साठविलेला आहे. परस्परांच्या सहवासाबद्दल स्त्री-पुरुषांना वाटणारी ओढ ही अशाच तऱ्हेने आपला व्याप हवा तेवढा वाढवू शकते. हा वाढविलेला व्यापही नैसर्गिक आहे, असे वाटू लागते. हे

समर्थन अपुरे पडते असे दिसू लागले तर, ' मानव आता सुधारलेला आहे. तो पूर्वीचा राहिलेला नाही.' अशी सबब पुढे करता येते. मग रसिकतेच्या नावाखाली निव्वळ सुखलोलुपता उजळ माथ्याने वावरू शकते.

स्त्री-पुरुषांमधले लैंगिक आकर्षण ही एक सत्य घटना आहे. ती निव्वळ कल्पना नाही. पण हे आकर्षण आपला प्रताप वाजवीपेक्षा जास्त दाखवू लागले म्हणूनच श्वेतकेतूला विवाहसंस्था स्थापन करावी लागली, असा उपनिषदांत उल्लेख आहे. समाजात उत्पात घडू नयेत, एक प्रकारची शिस्त नांदावी, म्हणून कामतृप्तीला ती कोणत्या व्यक्तीच्या मदतीने करून घ्यावी, याबद्दल मर्यादा घालून देण्यात आली. त्यामुळे हा प्रश्न कायमचा सुटला असे वाटू लागले; पण तसे दिसत नाही. कितीतरी नव्याच अडचणी पुढे उभ्या राहिल्या. वंशशुद्धतेचा आग्रह, विवाहाने समाजातला आपला दर्जा खाली येऊ नये, शक्य तर तो वाढावा हा आग्रह, धनप्राप्तीचा आग्रह, असे अनेक आग्रह विवाहाभोवती पिंगा घालू लागले. तो एक प्रतिष्ठेचा विषय होऊन बसला. कामतृप्तीबरोबरच आत्मगौरवाच्या कक्षेत विवाहाने पदार्पण केले. विवाहाने उत्पन्न होणाऱ्या संबंधांचा विचार करताना कोणत्या हेतूने विवाह केले जातात, हा प्रश्न टाळता येत नाही. कारण जर एखाद्या व्यक्तीने लैंगिक सुखाबरोबरच इतरही काही अपेक्षा पत्नीच्या प्राप्तीपासून केल्या असतील तर त्याचा परिणाम वैवाहिक सुखावर होणारच.

आपण असे समजतो की, पति-पत्नीचे नाते प्रेमाधिष्ठित आहे. अपवादभूत व्यक्ती सोडल्या तर या नात्यामध्ये प्रेमाची निर्मिती होतच असली पाहिजे, असे आपण ठरवून टाकले आहे. त्या प्रेमात जरी काही विशेष मधून मधून आले, तरी या नात्यात जी आपुलकी साधारणतः दिसते त्यालाच ' प्रेम ' असे नाव आपण दिले आहे. विवाहबाह्य प्रेमाने ज्यांच्या चित्ताचा कबजा केला नाही, असे सर्वच लोक, विवाहानंतर

उत्पन्न होणारी ही ‘ आपुलकी ’ म्हणजेच ‘ प्रेम ’ असे समजतात. या आपुलकीचा उगम विवाहाच्या अगोदर व्हावयास पाहिजे, नाहीतर ती खरी आपुलकीच नव्हे; अशीही एक बाजू मोठ्या हिरीरीने मांडली जाते. “ सहवासोत्तर जे उत्पन्न होते ते प्रेम नव्हेच; प्रेम प्रथमदर्शनीच उदयास आले पाहिजे. ते भाग्य ज्यांना लाभले नाही, ते दुर्दैवी. त्यांनी पति-पत्नी म्हणून किती वर्षे जरी बिनबोभाट एकत्र काढली तरी त्या त्यांच्या जिण्याला काही अर्थ नाही. त्यांच्या विवाहात एक मोठेच न्यून राहिले असे समजले पाहिजे ” असे उद्गार भारतीय समाजातल्या विवाहपद्धतीवर हल्ला करणाऱ्या विचारवंतांच एक-दोन पिढ्यांपूर्वी ऐकू येत असत. ‘ कोणती विवाहपद्धती श्रेष्ठ ’ या विषयाकडे आपणांस वळावयाचे नाही. पण प्रेम कशाला म्हणावे, त्याचा उद्भव कसा होतो, याबद्दल जो गोंधळ आपल्या मनात आहे, तो नीट समजून घेतला पाहिजे. जरी सर्वच देशांत वधूवरांची पसंती एकमेकानीच करावयाची असा प्रघात सुरू झाला, ( भारतातही ती सर्वत्र रूढ झाल्याचे लवकरच दिसेल ) तरी प्रेमाचा प्रश्न त्यामुळे मिटला असे होत नाही. मला तर वाटते की, लैंगिक आकर्षणाचा धागा या संबंधात सगळीकडे महत्त्वाचा आहे. या धाग्याचे एक टोक विवाहापूर्वीच सुरू झाले म्हणूनच पतिपत्नीसंबंधात विशेष महत्त्वाचा फरक पडतो, अशातला प्रकार नाही. या संबंधाचे स्वरूप ध्यानात येण्याकरिता ‘ प्रेम ’ शब्दाचा खरा अर्थ काय व आपण समजतो काय, याचा शोध घेतला पाहिजे.

“ आमचे दोघांचे प्रेम म्हणजे दैवी प्रेमच आहे. ते अत्यंत शुद्ध आहे. त्याला कसलाही हेतू चिकटलेला नाही. खऱ्या अर्थाने ‘ प्रेमविवाह ’ हे नाव आमच्याच विवाहाला शोभते ” अशी बढाई मारताना काहीजण दिसतात. त्यांनाही आत्मसंशोधन करावयास लागणारे कृष्णमूर्तींचे पुढील विवेचन पाहा :

Love is something that is not mechanical. What is mechanical is pleasurable, such as sexual experience-you want it to be repeated over and over again; thought has created images, symbols, ideas, and thinking about it will increase and strengthen pleasure. This is what actually takes place... The continuity of an experience which has given a great delight for a second is sustained by thought, nourished by thought....So, thought, which is always the old -- thought is never new, it is the response of memory, experience, knowledge and so on – thought, because it is old, makes this thing which you have looked at and felt, old and *from the old you derive pleasure, never from the new.* Do you understand this ? There is no time; in the new; in the instant there is something new; there is no time to enjoy or to take delight in; only when thought comes in (which is old) it gives it continuity. Is love a pleasure ? Please think it out, don't say " Yes " or " No." That is, is love the product of thought ? Thought can cultivate pleasure; thought can strengthen desire. *But when the mind, through sensation and sensuality seeks pleasure by thinking about it, is that love ?* And is love desire ? (1967 Talks--India P. 109).

पति-पत्नीसंबंधात ज्या आकर्षणाला आपण ' प्रीती ' हे नाव देतो, तिचे स्वरूप हे असे आहे. ते आकर्षण असते फक्त मिळालेल्या सुखाची पुनरावृत्ती करण्याचे. जे सुख स्मृतीत जाऊन बसलेले असते, त्याला ही एक मोठी खोड आहे. ते सुख वस्तुतः संपलेले असते; पण त्याची स्मृती

त्याचा पुन:प्रत्यय आणून देण्याची हिंमत बाळगते. सुखानुभवाची स्मृती ही त्या अनुभवाचाच एक भाग आहे, असा भास होऊ लागतो. ज्या अनुभवाची तो संपल्यावर पुढे सुखद अशी स्मृती राहत नाही, त्याला आपण ‘ सुख ’ म्हणू काय ? ‘ मी सुखी आहे ’ असा उद्‌गार जेव्हा मी काढतो, तेव्हा त्याचा अर्थ काय असतो ? कोणतेतरी सुख मला पूर्वी मिळालेले असते व त्याची स्मृती जवळ बाळगण्याची सोय झालेली असते, असा एक अर्थ वरील भावनेचा असतो. त्याच भावनेचा दुसरा भाग असा असतो की, मला हवे तेव्हा त्या गत अनुभवाची पुनरावृत्ती करण्यास मी समर्थ आहे. आणखी तिसरा भाग असा असतो की, लोक ज्याला ‘ सुख ’ मानतात ते मला मिळाले आहे व मिळत आहे. स्त्रीसुखाच्या बाबतीत या तीनही जाणीवा एकत्र येऊन त्यांची जी अनुभूती एखाद्या पुरुषाला येते, तिला ‘ पति-पत्नीप्रेम ’ असे नाव विवाहानंतर प्राप्त होते. ज्या ज्या वेळेस पती अगर पत्नी एकमेकांकडे पाहतात त्या त्या वेळेला वरील अनुभूती म्हणजे स्मृतिपरंपरा चित्तात जागृत होते. पतीपासून अगर पत्नीपासून मिळालेल्या गतसुखाच्या स्मृतीतूनच एकमेकांचे विशिष्ट नाते निर्माण होत नाही काय ? या नात्याला ‘ प्रेम ’ असे नाव देण्याचा प्रघात आहे. पण लग्नबंधनातून पुढे येणारे हे प्रेमाचे फक्त बंधन आहे. ते एक अवलंबन आहे. दोन व्यक्तींना एकत्र ठेवण्यास हे बंधन उपयोगी पडते. त्यामुळे समाजात एक प्रकारची व्यवस्था राहण्यास मदत होते. प्रजोत्पादनाची व प्रजेच्या पोषणाची स्थिर अशी व्यवस्था उपलब्ध होते, हे सर्व ठीक होते. या गोष्टी तर साध्य झाल्याच पाहिजेत. पण नैसर्गिक आकर्षणाच्या पायावर कुटुंबाची इमारत भक्कम तऱ्हेने उभी करता आली की सगळे कार्य संपले काय ? त्या कुटुंबात पतीला अगर पत्नीला जीवनाचा खरा आनंद कसा मिळेल, याचा विचार करावयास नको काय ? आणि जी इमारत बाहेरून इतकी मजबूत दिसते ती आतून पोखरलेली असली तर ?

‘ पति-पत्नीचे प्रेम ’ असे उदात्त नाव ज्याला आपण देतो, ती एक जुजबी व्यवस्था ( adjustment ) होऊन बसली आहे. ‘ नैसर्गिक भूक भागविण्याची लोकमान्य व लोकप्रिय योजना ’ एवढेच का तिचे स्वरूप आहे ? अशा योजनेने काही गरजा भागविल्या जातात; पण कितीतरी समस्या व संघर्षबीजे तिच्यातूनच निर्माण होतात. त्यांचा विचार आता यापुढे करू.

विवाहसंस्थेची स्थापना झाल्यावर श्वेतकेतूला वाटले असेल की ‘ बस्स, मानव आता कायमचा सुखी होईल. उगाच वणवण करीत तो आता इकडे तिकडे धावणार नाही. कामतृप्तीखेरीज इतर कितीतरी गोष्टींची तरतूद मी केली. पाहा. एकाकी जीवन कंठण्याची आपत्ती आता स्त्रीवर अगर पुरुषावर येणार नाही. शिवाय मुलांच्या संगोपनाची तजवीजही झाली. ’ श्वेतकेतूचे हे समाधान किती दिवस टिकले, हे समजण्यास मार्ग नाही. पण विवाहाची नवलाई फारच थोड्या दिवसांत संपते, हे तर प्रत्येकजण कबूल करील. ‘ आता आपणांस कायमचा जोडीदार मिळाला ’ अशी भावना विवाहित व्यक्तीच्या मनात अक्षता पडताक्षणीच प्रवेश करते, यात संशय नाही. ( याला अपवाद फक्त लादलेले विवाह ! ) पण जोडीदार आपणाला हवा असाच आहे अशी जी समजूत प्रथमच्या दिवसांत असते, ती हळूहळू मावळू लागते. मग त्या व्यक्तीचे मूल्यमापन सुरू होते. अर्थात् विवाहानंतर किती दिवसांनी हे सुरू व्हावयाचे, हे त्या त्या व्यक्तीवर अवलंबून आहे. तसेच मूल्यमापनाचे परिणाम तावडतोब बाहेर दिसू लागतील, असेही नाही.

विवाहाकरिता आतुर झालेली व्यक्ती, तिच्या सर्व प्रकारच्या उणीवांवर ‘ विवाह ’ हेच रामबाण औषध आहे, असे समजत असते. मुख्य आकांक्षा कामतृप्तीची असते, व तिची सोय विवाहाने होते हे तर उघडच आहे. पण कामतृप्ती म्हणजे काय, याचा फारसा विचार कोणी

करीत नाही, ही एक चटकन् समजणारी व सहज घडणारी गोष्ट आहे, असेच जो तो धरून चालतो. मला तर वाटते की, कामवृत्तीचा विषय नीट न समजल्यामुळेच जगातल्या सर्व लैंगिक समस्या एवढ्या भयानक झाल्या आहेत. घटस्फोटांची बेसुमार वाढ अथवा स्वैराचाराने उत्पन्न होणारी अव्यवस्था, या संकटांशी मुकाबला कसा करावा, हे तज्ज्ञांनाही कळेनासे झाले आहे. परिस्थिती इतकी बिघडली आहे की, विवाहाने प्रश्न सोडविले त्यापेक्षा जास्त निर्माण केले की काय, असे विचारण्याची पाळी आली आहे.

सर्वच वासना कशा निर्माण होतात हे न पाहता कामवासनेचा निराळा व पृथक् विचार करण्याची चूक बऱ्याच तज्ज्ञांनी केली आहे, असे नम्रपणाने सुचवावेसे वाटते. तज्ज्ञांची ही चूक व स्वतःच्या ठिकाणी कोणतीही वासना कशी उद्‌भवते हे न पाहता तज्ज्ञांवर अवलंबून राहण्याची आपली चूक! या दोन चुकांच्या संगमातल्या भोवऱ्यात विवाहसंस्था सापडली आहे.

कामवासना ही इतर वासनांपासून निराळी काढून तिचा जेव्हा विचार केला जातो, तेव्हा अनेक भ्रम उत्पन्न होतात. तिचा प्रभाव आहे त्यापेक्षा अधिक मोठा व अनिवार्य आहे, अशी समजूत मग सहज होते. 'आधी कामपूर्ती, मग जमल्यास इतर गोष्टी' असा जमाना नंतर सुरू होतो. मग फ्रॉईड आपल्या मदतीस येतो. विशेषज्ञांच्या (Specialists) ताब्यात हा विषय गेला की काय होते हे आपण पाहतच आहोत. रोगाचे मूळ शोधण्यापेक्षा त्याचे विद्यमान स्वरूप गृहीत धरूनच सगळी उपाययोजना चालली आहे. विवाहाचे बंधन शक्य तेवढे सैल करता येईल का, एवढे एकच सूत्र सर्व तज्ज्ञ तपासीत बसले आहेत. पण ज्या कामतृप्तीच्या केंद्राभोवती एवढे विचारमंथन चालले आहे, ते केंद्र समजून घेण्याचा प्रयत्न आपण

कधीच करीत नाही. यापूर्वी निर्दिष्ट केल्याप्रमाणे मनात सुरू होणाऱ्या एक प्रकारच्या यांत्रिक क्रियेमुळे (Mechanical and repetitive action) जर कामवासना प्रत्ययास येत असली, तर तिच्या पूर्तीचाच तेवढा विचार करून भागेल काय ? हल्ली हा विचार एकाच दिशेने होत आहे. ती दिशा अशी की, ही कामपूर्ती इतरांच्या जीवनात काही उत्पात घडवून आणणार नाही ना ? काही वेळा तर असे सांगितले जाते की, कामपूर्तीचा अग्रहक्क न डावलता जे काय उत्पात घडतील ते सोसण्याची तयारी दर्शविणे म्हणजेच आधुनिक माणसाचे लक्षण ! जे घडते ते सोसण्याची शक्ती खरोखरच आली तर त्यात काही वाईट नाही. पण ज्या कामपूर्तीच्या मागे सतत लागल्यामुळे विवाहबाह्य संबंधाचा परिणाम वैवाहिक जीवनावर होऊन घटस्फोट, परित्यक्त बालके वगैरे समस्या निर्माण होतात, तिची जरूरी शरीराला आहे, का या आधुनिक मनाला आहे ? कामोत्पत्ती कशी होते हे समजून न घेता तिच्या पूर्तीच्याच अनेकविध व्यवस्था करण्यात आपले काही चुकत तर नसेल ? पति-पत्नीचे नाते ही जीवनातली एक महत्त्वाची घटना आहे. ही घटना सर्वांत जास्त काळ टिकते, एवढेच नव्हे, तर ती माणसाच्या व्यक्तिमत्त्वावर फार खोल असा परिणाम करते. म्हणूनच तिच्याकडे जरा काळजीपूर्वक पाहिले पाहिजे. या घटनेच्या सुरुवातीपासूनच (किंबहुना विवाहाच्या अगोदर सुद्धा) आपल्या अनेक चुका होतात. नुसत्या लैंगिक शिक्षणाने हा प्रश्न सुटण्यासारखा नाही.

पत्नीबद्दल पतीच्या मनात व पतीबद्दल पत्नीच्या अंतःकरणात जी प्रतिमा (Image) निर्माण होते, त्या प्रतिमेला अनेक बाजू असतात. पण त्या प्रतिमेत ‘ कामतृप्ती करणारी व्यक्ती ’ हे अंग प्रमुख असते. (फ्रॉईडच्या म्हणण्याप्रमाणे, कामतृप्ती हा तर जीवनाचा केंद्रबिंदू

आहे. ) असे असूनही विवाहाची नवलाई इतक्या लवकर का जावी ? हा जुनेपणा आपल्याला नकळत येतो, आणि मग एक विलक्षण धडपड सुरू होते. जे सुख प्रथमच्या दिवसांत मिळाले ते पुन्हा का मिळत नाही, अशी पृच्छा आतून सारखी सुरू होते. गतसुखाच्या प्राप्तीची हाव हीच आपणाला परिचित असलेली कामवासना होय. ती केव्हा प्रकट असेल तर केव्हा सुप्त राहून चित्ताला मधून मधून प्रक्षुब्ध करीत असेल. प्रकटीकरणाच्या बाबतीत कमी निर्बंध असणे, म्हणजे आधुनिकता अशी समजूत प्रचलित आहे. पण आपला मुद्दा तो नाही. कामतृप्तीच्या अनुभवातून पत्नीबद्दल जी प्रतिमा तयार होते त्या प्रतिमेवर माझे सुख मी किती प्रमाणात अवलंबून ठेवतो, हा खरा प्रश्न आहे. अशा प्रकारचे अवलंबन ( dependence ) झाल्यावर त्यातून माझे जे नाते पत्नीशी होते, त्याला 'प्रेम' हे नाव देता येईल काय ? शिवाय, कामतृप्तीची कधीही न संपणारी मागणी समजून घेतली पाहिजे. ती मागणी जर स्मृतियंत्रात नमूद झालेला अनुभव पुन्हा का शंभर टक्के मिळत नाही, अशा नैराश्यातून प्रत्येक क्षणाला उत्पन्न होत असली तर तिच्या मागे धावण्यात काय अर्थ आहे ?

विवाहाचा प्रधानहेतू जरी कामपूर्ती हाच असला आणि प्रजोत्पत्ती हे त्याचे फलित असले, तरी विवाहानंतर पति-पत्नीच्या दरम्यान जो संबंध ( relationship ) प्रस्थापित होतो, त्यात अनेक प्रवाह असतात, तसेच आहे हे. पण मुख्य नदीच्या प्रवाहाचा जोर उपनद्यांवर मात करतो. कोणत्या दिशेने जावयाचे हे ती ठरविते, आणि उपनद्या फक्त तिचे सामर्थ्य वाढविण्याचे काम करतात. म्हणूनच पत्नीबद्दल पतीच्या मनात जी प्रतिमा असते, तिच्यात कामतृप्तीचा अनुभव हा मुख्य गाभा (core) असतो. कितीतरी समस्या यामुळेच उद्भवतात,

'ज्या व्यक्तीने मला पूर्वी कामतृप्तीचे सुख दिले ती कायमची मज-जवळच राहिली पाहिजे, इतकेच नव्हे, तर तिने कुणाकडे ढुंकूनही पाहता कामा नये,' अशी मागणी मन करू लागते. मला हवे तेव्हा केव्हाही पूर्वीसारखे सुख मिळण्याची सोय कायम राहावी, हा हेतू या मागणीच्या मागे असतो. याचाच अर्थ असा की, कामतृप्तीच्या बाबतीतही एक प्रकारची सुरक्षितता ( security ) माणसाला हवी असते. यातूनच मत्सराचा ( Jealousy ) उगम होतो, हे सुज्ञ वाचकांच्या ध्यानात आले असेल. या मत्सराच्या भावनेचा अतिरेक झाला की मग त्यातून पत्नीचा जो छळ होतो, तो आणखी नवे प्रश्न उत्पन्न करतो. स्त्रियांना स्वातंत्र्य किती असावे, घटस्फोटाचा हक्क कुणाला व केव्हा मिळावा, अशासारखे प्रश्न मग समाजाला सोडवावे लागतात.

सारांश असा की, कामतृप्तीची मागणी कशातून उगम पावते व तिच्यातला निसर्गदत्त ( factual ) भाग केवढा व कोणता हे न समजून घेतल्यामुळेच सगळ्या अडचणी येतात. तसेच प्रत्येक सुख-साधनाच्या बाबतीत, ते कायम कसे टिकेल ही विवंचना करण्याची जी सवय मनाला लागली आहे, ती घातक आहे. जीवनात सुख अनेक प्रकारचे आहे, पण ते प्रत्येक वेळी नव्याने शोधले पाहिजे. याचाच अर्थ असा की, सुखाच्या पुनरावृत्तीच्या मागे लागून उपयोग नाही.

गतसुखाची पुनरावृत्ती व्हावी हीच इच्छा मन सदैव करीत राहिले की अनेक खोट्या गोष्टी जीवनात येतात. नानाप्रकारच्या कल्पना मग मन शोधू लागते. अनेक उदात्त शब्दांचा वापर सुरू होतो. खरे जीवन संपूर्ण झाकले जाते, व एका खोट्या जगात माणूस वावरू लागतो. 'कामतृप्तीचे साधन' म्हणूनच पत्नीकडे पाहणारा पुरुष तिच्यावर खरे प्रेम करतो, असे म्हणता येईल काय? त्याचे प्रेम कामतृप्तीवर आहे असे

म्हणणे अधिक समर्पक होणार नाही काय ? आणि मग प्रश्न असा पुढे येतो की, पतिपत्नीचे नाते असे नाव ज्याला आपण देतो ते नाते असते तरी कुणामधले ? ते नाते दोन खऱ्याखुऱ्या व्यक्तींमधले नसते. एकमेकांच्या स्मृतियंत्रात स्थिर झालेल्या प्रतिमांचे ( Images ) दरम्यान असलेले हे नाते असते. एका प्रतिमेचे 'प्रेम' दुसऱ्या प्रतिमेवर असते. त्या प्रेमाची अपेक्षा व मागणी एकच असते. ती ही की, दुसऱ्या व्यक्तीची प्रतिमा जी हृदयात असते ती बदलणे भाग पडू नये. कारण, प्रतिमा कायम राहण्यात मनाला सुरक्षितता ( Securlty ) वाटते. नाहीतर जीवनाला अर्थ नाही असे वाटू लागते. माणूस उद्वेगाच्या दरीत स्वतःला झोंकून देतो, अथवा आत्महत्या करतो. त्याने प्रेमभंगामुळे आत्महत्या केली असे वर्तमानपत्रात मग छापून येते. पण हा प्रेमभंग नसतो, प्रतिमा भंग असतो.

प्रतिमेच्या मार्फतच सर्व व्यतींशी व वस्तूंशी संबंध ठेवण्याची मनाला सवय लागलेली आहे. मनाला दुसरी कार्यपद्धती माहीतच नाही. प्रतिमारक्षणाच्या मागणींतून हक्क उदयाला येतात. प्रतिष्ठेच्या कल्पना पुढे येतात. काही वेळा, "माझ्या पवित्र प्रीतीची परवड का केली जावी ?" असे सवाल केले जातात. पण माणूस या आपल्या 'पवित्र प्रीतीकडे' नीट पाहात नाही. 'मिळालेले सुख सुरक्षित राहावे' या हट्टाखेरीज त्या प्रीतीत दुसरे काही असते का ? भाषेतले उदात्त शब्द, समाजातल्या परंपरा आणि इतर लोकांचे वर्तन, या वेड्या हट्टाच्या मागे लागण्यास माणसाला मदत करतात. कुणीच थांबत नाही, व आत्मनिरीक्षण करीत नाही.

केवढी गुंतागुंत या आंधळेपणामुळे निर्माण होते, ते पाहा. शरीराची गरज व नैसर्गिक आकर्षण यांतून जी मागणी परस्परांच्या संगतीबद्दल निर्माण होते, तिचे मोजमाप केले तर ती फारच लहान असली पाहिजे,

हे उघड आहे. अर्थातच, हे मोजमाप प्रत्येकाच्या बाबतीत सारखे असणार नाही. पण या मागणीचा जो पुढे विस्तार होतो, तो भयप्रद आहे. हा विस्तार कसा होतो व तो टाळता येईल का, असे प्रश्न आपणांपुढे आहेत. नंतरचा प्रश्न असा आहे की, लैंगिक आकर्षण हल्लीच्या विस्तृत स्वरूपात प्रत्ययास येईनासे झाले की जीवन नीरस व निष्प्रेम होईल काय ? का ते उलट अधिक सहजस्फूर्त आणि सर्जनक्षम ( Creative ) होईल ? या सर्व प्रश्नांची उत्तरे दुसऱ्या कोणाकडून न मिळविता प्रत्येकाने आपल्या जीवनात शोधली पाहिजेत. हा शोध प्रामाणिकपणाने घेत असताना कामवासनेचे जे स्वरूप उरेल, तेच नैसर्गिक असे मला वाटते. त्या वासनेतून मग प्रतिमानिर्मिती होत नाही.

हल्ली होते असे की, पति-पत्नींना लवकरच एकमेकांचा कंटाळा येतो. हा कंटाळा वाजवीपेक्षा न वाढू देणारे स्त्री-पुरुष अर्थातच नमुनेदार नागरिक म्हणून मान्यता पावतात. या कंटाळ्याची कारणे दोन संभवतात. काहीजणांच्या बाबतीत, कामवृत्तीच्या प्रक्षोभाची न्यूनता हे कारण असू शकेल. पण यातही निसर्ग दोषी धरता येत नाही. कारण, स्मृतीच्या मदतीने पुनरावृत्तीचाच हव्यास धरल्यावर निसर्गाचा संबंध येतो कोठे ? निसर्गाला डावलून जे जे हट्ट माणूस करतो त्यांतले बरेचसे हट्ट आधुनिक समाजाने शिरोधार्य मानले आहेत. पण सर्वच हट्टांचे पर्यवसान वैफल्यभावनेत होते. या भावनेतून पत्नीविषयी तिरस्कार वाटू लागतो. एकत्र राहणे दुःसह होते व विभक्त होणे हाच एक पर्याय उरतो. कंटाळ्याचे दुसरे कारण, नमुनेदार नागरिकांच्या जीवनातही असू शकते. त्याचा आविष्कार हरतऱ्हेने होतो ' अनुभव ' चित्रपटात त्याचा एक प्रकार दाखविला आहे. पति-पत्नींचे सहजीवन खऱ्या अर्थाने नष्टच होते. फक्त देखावा राहतो. कोणी कुणाची मनापासून दखल घेत नाही. विचारपूस नाही. सहसंवेदना नाही, काही

नाही. यांत्रिक बाहुल्यांप्रमाणे घरातले सर्व व्यवहार केले जातात. या ठिकाणी पती हा फक्त धनोत्पादन करणारा घरातला कर्ता असतो; व पत्नी हीं पाकनिष्पत्ती करणारी अथवा करवून घेणारी सेविका असते. अशा उदाहरणांतही पति-पत्नी हे नाते बाहेरून दिसते; पण दोघांच्या अंत:करणांतून ते केव्हाच संपलेले असते.

एकूण काय, तर वैफल्याची गाठ या ना त्या रूपाने पडतेच. हे असे का व्हावे ? दोन व्यक्ती चोवीस तास अष्टौप्रहर एकाच घरात राहत असताना, एकमेकांपासून अत्यंत दुरावलेल्या, असे का ? त्यांचे प्रथमचे ‘ दैवी ’ प्रेम कुठे गेले ? का ते नव्हतेच ?

लैंगिक आकर्षणाने ज्या नात्याची सुरुवात होते, त्या ठिकाणी खऱ्या प्रेमाची उत्पत्ती अशक्य का आहे ? तसे दिसत नाही. पण प्रथम मीलनानंतर लवकरच एक ठराविक चूक प्रेमिकजन करू लागतात. ते असे समजू लागतात की, उभयतांच्या संगतीत घालविलेले क्षण, ( म्हणजे त्या क्षणात कोण काय बोलले व कसे दिसले हे ) सतत स्मरत राहणे म्हणजेच प्रेम करणे ! ही स्मृती पुन्हा पुन्हा येणे सुरुवातीस सहज घडते. पण त्या स्मृतीच्या आहारी माणूस इतका जातो की, तो खरे जीवन विसरतोच. मग दररोज घडणारी प्रत्येक कृती या स्मृतींच्या निकषावरच तपासून पाहिली जाते. या कृतीने आपले प्रेम अधिक उत्कट होत आहे, अशी समजूत बऱ्याच प्रेमिकांची असते. पण आपण भूत-कालात जगत आहोत, हे त्यांच्या लक्षात येत नाही. काही वेळा, नवीन येणारे अनुभव प्रथमच्या सुखद दिवसांशी सुसंगत असतात. मग मूळची प्रतिमा त्यांचे योगाने अधिक मजबूत बनते. पण जेव्हा ते विसंगत असतात, तेव्हा धक्का बसतो; पति-पत्नीप्रेमाला मग तडा जातो. “ मी फसलो काय ?” असे मन विचारू लागतें. यातूनच दुसऱ्या व्यक्तीवर आपल्या इच्छा लादण्याची वृत्ती उत्पन्न होते. पती पत्नीशी

अथवा पत्नी पतीशी कठोरपणाने वागू लागते. हा कठोरपणा व्यक्त कसा करावा, कोणते शब्द वापरावेत, त्या कठोरपणाचे रूपांतर कोणत्या कृतीत करावे, एवढ्याच बाबतीत तरतमभाव आढळतो. काही 'सुसंस्कृत' कुटुंबांतून अपशब्द ऐकू येत नाहीत; आवाज चढविला जात नाही, अथवा प्रहारापर्यन्त मजल जात नाही. पण एवढ्याने त्या पति-पत्नीमध्ये प्रथमची प्रेमभावना जागृत आहे, असे म्हणता येत नाही. कारण त्यांची मुद्राच असे सांगते की, आत्मीयतेचा झरा केव्हाच आटला आहे, व संसाराचा गाडा कसा तरी रेटीत राहण्याचे सौजन्य फक्त उरले आहे! हे असे का होते, याचा शोध घेतला पाहिजे.

खऱ्या प्रेमाचा संबंध गतसुखाच्या स्मृतींशी नाही अथवा त्या स्मृतींतून उद्भवणाऱ्या मागणीशीही नाही. ही मागणीच जीवनात संघर्ष उत्पन्न करते. कारण, जे या क्षणात विद्यमान नाही, ते तिला हवे असते. या मागणीला नैसर्गिक वासना समजण्यात आपण मोठीच चूक करीत आहोत. जी मागणी ( demand ) फक्त स्मृती घोळीत बसल्याने चित्तात मूळ धरते, तिला नैसर्गिक कसे म्हणता येईल? कृष्णमूर्तींच्या प्रतिपादनातले हे मुख्य सूत्र आहे. ते म्हणतात :

The beginning of pleasure is the beginning of thought in conflict. *It is thought that demands, that creates conflict.* My problem is not the delight of seeing something beautiful, but commences when thought says that these must be a repetition. then The delight becomes a pleasure and I feel I must have more of it. the idea of " more of it " is created by thought thinking about it. I see a nice face, a beautiful face with a clear smile and I think about it. First I see

it, and then I think about it. The thinking about it is the beginning of torture, of pain, of pleasure–*how to have it, how to hold it, how to dominate it*. When I have dominated it, it is destroyed and I go to something else, and so on and on and on. Can I look at that green field with that extraordinary light and that tremendous rapture of beauty, without thought interfering? *That is the issue*. The moment thought enters it becomes a torture, a pain, a conflict, with all the results and side–effects. Thought destroys that which was beautiful. (9 Talks in Europe, 1966, p. 369).

जो अनुभव एकदा आला व संपला त्याची प्राप्ती पुन्हा होईल अशी आशा धरणे व त्याकरता धडपडणे, हे आपल्या कामवासनेचे मुख्य अंग होऊन बसले आहे. या वासनेवर आधारलेले असेच पति-पत्नीचे नाते सर्वत्र दिसते. मग त्याला अपेक्षाभंग, संघर्ष, परित्याग ( desertion ), घटस्फोट, पुनर्विवाह यांची बाधा झाल्याखेरीज कशी राहील ? जे चालू वैवाहिक संबधात मिळत नाहीत, ते इतरत्र शोधण्याचा मूर्खपणा अनादिकालापासून माणसे करीत आली आहेत. समाज या प्रवृत्तीचे नियंत्रण करण्याची अयशस्वी खटपट सारखी करीत आहे. घटस्फोटाची तरतूद व इतर उपाय शोधून काढले जात आहेत. पण "विवाहाने जोडले जाणारे नाते अयशस्वी का व्हावे ?" हा प्रश्न तसाच अनुत्तरित राहिला आहे. जीवनातली सर्वच नाती एका चुकीच्या भूमिकेवरून हाताळली जात आहेत. पति-पत्नीसंबंधात असणारा कामतृप्तीचा प्रश्न आपल्या अज्ञानामुळे कसा अवघड होऊन बसतो, हे समजण्यास एवढे विवेचन पुरेसे आहे. पण पति-पत्नींच्या सहजीवनात

जे परावलंबन अथवा एकमेकांचा आधार नसला तर जी अगतिकता निर्माण होते, तिचा विचार आता यानंतर करू.

घरात काय, बाहेर काय, परतंत्रता ( dependence ) हीच सर्व समस्यांची जननी आहे, असे दिसते. माझ्या सुखाकरिता, किंबहुना दैनंदिन जीवनाकरिता, मी जर एका विशिष्ट गोष्टीवर अवलंबून राहू लागलो, तर किती अडचणी येतात, पाहा. चोवीस तास माझे लक्ष फक्त एकाच गोष्टीकडे असते. ती गोष्ट भरपूर प्रमाणात मला मिळत आहे ना, का काही कमी पडत आहे, या प्रश्नाचा घंटानाद मनात सारखा चालू असतो. मी लोकांशी बोलतो, द्रव्यार्जनाचा व्यवसाय करतो, इतरही काही संबंध ठेवतो. पण मन सारखे कसलातरी आधार शोधीत असते. हा आधार मिळालाच पाहिजे असा त्याचा हट्ट असतो. हा हट्ट पुरविला गेला तरच जीवनात अर्थ आहे, नाहीतर जीवन नीरस, टाकाऊ आहे, असा सिद्धान्त प्रत्येकाने स्वतःशी ठरविलेला असतो. तारुण्यात हवा असलेला सुखाचा आधार कामतृप्तीचा असतो व पत्नीची किंमत त्या दृष्टीने ठरविली जाते. ती ठरविताना तुलना हे मुख्य साधन असते. तुलनेने सत्य सापडते ही गैरसमजूत मानवाने केव्हा करून घेतली, हे समजण्यास मार्ग नाही, पण तिने जेवढे दुःखोत्पादन केले आहे तेवढे इतर कशानेही झालेले नाही. तुलनेने जे सौंदर्य प्रतीत होते तेच खरे सौंदर्य, असे एकदा ठरल्यावर असमाधानाची कायमची तरतूद करून ठेवली गेली, असेच नाही का झाले ? कारण, तुलना कधी संपत नसते.

कामतृप्तीशी संबंधित अशी जी प्रतिमा पतीची अथवा पत्नीची असते, तिचा विचार यापूर्वी केला आहे. या प्रतिमेमुळेच मत्सर, बदला म्हणून जोडीदाराशी बेइमानी व तज्जन्य बेदिली असे अनेक नको ते अनुभव वैवाहिक जीवनात येऊ लागतात. पतीने

पत्नीच्या प्रतिमेवर प्रेम न करता खुद्द पत्नीवर प्रेम केले तर ? मग विवाहाच्या वेलीला येणारी वरील कडू फळे टळतील, असे वाटते. पण ' खुद्द पत्नीवर प्रेम ' म्हणजे काय ? या प्रेमाची अनुभूती कधी तरी आपणाला आली आहे काय ? हे प्रेम नक्की कशावर असते ? पत्नीची प्रतिमा बाजूला गेली तर ' पती ' हे नाते जागेवर उरते का ? का हे सर्वच गूढगुंजन आहे ?

प्रतिमानिरपेक्ष प्रेम म्हणजे काय, हे शब्दांत सांगणे फार कठीण आहे. तो प्रयत्न शेवटी करू.

कामतृप्ती इतकाच प्रभावी असलेला आणखी एक आग्रह पती व पत्नीच्या नात्याला विशिष्ट आकार देतो. हे नाते मग बंधनच होते. पण माणूस स्वत:ची अशी फसवणूक करतो की हे बंधन नाही; उत्कट प्रेमाची ती परिणती आहे. कामतृप्तीचा हेतू नसताना देखील, परस्परांच्या सतत साहचर्याची एवढी जरूरी पतिपत्नींना वाटते की, त्याशिवाय जगणे अशक्य होऊन बसते. हे असे होणे क्रमप्राप्त आहे, अपरिहार्य आहे, असे समर्थनही करण्यात येते. पण निरोगी अवस्थेचे ते लक्षण नव्हे.

परस्परांची संगती कोणत्या हेतूमुळे जरूर वाटते हा खरा प्रश्न आहे. या हेतूचे खरे स्वरूप न पाहता त्याचे समर्थन करण्यातच कालाचा अपव्यय आपण करतो. हा शोध ज्याचा त्यानेच घेतला पाहिजे व तीही एक कला आहे. झोपेतून उठल्यावर प्रथमच्या तीन-चार सेकंदांत पतीने आपल्या जीवनातल्या प्रेरणा तपासल्या, तर त्याला काय दिसेल ? त्याच्या एकदम लक्षात येईल की, ठराविक वेळेला चहा आणून देणारी, धुतलेले कपडे हातात ठेवणारी, स्नानाची वेळ झाली हे पुन्हा पुन्हा सांगणारी, स्वकीयांचे स्वागत कोणत्या तारतम्याने करावे हे लक्षात ठेवणारी, घरातला हिशेब ठेवणारी, व गैरवाजवी खर्च कोणता

हे आवर्जून सांगणारी, व केव्हाही हाक मारली की हजर असणारी पत्नी, त्याच्या जीवनाचा अविभाज्य असा भाग होऊन बसली आहे. अर्थात् भारतातल्या पुढारलेल्या वर्गातले हे गृहचित्र आहे. पण त्यातला तपशील महत्त्वाचा नाही. पाश्चात्य समाजातही पत्नीकडून होणाऱ्या कित्येक कृतींवर पती आपले सर्वस्व अवलंबून ठेवतो. पत्नीही पतीकडून होणारी दैनंदिन कामगिरी अथवा त्याची घरातली हजेरी म्हणजेच वैवाहिक जीवन समजते. घरात ही कामे होऊ नयेत अथवा त्यांची अदलाबदल व्हावी, असे मला सुचवायचे नाही. मुद्दा असा आहे की, हळूहळू या सर्व गोष्टी मनात ठाण मांडून बसतात; नव्हे, मनातली सर्व जागा त्यांनीच व्यापली जाते या दैनंदिन स्मृतींचे बेमालूम मिश्रण होते; व त्यातून पतीच्या मनात पत्नीची व पत्नीच्या मनात पतीची एक मूर्ती तयार होते. मग पुढे काम एवढेच उरते की, ही मूर्ती अंगप्रत्यंगासह अगदी शाबूत आहे ना, हे सतत तपासावयाचे. या तपासणीत जरा का न्यून आढळले की झाला मनस्ताप! कोणतीही महत्त्वाची चूक पतीकडून अथवा पत्नीकडून होण्याचा अवकाश, तत्क्षणीच मन आक्रंदून उठते व म्हणते, " हा माझ्या प्रीतीचा अपमान आहे. हा कृतघ्नपणा आहे. केवढे दुःख माझ्यावर कोसळले आहे ! केवढा दुर्दैवी प्राणी मी आहे ! " पण हे दुःख मूर्तिभंजनाचे असते. हृदयात मूर्ती ( image ) नसती तर ते जन्मालाच आले नसते.

कामतृप्तीमुळे असो अथवा दैनंदिन साहचर्यामुळे असो, अवलंबन ( dependence ) हे प्रीतीचा फक्त आभास उत्पन्न करते व त्यातून हक्क, झगडे, विघटना, यांखेरीज पुष्कळदा पर्यायच राहात नाही. इतक्या दुराग्रहापर्यंत जरी मजल गेली नाही व अगदी बिनबोभाट व निमूटपणाने पति-पत्नीचे साहचर्य शेवटपर्यंत टिकले तरी त्यांना जीवनातला तोच तोपणा ( monotony ) जो सहन करावा लागतो, त्यांचा विचार

करावयास नको काय ? बहुसंख्य पति-पत्नींपुढे हाच काय तो प्रश्न आहे. ज्या जीवनाला मोठ्या उमेदीने सुरुवात होते, त्याला अशी कळा का प्राप्त व्हावी ? का 'सहन करणे' एवढाच जीवनाचा अर्थ आहे ? 'प्रेम' हे फक्त दिवास्वप्न का आहे ? जन्मभराचे सहचारी असून त्यांनाही दुष्प्राप्य, अशी का ही वस्तू आहे ?

केव्हा केव्हा असे वाटते की आपले मन हेच प्रेमाचा शत्रू आहे. मनाला जे हवे असते तेच, प्रत्येक क्षणात नव्याने उगवणारा प्रेमाचा अंकुर नष्ट करते. "मला प्रेम हवे," असे वरवर जरी मन म्हणत असले तरी त्यात काही अर्थ नसतो. सुरक्षित जीवनाचा साचा तसाच कायम राहून प्रीतीचा अनुभव मिळाला तर तो मनाला पाहिजे असतो. याचाच अर्थ असा की, या अनुभवाबद्दलच्या नुसत्या कल्पना (theories) अगर शब्द आपणाजवळ असतात. त्या कल्पना प्रत्यक्ष अनुभव तर देत नाहीतच, पण असमाधान मात्र वाढीस लावतात.

स्वतःच्या अगर दुसऱ्याच्या ठराविक वेळी होणाऱ्या ठराविक कृतीवर अवलंबून राहण्याची मनाला एकदा सवय लागली की, जीवनप्रवाहाशीच आपला संपर्क ( contact ) तुटतो. हे अवलंबन स्मृतीच्या साहाय्याने होते. "काल या वेळी काय घडले" असा प्रश्न मनात सारखा उत्पन्न होतो. या प्रश्नाचे स्वरूप नेहमीच शब्दांकित नसते. तो चित्तात केव्हा उदय पावतो, हे तितकेसे लक्षातही येत नाही. पण जरा खोल निरीक्षण केले तर वरील विधानाची सत्यता प्रत्येकाला पटेल. जरी आज या वेळी दुसरे काही घडले तरी ते कालच्याच – किंवा नेहमीच्या – घटनेशी ताडून पाहिले जाते व घडले ते बरोबर की चूक, इष्ट की अनिष्ट, हे याच रीतीने ठरविले जाते. कृष्णमूर्ती या मनाच्या क्रियेला नव्याने घडणाऱ्या घटनांचा अर्थ लावणे ( interpreting ) म्हणतात.

"माझा आजचा दिवस कालच्यासारखाच असला पाहिजे," या

आग्रहाचे कारण उघड आहे. तो तसा असला तरच मला सुरक्षित वाटते, माझे पाय जमिनीवर टेकलेले आहेत, असे वाटते. पत्नीची संगती सतत पाहिजे. एवढेच नव्हे तर तिचे वागणे – किंबहुना बोलणेही – रोजच्यासारखेच पाहिजे. " हे असे असले तरच ती माझी पत्नी; व अशी पत्नी मिळाली म्हणून मी भाग्यवान्. नाहीतर सगळेच बिघडले. " अशी आपली भूमिका असते. आपण म्हणतो की, " अनपेक्षिताचा आनंदही आम्हांला हवा असतो. किती नवेनवे बेत आम्ही करतो. दरवर्षी नव्या दूरच्या ठिकाणी जोडीने सहली काढतो व खरोखरच जीवनात नावीन्य आणतो. " पण हे खरे नसते. ' नवे ' सारखे दार ठोठावीत असते. फारच नाइलाज झाला तर आपल्या साचेबंद जीवनाचे दरवाजे किंचित उघडून फटीतून नवे आत शिरते का, हे आपण पाहू लागतो. पण जे ' नवे ' म्हणून आत शिरते, त्याला एखादे परिचित असे नाव देऊन ( naming ) व ते चांगले अगर वाईट आहे असे मूल्य ठरवून आम्ही मोकळे होतो. पति-पत्नींच्या या सहली वैवाहिक जीवनाला नवेपणा आणीत नाहीत; तर किंचित् स्वातंत्र्याचे ते थोडे दिवस आठवीत बसण्याची सोय होते, व रूक्ष, कंटाळवाणे जीवन सुसह्य झाल्यासारखे वाटू लागते.

मनाचा हा दुहेरी खेळ लक्षात घेतला पाहिजे. " सुख पाहिजे " असे जेव्हा पति-पत्नींना वाटते तेव्हा त्यात काहीतरी नावीन्य असले पाहिजे, असे त्यांचे मन सांगते. पण प्रत्यक्ष जे पदरात पडते ते नवे रंग दिलेले जुनेच खेळणे ! ते रंग तेव्हाच उडून जाऊ लागतात व पुन्हा नव्या खेळण्याकरिता हट्ट सुरू होतो. जोपर्यन्त नवीन येणाऱ्या सुखाची ओळख ( recognition ) पूर्वी भोगलेल्या सुखाच्या मदतीनेच पाहावयाची असे ठरलेले आहे, तोपर्यन्त अधिक सुखाकरिता धडपड किती जरी केली तरी ते मृगजळ ठरणार, हे उघड आहे. पण या सतत

चाललेल्या धडपडीचा एक परिणाम होतो. मनात असे एक केंद्र ( centre ) निर्माण होते की, ते सदैव एकच मागणी ( demand ) करीत राहते. ही मागणी पुरविली गेली तर ठीक; नाहीतर तिच्यातून जे 'हक्क' निर्माण होतात त्यांची बजावणी हरतऱ्हेने सुरू होते. दुसऱ्या व्यक्तीच्या भावना विचारात घेण्याचा प्रश्नच नसतो. काही वेळा तर शारीरिक छळ करण्यापर्यंतसुद्धा मजल जाते. "पुरुषाला हक्क जास्त, किंबहुना त्याला सारे हक्कच; त्यांचा जाच निमूटपणे सोसणे हे स्त्रीचे पवित्र कर्तव्य!" असा दंडक काही समाजात प्रभावी असतो. हा जमाना काही ठिकाणी उलटा होऊ पाहात आहे. पण हक्क आले की कुणाचा तरी छळ होणारच, हे उघड आहे.

मनात जे केंद्र निर्माण होते म्हणून वर सांगितले आहे, त्याचा परिपोष नाना प्रकारांनी करता येतो. काही प्रकारांत समाजाची मदत होते; तर काही प्रकार गुप्तपणाने चालू असतात. हे केंद्र केव्हा प्रभावी तर केव्हा कमजोर असते, पण त्याच्या अस्तित्वाची जाणीव नाही असा एक क्षणही जात नाही. संसारात तोच तोपणा फारच भासू लागला की, हे केंद्र पतीच्या अगर पत्नीच्या कानात सांगते की, "जा, काही तरी कर, स्वस्थ बसू नको. सुखाचा नवा प्रक्षोभ (excitement) अनुभवावयास मिळेल, अशी कोणती तरी कृती कर. त्याकरता कोणा व्यक्तीची मदत घे, अगर स्थलांतर कर." मनात सुखाची संवेदना उत्पन्न करणारी वस्तू (stimulus) बाहेर कोणती आहे का, याचा शोध मग सुरू होतो. या बाह्य वस्तूच्या मदतीने मिळणारे सुखसुद्धा पुनः-प्रत्ययाचेच (repetition of experience) असते; पण त्याचा संदर्भ (context) अथवा ते देणारी व्यक्ती बदललेली असते, म्हणून ते नवे आहे असा भास होतो. हे सुख सुद्धा अल्पजीवी ठरते. मग आणखी शोध, पुन्हा निराशा असे चक्र सुरू होते. पति-पत्नींच्या जीवनात जो

कंटाळवाणेपणा (boredom) येतो त्याचा उगम, मनात निर्माण होणाऱ्या आकृतिबंधात (pattern) व तो कायम टिकविण्याच्या हव्यासात आहे. या साचेबंदपणामुळेही मनात एक केंद्र तयार होते. ते सुरक्षेची (security) सतत मागणी करते. दुसरे केंद्र ( अथवा त्याच केंद्राचा दुसरा भाग ) सुखलालसेचे असते. पण हे सुखही पुनरावृत्तिजन्य असते. कोणते तरी एक केंद्र सदैव जागृत असते, आणि सुरक्षा व सुख यांची आळीपाळीने मागणी होत राहते. पति-पत्नींना सदोदित नवे वाटणारे जीवन हवे असते. एकमेकांच्या संगतीचा उपयोग जीवनाचा खरा अर्थ समजण्याकरिता व्हावा अशी त्यांची अपेक्षा असते. या अपेक्षेची पूर्ती कोणत्या अडथळ्यामुळे होत नाही, याचा मात्र ते विचार करीत नाहीत. मनात होणारी केंद्राची उत्पत्ती हाच तो अडथळा होय. कारण हे केंद्र गतकालातल्या अनुभवातून–त्यांच्या स्मृतीतून–जन्माला येते. मग तो अनुभव सुरक्षित सुखासीनतेचा असो, अगर एखाद्या प्रक्षोभाचा असो. मुद्दा असा आहे की, एकदा का हे केंद्र अथवा प्रतिमा पतीच्या अगर पत्नीच्या मनात उत्पन्न झाली की परस्परांमधला खरा संपर्क ( contact ) संपला. मग फक्त दोन प्रतिमांच्या दरम्यानचे व्यवहार उरले. या व्यवहारात प्रीतीच्या खऱ्या अनुभवाला अवकाशच राहत नाही.

पतीच्या काय, पत्नीच्या काय, मनाच्या यंत्रणेतच दोष असतो. त्यांना जीवनातला तोच तोपणा ( monotony ) नको असतो, पण सुरक्षितपणाही सोडावयाचा नसतो; जीवनाला प्राप्त झालेला आकृतिबंध ( pattern ) टाकावयाचा नसतो. नवे हवे, पण त्याकरिता जुने सोडण्याचे धाडस करण्याची तयारी नसते. मला तर वाटते की, नवे म्हणजे काय हे समजून न घेताच "ते हवे" म्हणण्याचा प्रघात पडला आहे. 'नवे मिळत नाही' म्हणून एक प्रकारची अस्वस्थता

आहे, हे मात्र खरे. पण त्याकरता ज्यात मी जगतो तो आकृतिबंध – नव्हे त्याचा एखादा लहानसा कोपरासुद्धा – गमावण्याची माझी तयारी नसते, हेही तितकेच खरे. माकडे पकडण्याकरिता पारधी योजतात ती युक्ती येथे आठवते. लाडवांनी भरलेली निमुळत्या तोंडाची भांडी ते झाडाखाली ठेवतात. लाडवांचा स्वाद माकडाना खाली आणतो. मग प्रत्येक माकड आपला हात त्या भांड्यात घालून शक्य तेवढे जास्त लाडू मुठीत गच्च आवळून धरते व पारध्यांची चाहूल लागताच पळून जाण्याकरिता तो हात बाहेर काढू लागते. पण लाडू सोडीत नाही, म्हणून हातही बाहेर निघत नाही. अगदी हाच प्रकार वैवाहिक जीवनात होतो. विवाहानंतर काही दिवस सततचे साहचर्य व दैनंदिन सेवेचा लाभ या गोष्टी अपरूप वाटतात. पति-पत्नींना वाटते, "आपण जीवनाची लढाई जिंकली. आता यशाचे हे टोक गच्च धरून बसावे, म्हणजे झाले." पण थोड्याच दिवसांनी सर्व व्यापार यंत्रासारखे होऊ लागतात. जुनेच अनुभव पुन्हा पुन्हा उगाळीत बसावे असे वाटू लागते. "नाहीतरी, धावपळ संपली हे बरेच झाले." असे उद्गार मधून मधून निघू लागतात. "स्थिर जीवनाखेरीज भागणार कसे ?" असे समर्थनही सुचू लागते. पण मनाच्या तळाशी एक सवाल पुन्हा पुन्हा जागृत होतो. "जे जीवन मला इतके रमणीय भासत होते, ते असे नीरस – बेचव का ?" या सवालाचे उत्तर न मिळताच माणसे जीवन संपवितात.

पति-पत्नींच्या प्रदीर्घ अशा एकत्र जीवनानंतरही वर उल्लेख केलेल्या तोच तोपणाचा जाच त्यांना होऊ लागला, तर त्यांचा विवाह यशस्वी झाला, असे म्हणता येईल काय ? पण जीवनातली कोणती नाती यशस्वी होत आहेत ? सर्वांच्या अपयशाचे कारण एकच तर नसेल ? प्रत्येक संबंधातून ( relationship ) मला सुखाची अथवा सुरक्षेची ( security

प्राप्ती कशी होईल हा एकच हेतू ठेवून मी जीवन, जगतो, हेच ते कारण होय. एका अर्थाने, माझ्या कल्पनेतल्या सुखाशी अथवा सुरक्षेच्या भावनेशी ( psychologieal security) मी संबद्ध असतो. व्यक्तीची मला पर्वा नसतेच. पण मला हवे ते सुख कमी पडले की दोष मात्र मी कोणातरी व्यक्तीला देतो. ही सुखलालसा आपल्या जीवनाला सर्वस्वी कशी व्यापून राहिली आहे, हें कृष्णमूर्तींच्या शब्दांची मदत घेऊन समजून घेऊ या :

What we all want is pleasure, more and more pleasure, physical pleasure through sex, through possessions, through luxury, and so on .......... All our relationship is based on that — the relationship between two images, not two human beings, but the two images, that human beings have created about each other. The animal wants only pleasure, And, as I said, there is a great deal of the animal in us.— — — — — what is pleasure ? Why does the mind constantly seek this thing called pleasure ? By pleasure, I mean feeling superior psychologically, feeling anger, violence and the opposite non–violence ............ violence gives a great deal of pleasure. There is a great deal of pleasure in acquiring, in dominating; and psychologically in the feeling of having a capacity, the feeling of achievement, the feellng that one is entirely different from someone else. On this pleasure principle, our relationshipr are based; on this principle our ethical and moral values are built ......... We change the patterns of our relationship,

I don't like my wife; I find various excuses and choose another wife; and this is the way we live, in constant battle, in endless strife. We never consider what pleasure is whether there is an aetual state such as pleasure psychologically or we have conceived, formulated pleasure through thought, and we want to achieve that pleasure. So, pleasure may be the product of thinking.

(Talks in U. S. A, Page 14.)

पण प्रीतीचा खरा अनुभव येण्याकरिता कुटुंब मोडावेच लागेल काय ? शिवाय अवलंबून ( dependence ) संपूर्ण टाकून दिले तर हल्लींच्या समाजात जगता येईल का, या प्रश्नाकडे आता वळणे जरूर आहे.

पति-पत्नीचे नाते जरी मनुष्यनिर्मित असले तरी ते निसर्गानुकूल आहे, असे मला वाटते. निसर्ग जे मागतो ते त्याला देणे, म्हणजे काही गुन्हा नाही. उलट त्याची खरी मागणी संपूर्ण दडपणे हाच गुन्हा आहे. या गुन्हयाला क्षमा नाही. तो घडू लागताक्षणीच चित्तात जी द्विधावृत्ती ( संघर्ष ) निर्माण होते, तीच त्याबद्दलची शिक्षा होय. नैसर्गिक प्रेरणांना प्रतिबंध करून जे साधले जाते, त्याचा इतरांनी किती जरी गौरव केला तरी त्या व्यक्तीच्या जीवनात विषनिर्मितीच होते, असे दिसते. पण निसर्ग काय सांगतो हे नीट ओळखता आले पाहिजे. " मला अमुक हवे " असे जेव्हा मन सुचवू लागते तेव्हा ते आव असा आणते की, जणू निसर्गच त्याच्यामार्फत बोलत आहे. पण हे खरे नसते. अडचण अशी आहे की, नैसर्गिक अशा कामवासने-बरोबरच इतर अनेक प्रेरणा कार्यान्वित होतात. शिवाय वासनाही हवी तेवढी वाढविता येते. मग ही अतिरिक्त वासना निसर्ग-विरोधीच बनते. पण तसे भासत नाही. ज्याअर्थी वासना चित्तात आहे, त्याअर्थी तिची

पूर्ती झालीच पाहिजे, असा आग्रह सुरू होतो. ती वाढली कशी, इकडे लक्ष देतो कोण ? अतिरिक्त वासना ओळखण्याचे गमक एकच आहे. जी स्मृतीतून आली ती खरी निसर्गप्रेरणा नव्हे, असे मला वाटते.

विवाहसंस्थेचे दुसरे कार्य, प्रजेची उत्पत्ती व तिचे संगोपन. हेही निसर्ग-विरोधी नाही. पण कुटुंबाची निर्मिती होताच ' माझे कुटुंब ' म्हणून त्याला जी प्रतिष्ठा ( status ) प्राप्त होते, तिच्यातून अनेक अनैसर्गिक प्रेरणा मूळ धरू लागतात. विवाह झाल्यानंतर फारच थोड्या दिवसांत पति-पत्नी हे एकमेकांना जखडले जातात. ज्या आकर्षणामुळे ते जवळ आले, त्याचेच बंधनात रूपांतर होते. मग या बंधनातून पति-पत्नींचे हक्क निर्माण होतात. हक्क आले की असूयेचा प्रवेश झालाच म्हणून समजावे. कारण, जे सौख्य उभयतांना मिळते असे वाटते, ते सुरक्षित राहावे असा हव्यास विवाहानंतर फारच थोड्या दिवसांनी सुरू होतो. एकदा का सुरक्षा ( security ) हाच जीवनाचा हेतू ठरला की ते नीरस, बेचव ( monotonous, boring ) होणारच, मग ' आमचे वैवाहिक जीवन नमुनेदार आहे ' अशी बतावणी करीत राहण्याचे काम फक्त उरते. जी थोडी दांपत्ये या सुरक्षेच्या पिंजऱ्यात निमूटपणे दिवस कंठीत नाहीत, त्यांना तरी सुख लाभते काय ? मुळीच नाही. झगडे, संघर्ष, विवाहाच्या बाहेर कामतृप्तीचा शोध, हा शोध यशस्वी झाला तर त्या प्रक्षोभातून सतत विस्तारणारी व कधीही तृप्त न होणारी वासना, या परंपरेत ते अडकतात. हेही लोक अशी बतावणी करतात की, ते आधुनिक आहेत व म्हणूनच स्वतंत्र आहेत व एकामागून एक अशी अनेक सुखे त्यांना भोगावयास मिळत आहेत. पण ते फक्त सुखाचा पाठलाग करीत असतात. ते स्थिर नाहीत, त्यांच्या जीवनाला गती आहे. असा भास

बाहेरून होतो. पण त्यांना हवे असणारे सुख, मुख्यत: substantially स्मृतिस्थित असते; व त्याची पुनरावृत्ती ते शोधीत असतात. म्हणजे तेही या रीतीने सुरक्षेच्याच (Psychological security) मागे असतात. एकूण सारांश काय, तर प्रत्येकजण या ना त्या रीतीने सुरक्षेचाच गुलाम आहे. या गुलामगिरीमुळे पदरात काहीच पडत नाही. फक्त अनेक समस्या मात्र जीवनात उद्‌भवतात. इतर समस्या पुढे आल्या नाहीत तर निदान वैवाहिक जीवन हे शेवटपर्यंत्त वाहिले पाहिजे असे एक ओझे (burden) आहे, असे सतत वाटत राहणे, ही तरी समस्या मानगुटीवर बसतेच.

एक पुरुष आणि एक स्त्री यांनी एकत्र राहण्याचे ठरविले म्हणूनच जीवनाचा खरा आनंद त्यांना अंतरला असे का झाले आहे ? तसे दिसत नाही. एकत्र राहून अगर एकाकी (alone) राहून, कोणत्याही अवस्थेत खऱ्या प्रीतीचा अनुभव घेता येईल, असे कृष्णमूर्तींचे सांगणे आहे. हा अनुभव म्हणजे आहे तरी काय ?

कारण काही का असेना, प्रत्येकाला प्रीतीचा अनुभव जीवनात यावा असे मात्र वाटत असते. पण हव्या असणाऱ्या सुखाशी, प्रीतीच्या कल्पनेचा जो संबंध आपण जोडून टाकला आहे, तिथेच सगळे बिघडले आहे. मला अमुक का हवे हे नीट सांगता यावे, म्हणून ‘ प्रीती ’ या शब्दाचा सर्रास उपयोग केला जात आहे. जे अत्यंत हिणकस अथवा निरर्थक ते ‘ दैवी ’ अथवा ‘ उदात्त ’ असे भासवून, समर्थनाचा उद्योग सगळीकडे चालू आहे. या कामी कवींनी व ग्रंथकारांनी मदतच केली आहे.

कृष्णमूर्तींना अभिप्रेत असलेली प्रेमाची अवस्था कोणती आहे ? ती अवस्था आमच्या अनुभवास का येत नाही ? कोणते कारण त्यांनी दाखविले आहे ?

" Thought destroys feelings — feeling being love. Thought can offer only pleasure, and in the pursuit of pleasure, love is pushed aside, The pleasure of eating, of drinking, has its continuity in thought, and merely to control or suppress this pleasure which thought has brought about bas no meaning; it creates only various forms of conflict and compulsion."

आणखी ते म्हणतात :

" We do not know what love is, for in the space made by thought around itself as the me, love is the conflict of the me and not – me. This conflict, this, torture is not love. Thought is the very denial of love, and it cannot enter into that space where the me is not ..... We don't realize how important it is to be free of the nagging pleasures and their pains, so that the mind remains alone. It is only the mind that is wholly alone, that is open."

( Meditations, 1969 )

अगदी सोप्या शब्दांत ते सांगतात की, " कोणती तरी स्मृती मनात घोळीत बसल्याने भावनांचा झरा आटून जातो. हृदयातून निघणारी भावना म्हणजेच प्रेम होय. स्मृतीच्या मदतीने केला जाणारा विचार एकच गोष्ट आपणाला देऊ शकतो. ती म्हणजे तथाकथित सुख. या सुखाच्या मागे तुम्ही धावू लागला की प्रेम बाजूला सारले जाते. पाहा ना, स्वादिष्ट अन्नापासून अथवा मधुर पेये पिण्यापासून जे सुख मिळते ते कशातून येते ? स्मृतियुक्त विचारामुळेच नाही का त्याची जाणीव होत ? परंतु हे विचारजन्य सुख दडपून टाकू म्हटले तर आणखी अडचणी

वाढतात. मग मनावर जुलूम होतो व अनेकविध संघर्षाला तोंड द्यावे लागते.

" खऱ्या प्रेमाचा अनुभव आपणांला कधी तरी आला आहे काय ? विचाराच्या मदतीने स्वतःभोवती मी जे जग (Space) निर्माण करतो त्या जगात " प्रेम " या शब्दाला कोणता अर्थ असतो, माहीत आहे ? मी एका बाजूला व इतर सर्व दुसऱ्या बाजूला, यांचे दरम्यान सतत चालणारा जो संघर्ष असतो त्या संघर्षालाच ' प्रेम ' हे नाव दिले जाते. हा संघर्ष व त्यापासून होणाऱ्या वेदना म्हणजे प्रीतीची अनुभूती खास नव्हे. स्मृतिजन्य विचार सुरू झाला की चित्तातून प्रीती बाहेर पडलीच म्हणून समजावे. ' मी ' रहित अशा अवस्थेत, विचार ( thought ) पदक्षेप करू शकत नाही.

" मनाला सतत प्रक्षुब्ध करणारे सुखोपभोग व तज्जन्य दुःखपरंपरा यांचेपासून मुक्त होण्याचे महत्त्व केवढे आहे, याची आपणांला कल्पना नाही. असे मुक्त मन एकाकी राहू शकते. जे मन सर्व दृष्टींनी स्वतः-वरच अवलंबून राहते, ते खुले असते; ते पूर्ण संवेदनाक्षम असते. "

मागील लेखात सांगितल्याप्रमाणे मिळालेले अनुभव साठविण्याची व्यवस्था म्हणजे मनात होणारी केंद्राची ( Centre ) निर्मिती होय. या केंद्रालाच ' मी ' म्हणून आपण ओळखतो, व या ' मी 'ला खऱ्या प्रीतीचा अनुभव वैवाहिक जीवनात का येऊ नये, असा प्रश्न आपण विचारीत असतो.

पण क्वचित् असेही क्षण पति-पत्नींच्या एकत्र जीवनात येतात की, ज्यांमध्ये खऱ्या प्रीतीची थोडीशी चाहूल ऐकू येते. केव्हातरी एक दिवस असा उगवतो की, मन अगदी प्रसन्न असते. पत्नी असो किंवा इतर व्यक्ती असो, जे कोणी जवळ येईल ते माणूस हवेसेच वाटते. जे येईल त्याचा मोकळेपणाने स्वीकारच करावा, असे मन सांगते. चिरपरिचित

व्यक्तींचे चेहरे नेहमीपेक्षा अधिक प्रफुल्ल भासतात व सर्वचजण आपले स्वागत करण्यास उत्सुक आहेत, अशी भावना होते. दिवसातले सर्व व्यवहार अगदी सहजपणाने खेळीमेळीने होत आहेत, कुठेच काही खटकत नाही, असे मनोमन वाटू लागते. एखाद्या सुंदर वनश्रीच्या ठिकाणी प्रथमच आपण गेल्यावर जसे नकळत पाय ओढले जातात, आपण कुणीकडे निघालो, घड्याळात किती वाजले याची जाणीव न होता एकामागून एक दिसणारी सौंदर्यस्थळे आपणांला आकर्षून घेतात व दिवस संपल्यावरच आपण भानावर येतो, तसा प्रकार क्वचित् आपल्या जीवनातही होतो. कोण काय बोलले, त्याचा अर्थ काय, बोलण्यामागचा हेतू काय, इकडे आपले लक्षच नसते. जे होते ते घेऊन आपण पुढेच जात असतो. 'माझी कुणी स्तुती केली का मानहानी केली ?' याचा प्रत्येक वेळी कानोसा घेत राहण्याची आपणांला सवय असते. मन जणू काय प्रत्येक पावलाला थबकते व प्रत्येकाच्या शब्दातून व कृतीतून काय व्यक्त होते, याचे मोजमाप घेत बसते. पण त्या दिवशी मन कुठे थांबत नाही. ते आपल्याच तंद्रीत अथवा गतीत असते. नदीच्या प्रवाहाबरोबर नाव जशी अलगद पण वेगाने जाते, तसा प्रकार होतो. 'सर्व काही ठीक आहे, सर्वत्र आनंद आहे.' अशा प्रकारचे शब्द नसले तरी तशी भावना चित्ताला व्यापून राहते.

वर वर्णन केल्याप्रमाणे दिवस अथवा दिवसाचा भाग आपल्या आयुष्यात येऊन गेलाच नाही, असे कोणतेच पति-पत्नी म्हणू शकणार नाहीत. निदान विवाहानंतरच्या पहिल्या कालखंडात असे काही दिवस असतातच. खंत एवढीच असते की, "ती सकाळ अथवा दुपार फार लवकर संपली; ती खूपच असती तर बरे झाले असते."

निर्हेतुक आनंदाचे हे पुष्प फार नाजूक असते, हे आपण विसरतो. ते गच्च धरून ठेवावे असे माणसाला वाटते; मग ते कोमेजते व त्याचे

निर्माल्य होते. नंतर त्या निर्माल्याकडे पाहून उसासे टाकीत राहणे, एवढेच आपल्या हातात उरते. ही आपत्ती टाळावयाची असेल तर पतिपत्नींनी एकच काळजी घेतली पाहिजे. मागे पाहण्याचे अथवा इतरांकडे पाहण्याचे सोडून दिले पाहिजे. तुलनेचा त्याग केला पाहिजे; व गतसुखाच्या हव्यासातून पुढे येणारा ‘ मी ’ निरखून पाहिला पाहिजे. हा ‘ मी ’ च जर खरा जागेवर नाही, ( तो एक भ्रम illusion आहे.) तर त्याचे हक्क, त्याची प्रतिष्ठा यांना काय अर्थ आहे ?

केव्हा असाही अनुभव येतो. पत्नी एखाद्या भयंकर व्याधीने जर्जर झालेली असते. तिचे दुःख जवळून पाहताना अशी काही सहसंवेदना होते की, जणू ती व्यथा स्वतःलाच आहे. मग, स्वतःच्या पायात सलणारा काटा जसा सहजपणाने पण मोठ्या प्रयत्नाने काढला जातो, त्याच पद्धतीने तिचे क्लेश दूर करण्याकरिता खटपट सुरू होते. ही खटपट चालू असताना, “ मी हिचा पती आहे, तिला वाचविणे माझे कर्तव्य आहे ” अशा प्रकारचे विचार मनात नसतात. अंतःकरणातली संवेदनाच आपले कार्य करीत असते. या संवेदनेला पूर्ण वाव मिळाला तर तिच्या प्रभावाने फार मोठे कार्य हातून होते. आश्चर्य असे की, यशापयशाच्या भीतीने वाटणारी काळजी या संवेदनेला स्पर्श करीत नाही. फक्त कृती होते. पण तिच्यातून पती म्हणून मला अमुक मिळावयास पाहिजे, अशी मागणी मनाची नसते.

वर जे दोन अनुभव दिले आहेत, ते नीट लक्षात घेतले तर चटकन समजेल की, त्या कालखंडात ‘ मी ’ चा मागमूस नव्हता. निदान तो सुप्त होता. पण असे असूनही जीवन जगता आले, एवढेच नव्हे तर ते विशेष सार्थ वाटले. उलटपक्षी, हा ‘ मी ’ प्रभावी ठेवून त्याला दिव्य प्रीतीचा अनुभव मिळावा याकरिता जे जे आपण करतो ते सर्व असमाधान वाढीस लावते; व जीवन निरर्थक, उदासवाणे करते. ‘ मी ’ कायम ठेवून जी प्रीती शोधली जाते, ती फक्त शब्दरूप अथवा स्मृति-

रूप असते. प्रीतीचा प्रत्यक्ष अनुभव ‘ मी ’ नाशानंतरच येऊ शकतो. ती शुद्ध संवेदना असते. जरी ती व्यक्तीच्या सांनिध्यात उद्‌भवली, तरी ती स्मृतीत गुंडाळलेली नसते.

खऱ्या प्रीतीचा अनुभव कोणत्या जातीचा असला पाहिजे, याचेवर दिग्दर्शन केले आहे. हा अनुभव ज्या क्षणात येतो त्या क्षणात, ‘ मी ’ चे केंद्र प्रभावी नसते. या केंद्राची निर्मिती कोणत्या हव्यासातून होते, हेही आपण पाहिले आहे. आता प्रश्न एकच राहिला तो असा की, आमच्या चालू जीवनातून त्या केंद्ररहित अवस्थेकडे कसे जावे ? ज्या केंद्राचा परिपोष, बाल्यावस्थेपासून सतत आम्ही करीत आलो आहोत व ज्या केंद्राची मागणी म्हणूनच वैवाहिक जीवन आम्ही पत्करले, ते केंद्र जावे कसे ? हे केंद्र अधिक मजबूत करण्यातच पति-पत्नी आपली सर्व शक्ती खर्च करतात, हेही लक्षात आले. या केंद्रामुळे ज्या प्रतिमा निर्माण होतात त्यांच्यामधील संघर्षामुळे इतके विवाह अयशस्वी होतात की, विवाहसंस्थेने साधले आहे तरी काय, अशी शंका येऊ लागते. मग नवसुधारकांचे ( ultra-modern reformers ) फावते. “ विवाह-संस्था हीच अनैसर्गिक आहे. ती मोडून टाका, ” असा घोशा मग सुरू होतो. जणू काय अतिरिक्त स्वैराचार हा निसर्गाला धरून आहे ! मुख्य मुद्दा बाजूलाच राहतो. विवाहाने जे नाते निर्माण होते, एकत्र जीवनाची जी संधी प्राप्त होते, तिला काही अर्थच (significance) नाही की काय ? थोडा जरी विचार केला तरी हे लक्षात येईल की, नुसते एकट्याने जीवन कंठण्यापेक्षा कोणाचे तरी साहचर्य लाभणे अधिक फायद्याचे आहे. अपवादभूत व्यक्ती सोडल्या, तर एकटी राहणारी माणसे अधिक आत्मकेंद्रित होतात असेच दिसते. मात्र, साहचर्याची परिणती आत्मस्मृतीतून उत्पन्न होणाऱ्या सहकार्यात झाली तरच विवाहाने काही साधले असे म्हणता येईल. याकरता किती सावध राहिले पाहिजे, हे कृष्णमूर्तींचे खालील उद्‌गार सांगतात :

" The quality of true love, of pure love, knows no such distinctions as wife and husband, son, father, mother. Now it generally happens that when you marry, you give love to the one and deny it to the many; but you can be married and yet hold the whole world in your heart and mind, without distinction. Such love is eternal.

" Marriage is co-operation in mutual experience. We must have marriage – not necessarily marriage in the present form – in which two people can grow through common experience, so that it will lead to the realisation that there is no separation in true love. That is, after all, the essential result of experience to recognise the reality in all things, not in one person, but in all persons, to give love, not to the one, but to the many. If marriage leads to that, then it is essential for man. But if it is merely a division, then it is fraught with sorrow. "

( " Chetana ", May 1971. P. 95–96 )

त्यांचा सारांश पुढीलप्रमाणे आहे :–

" वैवाहिक जीवनामुळे जर प्रेमभावना संकुचित झाली, म्हणजे ती फक्त पतीमध्ये अथवा पत्नीमध्येच केंद्रित झाली, तर तो विवाह सफल झालाच नाही, असे समजावे. खऱ्या प्रेमाला अशा मर्यादा नसतात. पण विवाह केला म्हणूनच सर्वव्यापी प्रेम अशक्य होते, अशातला भाग मुळीच नाही.

प्रीतीची अनुभूती म्हणजे काय, हे एकत्र जीवनातून पति-पत्नींना जाणून घेता येते की नाही, हा खरा प्रश्न आहे. खऱ्या प्रेमात द्वैत नसते, त्याचप्रमाणे या प्रेमाचा प्रवाह एका ठराविक व्यक्तीच्या दिशेने वाहत नसतो. ते सर्वगामी असते. "

आपणांला फक्त एक प्रकारचे प्रेम माहीत आहे. जे आकर्षण ठराविक व्यक्तीबद्दल वाटते, त्यालाच ' प्रेम ' असे नाव आपण दिले आहे. पण प्रेम ही मनाची अवस्था आहे. आपल्या अंतःकरणात प्रथम ' मी ' उदय पावतो व तो कुणाकडून काहीतरी मागू लागतो. ते मिळेल अशी खात्री वाटल्यामुळे त्या व्यक्तीविषयी या ' मी ' ला जिव्हाळा वाटू लागतो. ही भावना म्हणजेच प्रेम असे आपण समजतो. या भावनेतच प्रिय व्यक्तीच्या पूर्वीच्या कृती अगर शब्द यांच्या स्मृती मिसळलेल्या असतात. त्या स्मृती जितक्या अधिक उगाळल्या जातात तितकी ती भावना अधिक पुष्ट होते. बस्स, प्रेमाविषयी जे काय आपणांला माहीत आहे, ते एवढेच आहे. पण कृष्णमूर्तीच काय, इतरही अनेक विचारवंत निराळेच सांगत आहेत. एरिक् फॉम्चे शब्द असे आहेत :–

" Love is not primarily a relationship to a specific person; it is an attitude, an orientation of character which determines the relatedness of a person to the world as a whole, not towards one ' Object ' of love. If a person loves only one other person and is indifferent to the rest of his fellow–men, his love is not love but a symbiotic attachment or an enlarged egotism.......... If I truly love one person I love all persons, I love the world, I love life. If I can say to somebody else, ' I love you,' I must be able to say, " I love in you everybody, I love through you the world, I love in you also myself. "

(The Art of Loving, 1963 Edn., p. 38).

सगळ्यात महत्त्वाचा मुद्दा आपल्या दृष्टिपथात आता आला आहे. कवींनी, द्रष्ट्या लेखकांनी प्रेमाला ' दैवी ' हे विशेषण का दिले, हे आता आपल्या लक्षात येते. एका व्यक्तीच्या निमित्ताने पण निःस्वार्थी

भावनेने प्रेम करता येते काय, असा प्रश्न आहे. जीवनात जे अनुभव येतात अथवा ज्या ज्या व्यक्तींचे साहचर्य लाभते, त्यांचा उपयोग आपण ज्या तऱ्हेने करतो, त्यापेक्षा अगदी निराळीच अशी एखादी तऱ्हा आहे काय ? जीवनाचे एखादे नवेच दालन उघडणे शक्य आहे काय ?

पति-पत्नींनी आत्मसंशोधन केले तर वरील प्रश्नाचे उत्तर त्यांना स्वतःलाच सापडेल व तेच खरे. जी आपुलकीची भावना सध्या वाटते, तिचा केवढा तरी भाग एकमेकाबद्दलच्या स्मृती व प्रतिमा ( images ) यांनीच व्यापलेला आहे हे एकदम लक्षात येईल. जोडीदाराच्या कृतींकडे व शब्दांकडे प्रथम लक्ष जाते. तो अथवा ती एका विशिष्ट प्रतिमेतूनच जे काय करावयाचे ते करीत आहे, हे लक्षात येते. पण येथेच थांबून उपयोग नाही. स्वतःचे अंतःकरण तपासले पाहिजे. दोघांही पति-पत्नींचा हा आत्मनिरीक्षणाचा उद्योग सुरू होताच जे इतके दिवस महत्त्वाचे असे आपण समजत होतो, ते किती क्षुद्र व हिणकस होते, हे ध्यानात येऊन, ते आपोआप गळून जाण्याचा संभव आहे. स्मृती, अपेक्षा, हक्क आणि जुल्मम यांचे दुष्ट वर्तुळ तुटले जाण्याची शक्यता आहे. मात्र हे सर्व करताना, प्रत्येक कृती हेतुपूर्वक व योजनाबद्ध रीतीने करण्याची आपली सवय बाजूला ठेवली पाहिजे. प्रीतिसंशोधनाचा हा प्रवास निव्वळ कुतूहलातून सुरू झाला तरच तो सफल होणे शक्य आहे. मला तर वाटते की, जीवन आपणांला काय देते इकडेच सर्व लक्ष ठेवल्याने ते शुष्क होऊन जाते. जीवन फक्त जगण्याकरिता आहे हे आपण विसरून जातो.

परस्परांची संगती चोवीस तास – निदान त्यापैकी बराचसा भाग मिळण्याची सोय वैवाहिक जीवनात आहे. पण चोवीस तासांत पतीचा अथवा पत्नीचा उपयोग करून घेण्याकडेच जे लक्ष असते ते खरे विष आहे. " Only in the love of those who do not serve a purpose

love begins to unfold," असे एरिक् फॉम् म्हणतो. दुसऱ्याकरताच सर्वस्वी जगताना, स्वत:चे जीवन अशक्य होईल, असे का आहे ? ही भीतीच आपला घात करते. तसेच, नैसर्गिक कामवासनेची भूक भागविली म्हणून बिघडले कोठे ? पुन्हा कृष्णमूर्तींकडे वळण्याचा मोह मला आवरत नाही :

"Can't you fall in love and not have a possessive relationship ? I love someone and she loves me and we get married — that is all perfectly straightforward and simple; in that there is no conflict at all. Can't one have that without the other, without the tail, as it were, necessarily following ? Can't two people be in love and both be so intelligent and sensitive that there is freedom and absence of a centre that makes for conflict ? Conflict is not in the feeling of being in love. The feeling of being in love is utterly without conflict. There is no loss of energy in love. The loss of energy is in the tail, in everything that follows jealousy, possessiveness, suspicion, doubt, the fear of losing that love, the constant demand for reassurance and security. Surely it must be possible to function in sexual relationship with someone you love, without nightmare which usually follows, of course, it is.

(K. F. Bulletin [ England ] Summer, 1969).

पति-पत्नींनी एकत्र राहिल्यामुळे खऱ्या प्रीतीला प्रत्यवाय येतो, असे थोडेच आहे ! या 'एकत्र राहण्यात' जेव्हा इतर हितसंबंध उत्पन्न होतात, तेव्हा संघर्षाला, दुःखाला सुरुवात होते. एकत्र राहण्यात कितीतरी सोयी आहेत. विशेषत: मुलांच्या संगोपनाचे कार्य ही संयुक्त कामगिरी – जबाबदारी नव्हे – मानण्याने सुलभता प्राप्त होते. प्रक्षोभाचा

( stimulation ) पाठलाग म्हणजे नव्या सुखाची प्राप्ती नव्हे हे लक्षात आले तर लैंगिक भूक भागविण्याकरिता विवाहाखेरीज दुसरी कोणती व्यवस्था सुचविता येईल ? क्षुधा शमण्याकरिता कोणती तरी, जमेल तेवढी स्थिर व्यवस्था असण्यात जर काही बिघडत नाही, तर विवाह-संस्थेनेच काय घोडे मारले आहे ? पण वस्तुनिष्ठ स्थैर्य ( objective security ) थोडेबहुत मिळू लागताच त्यातून एक साचेबंदपणा तरी मनाला येतो व विवाह शिळा व नीरस होऊन जातो, नाहीतर नवा संबंध ( sexual relationship ) शोधण्याची भयंकर धडपड सुरू होते. यांपैकी काही जरी झाले तरी विवाहाच्या अपयशाचीच ती खूण आहे. जीवनातील प्रत्येक घटना व उत्पन्न होणारे प्रत्येक नाते यांचे कार्य कोणते आहे ? जीवनाचा अर्थ उलगडून दाखविण्याचे त्याचे खरे स्वरूप दर्शविण्याचे. हे व्हावयाचे असेल तर ती घटना घडत असताना व ते नाते चालू असताना माणसाचे स्वातंत्र्य अबाधित राहिले पाहिजे, नव्हे, त्याचा परिपोष होत राहिला पाहिजे. पण होत आहे अगदी उलटा प्रकार ! अनेक नात्यांमध्ये आम्ही अधिकच गुरफुटून जात आहोत. ती नातीच आमच्या जीवनाला विशिष्ट आकार देत आहेत. आम्ही मुक्त जीवनाकडे वाटचाल करीत नसून, स्वतःभोवती मोठमोठे पिंजरे मात्र उभे करीत आहोत. एका पिंजऱ्यातून दुसऱ्या पिंजऱ्यात प्रवेश करताच, " प्रगती झाली " असा पुकारा करीत आहोत !

ज्या प्रेमाचा कवींनी एवढा गौरव केला आहे त्याची प्राप्ती आम्हाला का होत नाही, हे काहीसे स्पष्ट करणे, एवढेच लेखकाला शक्य होते. स्त्री-पुरुषांच्या मीलनाला जीवनात फार मोठा अर्थ आहे. जे चैतन्य सगळीकडे व विशेषतः आपल्या चित्तात प्रभावी आहे त्याचाच आविष्कार स्त्री-पुरुषांमधील प्रीतीने होत असतो. या आविष्काराचे दर्शन इतरही अनेक प्रकारांनी होत असते. या आविष्काराला उपमाच

द्यावयाची, तर ती सतत वाहणाऱ्या व वर उफाळून येणाऱ्या झऱ्याचीच द्यावी लागेल.

पति-पत्नीच्या नात्याला मोठ्या उमेदीने सुरुवात होते. पण तो प्रीतीचा झरा इतक्या लवकर आटतो कसा ? जीवनाचा कानाकोपरा सुद्धा आपल्या तेजाने उजळून टाकणारी प्रेमाची ज्योत, पुढे मंद झाल्यासारखी का वाटते ? यांसारखे प्रश्न सर्वच विवाहितांना, विशेषतः वृद्ध पति-पत्नींना अस्वस्थ करीत असतात. पण वरील विवेचनाच्या मदतीने Dr. C. Leyborne या विदुषींचे पुढील दिग्दर्शन लक्षात घेतले, तर कोठे चुकते हे ध्यानात येईल :–

" What may have been clear, fresh, vivid, spontaneous, becomes dull, prosaic or even destractive. Anxiety about holding the quality of relationship unchanged, inevitably brings a rigidity, which cramps and may ultimately drive love away. For, love is like life and it cannot be held fixed, static. Love has then been killed, reduced to an idea of the mind. Only if each moment of love is fully and utterly lived and then not held on to a desparately, as the pattern for the next moment. as a continuity, only then can love live on in a relationship, why do we normally seek continuity in that which was real and joyous at the moment of experiencing ? Is it not a question to be gone into deeply ? Not to demand continuity in a certain pattern, would be to set love free to be joyous and bright at the end of life-time of companionship, as it was in the morning of its years."

मराठीत सारांश असा :–

" जे सुरुवातीला इतके उत्स्फूर्त, स्पष्ट व नावीन्याने रसरसलेले

असते तेच मंद, रूक्ष, किंबहुना विध्वंसक होऊन बसते. पति-पत्नीचे नाते जे रूप धारण करते, ते तसेच कायम राहिले पाहिजे या आग्रहातून उत्पन्न होणारी काळजी काय करते, माहीत आहे? ती जीवनात असा ठराविकपणा आणते की त्यामुळे प्रीती क्षीण होत जाते व शेवटी नष्ट होते. कारण प्रीती ही जीवनासारखी आहे; ती धरून ठेवता येत नाही अथवा बंदिस्त करता येत नाही. मग प्रीतीचे फक्त प्रेत जागेवर उरते; त्या भावनेचे संकल्पनेत ( idea ) रूपांतर झालेले असते. प्रीतीच्या अनुभवाचा प्रत्येक क्षण, संपूर्णपणे व विक्षेपरहित असा अनुभवला गेला पाहिजे. पण त्या क्षणाला गच्च मिठी मारून आपण बसतो. पुढचा क्षण त्या क्षणाच्या मापानेच आपण मोजू लागतो. मागच्या क्षणाचेच दीर्घीकरण आपणांला हवे असते. पति-पत्नींच्या नात्यात, अखेरच्या पर्वातही प्रीतीचा झरा आटू नये अशी इच्छा असली तर ही कृती थांबली पाहिजे. ”

□ □ □

४

# श्रेष्ठ व कनिष्ठ

लहानपणी आमच्या घरी अनेक प्रकारचे पाहुणे येत असत. त्यांपैकी एक वृद्ध गृहस्थ अजून मला आठवतात. ते आले की घरात सर्वांची एकच धांदल उडत असे. सगळे खालच्या आवाजात बोलू लागत. हे पाहुणे संस्कृतचे जाडे विद्वान् होते. त्यांनी काशीत बारा वर्षे अध्ययन केले होते व सर्व भारतभर त्यांची प्रवचने विद्वज्जनांत होत असत. त्यांचा चेहरा इतका उग्र दिसे की, 'हा गृहस्थ जन्मात एकदातरी हसला असेल का?' असा प्रश्न माझ्या मनात डोकावून जात असे. आमच्या घरातल्या कोणाही व्यक्तीकडे ते जेव्हा पाहत असत, तेव्हा त्यांची दृष्टीच सांगत असे की, एका उच्चपदस्थ व्यक्तीने केवळ मेहेरबानी म्हणून त्या पामराचे अस्तित्व मान्य केले आहे! शेतीसारख्या व्यवसायातली एखादी तज्ज्ञ व्यक्ती त्यांच्या समोर बागेत केलेले अनेक प्रयोग सांगू लागली, तर ते त्याच्याकडे पाठ फिरवून बसत; नाहीतर असे स्मित करीत की, ज्याचा अर्थ पुढील शब्दांतून सांगणे शक्य आहे, "काय मूर्ख माणूस आहे हा! सगळ्या आयुष्याची याने धूळधाण

केली आहे." एकदा तर एका तरुण मुलाच्या हातात तुकारामाची गाथा पाहून त्याची त्यांनी इतक्या कडक शब्दांत निर्भर्त्सना केली की, जन्मभर आठवण राहावी: "या प्राकृत भाषेतल्या पुस्तकात काय मिळणार आहे? देवभाषेतल्या एका शब्दाची तरी सर मराठीतल्या हजार पुस्तकांना येईल का? जाळून टाका हा केरकचरा!" असे ते ओरडले.

जुन्या पिढीतल्या एका श्रेष्ठ विद्वानाचे हे चित्र आहे. पण, 'मी विद्वान्, तू अडाणी, मी शहाणा, तू मूर्ख,' ही भावना चालू जमान्यातही आहे; नव्हे, ती अधिक तीव्र आहे. नुसत्या विद्यासंपादनामुळेच हा अहंगंड येतो, अशातला भाग नाही. श्रेष्ठ-कनिष्ठ भाव उत्पन्न होण्यास कोणतेही कारण पुरेसे होते.

डोंगरामधल्या सर्वात उंच शिखरावर उगवलेल्या वृक्षाने मोठ्या ऐटीने उतरणीवर उगवलेल्या झाडाकडे पाहावे व मैदानातले झाड दिसले की त्याचेकडे पाठ फिरवावी, अशातला हा सारा प्रकार आहे. आता हे खरे की, त्या उच्चस्थानी असलेल्या वृक्षाला काही विशिष्ट सवलती मिळतात, इतर झाडांना न मिळणारे फायदे सहज मिळतात; पण म्हणून इतरांबद्दल तुच्छता वाटावी, याला काय अर्थ आहे? उंचीवर असलेल्या झाडाला कितीतरी जास्त हवा उपभोगावयास मिळेल, वाऱ्याशी तासन् तास खेळावयास मिळेल, त्यामुळे ते झाड सर्वांगांनी परिपुष्ट होईल, काही विशेष गुण त्यांच्यात येतील. हे सर्व खरे. पण म्हणून, खालच्या पातळीवर असलेल्या बारीक सारीक झाडांना त्याने कमी लेखावे हे योग्य आहे काय? निसर्गाने काही अपरूप गोष्टी एखाद्या व्यक्तीला बहाल केल्या, तर तिने त्यांचा गर्व वाहावा, असे काय त्यात आहे?

श्रेष्ठ-कनिष्ठ भाव कुटुंबात, समाजात, राजदरबारी, अनेक व्यवसायांत

सर्वत्र इतक्या प्रमाणात दिसतो की बोलता सोय नाही. असे असूनही हा भाव नुसत्या कल्पनेवर – असत्यावर – आधारलेला कसा आहे हे लक्षात आले म्हणजे आश्चर्य वाटते. यापुढचा अनर्थ असा आहे की, हा भाव ही एक सत्यवस्तू आहे, असे गृहीत धरून समाजाची रचना केलेली सर्वच देशांत आढळते.

कम्युनिस्ट समजल्या जाणाऱ्या देशांतही समाजरचना बाजूला ठेवली तर इतर देशांत काय आढळते ? बहुतेक सर्व ठिकाणी श्रीमंत-गरीब हा भेद आढळतो; आणि सर्वत्र श्रीमंत लोक स्वतःला गरीब लोकांपेक्षा श्रेष्ठ समजतात. श्रीमंती प्राप्त होण्याचे प्रकार दोनच असतात, एक प्रकार श्रीमंत आईबापांच्या पोटी जन्म घेणे अथवा कोणातरी श्रीमंत नातेवाइकाची इस्टेट मिळण्याचे भाग्य असणे. दुसरा प्रकार, स्वकष्टार्जित पैशाने श्रीमंत होणे. या दोन्ही प्रकारच्या श्रीमंतांमध्ये जो गर्व आढळतो, त्याला खरोखर काही आधार आहे का ?

श्रीमंत पिता अगर आप्त असल्यामुळे जी ऐती श्रीमंती मिळते ती घेऊ नये अथवा ती लाथाडावी, असे मला म्हणायचे नाही. प्रश्न एवढाच आहे की, या श्रीमंतीत गर्व करण्यासारखे काय आहे ? वर दिलेला उच्चपदस्थ वृक्षाचा दृष्टान्त येथे तंतोतंत लागू पडतो. पण विचार करतो कोण ? "तुम्ही खुशाल पैशात लोळा, पण आम्हांला लाथा का मारता ?" असा सवाल गरिबांनी केला तर त्यात वावगे ते काय ? माझे एक मित्र आहेत. स्वभावाने फारच सरळ म्हणजे प्रामाणिक. असे मित्र मला फार आवडतात कारण, त्यांना जे आत वाटते तेच ते बाहेर बोलून दाखवितात. यामुळे माझी गैरसोय होत नाही, मला दगा होत नाही. कोणाही व्यक्तीबद्दल प्रश्न निघाला की ते एकदम बोलून जातात, "त्याचेजवळ काय आहे ? तो अन्नाला महाग आहे !" बहुतेक वेळा

हे त्यांचे म्हणणे खरे असते. कारण महाराष्ट्रात दरिद्रीच फार. पण गंमत यापुढेच आहे. एकदा का माझ्या धनिक मित्राने हा शेरा कोणाबद्दल मारला की मग मला पुढे बोलताच येत नाही. बोलणार काय ? मी त्या दरिद्री माणसाचे काही गुण सांगितले, त्याने केलेली अवघड कामगिरी सांगितली, तरी ती ऐकतो कोण ? हे मित्र मग बहिरेच होतात ! ऐकण्यासारखे असे त्या इसमाजवळ काही असणे शक्यच नाही, असा त्यांचा सिद्धान्त आहे.

अतिशयोक्ती वाटेल, पण आजच्या घटकेसही भारतात “ सर्वे गुणाः कांचनमाश्रयन्ते ” हाच दंडक आहे. केवळ अपघाताने, एखाद्या श्रीमंत कुटुंबात जन्म झाल्यामुळेच मी जर इतरांना तुच्छ लेखू लागलो तर मला सत्याची कदर आहे, असे म्हणता येईल काय ? “ श्रीमंत घरात जन्मापासून वावरण्याचे भाग्य मला लाभले, यात मी स्वतः काय केले ? ” असा प्रश्न कोणताच श्रीमंत स्वतःला विचारून पाहत नाही. श्रीमंतीचा वारसा मी समजू शकतो, पण त्या कलमातच श्रेष्ठतेबद्दलचे एखादे पोटकलम आहे काय ?

ज्यांनी स्वकष्टाने पैसा जमा केला त्यांचे दोन वर्ग पडतात. पहिला वर्ग, ज्या व्यवसायात बुद्धीचे काम आहे असे लोक समजतात, त्या व्यवसायातून श्रीमंत झालेल्यांचा. दुसरा वर्ग, शारीरिक कष्ट आवश्यक असलेल्या व्यावसायिकांचा. या दोन्ही वर्गातले लोक एकदा श्रीमंत झाले की स्वतःला श्रेष्ठच समजतात. माझे काही वाचक येथे बुचकळ्यात पडतील. “ या लोकांचे कर्तृत्व नाही, असे कसे म्हणावे ?” अशी शंका त्यांना आली असेल. पण आज आपल्यापुढे प्रश्न कर्तृत्वाचा नाही. ( त्याचा विचार पुढे केव्हातरी करू. ) प्रश्न एवढाच आहे की, कशाने का होईना, श्रीमंती आली की त्या माणसात एखादा मूलभूत बदल घडतो काय ? माणूस म्हणून त्याचे जे स्थान या विश्वात असते

ते अधिक उच्च होते काय ? प्रत्यक्षात असा कोणता बदल त्या व्यक्तीत घडतो ? मला तर वाटते की, श्रेष्ठत्वाचा अभिमान अंगी आला एवढाच बदल होतो. पण हा बदलसुद्धा त्या व्यक्तीच्या कल्पनेतला आहे, प्रत्यक्ष वस्तुस्थितीतला नाही. त्या माणसाचे शरीर तेच कायम असते. मनाचे व्यापारही इतरांसारखेच होतात. फक्त बदलतात कपडे व त्यामुळे येणारा चेहऱ्यावर रुबाब !

स्वकर्तृत्वाने श्रीमंत झालेल्या लोकांची समजूत अशी आहे की, गर्व वाटण्यास भरपूर कारणे त्यांच्याजवळ आहेत. " लोक जेव्हा अंथरुणात झोपून राहत होते, तेव्हा आम्ही कष्ट उपशीत होतो " असे ते म्हणतात. अगदी बरोबर आहे हे. पण अभिमान वाटण्यासारखे यात काय आहे ? लोकांचा आळस व यांचा उद्योग असा संयोग झाल्यामुळेच यांना श्रीमंती आली असा भास होतो. पण जरा खोल पाहिले तर हेही खरे नसल्याचे आढळते. कितीतरी लोकांना रात्रंदिवस उद्योग करूनही पैसा म्हणावा तसा दिसत नाही. श्रम आणि क्वचितच येणारी संधी यांची गाठ पडली की मग धनप्राप्ती होते. पैशाची विशेष प्राप्ती ज्यांना होते त्या श्रमिकांना नुसतेच राबणारे त्यांचे पूर्वीचे सहकारी दिसत नाहीत काय ? गर्व वाहावयाचाच असला तर ' संधीचा योग्य फायदा घेण्याचे कौशल्य मी दाखविले, ' याबद्दल वाहावा. पण संधी पकडण्याचा निर्णय घेण्याच्या क्षणाला हा गृहस्थ आजारीच पडला असता तर ?

आणखी एक गंमत आहे. ज्या व्यवसायात बुद्धी वापरली जाते तो व्यवसाय करणारे लोक, व्यवसायामुळेच स्वतःला श्रेष्ठ समजतात. आता हे उघड आहे की, व्यवसाय कोणता मिळायचा हे त्या व्यक्तीच्या परिस्थितीवर अवलंबून असते. कोणत्या कुटुंबात, शहरात अगर खेड्यात, किंबहुना देशाच्या कोणत्या भागात व्यक्तीचा जन्म होतो, त्यावर ही परिस्थिती अवलंबून असते. बुद्धिजीवी व्यवसाय करायला मिळणे

हीसुद्धा गोष्ट जन्मावर अवलंबून आहे. म्हणजे श्रीमंत आईबापांच्या पोटी जन्म घेतल्यामुळे येणारी श्रीमंती व व्यवसायश्रेष्ठता यांचेमध्ये काही फरक नाही. पण तरी माणसे गर्व वाहातच असतात. जे आपाततः प्राप्त झाले ते स्वतःच मिळविले असे समजतात. आश्चर्य असे की, हा बिनडोकपणा करणारे लोक, ' बुद्धिवंत ' म्हणून समाजात मान्यता पावतात.

मला तर वाटते की, बुद्धिजीवी वर्गातल्या लोकांची बाजू फारच लंगडी आहे. " लोक जेव्हा आळसात काळ घालवीत होते तेव्हा आम्ही राबत होतो. " असे त्यांच्यापैकी बऱ्याच लोकांना म्हणताच येणार नाही. या व्यवसायांपैकी बरेच असे असतात की, फारच थोडा काळ बुद्धीचा लक्षपूर्वक वापर करावा लागतो. बाकीचा वेळ बुद्धिमान लोकही आळसात अथवा चालढकल करण्यात घालवितात. सारांश असा की, उद्योगप्रियतेवर आधारलेले समर्थन बऱ्याच बुद्धिमंतांना मुळीच उपलब्ध नसते.

जे बुद्धिमान दीर्घोद्योगी असतात, त्यांनी तरी स्वतःला इतरांपेक्षा श्रेष्ठ का समजावे, हे कळत नाही. अगोदर बुद्धी ही त्यांना मिळालेली निसर्गदत्त देणगी असते. ती मिळविण्याकरिता त्यांनी कष्ट केले असे म्हणता येईल काय ? फार तर असे म्हणू की, या निसर्गप्राप्त बुद्धीवर संस्कार करण्याकरिता त्यांनी विशेष श्रम घेतले. पण अगोदर शिक्षणाची संधी मिळणे, नंतर चांगल्या दर्जाचे शिक्षण मिळणे व ते अपुरे न राहणे, वगैरे सर्व गोष्टी इतक्या बहुविध परिस्थितींवर अवलंबून असतात की, ' या नशिबाच्याच गोष्टी ' असा शब्दप्रयोग केला तर ते चूक ठरणार नाही. एकूण सारांश काय, तर फारच थोड्या व्यक्तींना स्वतःकडे बोट दाखवून असे म्हणता येईल की, "हा पाहा, स्वकर्तृत्वाने संपूर्ण घडविलेला महापुरुष! " जगात जे स्वतःला श्रेष्ठ ( Superior )

६००६२ श्रीकांध
२२९६ ११३१७३

समजतात व ज्यांना इतरही श्रेष्ठ मानतात, त्यांचे श्रेष्ठत्व खरोखर कशात असते, याचा कुणी विचारच करीत नाही. समाजात काही संकेत ( conventions ) प्रस्थापित झालेले असतात. त्यांचा फायदा घेऊन श्रेष्ठपणाचे हक्क बळकावले जातात. या हक्कांच्या बजावणीतले पहिले सूत्र असे की, कनिष्ठांकडे तुच्छतेने पाहिले पाहिजे. दुसरे सूत्र असे की, कनिष्ठजन शब्दांनी व कृतींनी आपल्या श्रेष्ठतेचा मान ठेवीत आहेत की नाही, इकडे सतत लक्ष देणे. तिसरे सूत्र हे की, श्रेष्ठतेचा फायदा घेऊन कनिष्ठांकडून सेवा घेणे अगर अनेक आर्थिक अथवा इतर जादा सवलती उपटणे.

श्रेष्ठ-कनिष्ठ भाव जगात सगळीकडे प्रस्थापित होऊन राहिल्यामुळे समाजात विषमता उत्पन्न होते व अनेकांच्या प्राथमिक गरजासुद्धा भागेनाशा होतात. पण या भावनेचे परिणाम समाजात काय होतात, इकडे आपणांस वळावयाचे नाही. या भावनेमुळे व्यक्तिजीवनात जी स्थित्यंतरे होतात, त्यांचाच तेवढा विचार आज करू.

अगोदर एक गोष्ट स्पष्ट केली पाहिजे. ती ही की, तांत्रिक नैपुण्य ( Technological Skill ) अंगी असल्यामुळे व्यक्तीला जे स्थान मिळते ते अपरिहार्य आहे. या स्थानामुळे करावी लागणारी कामगिरी ( function ) व श्रेष्ठत्वाची भावना ( Status ) या अगदी भिन्न गोष्टी आहेत. पण या दोहोंची गल्लत करण्याची सवय आपणांला लागली आहे. एखादा इंजीनियर नदीवर पूल कसा बांधावा याबद्दल जे काही सांगेल ते कनिष्ठ कामगारांनी निमूटपणे ऐकलेच पाहिजे. त्या तज्ज्ञाने अभ्यास केला आहे, त्याचे या विषयातले ज्ञान अधिक आहे, ही गोष्ट इतर लोकांनीही मान्य केलीच पाहिजे. इंजीनियर म्हणून देखरेखीचे काम करण्याकरिता सोयीचे असले तर त्याला खुर्चीही दिली पाहिजे व इतरांनी खाली जमिनीवर बसले पाहिजे. न्यायाधीश म्हणून ज्याला

१६८९९

काम करावे लागते त्याला उच्चासन मिळणे क्रमप्राप्त आहे. तसेच शिक्षकाला आपल्यापेक्षा जास्त समजते, असे बालविद्यार्थ्यांनी तरी गृहीत धरले पाहिजे. 'शिक्षकाकडून काहीतरी नवे ज्ञान मिळणार आहे,' अशी भावना विद्यार्थ्यांत असणे याला कनिष्ठभाव (Idea of inferiority) म्हणता येणार नाही. अडचण अशी आहे की, एखाद्या व्यक्तीच्या ठिकाणी ज्ञानाचा संग्रह अथवा बुद्धीचे तेज आढळले की बाकीचे लोक दिपूनच जातात. त्यांच्या ठिकाणी हीनभावना अथवा लाचारी उत्पन्न होते. काही वेळा ही भावना प्रामाणिक असते, तर बऱ्याच वेळा स्वार्थ साधण्याच्या हेतूने मनात नसतानाही बाहेरून भलता आदर दाखविला जातो.

एक मात्र गोष्ट खरी की, उच्चनीच भावनेचा उपयोग उभयपक्षी स्वार्थ साधण्याकरिता करता येतो. कृष्णमूर्ती याला Mutual-exploitation म्हणतात. परस्परांमध्ये हे जे नाते निर्माण होते त्याचा गौरव कितीतरी नीतिशास्त्रज्ञांनी केला आहे. आपणांलाही वाटते की, हे एकप्रकारचे सहकार्य आहे. भगवंतांनी नाही का सांगितले, "परस्परम भावयन्तः श्रेयः परमवाप्स्यथ?" पण या वचनातला 'श्रेयस्' हा शब्द आपण विसरतो. जे हवे वाटते, त्याला 'श्रेयस्' म्हणत नाहीत. त्याला 'प्रेयस्' म्हणतात. कितीतरी वचने, म्हणी, श्रेष्ठ-कनिष्ठ भावाचे समर्थन, नव्हे गौरव करतात ! "Knowledge is power."

हे वचन घ्या ज्ञानसंपादनामुळे सत्ता गाजविण्याची संधी मिळणे यात जणू काय काहीच वावगे नाही, असा ध्वनी, "ज्ञान मिळवा व सत्ता गाजवा" या वचनातून निघतो. समाजाची सबंध इमारत श्रेष्ठ-कनिष्ठ भावावरच कशी उभारली आहे, हेच या विपुल म्हणी व वचने दाखवितात.

सगळ्यात अवघड प्रश्न ज्ञानसंपादन व त्यामुळे उत्पन्न होणारा

उच्चनीचभाव यांचेबद्दलचा आहे. या लेखाच्या सुरुवातीस दिलेल्या उदाहरणात, जी इतरांबद्दल तुच्छता दिसली, तिचा अधिक विचार करणे जरूर आहे. या भावनेचा जाच भोवतालच्या लोकांना तर होतोच, पण खरे नुकसान जो स्वतःला श्रेष्ठ समजतो त्याचेच होते. त्याचा जगाशी संबंधच तुटतो. एका बंदिस्त खोलीत जणू तो राहू लागतो. "त्या खोलीत बाहेरच्या प्रकाशाचा एकही किरण येत नाही ना?" इकडेच सारे लक्ष त्या ज्ञानी माणसाचे असते. बाहेरच्या प्रकाशाने त्याच्या संपादित ज्ञानात ढवळाढवळ केली तर? ही शंका, ही भीती, त्या ज्ञानी माणसाला कधीच सोडून जात नाही. जे ज्ञान याप्रमाणे जीव मुठीत धरून जगते त्याला काय किंमत आहे?

ज्ञानी माणसांचा गर्व काही वेळा बाहेर दिसत नाही. ज्ञान्याने नम्रता सोडू नये. यांसारखी कित्येक वचने त्याला बजावीत असतात की, "कठोर शब्द बोलू नकोस. मुद्रा उग्र करू नकोस." पण हृदयातली भावना काय असते, हा खरा प्रश्न आहे. हा जो अहंकार ज्ञानामुळे येतो, तो ज्याचा त्याने नीट पाहिला पाहिजे. हा अहंकार सर्वांनाच कमीजास्त प्रमाणात असल्यामुळे ती विकृती आहे असे वाटत नाही. जो रोग सर्वांना सर्वकाळी असतो त्याला 'रोग' ही संज्ञा प्राप्तच होत नाही. पण हा अहंकार, ही निव्वळ कल्पनेने उभी केलेली व 'प्रिय' म्हणून हृदयाशी धरलेली एक खोटी प्रतिमा असते हे आपल्या लक्षात येत नाही. कल्पनेने उभी केलेली मूर्ती कशी असते हे पाहणे मोठे उद्‌बोधक आहे. प्रथम असे होते की, जे इतरांना कळत नाही ते आपल्या गाठीला आहे ही जाणीवच सुख देते. मग आपल्या ज्ञानप्रदर्शनाने भोवतालचे लोक स्तिमित कसे झाले, त्यांच्या चेहऱ्यांवर आपल्या गौरवाची व त्याच्या विनीतभावाची चिन्हे कशी दिसू लागली, हे आठवू लागते. आपल्या अगाध ज्ञानाचे कौतुक कोठेकोठे झाले, हे

सर्व स्मृतिपटावर दिसू लागते. जरी बारीकसारीक तपशील आठवला नाही, तरी सर्व आठवणींचा अर्क 'मी'च्या भावनेत उतरतो; व मग हा 'मी'च कार्यप्रवण होतो. 'ज्ञानवान मी' म्हणजेच माझा खरा 'मी', असे वाटू लागते. पण जागेवर फक्त एक इतरांसारखाच मानवदेह असतो. या देहाला स्मृतियंत्र निसर्गाने बहाल केलेले असते. त्या यंत्राला इतरांच्या वाचनात न आलेले असे बरेचसे काही आठवत असते; व सरावाने अथवा जन्मानेच प्राप्त झालेल्या देणगीमुळे ते सफाईदार व परिणामकारक भाषेत व्यक्त करण्याची कला त्या यंत्राच्या मालकाजवळ असते. बस, यापेक्षा अधिक काही नसते. पण इतरांकडे पाहिल्यावर या 'यंत्राची मालकी' अथवा 'जवळ देणगी असल्याची जाणीव' फार मोठे सुख देते. मागेही हे सुख अनेकदा मिळालेले असते. ही आठवण जागी असल्यामुळे, त्या सुखाची पुनःप्राप्ती सहज होईल अशी व्यवस्था करण्यात चित्त सतत गुंतलेले असते. या पुनःप्रत्ययातून जो धागा तयार होतो तो विद्वान माणसाचा 'मी' असतो. खरे पाहिले असता, कोणतेही सुख पुन्हा पुन्हा मिळावे याकरिता स्मृतियंत्रात झालेली व्यवस्था, मुद्दाम केलेली सोय म्हणजेच 'मी'ची उत्पत्ती होय. पण हा 'मी' कायम राहण्याकरिता एका गोष्टीची जरुरी असते. जे इतरांजवळ नाही ते आपल्याजवळ आहे अशी खात्री त्याला सतत वाटावी लागते. सुख या तुलनेत असते, व या तुलनेतून श्रेष्ठ-कनिष्ठ भाव उदयाला येतो. तो कसा उद्भवतो, हे कृष्णमूर्ती पुढील शब्दांत सांगतात :

Exclusive, private knowledge offers deeply satisfying pleasure. To know something that others do not know is a constant source of satisfaction; it gives one feeling of being in touch with deeper things which afford prestige and authority. You are directly in contact, you have something

which others have not, and so you are important, not only to yourself, but to others. The others look up to you, a little apprehensively, because they want to share what you have; but you give, always knowing more, You are the leader, the authority; and this position comes easily, for, people want to be told; so, authority is built up in the name of the state, in the name of religion, in the name of a Master or a party leader.

(Commentaries on Living I. P. 66).

विद्वत्तेमुळे ज्या 'मी'चे पोषण होते तो त्या विद्वानाचा शत्रूच बनतो व शेवटी त्याचा घात करतो. 'मी' उत्पन्न करणारी विद्या म्हणजे काय असते ? ती फक्त "माहितीचा संग्रह (Collection of information)" या स्वरूपाची असते. एकदा का "मी विद्वान झालो" असे वाटू लागले की नवीन माहिती गोळा करण्याचेही काम थांबते. कारण, वरील जाणीव व्हायला लोकांत थोडीबहुत मान्यता मिळावी लागते. ही मान्यता मिळू लागली की, सामान्य लोकांचे ज्ञान व या विद्वन्मणीचे ज्ञान यांच्यात खूपच तफावत पडली आहे असे समजण्यास हरकत नाही. हा टप्पा गाठल्यावर आणखी ज्ञान म्हणजे माहिती मिळविण्याची जरूर काय ? मग फक्त एकच उद्योग सुरू होतो. तो म्हणजे जुनाच माल नव्या आभरणात घालून लोकांपुढे ठेवणे. यातही एकप्रकारचे कौशल्य असते, नाही असे नाही. पण काही वेळा हे कौशल्य अपुरे पडते व फजिती होते. सुज्ञ वाचकांच्या हे लक्षात आले असेल की, ज्या समाजात सामान्य लोकांच्या ज्ञानाची (म्हणजे माहितीची) पातळी फारशी वर नसते त्या समाजात 'विद्वान्' होणे सोपे आहे. पण प्रगत समाजात, 'ज्ञानी' म्हणून पदवी प्राप्त होणे

अवघड व अधिक श्रमाचे आहे. समाज प्रगत असो अगर मागासलेला असो, त्याला कुणातरी ज्ञान्याकडून मार्गदर्शन हवेच असते. म्हणूनच कुणालातरी उच्चस्थानी बसवल्याखेरीज समाजाचे भागत नाही. स्वतःच्या पायावर उभे राहून सत्यसंशोधन करण्याचे श्रम घेण्यास माणसे तयार नसतात. त्यांना 'आयते ज्ञान' पाहिजे असते. हे तयार ज्ञान जे देऊ करतात, त्यांना मोबदला म्हणून पैसा व इतर सुखसोयी समाज बहाल करतो. उच्चपदस्थानी खालच्यांची मागणी पुरी करावी व त्यांनी वरील मोबदला त्यांना द्यावा, या तत्त्वावर समाजातले व्यवहार चालतात व श्रेष्ठ-कनिष्ठ भाव दृढमूल होतो. एवढेच नव्हे, तर समाजाची सबंध रचनाच या पायावर होते. जो उच्च समजला जातो त्याला अधिक पैसा, राहायला चांगले घर व बसायला मोटारही मिळू लागली व ही सर्व प्राप्ती त्याच्या उच्च स्थानामुळे आहे, हे उघड दिसू लागले, तर समाजात सगळीकडे एकच प्रवृत्ती जोर धरते. चढाओढ दुसऱ्याला मागे टाकून पुढे जाण्याची हाव ( Competition ) ही ती प्रवृत्ती होय.

चढाओढ एकदा सुरू झाली की, 'जो थांबला तो संपला' हा न्याय अंमलात येतो. जीवनाला लढाईचे स्वरूप येते व त्याला विलक्षण वेगही येतो. ज्ञानाच्या क्षेत्रात, अर्थोत्पादनाच्या क्षेत्रात, सर्वच क्षेत्रांत फक्त एकच लक्ष्य सर्वांपुढे असते. "मी शक्य तेवढ्या अधिक लोकांना मागे टाकले आहे ना?" हा एकच सवाल प्रत्येकजण दर क्षणाला स्वतःला विचारीत असतो. समाज इतर तऱ्हेने किती जरी सुधारला तरी एकप्रकारचे विलक्षण क्रौर्य सर्वांच्याच चित्तावर हुकमत गाजवू लागते. हा मात्स्य न्याय, मोठ्या माशाने लहान माशास गिळावे हा न्याय सगळीकडे प्रचलित झाल्यावर, सर्वांच्याच हृदयातून प्रेमभावना नाहीशी होते.

जोपर्यंत "मी श्रेष्ठ" असे मला वाटते, तोपर्यन्त तथाकथित कनिष्ठावर मी प्रेम करूच शकत नाही. कनिष्ठांचा उपयोग माझी श्रेष्ठत्वाची

भूक शमविण्याकरिताच मला हवा असतो. तसेच कनिष्ठांच्या ठिकाणी दिसणारा वरिष्ठांबद्दलचा आदर म्हणजे काय, हे समजून घेतले पाहिजे. मला वाटते की, आदराचे प्रकार दोन आहेत. दुसरा काय म्हणतो हे, कोणतीही विरोधी भावना अथवा तुलना मनात येऊ न देता नम्रपणाने लक्ष देऊन ऐकणे ( listening ) एक प्रकार. या प्रकारात सांगणाऱ्याबद्दल आपुलकी असते, प्रेम असते. तसेच स्वतःबद्दलची कोणतीच प्रतिमा चित्तात नसते. 'मी कनिष्ठ' हा भावही नसतो. पण दुसऱ्या प्रकारात ज्ञानी मनुष्य जे काही सांगतो ते निमूटपणाने स्वीकारून त्या ज्ञान्याचे अनुकरण करण्याचीच वृत्ती असते. यालाही आदरभाव म्हणतात. हा आदरभाव जरूर आहे, त्याखेरीज प्रगती होणार नाही असे ज्ञानाच्या क्षेत्रातले वरिष्ठ सांगत असतात. पण हा भाव सुरक्षेच्या ( Psychological security ) हव्यासातून उत्पन्न होतो. तो कनिष्ठांच्या हृदयात प्रेमभावनेचा उदयच होऊ देत नाही.

श्रेष्ठ-कनिष्ठभाव निर्माण झाला की प्रेमाचे नाते संपतेच, असे मला म्हणावयाचे आहे. वरवर पाहिले तर हे विधान विसंगत वाटेल. पण विविध क्षेत्रांतली उदाहरणेच घेऊ या. एका लहान मुलाने कसली तरी चूक केली होती व त्याची कानउघाडणी त्याचा पिता कडक शब्दांत करीत होता. येथपर्यन्त ठीक होते. त्या पित्याची भाषा कठोर असेल, पण मुलाविषयीच्या जिव्हाळ्यामुळे व त्याच्या हिताकरिता ते कठोर शब्द आले असतील, अशी समजूत मी करून घेतली. पण थोड्याच वेळात शब्दांचे रूपांतर प्रहारात झाले. हे प्रहार मारतानाची पित्याची मुद्रा पाहिल्यावर माझी खात्री पटली की, पुत्रप्रेम बाजूला झाले असून आता फक्त एकच नाते कार्य करीत आहे. "माझी शक्ती तुझ्यापेक्षा कितीतरी जास्त आहे पाहा! किती जोरात मी तुला मारू शकतो व तुला उलट काहीच करता येत नाही" असेच शब्द त्या

प्रहारांतून मला जणू ऐकू येत होते. हे असे होते की नाही, हे जाणून घेण्याचा प्रयोग कुणालाही करता येईल. शारीरिक दृष्ट्या मी किती श्रेष्ठ ( Superior ) आहे, हे कनिष्ठाला त्याचेवर प्रहार करून पटवून देण्याचा उद्योग, आपण क्वचित का होईना पण मधून मधून करीत असतो. ही कृती कोणत्या हेतूंतून सुरू होते, तिला योग्य कारण असते की नाही हे सारे प्रश्न गैरलागू आहेत. प्रथमचा हेतू जरी चांगला असला तरी तो फार लवकर बाजूला जातो व जागेवर उरते फक्त क्रौर्य ! समाजधारणेकरिता हे क्रौर्यही जरूर आहे, असे समर्थन मग सुरू होते. त्या क्रौर्याला ' शिस्त लावणे ' असे नवे नाव प्राप्त होते. रोमन लोकांच्या कायद्यामध्ये, पित्याने पुत्राचा खून केला तरी कसलाही गुन्हा होत नसे. कारण, समाजात शिस्त राहावी याकरिता पित्याला हा अधिकार बहाल केला होता. स्त्रियांना शिस्त लावण्याकरिता त्यांच्या पतींना काही विशेष अधिकार पूर्वी सगळ्याच देशांत असत. इंग्लंडमध्ये अजूनही प्राचीन कॉमन लॉचे काही अवशेष आहेत. त्यांतला एक असा आहे की, पतीने प्रहार करून केवढीही जखम पत्नीला केली तरी तिला त्याचेबद्दल नुकसानभरपाई मिळत नाही. ( फौजदारी कायद्यात हे तत्त्व नाही. ) सांगण्याचा हेतू एवढाच की, समाजात शिस्त नांदावी, मुलांना चांगले वळण लागावे, हे उद्देश योग्य असले तरी त्यांचे निमित पुढे करून आम्ही जेव्हा वर्तन करतो तेव्हा त्या वर्तनात बऱ्याच वेळा श्रेष्ठत्वाची भावना अवतीर्ण होते. ही भावना म्हणजे सत्ता गाजविण्याची हौस ( desire to dominate ) असते. तिच्यात क्रौर्य असते; व क्रौर्याचा स्पर्श झाला की हृदयातून प्रीतीची संवेदना नाहीशी होते. हे असे होते की नाही हे सतत पाहात राहिले पाहिजे.

गुरुशिष्यसंबंधात गुरूबद्दल प्रेम वाटते की नाही, हा खरा प्रश्न

आहे. मग तो गुरू कोणत्याही क्षेत्रातला असो. ही प्रेमाची भावना ओळखता आली पाहिजे. अनुकरणाची भावना एकप्रकारची शिस्त राखील. पण ती खरी शिस्त नव्हे. ‘ गुरूविषयी पूज्यभाव पाहिजे ’ याचा अर्थ, ‘ गुरू श्रेष्ठ व मी कनिष्ठ ’ असे सतत वाटत राहणे, एवढाच करून उपयोगी नाही मग दोघेही आपापल्या स्थानावर स्थिर राहतील व त्यांच्यांतली दरी तशीच कायम राहील. पुष्कळदा असे होते की, ही दरी कायम राखण्याचा प्रयत्न जाणूनबुजून केला जातो. जेव्हा गुरूकडून हा प्रयत्न होतो तेव्हा त्यात अहंकार, आत्मगौरवाचा हव्यास, अशा अनेक विकृतीं दडलेल्या असतात. शिष्याकडून हे अंतर कायम राखण्याचा प्रयत्न जेव्हा केला जातो, तेव्हा त्याला ‘नम्रता’, ‘विनीतभाव’ अशी सुंदर नावे दिली जातात. पण ही खोटी नम्रता आहे. “ मी आहे त्या स्थानावर राहण्यात सुरक्षितता आहे. मला संशोधनाचे श्रम नकोत. तुम्हीच हे श्रम करा व आयते फळ माझ्या हातात द्या. बाह्य अनुकरण मात्र मी चालू ठेवीन.” अशी भूमिका जो शिष्य घेतो, तो प्रेमाला पारखाच होतो. ‘ गुरूविषयी आपल्याला प्रेम वाटते,’ असे तोंडाने जरी तो म्हणत असला तरी त्यात काही अर्थ नसतो. पुष्कळदा पूज्य भावनेच्या आवरणाखाली आत्मपूजा कशी दडलेली असते, हे लक्षातच येत नाही. घरात अगर समाजात शिस्त राहिली पाहिजे, ही सबब एवढी व्यापक आहे की, तिच्या नावाखाली क्रूरता वाटेल तेवढा धुडगूस घालू शकेल. याचा अर्थ, शिस्त नको असा नाही. पण शिस्तीचे निमित्त करून गुरू काही फायदे उपटतो का व शिष्य सुरक्षेच्या कोशात बौद्धिक आलस्याचे सुख भोगीत राहतो का,असा प्रश्न आहे. उच्चनीच भावावर समाजात त्या सर्व व्यवहारांची रचना करण्यात इतर काही सोयी झाल्या असतील. पण प्रेमभावनेचे महत्त्व कमी करण्याचा मोठा गुन्हा घडला आहे. कारण, दोन व्यक्ती समान भूमिकेवर असल्या तरच

प्रेमाची देवाण-घेवाण होऊ शकते, हे आपण विसरत चाललो आहोत.

धार्मिक क्षेत्रातही गुरुशिष्यामध्ये प्रेमाचे नाते प्रभावी असले तरच जीवनाला उपकारक असे त्या संबंधातून काही मिळेल, हे आता अधिक विस्ताराने सांगण्याची जरूर नाही. फक्त एका गोष्टीचा उल्लेख करणे जरूर आहे. या क्षेत्रातल्या शिष्यांनी, ज्याबद्दल विशेष जागरूक राहिले पाहिजे, असा एक धोका आहे. तो धोका असा की, स्वतःच्या गुरूपुढे शिष्य किती जरी विनीत असला तरी इतर गुरूंच्या शिष्यांपेक्षा तो स्वतःला श्रेष्ठच समजत असतो. निदान स्वतःमध्ये काही जादा गुण आहेत, असे त्याला वाटत असते. हा अहंकारच नव्हे काय ? या भूमिकेवरून विविध धर्मांच्या अनुयायांचे दरम्यान जे नाते प्रस्थापित होते ते प्रेमाचे असते काय ? वरून भाषा, ' आपण सर्व सारखे आहोत ' अशी असली तरी निराळेपणाची भावना व श्रेष्ठपणाची भावना या जुळ्या बहिणीच नाहीत काय ? हा धोका ओळखून वागणारे व मनातही सदैव नम्र असणारे शिष्य किती आहेत ?

कठोरता, क्रौर्य हा माणसांना पशूंकडून मिळालेला वारसा आहे. प्रश्न अवघड केव्हा होतो ? जेव्हा या गुणांचे समर्थन केले जाते तेव्हा. समर्थनामुळे माणूस आहे तेथेच राहतो; नव्हे, त्या ठिकाणी त्याचे पाय घट्ट रोवले जातात. मला तर वाटते की, दुर्गुणांचे समर्थन करून त्यांना सद्‌गुणांचे स्वरूप देण्याचाच उद्योग माणसाने आजपर्यंत केला आहे. ' सुधारणा ', ' प्रगती ' हे शब्द मोठे उदात्त आहेत. पण माणसांमधले पशुत्व अनेक मार्गांनी अजूनही आपला प्रभाव दाखवीत आहे. शब्द मात्र बदलले आहेत. भाषा गोड, अधिक मोहक झाली आहे. त्यामुळे आपल्या जीवनाच्या सर्व अंगांना व्यापून राहणारे पारुष्य ( harshness ) झाकले गेले आहे. झाकला गेलेला रोग जसा वाढत जातो, तसा हा आत्मकेंद्रितपणा सारखा विस्तार पावत आहे.

श्रेष्ठतेची भावना सर्वांत अधिक कोणामध्ये आढळते ? असा प्रश्न मला केला तर, ' राजकीय नेत्यांमध्ये ' असे उत्तर मी देईन. प्रथम ही श्रेष्ठता, लोक त्याला आपखुषीने बहाल करतात व मग तो त्यांच्यावर वाटेल तेवढा जुलूम करू शकतो. पण नेत्यांमधला सत्तेचा हव्यास नीट समजण्याकरिता प्रथम आपणा सर्वांमध्येच सत्ताप्रेम किती मोठ्या प्रमाणात आहे, हे पाहिले पाहिजे. कृष्णमूर्ती म्हणतात :-

What do we mean by power ? Every individual and group is after power; power for oneself, for the party, or the ideology. The party and the ideology are an extension of oneself. The ascetic seeks power through abnegation, and so does the mother through her child, There is the power of efficiency with its ruthlessness and the power of the machine in the hands of a few; there is the domination of one individual by another, the exploitation of the clever, the power of money, the power of name and word, and the power of mind over matter. We all want some kind of power, whether over ourselves or over others. This urge to power brings a kind of happiness, a gratification that is not too transient. The power of renunciation is as the power of wealth. It is the craving for gratification, for happiness, that drives us to seek power... ... ... ... Why do we seek power ? ... ... ... ... Is not the pursuit of power one of the recognized and respectable escapes from ourselves, from what is ? Everyone tries to escape from his own insufficiency, from his inner poverty, loneliness, isolation. The actual is unpleasant, but the escape is glamourous and inviting... ... ... ...So you have all the outer show without

the inner substance, the incorruptible treasure. You want your outward show and so does another and from this conflict arise hate and fear, violence and decay-- -- -- ...As almost everyone craves to be on the top, we have built a society of violence. conflict and enmity.

( Commentaries on Living II, P. 68 and 70 ).

याचा सारांश असा :–

'सत्तेचे आकर्षण' म्हणजे आहे तरी काय? प्रत्येक व्यक्ती व गट सत्तेच्या मागे लागलेला आहे. मग ती सत्ता स्वतःकरता असो अगर पक्षाकरता, पंथाकरता असो. पक्ष अथवा पंथ ही अहम्‌चीच वाढविलेली आवृत्ती आहे. संन्याशाला त्यागातून सत्ता हवी असते, तर आईला मुलाच्या मार्फत सत्तेचा उपभोग पाहिजे असतो. कर्तबगार माणसाला जी सत्ता मिळते ती मिळविण्याकरिता निर्दयपणाची मदत घ्यावी लागते. जवळ एखादे प्रभावी यंत्र असले तर हजारो लोकांना काबूत ठेवता येते. कितीतरी प्रकारांनी सत्तेचा वापर समाजात चालू असतो. दुर्बल व्यक्तीवर प्रबल व्यक्ती सत्ता गाजवितात. त्याच तऱ्हेने हुषार लोक अज्ञजनांवर हुकमत चालवितात. पैसा मिळाला की सत्ता त्याचे मागोमाग येते. उच्च पदवीदर्शक शब्दामध्येही सत्तेचे सामर्थ्य असते. प्रत्येकाला कसली तरी सत्ता हवी असते. कारण सत्तेने जे सुख मिळते, जो संतोष होतो, तो काही काळ तरी टिकेल अशी आशा वाटत असते. त्यागाने मिळणारी सत्ता ही धनिकाच्या सत्तेइतकीच कठोर असू शकते. सत्तेकरिता एवढी धडपड आपण का करतो? सत्तासंपादन हा शिष्टसंमत असा पलायनाचा (escape) एक प्रकारच नव्हे काय? आपण स्वतः जसे आहोत त्यापासून व चालू क्षणापासून दूर नेणारे असे हे पलायन असते. प्रत्येकाला स्वतःमध्ये एकप्रकारचा अपुरेपणा आहे असे वाटत असते. आतल्या बाजूस आपण अगदी एकाकी

आहोत अशी भावना असते. जे प्रत्यक्ष विद्यमान असते ते आवडत नाही. पण पलायन मोठे आकर्षक व रंगतदार भासते .... अशा रीतीने आपणा सर्वांजवळ फक्त मुखवटा असतो. आत काहीच नसते. कधीही न संपणारा असा सुखाचा ठेवा अंतःकरणात नसल्यामुळेच ही स्थिती होते. तुम्हांला आपल्या मुखवट्याचा जसा अभिमान वाटतो, तसाच दुसऱ्याला वाटतो. मग या संघर्षातून द्वेष, भीती, हिंसा आणि नंतर नाश ठेवलेलाच आहे. प्रत्येकाला शिखर गाठावयाचे असते. म्हणूनच ज्या समाजात हिंसा, संघर्ष व शत्रुत्व यांचे थैमान सगळीकडे चालू आहे असा समाज जन्माला येतो.

वरील उताऱ्यावरून हे लक्षात येईल की, नेत्याजवळ असलेला मुखवटा व आपल्याजवळचा मुखवटा यांत महत्त्वाचा असा फरक नाही. आत्मप्रौढीच्या भावनेने महापुरुषांच्या व लघुजनांच्या अंतःकरणांत सारखेच घर केलेले असते. नेत्यांच्या बाबतीत फरक एवढाच की, त्यांचा गौरव होताना जी भावना त्यांच्या चित्ताला सुखवीत असते, तिलाच खालच्या बाजूला एक अस्तर असते. ते अस्तर त्यांना सांगते की, "तुझा गौरव होण्यात देशाचे हित आहे. तू नसतास तर देश बुडाला असता !" यामुळे नेत्यांची अहंमन्यता पराकोटीला पोचते व अधिकच अनर्थाला कारणीभूत होते.

□ □ □

५

# व्यक्ति व समाज

"आपले जीवन असे आपण ज्याला म्हणतो, ते खरोखर आपले आहे काय?" असा प्रश्न मला कधीकधी पडतो. सकाळी उठल्यापासून झोपेपर्यंत मी जे जे करतो, त्यातले माझे स्वतःचे कोणते व समाजाने – यात कुटुंबही आलेच – माझ्यावर लादलेले असे कोणते, असा शोध जेव्हा मी घेऊ लागतो तेव्हा मी फारच विषण्ण होतो. कारण फार थोड्या कृती अशा आढळतात की, ज्या केवळ स्वेच्छेने मी केल्या असे म्हणता येईल.

सकाळी उठताच मी कपडे घालतो. पण फार क्वचित् वेळा असे होते की, माझ्या देहाचे रक्षण व्हावे म्हणून ते घातले जातात. लोकांत बरे दिसावे म्हणूनच कपड्यांची योजना आहे. निदान त्यांचा आकार वगर मी ठरविलेला नाही. नंतर दिवसभर ज्या कृती होतात त्यांतल्या बऱ्याचशा सवयीमुळे होतात. या सवयी समाजाने मला लावल्या हे तर उघडच आहे. फक्त क्षुधातृप्तीसारख्या काही गोष्टी खुद्द माझ्याकरताच करण्याची मला परवानगी आहे. पण त्या कोणत्या पद्धतीने व केव्हा करावयाच्या हे समाजानेच ठरवून दिले आहे. अन्नसेवनाने

माझी भूक भागते हे जरी खरे असले, तरी कोणत्या प्रकारचे अन्न हे समाजानेच ठरविले आहे.

एकूण असे दिसते की, गरजा जरी माझ्या शरीराच्या असल्या तरी त्या भागवाव्या कशा हे आधीच ठरून गेले आहे. त्या चौकटीत राहूनच मला जगावयाचे आहे. काही किरकोळ बदल करण्याचे स्वातंत्र्य मला आहे. पण, भूक लागली म्हणून दिसेल त्या दुकानातली मिठाई खाईन म्हटले तर ते चालावयाचे नाहीं.

समाजाने व्यक्तीवर ही जी बंधने घातली आहेत त्यांचा मोबदला म्हणून काही गोष्टी व्यक्तीला सुद्धा समाजाकडून मिळतात हे नाकबूल करता येत नाही. एकदा का 'नागरिक' म्हणून तुम्हांला समाजाने दाखल करून घेतले की, मग तुमच्या संरक्षणाची काळजी समाज म्हणजे सरकार वाहते. काही देशांत तर तुम्ही उपाशी मरणार नाही, अशी हमी सरकार देते. तुमचे कोणाशी भांडण झाले तर न्याय करण्याची जबाबदारीही सरकार शिरावर घेते. आता हे खरे की, सर्वच देशांत जागरूक व कार्यतत्पर सरकारे नसतात. पण कुचराई करणारे सरकार असले तरी ते अगदीच निकामी नसते. काहीतरी संरक्षण अथवा सेवा व्यक्तीला सरकारकडून लाभेलच.

'सरकार' हे समाजाला जे कार्य व्हावे असे वाटते त्याचा काही भाग पार पाडणारे एक हत्यार आहे. सरकारच्या क्षेत्रात न पडणारी अशी कामगिरी बरीच असते. तिची जबाबदारीही समाजाने पत्करलेली असते. ही कामगिरी व्यक्तीच्या हिताकरिताच होत आहे असा समाजाचा दावा असतो. ती घडवून आणण्याचे मुख्य साधन म्हणजे 'लोकमताचा प्रभाव' व 'बेअब्रूची भीती' हे होय. सामान्य व्यक्ती ही लोकमताला फार भीत असते. स्वतःची बेअब्रू होईल असे कोणतेच कृत्य करण्याला व्यक्ती सहसा तयार नसते.

समाजाची व्यक्तीवर जी सत्ता चालते ती काही देशांत अगदी निरंकुश असते; तर काही देशांत हा अंमल जरा ढिला असतो. पण 'समाजात हे खपेल का?' असा प्रश्न प्रथम विचारून सामान्य माणसे कोणतीही महत्त्वाची कृती करतात अथवा टाळतात.

समाज व व्यक्ती यांचे परस्परसंबंध ध्यानात येण्याकरिता दोन मुद्दे महत्त्वाचे वाटतात. पहिला असा की, 'समाज' नावाचे दृश्य असे सत्ताकेंद्र नसते. दुसरा मुद्दा हा की, समाजाची व्यक्तींवर जी सत्ता चालते, ती भीतीचाच उपयोग करून चालते. नाहीतरी 'सत्ता' या शब्दाचा अर्थ 'सक्ती' असाच आहे. पण आपखुषीनें समाजाचा अधिकार मान्य केल्यामुळे 'सक्ती' भासत नाही. काही वेळा वाघाच्या डरकाळीमुळे मेंढरे इतकी घाबरतात की, आपल्या पायांनी चालत जाऊन ती वाघाच्या जबड्यात पडतात. तसाच काहीसा हा प्रकार आहे.

'समाज' नावाचे सत्ताकेंद्र प्रत्यक्ष दिसत नसल्यामुळे, काही-जणांची सोय कशी होते व ते काय साधतात हे पाहणे मोठे मनोरंजक आहे. काही व्यक्ती असा पुकारा करतात की, समाजाच्या वतीने बोलण्याचा आम्हांला अधिकार आहे. त्यांना 'नेते' म्हणतात. या नेत्यांनी आव असा आणलेला असतो की, 'व्यक्तींच्या जीवनात उत्पन्न होणाऱ्या सर्व प्रश्नांचा त्यांनी अभ्यास केलेला आहे व काही दुर्मिळ तत्त्वे (Truths) त्यांना सापडली आहेत. त्याचे पालन करणे समाजाच्या हिताचे आहे! ही घोषणा कानी पडताच सामान्यजन हरखून जातात. कारण, सत्यशोधनाचे आपले श्रम वाचले याचा त्यांना हर्ष होतो. मग नेत्यांचे अनुकरण करणे, त्यांच्या वचनाचा अभ्यास करणे एवढेच काम समाजातल्या व्यक्तीपुढे उरते. या नेत्यांच्या कामगिरीमुळे व्यक्तीचे जीवन कसे जखडले जाते, ते निर्माल्यवत् कसे होते, एवढ्याच विषयाचा विचार आपण करू. समाजाची सत्ता कशी उदयास आली,

त्या संबंधात काही चुका झाल्या का, इकडे आपणांस वळावयाचे नाही.

प्रथमच हे लक्षात येते की, जीवनाच्या प्रारंभी जे शिक्षण प्रत्येक व्यक्तीला मिळते, त्याचा अभ्यासक्रम समाजाच्या नेत्यांनी ठरविलेला असतो. या अभ्यासक्रमात काही शास्त्रीय विषय असतात, तर काही 'माहितीचा संग्रह' या स्वरूपाचे विषय असतात. शास्त्रीय विषयांचा उपयोग एखादे यंत्र अगर व्यवसाय चालविण्याकरिता होतो. त्यामुळे धनार्जन करता येते. समाजाच्या नेत्यांना जे व्यवसाय हवे असतात, त्यांना उपयोगी असे शिक्षण शाळांतून व महाविद्यालयांतून दिले जाते. पण बाकीचा जो अभ्यासक्रम असतो त्याचा उद्देश विद्यार्थ्यांच्या मेंदूत माहितीचा भरणा करणे एवढाच असतो. ही माहिती अशा तऱ्हेने देण्यात येते की, काही परंपरांचा अभिनिवेश या शिक्षणामुळेच वाढीस लागावा. यामुळे, भिन्न समाज अथवा भिन्न देश एकमेकापासून अलग असेच जन्माला आले आहेत व ते तसेच राहणे जरूर आहे, अशी धारणा विद्यार्थ्यांची होते.

प्रश्न असा उत्पन्न होतो की, शिक्षणाचा उद्देश व्यवसायक्षमता देणे एवढाच आहे काय? त्याचप्रमाणे, चालू समाजात समरस होईल असा नागरिक निर्माण करण्याने शिक्षण सफल झाले असे म्हणता येईल काय? प्रत्येक व्यक्ती जर समाजात विलीन होण्यातच इतिकर्तव्यता मानू लागली तर तो समाज तरी जिवंत राहील का? मागच्या पिढीचीच आवृत्ती पुढच्या पिढीत, अशा पद्धतीने समाजधारणा होत राहिली तर भागेल का? बदलत्या कालामुळे उत्पन्न होत असलेल्या समस्यांना तोंड देण्याची शक्ती व त्या सोडविण्याची ताकद, गतानुगतिक समाजात येणे शक्य आहे का?

पण हा सर्व विचार नीट न होण्याचे कारण असे आहे की, समाज व व्यक्ती यांचेमध्ये द्वैत कल्पिले गेले आहे व व्यक्तीचे जीवन समाज

ठरवील तसे राहावे, असा एक संकेतच गृहीत धरला गेला आहे. आश्चर्य असे की, या गुलामगिरीत दिवस कंठण्यात व्यक्ती स्वत:ला धन्य मानीत आहे.

चालू जगापुढे उभे असलेले हे एक भयंकर संकट आहे. समाजाच्या हातात प्रचाराची व सत्ता गाजविण्याची एवढी प्रभावी साधने आहेत की, व्यक्ती अगदी गुदमरून जाते. तिला स्वत:च्या अशा आकांक्षा नाहीत, मते नाहीत, काही नाही. जे समाज सांगेल ते निमूटपणे ऐकणारी माणसे एवढ्या मोठ्या संख्येने जगाच्या पाठीवर पूर्वी कधीच नव्हती. याचे कारण, व्यक्तीलाही फक्त सुखाचे आकर्षण आहे. स्वातंत्र्याची किंमत तिला वाटेनाशीच झाली आहे. लोकमताला भलते महत्त्व माणसे देऊ लागली आहेत.

भारतीय समाजाकडे नजर टाकली तर काय दिसते ? अन्नसंपादनाचा उद्योग करण्यात जाणारा वेळ सोडला तर इतर वेळात सुशिक्षित-अशिक्षित करतात काय? फक्त दोन गोष्टी. एक करमणूक किंवा कोणत्यातरी नेत्याच्या नेतृत्वाखाली चाललेल्या चळवळीत किती व कसा भाग घ्यावा याची चर्चा. स्वत:च्या जीवनाकडे पाहण्यास कोणाला वेळच नाही. श्रेष्ठजनांच्या हालचाली, भाषणे यांचे चर्वितचर्वण एवढे चालते की उबग येतो. कुठेही जा, राजकारणाची चर्चाच ऐकू येते. कोणत्या गटाच्या हातात सत्ता राहावी, याकरताच या देशातले सर्व राजकारण चालले आहे, हे कोणाच्या लक्षातच येत नाही. प्रत्येक नेता या सत्तास्पर्धेत एवढा अडकला आहे की, जनहिताचा विचार करावा तरी त्याला वेळ मिळणे शक्य नाही. वाघावर बसलेल्या माणसापुढे एकच पर्याय असतो. मागे वळूनही न पाहता सारखे पुढे जाणे, एवढेच त्याला शक्य असते.

इतर देशांतही हेच चित्र दिसते. फक्त गट मोठे आहेत म्हणून

त्यांची संख्या कमी आहे व प्रचाराकरिता भरपूर पैसा उपलब्ध आहे, एवढाच फरक दिसतो.

या एकूण पार्श्वभूमीवर विचार केला तर असे दिसते की, समाजाचे स्वतंत्र अस्तित्व कल्पिण्यातच मोठी चूक झाली आहे. हे अस्तित्व गृहीत धरून जे जे काय केले जात आहे, ते सर्व नव्या समस्या उत्पन्न करीत आहे, आपल्या अडचणी अधिक वाढवीत आहे.

" हे सत्य आहे का ? समाज नावाची एखादी वस्तू खरोखरच आहे का ? का माणसांचा फक्त समुदाय आहे ? " हे प्रश्न आपण स्वतःला कधीतरी विचारतो का ? समाज माझ्याकडून ही अपेक्षा करतो, ती अपेक्षा करतो, असे आपण नेहमी म्हणतो. पण या शब्दांना काही अर्थ आहे का ?

समाजाबद्दल ही अशी कल्पना करून घेण्यात आपण फक्त एक सोय पाहिली आहे. अनुकरण करण्यास सोपे जावे म्हणून ही योजना आहे. व्यक्तींनी स्वतंत्र विचार केला तर उत्पन्न होणारे अवघड प्रश्न, तसेच दबवून टाकावे या एकाच हेतूने समाजाचे श्रेष्ठत्व गृहीत धरले पाहिजे असा आग्रह सगळीकडे चालू आहे. हा आग्रह या ना त्या रूपाने प्राचीन कालापासून चालत आला आहे. पूर्वी त्याला धर्म-सत्तेचे स्वरूप होते. धर्म, जोपर्यंत व्यक्तीच्या अंतःकरणात जिवंत असतो तोपर्यंत त्याला एकप्रकारचे तेज असते. पण ही भावना हृदयातली नाहीशी होऊन तिला फक्त बाह्य आचाराचे स्वरूप किती लवकर येते, हे स्वतःचे स्वतःलासुद्धा सहज कळण्यासारखे आहे. मात्र, आत्मपरीक्षणाचे श्रम घेतले पाहिजेत. अंतःकरणातल्या सत्प्रवृत्ती किती लवकर मावळू लागतात ! दुसऱ्याकरता प्रत्यक्ष त्याग आत्मस्मृतीने करण्याची प्रवृत्ती जी लहान मुलांत असते, ती वय वाढू लागताच दिसेनाशी होते. मग फक्त बाहेरचे लोक काय करतात इकडेच दृष्टी

लागते. “ अमक्याने काय केले, तमक्याने काय केले, ” याचीच चर्चा नाही का आपण सदा करीत ? दुसऱ्यांच्या वर्तनाकडेच आपले सर्व लक्ष असते. हल्लीच्या भारतीय समाजात हा प्रकार विशेष दिसतो. अधः-पाताचे हे प्रमुख लक्षण आहे, असे मला वाटते. आपल्या मनाची दारे जेव्हा उघडी असतात तेव्हा ती कशाकरता, माहीत आहे ? फक्त बाहेरचे विचार आत घेण्याकरिता. जुन्या अथवा विद्यमान श्रेष्ठांचे अनु-करण, त्यांच्या वचनांचे स्मरण अथवा पठण, यांनीच आपले दैनंदिन जीवन बनलेले दिसत नाही काय ? धर्माच्या क्षेत्रात आचाराला (ritual) प्राधान्य आले की धर्मभावना निघून जाते, हे जसे आपण विसरलो आहोत, तसेच सदाचरण ( virtue ) म्हणजे अनुकरण नव्हे हेही विसरलो आहोत. विशेष लक्षात घेण्याजोगी गोष्ट अशी आहे की, ज्या पाश्चात्य समाजात एके काळी सत्याचा आग्रह विज्ञानाच्या प्रगतीकरिता समाजाला धुडकावूनही धरण्यात येत होता, त्याच समाजात अनुकरण करण्यात व अनुयायित्व पत्करण्यात स्वतःला धन्य मानणारी पिढी जन्माला आली आहे. हेच वारे पश्चिमेकडून सारखे वाहत आहेत व येथले संबंध वातावरण बदलून टाकीत आहेत.

डॉ. गोबेल्सचे ते सुप्रसिद्ध सूत्र सर्वांनाच माहीत आहे. किती का मोठे असत्य असेना, त्याची सतत पुनरावृत्ती करा म्हणजे लोक ते सहज ग्रहण करतील. खरोखर हा एक चमत्कार आहे. पण चालू युगात रेडिओ, वृत्तपत्रे, मासिके व पुस्तके यांची एवढी भरमसाठ वाढ झाली आहे की, स्वतंत्र विचाराला जागाच उरलेली नाही. कोणताही विषय घ्या, त्याबद्दलचा अंतिम निर्णय आयता मिळण्याची सोय झाली आहे. प्रचार आणि अनुकरण यांचे फार जवळचे नाते आहे. अनुकरणाकडे लक्ष लागले की स्वतंत्र विचार संपलाच. पण त्याबरोबरच जीवनातला आनंदही संपतो, हे आपल्या लक्षात येत नाही.

एरवी जे दुर्गुण वाटतात ते समाजाच्या टोकाकडून त्यांचेकडे पाहिले की सद्‌गुण होतात ! ही किमया समाजातल्या नेत्यांची असते. कौशल्याने प्रचार केला तर हिंसा क्षम्य, नव्हे वंदनीय आहे. असे लोक मानू लागतात. आश्चर्य असे की, ज्या जाणत्या लोकांनी घरात किडामुंगीचीही हत्या केली नसती, तेच निर्घृणपणाने जाळपोळ करण्यास उद्युक्त होतात. व्यक्तींवर ही एवढी सत्ता समाजाची चालते, म्हणूनच दोघांमध्ये खरे नाते ( relationship ) समजून घेणे अगत्याचे आहे,

हे नाते आणि आपण स्वत: व आपली सावली यांचे दरम्यानचे नाते, मला एकच वाटते. आपण जी सावली पाडतो, तिचेकडे पाहूनच कसे वागावयाचे हे ठरविता येईल काय ? पण जवळजवळ इतकेच हास्यास्पद वर्तन आपण करीत असतो. हिटलरने ज्यू लोकांच्या दुष्टपणाबद्दल एवढी खात्री जर्मन जनतेची पटविली की, लहान कोवळ्या बालकांचीही त्यांना भीती वाटू लागली. ती पुढे मोठी झाल्यावर नक्कीच राष्ट्राचा घात करणार हे ठरूनच गेले. झाले, मग अत्यंत सुसंस्कृत माणसांनीही त्या लाजिरवाण्या हत्याकांडात भाग घेतला. मला वाटते की, जर्मन इतिहासातला हा कालखंड फारच उद्‌बोधक आहे. समाज, समाजाचे प्रणेते व व्यक्ती यांचा अन्योन्यसंबंध लक्षात येण्याकरिता यापेक्षा दुसरे चांगले उदाहरण मिळणे कठीण आहे.

शिक्षणाच्या मार्फत जे 'सुसंस्कार' होतात असा दावा केला जातो. त्यांचा खरा अर्थ ध्यानात येण्याकरिता जर्मन राष्ट्राचे वरील उदाहरण फार उपयोगी आहे. माणसे साक्षर होतात; सफाईने बोलू व लिहू शकतात, तांत्रिक प्रक्रियांचे ( technical operations ) ज्ञान पराकोटीचे त्यांना होऊ शकते. बस्स, यापेक्षा अधिक काही शिक्षणाने साधावे, याची कल्पनाच समाजाच्या नेत्यांना अजूनही सहन होत नाही. जर्मनीसारखे पुढारलेले राष्ट्र खऱ्या अर्थाने रानटीच राहिले, असा नाही का याचा

अर्थ होत ? जोपर्यंत माणसाला स्वतःच्या हृदयातली हिंसेची प्रवृत्ती नष्ट करता आली नाही, तोपर्यंत त्याचे शिक्षण सुरूच झाले नाही, असे म्हणण्यास काय हरकत आहे ? बाहेरच्या सृष्टीवर विजय मिळविण्यावरच समाधान मानण्याची प्रवृत्ती अजूनही सुधारलेल्या राष्ट्रांत आहे. हे असे का ? याचे कारण एकच आहे. समाजाच्या हातात व्यक्ति-नियमनाची सर्व सूत्रे तशीच राहू द्यावयाची, असा आग्रह अजूनही सर्व देशांत आहे. माणसाच्या इतिहासाची पहिली थोडी वर्षे सोडली तर अगदी सुरुवातीपासूनच माणूस गुलामगिरीत सुख मानून राहू लागला, हे उघड दिसते. त्याच्या हे लक्षातच आले नाही की, बाहेरच्या जगावर स्वामित्व गाजविल्याने भागत नाही. उलट जो जो हे स्वामित्व वाढत जाते, तो तो अहंकर्तृत्वाचा गर्वही वाढीस लागतो. हा गर्व म्हणजे धनीपणा नाही, तर सुखवासनेचा जाच आहे. ती एक शृंखला आहे.

बहुतेक सर्व देशांत मिळणारे शिक्षण, या आंतल्या शृंखलेला स्पर्श का करीत नाही, हे सुज्ञ वाचकांच्या लक्षात आता आले असेल. स्वतंत्र विचार करण्याचे शिक्षण देऊन, समाज आपले वर्चस्व धोक्यात आणू इच्छित नाही. पूर्वी धर्माच्या मार्फत ही सत्ता गाजविली जात असे. आता धर्मोपदेशकांची जागा राजकारणी नेत्यांनी घेतली आहे. कोणत्याच धर्माने अनीती शिकविली नाही; सदाचार, दमनाचे महत्त्व, त्यागाची जरूरी, यांवरच सर्व धर्मांनी भर दिला. पण असे असूनही, ‘ मी स्वतंत्रपणे विचार करून सदाचरणी राहू शकतो, ’ हा आत्मविश्वास माणसाच्या ठिकाणी जागृत करण्यात कोणत्याच धर्माला यश आले नाही. कारण, सर्व धर्मांनी प्रथम समाजाच्या स्थैर्याची काळजी वाहिली, व काही वेळा भडक ध्येये जनतेपुढे ठेवून तिला हिंसेला उद्युक्त करण्यासही मागेपुढे पाहिले नाही. या उद्योगात धर्माची मूलतत्त्वे पायदळी तुडविली गेली, तरी चकार शब्द कोणी काढला नाही.

समाजाची धारणा व व्यक्तीचे स्वातंत्र्य यात मूलभूत विरोध ( fundamental contradiction) आहे का ? मला तसे वाटत नाही. पण एवढे मात्र खास की, समाजधारणेकडून सुरुवात केली की सर्व विपरीत दिसते व अनेक चुका होतात. याचे कारण एकच आहे. ते असे की, समाज नावाची वस्तू जागेवर नाहीच. व्यक्तींचा समूह, एकमेकांच्या सोयीकरिता जवळ आलेल्या व्यक्तींचा समुदाय, म्हणजेच समाज ! या समूहाला व्यक्तित्व (personality or identity ) बहाल केल्यामुळे सर्व अनर्थ उत्पन्न होतात. मग 'समाजपुरुष' निर्माण होतो. त्याला केव्हा धर्मावरून नाव दिले जाते, तर केव्हां समान इतिहासाचे निमित्त सांगितले जाते. कुठला तरी हजारो वर्षांपूर्वीचा इतिहास उकरून काढून राष्ट्रे निर्माण करता येतात, अथवा मोडता येतात. केव्हा भाषेचा अभिमान जागृत करता येतो, तर केव्हा नैसर्गिक भूमर्यादांचा विपरीत अर्थ लावता येतो. समाजाला हे सर्व करता येते, तरी 'समाज' नावाची वस्तू खरोखर जगात नाहीच. हा चमत्कार वाटेल. पण हरगडी असे चमत्कार घडलेले आपण पाहतो. जे भूत (ghost) खरोखर सत्यसृष्टीत नाही, त्याने काही मागितलेले व त्याला ते दिलेलेही आपण पाहतो. तसाच प्रकार आहे हा.

समाजाच्या वतीने बोलण्याचा अधिकार जे सांगतात त्या नेत्यांची सत्ता म्हणजेच समाजाची सत्ता. या नेत्यांच्या मार्फत, त्यांच्या पुस्तकांच्या अथवा भाषणांच्या मदतीने निरंकुश सत्ता समाजाला सर्व व्यक्तींवर चालविता येते.

आपल्याला वाटते की, "आहे ती परिस्थिती स्थिर राहावी, समाजात विनाकारण उत्पात घडून व्यक्तींच्या जीवाला अपाय होऊ नये," याकरताच समाजनेते सदैव झटत असतील. पण तसे दिसत नाही. त्यांच्यापुढे ध्येय एकच असते. स्वतःच्या हातात शक्य तेवढी अधिक

सत्ता केंद्रित करण्याचे वेड सर्व नेत्यांना लागलेले असते. या वेडाने झपाटले गेल्यानंतर ते काय करतील व काय नाही याचा नेम नसतो. ही सत्ता एखाद्या नेत्याच्या हातात जोपर्यंत निरपवाद असते तोपर्यंत समाजाला स्वास्थ्य लाभते. पण दुसरे नेतेही याच खटपटीत असतात. त्यामुळे ते अशी काही तत्त्वप्रणाली ( ideology ) शोधून काढतात की, तिचे आकर्षण जनतेला अधिक वाटावे. मग समाजात नेत्यांच्या नावाने अथवा कोणत्यातरी वादाच्या ( I-sm ) नावाने घालमेल, बखेडे, चळवळी सुरू होतात. जनतेला ' तुष्टी ' ' पुष्टी ' प्राप्त करून देण्याकरिता नेत्यांत व अनुयायांत मारामाऱ्या, लढाया होतात. यात हिंसा झाली, ' तुष्टी ' ' पुष्टी ' तर राहोच, पण जीवही अनेकांना गमवावा लागला, तरी कुणी क्षिती बाळगीत नाही. कारण नेत्यांनी भविष्यकाळातल्या शांतीचे, वैभवाचे जे निशाण हातात धरलेले असते त्याचेकडेच सर्वांचे डोळे असतात. पायाखाली प्रत्यक्ष काय होत आहे, इकडे कुणीच लक्ष देत नाही.

एकूण असे दिसते की, समाजाची ( म्हणजे नेत्यांची ) मागणी स्थिरतेची असते. पण ही स्थिरता फक्त दोन लढायांमधली शांतता असते. शांततेपेक्षा ध्येयाकडे प्रगती अधिक महत्त्वाची वाटते. ध्येयाकरिता लढाई करण्याकरिता, माणसे सुसंघटित असावी लागतात व संघटनेची शिस्त उत्पन्न करण्याकरता अनुकरणाची सवय व्यक्तींना लावण्यात येते. वरील विवेचनाचा अर्थ असा नाही की, सर्वच नेत्यांना हिंसा मनातून हवी असते. त्यांची श्रद्धा अहिंसेवर असूनही, नाइलाज म्हणून ते हिंसेचा आश्रय करतात. दिशाभूल झाल्यामुळे, गोंधळलेली मनःस्थिती असल्यामुळे व प्रामुख्याने 'समाजपुरुष' म्हणून कोणीतरी आहेच या समजुतीमुळे नेत्यांच्या अनेक चुका होतात. या चुका का व्हाव्यात? स्वतंत्र विचार करून सत्यसंशोधन करण्याचे शिक्षण नेत्यांनाही मिळा-

लेले नसते म्हणून. सुशिक्षणाचा प्रश्न किती महत्त्वाचा आहे हे आता वाचकांच्या लक्षात येईल.

पण नेत्यांची एक चूक मात्र कधीच होत नाही. स्वतःच्या हातात समाजाला वळण लावण्याची सत्ता शक्य तेवढी अधिक कशी येईल व जास्तीत जास्त काळ कशी राहील, हे मात्र प्रत्येक नेता सदैव पाहत असतो. ही सत्ता हरतऱ्हेने मिळविता येते. अनुयायी संघटित करून, प्रचाराची साखरपेरणी करून, अथवा चारित्र्याचा दबाव उत्पन्न करून समाजावर अप्रतिहत सत्ता चालविता येते. पण यामुळे व्यक्तीचे स्वातंत्र्य समूळ नाहीसे होते. तिचे जीवन निर्माल्यवत् होते. नेत्यांच्या या क्रियेला ideology असे नाव कृष्णमूर्तींनी दिले आहे. तिचा व्याप केवढा मोठा आहे, पाहा :–

" Your ideology may be the outcome of study, of comparison, of accepting certain facts and denying others, and your conclusions may be the product of experience; but why reject the ideologies of others as being illusory, when they also are the result of experience ? You gather a group around your ideology, as do others around theirs; you want collective action and so do they in a different way. In each case, what you call collective action springs from an idea, you are both concerned with ideas positive or negative, to bring about collective action. Each ideology has experience behind it, only you refute the validity of their experience, and they refute the validity of yours. They say that your system is impractical, will lead to slavery, and so on, and you call them Warmongers and say that their system must inevitably lead to economic bisater. So both of you are concerned with ideologies, not

with feeding people or bringing about their happiness. The two ideologies are at war and man is forgotten .... You both want to save the future man by sacrificing the present man – as though you knew all about the future, as though the future were a fixed thing and you had the monopoly of it. Yet you are both as uncertain of tomorrow as any other. There are so many imponderable facts in the present that make the future .... Ideas are always concerned with past or the future, but never with the present.

( Commentaries on Living 1, p. 187–188 ).

एकूण सारांश असा दिसतो की, सामुदायिक कृतीचा (Collective Action) मोह जनतेने व नेत्यांनीही सोडला पाहिजे. ही कृती सुलभ व्हावी म्हणून जनतेला तत्त्वप्रणालीच्या ( ideology ) मदतीने झुलवीत ठेवण्याचा उपक्रम जोपर्यंत चालू आहे तोपर्यंत समाजात बेदिली पक्षद्वेष, हिंसक चळवळी यांना ऊत येणारच. या निरर्थक उद्योगात व्यक्तींची व समाजाची शक्ती क्षीण तर होतेच, पण व्यक्तिजीवनाचे स्वरूपच पालटते. व्यक्ती म्हणजे निव्वळ यंत्रे बनतात. एका अर्थाने माणसे निर्जीव बनतात. या निर्जीव माणसांचे ओझे स्वत:च्या शिरावर वाहण्यात नेत्यांना तरी का एवढी हौस वाटावी ? असा प्रश्न वाचक विचारतील. दिशाभूल झालेले प्रामाणिक नेते सोडले, तरी बहुसंख्य नेत्यांची अनेकविध आत्मतृप्ती (Self–fulfilment) नेते राहण्यातच होत असते. सत्ता उपभोगण्यात फार मोठे सुख असते, एकप्रकारचा विशेष आनंद असतो. ‘ इतरांपेक्षा आपण श्रेष्ठ आहोत, ’ ही जाणीवच नेत्यांना अनेक संकटांना सामोरे जाण्यास तयार करते. मग त्यांची किंमत आणखी वाढते. पण त्यांच्या ठिकाणी जी अहंमन्यता येते ती अनुयायांच्या नाशालाही कारणीभूत होते. विवेक केव्हा केव्हा सुटतो, व

योग्य निर्णय घेण्याचे ऐवजी, स्वतःच्या हातात सत्ता ठेवील असाच निर्णय घेण्याचा मोह होतो.

पण खरे नुकसान समाजातल्या व्यक्तींचेच होते. सामुदायिक कृतीवर सर्वस्वी भिस्त ठेवण्याची सवय एकदा का जडली की माणसे दुर्बल बनतात. त्यांची उपक्रमशीलता ( initiative) नष्ट होते. प्रत्येक बाबतीत परावलंबी असे जीवन ते जगू लागतात.

ज्या समाजातल्या व्यक्तींना नेत्याकडे सदैव पाहण्याची सवय लागली आहे, त्यांच्या अंगीही सत्ताप्रेम वाढीस लागते. नेत्यांचा होणारा गौरव, त्यांना मिळणारे सुखोपभोग व लाभणारी प्रसिद्धी यांचे आकर्षण आबालवृद्धांना, सर्वांनाच वाटू लागते. नेते ज्या लबाड्या करीत असतील, ज्या हिकमती लढवीत असतील, त्या आपण का करू नयेत, असे वाटून सामान्य व्यक्तींचाही अधःपात होऊ लागतो. समाजातल्या प्रत्येक गटात मग नेते निर्माण होऊ लागतात. निष्ठा त्या त्या नेत्यावर, कोणत्याच तत्त्वावर नव्हे, असा जमाना सुरू होतो. जास्तीत जास्त पैसा अगर सत्ता मिळविणे हेच ध्येय मग प्राकृत जनांचेही बनते. घरात व बाहेर सत्ताप्रेमाखेरीज इतर सर्व मूल्ये पायदळी तुडविली जातात. यामुळे होणारा संघर्ष, वाढणारा असंतोष. आणखी कितीतरी दुर्गुणांना खतपाणी घालतो. माणसे कमालीची क्रियाशील ( Active ) व हुषार बनतात. पण त्याचबरोबर क्रौर्यही वाढीस लागते. जो आड येईल त्याला कापून काढले पाहिजे, अशी वृत्ती सर्वत्र थैमान घालते. इकडे नेते मात्र, सबंध समाज उचलून प्रगतीकडे नेण्याचे अवघड कार्य आपण करीत आहोत, असा आव आणतात. सामान्य व्यक्तींना जीवनातली खरी मूल्ये काय याची ओळख करून देण्याचे काम कोणीच करीत नाही. समाजाला प्राधान्य दिल्याने नेत्यांची मूल्ये तीच व्यक्तींची होऊन बसतात. मग नेत्यांचे दुर्गुण सद्गुण वाटू लागतात. भाषा ही भावना व्यक्त करण्या-

करिता नसून ती लपविण्याकरिता व भुरळ पाडण्याकरिता आहे, असे सर्वांनाच वाटू लागते. हा प्रकार फार काळ जारी राहिला तर तो समाज रसातळाला जातो.

अधःपाताने ज्या समाजाला ग्रासले आहे व नेत्यांच्या मगरमिठीत जो पक्का सापडला आहे अशा समाजातही काही थोड्या व्यक्ती बंड करून उठतात. जीवनाकडे नव्याने त्या पाहू लागतात. उबग आल्यामुळे जे प्रस्थापित आहे ते सर्वच मोडून तोडून टाकावे असे त्यांना वाटू लागते पण दुर्दैव असे की, त्यांचाही पंथ बनतो, व संघटनाप्रेम त्यांच्या-मध्येही वाढीस लागते. मग इतिहासाचीच पुनरावृत्ती होते.

सत्यप्रस्थापनाकरिता नवीन संघटना करून अथवा नुसते बंड करून या प्रश्नाची तड लागेल असे दिसत नाही. हे प्रयोग अनेकदा केले गेले आहेत व फसले आहेत. दुसरे असे की, जुन्याचा नाश करू अशी घोषणा जेव्हा केली जाते, तेव्हा कोणते 'जुने' या क्रांतिकारकांच्या डोळ्यांसमोर असते ? जुन्या विचारसरणीतून उभी राहिलेली देवालये, लिहिलेले ग्रंथ, काढलेल्या संस्था अथवा काही विशिष्ट व्यक्ती त्यांच्यासमोर असतात. यांचा नाश करू पाहणारांना साहजिकच जो विरोध होतो, तो त्यांना जन्मभर पुरण्यासारखा असतो. पण 'खरे जुने' माणसांच्या मनात, वृत्तीत असते. शिवाय, वरील कृतीत शक्तीचा जो व्यय होतो तो काहीच साधीत नाही. पण ज्या व्यक्तीला, परंपरेतून ( tradition ), शिस्तप्रियतेतून अथवा गतानुगतिक वृत्तीतून सतत डोकावणारे 'जुने' ओळखता येते, ती स्वतः त्यापासून अलिप्त राहू शकते. ही अशी अलिप्त राहणारी स्वतंत्र व्यक्ती ज्या तऱ्हेने जीवन व्यतीत करते, ती तऱ्हाच इतरांना मार्गदर्शक बनते. स्वतंत्र व्यक्तीच्या ठिकाणीच खरे प्रेम उदयास येऊ शकते. हे प्रेम मग जे कार्य करते तेच इतरांचा हृदयपालट घडवू शकते. हे कार्य जवळच्या

व्यक्तींवर परिणाम करीत करीत फार दूरही पसरू शकते. निदान त्या स्वतंत्र व्यक्तीला तरी खरे जीवन उपभोगावयास सापडते. त्यात जी नवनिर्मितिक्षमता ( creativity ) असते, तिच्यापासून समाजातही कितीतरी खऱ्या हिताच्या गोष्टी घडतात. पण हे सर्व व्हावयाचे तर समाजाने व्यक्तीची कदर केली पाहिजे. व्यक्तीला महत्त्वाचे स्थान दिले पाहिजे. हा मार्ग लांबचा वाटतो. पण खात्रीचा आहे. समाज-हिताची घाई झाल्यामुळे अथवा नवसमाजाचे सुंदर स्वप्न ( Ideal ) सतत डोळ्यांसमोर धरल्यामुळे जी हिंसा होते, जो नाश होतो, निदान तो तरी टळेल. ‘ हेही नसे थोडके. ’

□ □

६

# मी व माझी संपत्ति

संपत्तीशी असणारे एकच नाते आपणांला माहीत आहे. संपत्ती ही मिळवावी लागते, वाढवावी लागते व तिचे जतन करावे लागते. जे लोक यात कमी पडतात त्यांना पश्चात्ताप करण्याची पाळी येते. यापेक्षा आणखी काय संबंध आमचा संपत्तीशी असणार ? असा प्रश्न काही वाचक करण्याचा संभव आहे. संपत्ती नाना प्रकारची असते. जमीन-जुमला, पैसाअडका, घरात असणाऱ्या विविध वस्तू - त्यांतल्या काही जरुरीच्या तर काही निरुपयोगी म्हणजे चैनीच्या – फर्निचर, दागदागिने, कपडे इत्यादी सर्व गोष्टींचा उल्लेख ‘ संपत्ती ’ या शब्दाने केला जातो.

संपत्ती निर्जीव असल्याने, वरवर पाहणाराला ती मनावर विशेष परिणाम करीत असले, असे वाटत नाही. पण पुत्रदारादिकांशी जे आपले नात असते, त्याचप्रकारचे नाते संपत्तीशीही असते. संपत्तीशी आपल्या मनाने योग्य प्रकारचा संबंध ठेवला नाही, तर जीवनातली

इतर नातीही बिघडू लागतात. म्हणूनच, संपत्ती म्हणजे काय व तिचा जीवनावर एवढा प्रभाव का, हे समजून घेतले पाहिजे.

मला कित्येक वेळा असे वाटते की, जगातले सर्वच लोक मार्क्सवादी बनत चालले आहेत. भारतीय संस्कृती मार्क्सवादापासून फार दूर, अशी समजूत माझी फार पूर्वी होती. पण आता पाहावे तो सगळीकडे संपत्तीचे पूजकच दिसत आहेत. त्यांतले काही मार्क्सच्या तत्त्वज्ञानाला कडाडून विरोधही करतील. पण ज्याच्या अंतरंगात ' संपत्तीचे प्रेम ' नाही असा माणूस या भारतातही शोधून सापडेलच असे मला वाटत नाही.

मुलगा लहानाचा मोठा होताना, प्रथम त्याच्या लक्षात कोणती गोष्ट येते ? निर्वाहाकरिता पैशाची जरूर आहे व तेवढीच त्याची किंमत आहे ही, का पैशाने मला हवी ती वस्तू घेता येते ही ? जीवनात पैशाचे खरे स्थान काय, याबद्दल सुरुवातीपासून मनात गोंधळ अथवा गैरसमज होतो. लहान मुलांनाही फार लवकर कळू लागते की, मागितल्याबरोबर पैसा देणारे बाबा जास्त चांगले. शेजारच्या घराकडे, त्यातल्या मुलांना काय कसे मिळते याकडे मुलांचे फार बारीक लक्ष असते. मग शाळेत जर आणखी असे आढळले की, एखाद्या मुलाला गुरुजी जवळ घेतात व त्याचेशी जास्त गोड बोलतात, तर काय होईल ? हा श्रीमंताचा मुलगा म्हणून असे होते, असे कळले तर ? यापुढे जर आणखी असे दिसले की, वर्गात एकही प्रश्नाचे धड उत्तर ज्याला देता येत नाही, तो केवळ श्रीमंताचा बेटा म्हणूनच गुरुजींना प्रिय आहे, तर श्रीमंतीबद्दलचे आकर्षण मुलांच्या चित्तात रुजलेच म्हणून समजावे. यात जर आणखी अशी भर पडली की, आपले बाबाही श्रीमंत मनुष्य घरी आला की भांबावून जातात, त्याला कुठे ठेवू कुठे नको असे करतात, तर मग श्रीमंत होण्याचे ध्येयच तो मुलगा हृदयात

बाळगू लागतो. हा मुलगा मोठा झाल्यावर कसा वागू लागतो हे तर आपणांला सगळीकडे दिसतच आहे.

श्रीमंतीचे आकर्षण, समाजातल्या प्रौढजनांना सतत वाटत राहावे, अशी व्यवस्था कायम ठेवून, मुलांना त्या आकर्षणापासून दूर ठेवण्याचे शिक्षण देता येईल का, हा एक अवघड प्रश्न आहे. पण तिकडे न वळता आज फक्त लक्ष्मीचा प्रताप किती सर्वव्यापी आहे, एवढेच पाहू.

केवळ 'सोय' म्हणून एखादी गोष्ट करावी व तिनेच मोठा घात करावा असे व्यक्तिजीवनातही केव्हा केव्हा घडते. प्रत्येकाला याचा अनुभव आहे. पण एकंदर मानवसमाजाचा इतिहासच बदलून टाकणारी एक गोष्ट कित्येक शतकांपूर्वी घडली. ती अशी की, वस्तूंची देवाण-घेवाण ( exchange ) करणे फार गैरसोयीचे व जिकिरीचे आहे, असे माणसाला आढळून आले. धान्याचा केलेला साठा, कित्येक दिवस राखीत बसण्याचे श्रम टाळता येतील का, असा विचार तो करू लागला. तसेच, हे धान्य नेण्याआणण्याचा त्रास वाचेल का, अशी पृच्छा सुरू झाली. मग एके दिवशी पैशाचा - नाण्याचा - शोध माणसाला लागला. या पैशाचा संग्रह वाटेल तितके दिवस कायम ठेवणे इतके सोपे होऊ लागले की, मग धान्यसाठ्याचा नादच माणसाने सोडला. हा संग्रह गुप्त ठेवणे सहज शक्य होते. रक्षणाच्या दृष्टीने ही मोठीच सोय झाली. पण माणूस येथे थांबला नाही. केव्हा तरी पुढील घटना घडली असावी. कोणातरी धनिकाने जवळची पैशाची भली मोठी पुरचुंडी एकदम बाहेर काढून, जमलेल्या सर्वच लोकांना आश्चर्यचकित केले असावे ! त्यांच्या चेहऱ्यावरचा तो भाव, आदर आणि मत्सर यांचे ते मनोहर मिश्रण पाहून त्या धनिकाने ठरवूनच टाकले असेल की, "बस्स्, मी एकदम या सर्वांपेक्षा मोठा झालो आहे ! आता मी कसाही वागलो तर कोण मला आडवणार ?" मला वाटते की, त्या धनिकाच्या आयुष्यात

यामुळे काय झाले हा प्रश्न तितकासा महत्त्वाचा नाही. एकंदर मानवसमाजातच या घटनेमुळे मोठी क्रांती घडली, हे निःसंशय आहे.

हल्ली ज्या अवस्थेत मानवसमाज आहे त्या अवस्थेत व अगदी प्राचीन काळच्या समाजस्थितीत एक मोठे साम्य आहे. ते असे की, सकाळी उठल्यापासून झोपेपर्यन्त जे जे माणसाला लागते त्यातली एकही वस्तू पैशाशिवाय मिळू शकत नाही. "सर्वारंभाः तंडुलाः प्रस्थमूलाः" हे वचन फार प्राचीन आहे. फक्त 'हवा' याला अपवाद आहे, असे विधान करावेसे वाटते; पण त्या विधानातही दोषच आहे. कारण 'हवेशीर जागा' राहायला मिळणे पैशावर अवलंबून आहे. तसेच, बाहेरच्या मोकळ्या हवेत फिरायला जाण्याइतकी सवड मिळणे, हेही पैसा जवळ किती आहे यावरच ठरते. मोठ्या शहरात तर थोडेसे बाहेर जायलाही पैसा लागतो. माडीवरच्या थोडीबहुत स्वच्छ हवा असलेल्या जागेचे भाडे न परवडणारे असते, एकदम जास्त असते. पाण्याचा प्रश्न हवेपेक्षाही अवघड आहे. पाण्याला नेहमीच पैसे पडत नसले तरी, ते नळासारख्या साधनांशिवाय उपलब्ध नसते. मग वरच्यासारखी व्यवस्था ( का अव्यवस्था ? ) पाण्याकरताही समाजाने केलेली आहे. जो श्रीमंत असेल त्याला सांडायलाही भरपूर पाणी मिळते, तर गरिबाला प्यायला पाणी मिळणे दुरापास्त होते. हवापाण्यापेक्षा अन्नाचा प्रश्न जास्तच बिकट आहे. अन्नधान्याचे भाव उत्पादन करणारे शेतकरी ठरवीत नाहीत, तर ते मोठेमोठे धनिक व्यापारी ठरवितात. हे व्यापारी याच देशातले असतात असे नाही. परदेशांतल्या घडामोडींचाही भावांवर परिणाम होतो. याचा अर्थ असा की, जगातल्या इतर देशांची सरकारे व त्याचे सहकारी असणारे व्यापारी ठरवितील त्या भावाने मला माझे अन्न विकत घ्यावे लागते. पुरेसे व चांगले अन्न विकत घेण्याकरिता जरूर तेवढा पैसा गाठी असावा लागतो. म्हणजे अन्नाची भूक भागविण्याकरताही

धनाचा साठा करणे आवश्यक असते. पण, 'मी किती पैसा साठवितो' यावरही फारसे काही अवलंबून नाही. इतर धनिकांना अधिकच श्रीमंत व्हावे असे सारखे वाटत असते. त्यांच्या धनतृष्णेच्या मर्यादेवर बाजारातली महागाई अवलंबून असते. आणखी आश्चर्य असे की, जे आधीच भरपूर श्रीमंत झालेले असतात त्यांच्याच अंगी, बाजारात येणारा माल गोठवून ठेवण्याचे अथवा मर्जीला येईल त्या भावाने तो विक्रीस काढण्याचे सामर्थ्य असते. एकूण सारांश असा की, माझ्या प्राथमिक व कमीत कमी असणाऱ्या गरजा भागणार की नाही हे माझ्या अखत्यारीत नसते. एकप्रकारची अनिश्चित अशी अवस्था या गरजांबद्दलही सामान्य माणसाच्या जीवनात असते. मग, या गरजा उद्या-परवासुद्धा खात्रीने भागतील अशी तजवीज करणे क्रमप्राप्त नाही का, असे वाटू लागते. अशा रीतीने, आजची गरज भागविण्याकरिता कराव्या लागणाऱ्या धनप्राप्तीपासून सबंध आयुष्याकरता तरतूद करण्यापर्यंत मजल जाते.

'आवश्यक तेवढाच पैसा मिळवीन,' असे म्हणणाऱ्या सरळ वृत्तीच्या माणसापुढेही अनेक अडचणी येतात. 'आता जो पैसा मिळत आहे तो पुढे बंद झाला तर?' असा प्रश्न डोकावू लागतो. मग धनसंग्रह करून या शक्यतेबद्दल तजवीज करावी, असे वाटू लागते. शिवाय, एकदम एखादे संकट – मोठ्या आजारासारखे – येऊन ठेपले तर मग करणार काय? धनसंग्रह करण्याच्या कामात माणसे गुंतलेली दिसतात त्यांचेपैकी बरीचशी वरील शंकांनी व्यथित झालेली असतात. या शंका निराधार तरी कशा म्हणाव्या? भोवताली कित्येक उदाहरणे अशी दिसतात की, जो अनाहूत संकटांबद्दल आगाऊ तजवीज करीत नाही तो मूर्खच, असे विधान करण्यास मुळीच हरकत नाही. आपल्या हातात हुकमी पैसा असावा असे म्हणणारे सर्वच लोक 'धनलोभी' म्हणून त्यांची हेटाळणी करता येत नाही. पण जी माणसे सुरुवातीला

अगदी आवश्यक तेवढ्याच वस्तूंचा संग्रह करणारी असतात, तीच काही वेळा चैनीच्या वस्तूंनाही आवश्यक म्हणू लागतात. त्यांच्या गरजांचे ( needs ) हव्यासांत ( greed ) केव्हा रूपांतर होते, हे त्यांचे त्यांनाही कळत नाही. समोर दिसणाऱ्या भविष्यकालाबद्दल अथवा वृद्धावस्थेच्या दिवसांबद्दल सहजगत्या शक्य तेवढी तरतूद करणे, हेही आपण गरजेतच ( need ) धरू. पण कुणीच इथे थांबत नाही.

प्राथमिक गरजा भागविणे म्हणजे तरी काय ? अन्नवस्त्र आणि आसरा एवढ्याच गोष्टी जरी विचारात घेतल्या तरी अगदी खालच्या थरातल्या लोकांचे कदान्न, श्रीमंतांना तर राहोच पण मध्यमवर्गीयांना तरी चालेल काय ? ज्या वातावरणात लहानपण गेले ते अगदीच विसरता येईल काय ? जुन्या सवयी नष्ट करण्याचा आग्रह व त्याकरता करावा लागणारा संघर्ष ( स्वतःशी व इतरांशी ) अगदी जरूरच आहे काय ? धनतृष्णेचा प्रश्न सोडविता सोडविता, दुसऱ्याच एखाद्या तृष्णेच्या आहारी आपण जात नाही ना ? असे अनेक प्रश्न उत्पन्न होतात. हे सर्व प्रश्न ज्याचे त्यानेच सोडविले पाहिजेत. " निग्रह नको " ही, कोणतातरी आग्रह चालू ठेवण्याकरता पुढे केली जाणारी सबब तर नाही ना ? हेही पाहिले पाहिजे.

' पैशाचा लोभ,' ' संपत्तीचा हव्यास ' या शब्दांचा नेमका अर्थ समजून घेतला पाहिजे. हा लोभ, हा हव्यास चित्तात असतो. बाहेर काय दिसते, याला फारसे महत्व नाही. एका अर्थाने हा तारतम्याचा प्रश्न आहे. पण, " लोक काय म्हणतील ? " या प्रश्नाला महत्व दिले की जे उत्तर मिळते ते सत्याला धरून कधीच असत नाही. सर्व-साधारणपणे असे सूत्र सांगता येईल की, ' प्रत्येकाने मला कमीत कमी ( minimum ) काय जरूर आहे ? ' या प्रश्नाचा पिच्छा प्रामाणिक-पणे पुरविला तर त्याचे जे उत्तर मिळेल ते धनलोभातून येणार नाही.

अर्थात् सर्वांची किमान गरज सारखीच असणार नाही. तसेच एका समाजात, किंबहुना एका घरातही, प्रत्येकाचे किमान ( minimum ) निराळे असू शकेल.

आपल्या जीवनातले संपत्तीचे खरे स्थान प्रत्येकाने स्वतःच शोधले पाहिजे. 'सब घोडे बारा टक्के' असा नियम घालून देता येणार नाही. याचा अर्थ असा की, संपत्ती मला राबवीत आहे की मी तिला राबवीत आहे, हे ओळखता आले पाहिजे. 'संपत्तीचा मी गुलाम होत नाही ना?' हे सतत डोळ्यांत तेल घालून पाहत राहिले पाहिजे. धनजी-शेठ व मी पाचसहा वर्षे एकाच वर्गात होतो. विद्यालयातले शिक्षण धनजीला मिळणे अशक्यच झाले असते. पण माझे वडील त्याच्या वडलांचे परममित्र होते व त्यांनी आग्रहच धरला व आर्थिक मदतही केली म्हणून धनजीला त्याच्या वडलांनी शाळेत शिकू दिले. तरी तो मॅट्रिक काही झाला नाही. "लवकर धंद्यात पड" असा त्याच्या बापाचा तगादा पुढेपुढे इतका वाढला की, मॅट्रिकच्या वर्षातच त्याने शाळा सोडली. त्याच वर्षी माझ्या वडलांची बदली गुजरातेत झाली व पुढे मी वकील होताच मुंबईला वकिली सुरू केली. त्यानंतर वीस वर्षात मी एकदाही बंगलोरला आलो नव्हतो; पण तेथे जाण्याचे ठरताच प्रथम मला धनजीची आठवण झाली. शाळेत असताना एकमेकांच्या हातात हात घालून तासचे तास आम्ही बोलत असू. धनजी घरी कधी ठरतच नसे, जेवणापुरता घरी जाई. बाकी सगळा वेळ आमच्याच घरी तो असे. त्याच्या वडलांचे लहानसे दुकान चांगले चालत नसे. दारिद्र्य असले म्हणजे काय यातना असतात, याची कल्पना मला त्याच्या घळाघळा वाहणाऱ्या अश्रूंनीच दिली. इतके 'जीवश्चकंठश्च मित्र' आम्ही होतो की, सगळ्या शाळेत तो एक कुतूहलाचा विषय होता. इतक्या वर्षांनंतर प्रियमित्राची भेट होणार, म्हणून मी तर हरखून गेलो

होतो. धनजीचेही पत्र " एक–दोन दिवस तरी मुक्काम कर, " असे आले. धनजीला आता दिवस फारच चांगले आले होते. बंगलोरचा सर्वांत धनाढ्य व्यापारी म्हणून त्याचा लौकिक होता. चारपाच शहरांत त्याच्या पेढ्या व हरतऱ्हेचे कारखाने होते. बंगलोरचा त्याचा बंगला म्हणजे एक आधुनिक राजवाडाच होता. नोकरचाकर, तीनचार नव्या कोऱ्या ॲम्बॅसडर गाड्या, बंगल्यातले उंची फर्निचर, वातानुकूलित दिवाणखाने, हे सर्व वैभव पाहून मी तर दिपूनच गेलो. शाळेत असताना आम्हां दोघांमध्ये आर्थिक दृष्ट्या जे अंतर होते, तेवढेच अंतर आताही होते. मात्र जागांची उलटापालट झाली होती. कारण माझी वकिली कशीतरी जेमतेम चालत होती. मी धनजीच्या घरी पाय ठेवताच त्याच्या पत्नीने मला विचारले, " तुम्ही एकटेच कसे आला ? गाडी घेऊन तुम्हांला आणायला स्टेशनवर जा, विसरू नका, म्हणून सकाळपासून चारदा मी शेटजींना सांगितले तरी ते विसरलेच का ? " " त्यात काही बिघडले नाही. तुमचा बंगला इतका प्रसिद्ध आहे की, रिक्षावाल्याने सरळ मला आणून सोडले. तुम्ही उगाच मनाला लावून घेऊ नका. " असे मी म्हणालो, " त्यांचे नेहमीचेच आहे हे " असे म्हणून त्यांची पत्नी आत गेली. त्या सबंध दिवसात शेठजींची माझी गाठच पडली नाही. कारण नंतर असे कळले की, स्टेशनवर मला आणण्यास शेठजी घराबाहेर पडले. पण लगेच वाटेत त्यांचा मुनीम त्यांना भेटला व शेठजींना ताबडतोब पंधरा मैलांवरल्या त्यांच्या धंद्याच्या दुसऱ्या गावी जावे, अशी सूचना केली. कारण तेथे एक मंत्री येणार असल्याचे त्याला नुकतेच कळले होते. शेठजींना अनेक प्रकारचे परवाने नवे धंदे काढण्याकरिता पाहिजे होते. त्याबद्दल तगादा करण्याची ही सुवर्णसंधी ते कसे दवडणार ? ते लगेच तिकडे गेले व भेटीची योग्य वेळ येण्याची प्रतीक्षा करीत

दुसरे दिवशीच्या सकाळपर्यंत बसले. येताच ते म्हणाले, " माफ कर बुवा, आम्हां धंदेवाल्या लोकांचे हे असेच होते. मुनीमजीने ती बातमी सांगताच मी मोटार वळविली व मग तू येणार वगैरे सगळे मी विसरलोच. सारखा त्या एकाच नादात होतो. मंत्रीसाहेबांचे पत्र हातात पडल्यावर आज सकाळी तुझी आठवण झाली. बरं, तुझी सगळी व्यवस्था ठीक झाली का ? काही गैरसोय नाही ना झाली ? " नंतर ते लगेच दुकानाला गेले. जेवणाच्या वेळेसच त्यांची माझी गाठ पडली. पानातले पदार्थ फारच उंची व स्वादिष्ट होते. त्यांची पत्नी अगत्याने वाढीत होती. पण हा गृहस्थ मात्र दर पाच मिनिटाला पाटावरून उठून फोनकडे जात असे व " विका ", " खरेदी करा " अशा प्रकारच्या सूचना दिल्ली, बनारस, वगैरे दूर ठिकाणच्या अडत्यांना सारख्या देत होता. त्याचा चेहरा अत्यंत त्रस्त दिसत होता. डोक्यात निरनिराळ्या सौद्यांबद्दलचे अथवा नवे धंदे काढण्याबद्दलचेच विचार. मी त्याचा लहानपणचा जिवलग मित्र फार दिवसांनी भेटत आहे व त्याच्याजवळच जेवायला बसलो आहे, याचा त्याला विसरच पडला होता. त्याने एका शब्दानेही माझी विचारपूस केली नाही. जुन्या आठवणी काढल्या नाहीत, मुलाबाळांचे क्षेम विचारले नाही. काही नाही. मी इतक्या दिवसांनी भेटलो ही घटना त्याच्या दृष्टीने अगदीच क्षुल्लक होती. फक्त चढणारे उतरणारे भाव महत्त्वाचे होते. शेवटी त्याची पत्नी म्हणाली, " काय हा वेडेपणा ! तुमचे मित्र इतक्या दिवसांनी भेटत आहेत आणि तुम्ही त्यांना, " सावकाश होऊ द्या, एवढेसुद्धा म्हणत नाही ? घाला तुमचा धंदा चुलीत ! " धनजी-शेठच्या पत्नीचे हे उद्‌गार मला त्या वेळी जरा कडक वाटले. पण आता मला खरेच असे वाटते की, ज्या संपत्तीची सेवा इतक्या निष्ठेने करावी लागते, ती संपत्ती चुलीत घालण्याच्याच योग्यतेची आहे ! एका ठराविक मर्यादेच्या पलीकडे श्रीमंती येणे, यासारखे दुर्भाग्य नाही. कारण मग

तो मनुष्य असाहाय्य, अगतिक बनतो. तो एक यंत्र बनतो. तो फक्त एकच काम करण्यास लायक असतो. ते काम म्हणजे पैसा वाढविण्याचे. धनोत्पादनाची गिरणी चालू ठेवण्याचे. पती म्हणून, पिता म्हणून अगर मित्र म्हणून त्याचे जीवन संपतेच. तो जगतो ते फक्त धनजीशेठ म्हणून, लक्ष्मीपती म्हणून !

संपत्तीच्या बाबतीत स्वतःचे किमान (minimum) शोधण्याचे महत्व वाचकांच्या लक्षात आता आले असेल. हल्ली जो तो अधिकात अधिक संपत्ती मिळविण्याच्याच मागे आहे व 'आपण आपली कमाल-मर्यादा (maximum) गाठली आहे ना ?' असाच प्रश्न प्रत्येकाच्या डोळ्यांपुढे सतत आहे. मला वाटते की, हा मूल्यविपर्यास (perversion of value) आहे. समाजात या हव्यासाने काय होते, याचा विचार मागील प्रकरणात केला आहे. पण व्यक्तिजीवनात धन-संचयाच्या लोभामुळे अनेक समस्या उत्पन्न होतात. त्यांतल्या एकीने धनजीशेठना त्रस्त केले होते. नव्हे, त्यांचा तिने ग्रासच केला होता ! धनजीशेठचे जीवन म्हणजे पैशाचा पाठलाग, दुसरे काही नाही. पण कित्येकांना संपत्तीची प्राप्ती झाल्यानंतर अनेक व्यसने जडतात. या व्यसनामुळे ते समाजकंटक बनतात. धनप्राप्तीमुळे तृप्ती का होत नाही ? व्यसनांकडे वळावे असे का वाटते ? अगोदर, निर्वाहाला जरूर असलेल्या धनापेक्षा अधिक धन मिळवावे, असेच का वाटावे ? धनाने कोणती पूर्ती (fulfilment) होईल अशी आशा वाटते ? ती होते का होत नाही ? पुन्हा व्यसनांनी आणखी कोणती तृप्ती शोधली जाते ? का नुसत्या अनुकरणाचाच हा प्रताप आहे ? समाजात दुसरी व्यसनी माणसे दिसतात, म्हणूनच का मी व्यसनी बनतो ? काही वेळा असे दिसते की, प्रतिष्ठित माणसांच्या कंपूत प्रवेश मिळण्याचे एक साधन म्हणूनच व्यसनांचा आश्रय केला जातो व हा प्रवेश मिळाला की

' प्रतिष्ठा मिळाल्याचे समाधान ' चेहऱ्यावर दिसू लागते. पण धनप्राप्ती-नंतर व्यसने, नंतर प्रतिष्ठाप्राप्ती, ही सर्व धावपळ माणूस करतोच का? या सर्व खटपटीत महत्त्वाचे काय असते? ज्याला धन मिळते तो स्वतःला धनामुळे श्रेष्ठ समजू लागतो. त्याचा ' मी ' अगोदरच्या अकिंचनावस्थेत कवडी किंमतीचा असतो व धनसंपादनानंतर त्या ' मी ' ला वैभव प्राप्त होते. पण पुढेही धावपळ व असमाधान चालूच का राहावे? संपत्तीमुळे जो माझा ' मी ' समृद्धी होईल अशी अगदी खात्री वाटत होती, तो ' मी ' धनप्राप्तीनंतरही सुकेला, वखवखलेला असाच का राहतो? अत्यंत बुद्धिमान अशी श्रीमंत माणसे व्यसनाकडे वळण्याचा मूर्खपणा का करतात? का व्यसनांचे बीज श्रीमंतीतच आहे? पैसा तिजोरीत आला की त्याच्यातूनच अशी एखादी प्रेरणा निघते काय की, जी व्यसनाकडे माणसाला ढकलीत नेते? संपत्तीचे आपल्या जीवनाशी जे नाते आहे त्यात हे दोनच प्रश्न उत्पन्न होतात. एक संपत्ती मिळाल्यावर बहुतेक माणसे व्यसनी का होतात? दुसरा, ती व्यसनी न झाली तरी असमाधानी व धनजीशेठप्रमाणे यंत्रासारखी अत्यंत क्रियाशील ( active ) पण निर्जीव ( insensitive ) का होतात? बाहेरच्या परिस्थितीवर आपला ताबा असावा, तिने आपणांला चिरडून टाकू नये, या आकांक्षेतून विश्लेषण निर्माण होते. पण हा ताबा पैशामुळे थोडाबहुत मिळाला असे वाटते न वाटते तोच त्यातून असमाधान का जन्माला यावे? कृष्णमूर्ती म्हणतात :

And how is this continual compulsion created, which has become the instrument, this penetrating instrument of fear? Memory clouds the mind and this, I have said over and over again, is the result of the lack of understanding of the environment which creates conflict, and memory becomes self-consciousness. This mind, clouded over, limited and

confined by memory seeks perpetuation of the result of environment which is the " I "; so, in perpetuating the ' I ' mind seeks the adjustment, alteration or modification of environment, its growth and expansion. You know, mind is eontinually seeking adjustment to the environment, but adjustment to the environment does not bring about understanding,nor can we see the significance of that environment by merely modifying the state of mind or trying to change or expand that environment.... So long as mind, which is intelligence is held in the bondage of memory, which is the ' I ' consciousness there is the search of the false for the false. This I, as I explained, is the false reaction to environment; there is a false cause and it is ever seeking a false solution, a false effect, a false result.... In thls perpetuation of the 1 that self-preserving memory, in the perpetuation of tbat I is born fear, not superficial fear, but the fundamental fear. Remove that fear which has its outward expression, nationality, growth, achievement, success– remove that fundamental fear, the anxiety for the perpetuation of that ' I ', and all fears cease. So fear exists as long as there is this desire for the perpetuation of that thing which is false, this I is false, therefore, you must have a false reaction which is fear itself .... So in these restraints of the outer environment which create conflict between the individual and the outer environment in which the individual is crushed, warped,twisted, he becomes increasingly unintelligent.

( Chetana, 1972, May, p. 43, 44, 45 ).

आपल्या वरील सर्व शंकांचे निरसन कृष्णमूर्ती पुढीलप्रमाणे करतात :– " अगोदर एक गोष्ट लक्षात घेतली पाहिजे. ती ही की, संपत्तीचा संचय करावा अशी जी इच्छा माणसाला होते, तिचा उगम भीतीत आहे. माणसाच्या हृदयाचाच ताबा जिने घेतला आहे व जी जीवनाला सर्व बाजूंनी वेढून टाकते अशी एक मूलभूत भीती (fundamental fear) माणसामध्ये आहे. ही भीती माणसावर सारखे दडपण आणीत असते. भोवतालच्या परिस्थितीचे सम्यग्ज्ञान – खरे व निश्चित असे ज्ञान – झाले नाही की स्मृती आपले मन झाकाळून टाकते. मग या परिस्थितीशी आपला संघर्ष सुरू होतो. हा संघर्ष सुरू झाला की त्या स्मृतीचेच रूपांतर ' मी ' मध्ये होते. मग असे होते की, त्या ' मी ' चे सातत्य टिकून राहावे याकरिता सर्व प्रकारची खटपट मन करू लागते. भोवतालच्या परिस्थितीशी जमवून घ्यावे, तिच्यात बदल करावा, अथवा तिच्यात सुधारणा करावी, याकरिता जे जे काही मन करू पाहते, ते सर्व या खटपटीचाच भाग असतो. आपले वैभव सारखे वाढत राहावे असे जे वाटत असते, ते यामुळेच. एक गोष्ट मात्र लक्षात ठेवली पाहिजे. ती ही की, परिस्थितीशी नुसते जुळते घेत राहिल्याने अथवा तिच्यात सुधारणा करून अगर तिचा विस्तार वाढवून तिचे खरे ज्ञान मुळीच होऊ शकत नाही. जोपर्यंत मन हे स्मृतीचे गुलाम आहे, ते ' मी ' च्या भावनेत रुतलेले आहे, तोपर्यंत एक असत्य दुसऱ्या असत्याचाच शोध करीत राहते. परिस्थिती न समजल्यामुळे, तिच्यातून होणारी खोटी प्रतिक्रिया म्हणजेच ' मी 'ची उत्पत्ती होय. वर सांगितलेल्या मूलभूत भीतीचे निर्दालन केले की जीवनातली इतर सर्व भयस्थाने नष्ट होतात. आपली प्रगती व्हावी, जीवनात कोणते तरी भव्य असे यश प्राप्त करून घ्यावे, या सर्व वासना या भीतीतूनच जन्म पावतात. आणखी असे होते की, बाहेरची परिस्थिती – मग ती श्रीमंतीची, ऐश्वर्याची का असेना– आणि

वर सांगितलेला ' मी ' यांचेमध्ये संघर्ष उत्पन्न झाला की मन चुरगाळले जाते, ते विकृत होते, त्याची प्रकृती दूषित होते. मग तो माणूस वरचे-वर अधिकच मूढ (unintelligent) बनत जातो. "

काय गंमत आहे पाहा ! माणूस, अन्नवस्त्र आणि आसरा यांसारख्या मूलभूत गरजा भागाव्यात म्हणून पैसा मिळवू लागतो. मग हळूहळू तो श्रीमंत होतो; अथवा देवाने हात दिला तर एकदम श्रीमंत होतो. मग दोन्हीपैकी एक गोष्ट होते. तो संपत्तिसंपादनाच्या खटपटीत एवढा अडकला जातो की, मानवी जीवन त्याला पारखे होते. घरातल्या माणसांशी अथवा इतर व्यक्तींशी त्याचा माणूस म्हणून संबंधच राहात नाही. तो एक यंत्र बनतो. हे असे झाले नाही तर तो व्यसनांचा अथवा सुखोपभोगांचा गुलाम होतो. महत्त्वाची गोष्ट ही आहे की, या दोन्हीं-पैकी काहीही घडले तरी अत्यंत असमाधान अथवा कमालीची अस्वस्थता ( restlessness ) त्या श्रीमंत माणसाला सारखी जाळीत राहते. सगळ्याच श्रीमंतांचे हे असे होते, हे दिसत असताना सुद्धा आम्ही सर्व श्रीमंत होण्याच्याच मागे का, हा एक कूटप्रश्न आहे.

श्रीमंतीचे हे दुष्परिणाम काही थोडी बुद्धिमान माणसे ताबडतोब ओळखतात. मग ते करतात काय? धनसंग्रहाकडेच नव्हे, तर धनसंपादनाकडेही ते संपूर्ण पाठ फिरवितात. ' निर्वाहाला आवश्यक तेवढा पैसा पाहिजे, ' हे सूत्र किती फसवे आहे, हेही त्यांच्या लक्षात आलेले असते. मग ते अकिंचनच बनतात. सर्वसंगपरित्याग करतात. ' संग ' याचा अर्थ ' चित्तातली आसक्ती ' असा आहे हे नीट ध्यानात न आल्यामुळे, " पैशाचे तोंड पाहायचे नाही " अशी प्रतिज्ञा ते करतात. स्वखुषीने पत्करलेले हे दारिद्र्य परमार्थसाधनाला उपकारक आहे, असे काहीजण मानतात. पण ' लक्ष्मीचे प्रताप ' पाहून आलेला हा उबग असतो, ती एक प्रतिक्रिया ( reaction ) असते.

प्रतिक्रियेतून खरे ज्ञान होत नाही, हे आपल्या लक्षातच येत नाही. एकदम "पैसा वाईट," असे आपण ठोकून देतो. 'पैसा केव्हा व का वाईट ?' हे संशोधन आपण कधी करीतच नाही. हे संशोधन न केल्यामुळे कित्येकजण स्वतः पैसा मिळवीत नाहीत, अथवा असलेला पैसाही टाकून देतात म्हणजे दान करतात; व लोकांच्या दयेवर अथवा धर्मबुद्धीवर जगतात. सुज्ञ वाचकांच्या सहज लक्षात येईल की, धनजी-शेठचे लक्ष जसे सदैव धनप्राप्तीचे नवे मार्ग शोधून काढण्यात गुंतलेले असते, जवळ जवळ तशीच अवस्था दरिद्री माणसाची असते. लोकांच्या दानबुद्धीवर अवलंबून असणारा 'संन्यासी' जरा वरच्या कोटीत असतो, एवढेच. पण प्रकार तोच. भिक्षा अनिश्चित असल्यामुळे तिची विवंचना सारखी करावी लागते.

पण स्वखुषीने पत्करलेल्या दारिद्र्याची समस्या सामान्यांच्या जीवनात नाही. "दारिद्र्य मरण यांतुनि मरण बरें बा दरिद्रता खोटी," हे उद्गार काढण्याची पाळी कितीतरी निर्धन चारुदत्तावर येते. "गरिबीची ही भयानक समस्या कशी सोडवावी ?" हा प्रश्न कित्येक शतकांपासून विचारवंतांपुढे आहे. या समस्येमुळेच अनेक राज्यक्रांत्या झाल्या, रक्ताचे पाट वाहिले. पण गरिबी हटवण्याचा प्रश्न वरचेवर अधिकच अवघड होत आहे.

एकदम लक्षात येते की, थोड्या श्रीमंतांकडे वाजवीपेक्षा अधिक पैसा साठल्यामुळे असंख्य गरिबांना दारिद्र्य भोगावे लागते. पण रोगाचे नाव कळले की अचूक उपाययोजनेची हमी मिळते असे थोडेच आहे ? तथापि एवढे खास की, श्रीमंतांनी बहुसंख्यांच्या हिताकरिता नसले तरी स्वहिताकरिता संपत्तीचा व आपला खरा संबंध ( relationship ) कोणता व खोटा कोणता, हे पाहिले पाहिजे. पुष्कळदा असे होते की, भ्रमातूनच एखादे नाते निर्माण होते व तेच खरे धरून चालल्यामुळे अडचणी वाढत जातात, कमी होत नाहीत.

आपल्या जीवनातली संपत्तीची अपरिहार्यता म्हणजे गरज ( need ) कोठे संपते व हाव (greed) कोठे सुरू होते, हे प्रत्येकाने पाहिले पाहिजे. एकाची क्षेत्रमर्यादा दुसऱ्याच्या जीवनाला लागू पडेलच अशी खात्री नाही. पण म्हणून मला जे हवेसे वाटते ते माझ्या जीवनाला अगदी जरूरच आहे, अशी स्वतःची फसवणूक करून घेणेही वेडेपणाचे आहे. या आत्मसंशोधनाच्या कामात कृष्णमूर्तींचे वरील मार्गदर्शन नक्कीच उपयोगी पडेल.

कृष्णमूर्ती सांगतात ती 'हृदयातली भीती' नाहीशी करता येईल का ? या भीतीतून जे जे मी करतो ते ते सर्व माझ्या अंगाशी येते. "माझा 'मी' कायम राहील का ?" असे स्वरूप या भीतीचे काही वेळा असते. तर काही वेळा हा 'मी' अधिक मोठा, खूप मोठा व्हावा, असे मला वाटते. "'मी'ला हे वैभव प्राप्त करून देण्यात मी यशस्वी होईन ना ? का मला अपयश येईल ?" असे स्वरूप या भीतीचे असते. पण ज्याच्या रक्षणाकरिता अथवा संवर्धनाकरिता मी एवढा हैराण होतो, तो 'मी'च मुळी परिस्थितीच्या अज्ञानामुळे उत्पन्न होतो, हा एक चमत्कार आहे ! कृष्णमूर्ती परिस्थितीचे अज्ञान ( Lack of understanding of the environment ) कशाला म्हणतात हे समजून घेणे जरूर आहे. त्यांच्या मताने कोणत्याही घटनेची, वस्तूची अथवा व्यक्तीची स्मृती मनात रेंगाळत राहणे म्हणजेच अज्ञान होय. मग ती घटना, वस्तू अगर व्यक्ती प्रिय असो अगर अप्रिय असो. बस्स, कृष्णमूर्तींना म्हणावयाचे आहे ते एवढेच आहे. एकदा का हे स्मृतिरूपी अज्ञान जन्माला आले की पुढे दोन क्रिया होतात. पहिली क्रिया अशी की, या अर्धवट ज्ञानातून म्हणजे अज्ञानातून अथवा स्मृतीतून 'मी' नामाचा पदार्थ पुढे येतो. पण तो स्वस्थ बसत नाही.

स्वतः कायम कसे राहावे व जमल्यास वृद्धिंगत कसे व्हावे, याकरिता फार जोराची खटपट तो करू लागतो. ही दुसरी क्रिया होय. आत्म-संवर्धनाकरिता तो, त्याला जन्म देणाऱ्या स्मृतींची अथवा इतर स्मृतींची मदत घेतो. यामुळे होते असे की, मनात स्मृतींचाच बुजबुजाट होतो. मनाच्या ठिकाणी त्याच्या अंगचीच अशी जी प्रज्ञा ( intelligence ) असते ती मलिन होते. मरगळते. या अशा मनाचा जो एकंदर उद्योग चालतो, तोच आपले हल्लीचे जीवन होय.

स्मृती या स्वप्नासारख्या असत्य आहेत हे तर अगदी उघड आहे. या खोट्या स्मृतींच्या खाणीत जन्म घेणारा 'मी' खरा कसा असेल ? ( पण हा हिरा खराच आहे, असा भास आपणांला होतो.) हा आभासमय 'मी' नुसता मोकळा ( left to itself ) राहिला असता तर तो आपोआपच मावळला असता. पण त्याला मावळू देतो कोण ? तो पाय रोवून घट्ट राहावा याकरिता अनेक प्रयास केले जातात. या प्रयासांपैकीच एक प्रकार धनसंचयाचा आहे. पैसा, घरदार, ऐश्वर्य व त्यामुळे मिळणारा लौकिक यांचा आधार या 'मी'ला पुन्हा पुन्हा देऊन सारखा पडणारा हा 'मी' सावरता येतो का, हेच माणूस जन्मभर पाहत असतो. 'तो पडेल,' असे त्याला क्षणाक्षणाला वाटते. यामुळेच तो सारखा भीत असतो. भीती उत्पन्न झाली की, अधिक धनसंचय किंवा दुसरे काहीतरी करून भीती बुजविण्याचा प्रयत्न केला जातो. श्रीमंतांना जी सतत अस्वस्थता वाटत असते, ती या भीतीमुळेच यात संशय नाही. जे श्रीमंत आपली अस्वस्थता, समाजाला मान्य अशा उद्योगांनी झाकू शकत नाहीत, ते व्यसनांकडे वळतात.

सारासार विचार करून आपल्या 'किमान गरजा' नीट ओळखता आल्या की पुढचे काम सोपे आहे. मग पुढील प्रश्न स्वतःला प्रत्येकाने विचारीत राहिले पाहिजे. माझ्याजवळ जी संपत्ती आहे

तिच्या योगाने मी मोठा झालो आहे अशी भावना माझ्या हृदयात आहे का ? मला कसलीतरी भीती वाटते का ? या भीतीला झाकण्याकरिता तर मी धनसंचयाच्या मागे नाही ना ? समजा, माझी सर्व संपत्ती उद्या विलयास गेली तर माझ्या जीवनात काहीच अर्थ उरला नाही असे मला वाटेल का ? माझ्या जीवनाचे जर मोजमाप केले ( हा शब्द-प्रयोग बरोबर नाही ) तर त्यात माझ्या संपत्तीखेरीज इतर काही येईल की नाही ? नुसत्या जगण्याचाच आनंद कधी माझ्या अनुभवास येतो का, का प्रत्येक वेळी माझ्या श्रीमंतीची जाणीव मला सुख देते ? जेव्हा कोणी मला भेटायला येते तेव्हा ती व्यक्ती माझ्यापेक्षा कमी श्रीमंत आहे अगर जास्त श्रीमंत आहे, हाच विचार प्रथम माझ्या डोक्यात येतो का ? माझे नंतरचे त्या व्यक्तीशी होणारे वर्तन त्या विचाराने कलुषित झालेले असते का ? " आणखीही अनेक प्रश्न सुचविता येतील पण मुख्य मुद्दा लक्षात येण्यास हे प्रश्न पुरेसे आहेत.

" श्रीमंतीने ज्यांच्या जीवनात प्रवेश केला आहे असे लोक इतके थोडे असतात की, त्यांच्या समस्येचा इतका विस्तृत विचार कशाला ? " असा प्रश्न काही वाचक विचारतील. पण श्रीमंती जवळ नसली तरी श्रीमंतीचा पाठलाग आपण सर्वच करीत आहोत. हा पाठलाग का व किती करावा हे समजण्याकरिता श्रीमंतांना मिळते तरी काय, हे पाहणे जरूरच होते. दुरून चकाकल्यामुळेच जे सोने वाटते त्याच्या-मागे इतक्या धापा टाकीत धावण्याच्या अगोदर ' जरा थांबा व नीट पाहा ' अशी सूचना देणे वावगे नाही. गरिबी हटविण्याच्या दृष्टीने सुद्धा ज्यांच्याजवळ संपत्ती आहे त्यांना तिची खरी किंमत कळली तर फायदाच होण्याचा संभव आहे. " हातातली संपत्ती सोडणारच नाही, तो आमचा हक्कच आहे, " असा दुराग्रह जेव्हा श्रीमंतांकडून चालविला जातो तेव्हा त्याच्यामागे अज्ञान असते. " संपत्ती नसली

तर जीवनात सुख कोठले राहणार ? मग आमचे जीवन शुष्क नाही का होणार ? " अशी पृच्छा प्रत्येक श्रीमंताचे मन आतून करीत असते. म्हणूनच श्रीमंतांचा भ्रमनिरास होणे हे गरिबांच्याही हिताचे आहे. " पण येवढ्याने जगातली गरिबी ताबडतोब हटेल का ? " असा प्रश्न गरिबीने त्रस्त झालेले वाचक विचारतील. पण आहे ही परिस्थिती नीट समजून घेण्यानेच, निदात व्यक्तिजीवनातल्या समस्या सुटण्याच्या मार्गाला लागतात. ' जगाची सुधारणा कशी होईल व केव्हा होईल ? ' ही विवंचना पुष्कळदा पलायनाचाच ( escape ) एक प्रकार असतो.

' संपत्तीशी असणारे आपले नाते समजून घ्यावे, ' असे कोणत्या सुविद्य वाचकाला वाटणार नाही ? पण हे नाते दुसऱ्याकडून कितपत समजेल याबद्दल मला शंकाच आहे. मी माझ्याजवळ असलेल्या संपत्तीला जीवनाच्या कोणत्या दालनात बसवितो हे इतरांना कसे समजणार ? म्हणून हे संशोधन ज्याचे त्यानेच करावयाचे आहे. पण एक गोष्ट मात्र नक्की. ती ही की, संपत्तीबद्दल जे काय आपणांला वाटत असते, ते फक्त तुलनेमुळे. ही तुलना श्रीमंत, मध्यमवर्गीय, गरीब, अकिंचन सर्वच करीत असतात. जे काय धन मजजवळ आहे त्याची तुलना इतरांजवळच्या धनाशी केलीच नाही तर काय होईल ? मग ' धनवान् ' म्हणून वाटणारा अभिमान जसा अनुभवता येणार नाही, तशीच ' माझी श्रीमंती फारच कमी आहे ' ही व्यथाही जाणवणार नाही. पण वरील अभिमानात एकप्रकारचे सुख आहे ते सोडवत नाही. या सुखाच्या मागे जावयाचेच असले, तर जास्त श्रीमंत माणसांशी तुलना होताच होणारे दुःखही सोसले पाहिजे. पण माणसाला दुःख नको वाटते. मध्यमवर्गीय व गरीब लोकांच्या जीवनात तुलनेचा उपद्रव श्रीमंतांच्यापेक्षा अधिक असतो, असे मला वाटते. कारण त्यांची आर्थिक

परिस्थिती रोज त्यांना बोचत असते. दैनंदिन जीवनात होणारे क्लेश तुलनेकडेच मनाला पिटाळतात. तेथेही प्रश्न किमान गरजांचा (minimum) उत्पन्न होतो. पण या गरजा भागविण्याचा उद्योग निराळा आणि तुलनेने होणारा मनस्ताप निराळा. हा मनस्ताप वाटेल तितका वाढविता येतो व 'परिस्थतीच तापदायक आहे,' असे समर्थन कोणालाही कोणत्याही परिस्थितीतल्या माणसाला करता येते. काही वेळा तर असे दिसते की, दरिद्री माणसे थेट मार्क्सवाद्यांची भाषा वापरतात. जीवनात अर्थप्राप्ती-खेरीज दुसरे काही मूल्यच नाही, असा त्यांचा दृष्टिकोण झालेला असतो. धनजीशेठ ज्याप्रमाणे संपत्तीच्या कोशातच जगत होते, त्याप्रमाणे बरेचसे मध्यमवर्गीय व गरीब लोक जवळ नसलेल्या संपत्तीच्या विचारातच सदैव गुंतलेले असतात. खरे जीवन जे रोजच्या रोज ते जगत असतात ते त्यांच्या मनाला स्पर्शच करीत नाही. त्यांनाही भीतीने ग्रासलेले असते. श्रीमंतांना "आहे हे जाणार नाही ना ? अशी भीती असते, तर गरिबांना "उद्या कसे होईल ?" हे भय असते. पण कोणतेही भय परिस्थितीच्या अज्ञानामुळे कसे उत्पन्न होते, हे कृष्णमूर्तींनी वर सांगितलेच आहे. 'भ्यालेला मी', 'काळजीने त्रासलेला मी' हा सुद्धा खोटाच असतो. तो क्षम्य, समर्थनीय असे मानता येणार नाही, अर्थात श्रीमंतांच्या मापाने गरिबांना मोजता येणार नाही. कारण श्रीमंतांचा 'मी' समाजात अनेक उत्पात घडवून आणतो. त्यांच्या 'मी' ने समाजातल्या सर्व गरिबांशी युद्धच पुकारलेले असते. गरीब लोक हे या 'मी' चे खाद्य असतात. सत्ता ही श्रीमंतांच्याच हातात असते; तिचा उपयोग करून ते आपली श्रीमंती व अहंभावनाही सारखी वाढवीत असतात. इतके करून आतून ते भयग्रस्तच असतात. स्वतःला मनःशांती मिळत नसतानाही श्रीमंत जेव्हा केवळ स्वार्थामुळे असंख्य लोकांचे अन्नही हिरावून घेतात तेव्हा त्यांना काय म्हणावे हेच समजत

नाही. पण यामुळे ज्यांना चीड येणे अगदी संभवनीय आहे, अशा गरिबांनी जीवनाचे खरे दर्शन घेऊ नये, या म्हणण्यात तरी काय अर्थ आहे ? कृष्णमूर्तींच्या वरील उताऱ्यात शेवटच्या वाक्यात दिलेला इशारा मला तर गरिबांनाच अधिक उपयोगी वाटतो. गरिबांनी हे लक्षात घेतले पाहिजे की, परिस्थितीशी संघर्ष, – जो तुलनेच्या मदतीने केला जातो – बुद्धीत मालिन्य व अनेक विकृती आणल्याखेरीज राहात नाही. मूढता ही कोणालाच परवडण्यासारखी नाही.

भविष्यकाळाबद्दल सारखी विवंचना करीत बसल्यामुळे एक गुन्हा श्रीमंत व गरीब या दोघांच्याही हातून घडतो. तो हा की, जीवन हे अत्यंत विशाल आहे व सारखे बदलत आहे हे सत्य दृष्टीआड केले जाते. जीवन सारखे बदलत आहे, अशी संवेदना जर गरिबांनीही अनुभविली तर दारिद्र्याचे क्लेश – निदान जे मनातून येतात ते तरी – कमी होतील व आर्थिक दृष्टीनेही योग्य व अचूक निर्णय करण्याचे सामर्थ्य बुद्धीत येईल.

□ □ □

अनुक्रम 80052
2295



७

# मी व माझा व्यवसाय

व्यवसायाबद्दल कृष्णामूर्ती काय म्हणतात हे प्रथमच आपण पाहू.

To live fully and creatively there must be self-knowledge; and to know, there must be candour and humility, love and thought freed from fear. Virtue lies in the freedom from craving and craving brings multiplicity and repetition and makes life complex, tormenting and sorrowful. A simple life, as I explained, does not merely consist in the possession of a few things, but in right lovelihood and in the freedom from distractions, addictions and possessiveness. Freedom from acquisitiveness will create the means of right livelihood but there are certain obvious wrong means. Greed, tradiiton and the desire for power will bring about the wrong means of livelihood. Even in these times, when everybody is harnessed to a particular kind of work, it is possible to find right occupation. Eacfi one must become aware of the issues of wrong occupation with its disasters and miseries, weary

routine and death dealing ways. Is it not necessary for each one to know for himself what is the right means of livelihood ? If we are avaricious, envious, seeking power, then our means of livelihood will correspond to our inward demands and so produce a world of competition, ruthlessness oppression, ultimately ending in war.

( Talks at Ojai, 1944, p. 69 ).

याचे मराठीत रूपान्तर पुढीलप्रमाणे आहे :

" माणसाचे जीवन समृद्ध व नावीन्याने भरलेले असे व्हावे, असे वाटत असेल तर त्याने आत्मज्ञान प्राप्त करून घेतले पाहिजे. हे ज्ञान होणे केव्हा शक्य आहे ? मनुष्याच्या अंगी प्रामाणिकपणा, नम्रता, प्रेम व भीतीचा स्पर्श जिला अजिबात झालेला नाही अशी विचारशक्ती असली तरच आत्मज्ञान होईल. पण याकरिता साध्या राहणीची गरज आहे. साधी राहणी म्हणजे नुसता अपरिग्रह नव्हे. जो व्यवसाय आपण करतो तो योग्य असणे जरूर आहे. मन नाना प्रकारच्या विक्षेपांपासून, सवयीपासून व अभिलाषापासून मुक्त राहत आहे ना, हे सतत पाहिले पाहिजे. ज्या माणसाला हव्यास नाही तो अयोग्य व्यवसायाकडे वळणारच नाही. पण काही व्यवसाय प्रथमदर्शनीच त्याज्य असे असतात. मनुष्याच्या ठिकाणी पैशाचा लोभ अथवा सत्तेचा हव्यास असला किंवा तो परंपरेचा गुलाम असला तर अनिष्ट अशा धंद्याचीच तो निवड करणार, हे उघड आहे. या कठीण दिवसांतसुद्धा योग्य अशा धंद्याची निवड करणे अशक्य नाही. पण याकरिता अनिष्ट व्यवसाय जीवनात विषनिर्मिती कशी करतो, याची तीव्र जाणीव झाली पाहिजे. चुकीचा व्यवसाय निवडल्याने दुःखनिर्मिती कशी होते, घाण्याच्या बैलासारखे कंटाळवाणे जीवन कसे जगावे लागते, किंवा जीवन हिंसामय कसे होते, हे समजले पाहिजे. प्रत्येकाने योग्य व्यवसाय कोणता हे पाहणे जरूर

नाही का? एक गोष्ट लक्षात घेतली पाहिजे. ती ही की, आपल्या मनातच संपत्तीचे प्रेम असले, चित्त मत्सराने जळत असले अथवा त्याला सत्तेचे आकर्षण असले तर जो व्यवसाय आपण निवडू तो आतल्या मागणीला अनुसरूनच असणार. मग यातून चढाओढ, निष्ठुरता, जुलूम आणि शेवटी युद्धपिपासा यांनी भरलेले जग निर्माण झाले, तर त्यात आश्चर्य कसले?"

प्रत्येक प्रौढ माणसाचा दिवसाचा बराचसा भाग, जो व्यवसाय त्याने पत्करला असेल त्याचे काम करण्यात जातो. बेकारीत अथवा वृद्धावस्थेत दिवस कंठणारी माणसे व्यवसायमग्न नसतात, हे खरे. पण त्यांच्या जीवनावरही, ते शोधीत असलेला व्यवसाय अथवा ज्यातून ते निवृत्त झाले तो व्यवसाय, परिणाम करीतच असतो. व्यवसाय माणसाच्या जीवनावर किती खोल परिणाम करतो हे लक्षात आले की, मला एका गोष्टीचे आश्चर्य वाटते. ती गोष्ट अशी की, व्यवसाय कोणता असावा या प्रश्नाचा सर्वांगीण असा विचार फारसा झालेलाच नाही. अर्थार्जनाला सर्वांत जास्त उपयोगी व्यवसाय कोणता, या एकाच दृष्टीने बहुतेकजण आपला व्यवसाय ठरवितात. आधी व्यवसायाची अर्थोत्पादक शक्ती पाहिली जाते व मग तो आवडतो की नाही हे जमल्यास लक्षात घेतले पाहिजे.

सर्व लोकशाही देशांच्या घटनेच्या कागदावर 'व्यवसाय-स्वातंत्र्य' प्रत्येकाला आहे, असे लिहिलेले असते. सरकारही शांततेच्या काळात व्यवसायाबद्दल सक्ती करीत नाही. पण कोणत्याच देशात अजून असे आढळत नाही की, माणसाला हवा तो व्यवसाय सहजगत्या त्याला मिळत आहे. समाजरचना इतकी गुंतागुंतीची असते की, अगोदर कोणताच व्यवसाय चटकन हातात येत नाही. मग आवडीचा प्रश्न दूरच राहिला. 'जो व्यवसाय मिळाला तोच मला आवडतो,' असे

मग माणसे म्हणू लागतात. आपल्या आवडीलाच ते मुरड घालतात; नव्हे, हृदयात असलेली आवड दाबून टाकतात व फक्त यंत्रासारखे राबूं लागतात.

व्यवसाय कोणता करावा या बाबतीत इतकी परतंत्रता असल्यामुळे या विषयाचा विचार फक्त दोन प्रकारांनी करता येईल. अप्रिय व्यवसाय करावा लागत असताना त्याचा जो आसर चित्तावर पडतो, त्यातून ते मोकळे कसे करावे हा एक विचार. दुसरा विचार असा की, ज्या थोड्या व्यक्तींना हवा तो व्यवसाय करता येणे शक्य आहे, त्यांनी व्यवसायाची निवड करताना कोणती सावधगिरी बाळगणे जरूर आहे, याबद्दलचा विचार. समाजातल्या सर्वच व्यक्तींना कायद्याप्रमाणे नव्हे, तर प्रत्यक्षात व्यवसाय-स्वातंत्र्य कसे मिळेल हा विषय मुद्दाम आपण बाजूला ठेवीत आहोत.

व्यवसायाचा परिणाम शरीरावर झालेला आपणांला सहज दिसू शकतो. पांढरपेशा व्यवसायात असणारी माणसे शरीराने दुर्बल पण कमी राकट दिसू लागतात. शारिरिक आरोग्य हे महत्त्वाचे आहे, हे कोणीच नाकारीत नाही. पण मनाचाच विचार आपण प्रामुख्याने करू. सरकारी नोकरीत मोठ्या हुद्यावर असणारा माणूस घ्या. जिल्ह्याच्या ठिकाणी पहिल्या प्रतीचा जो अंमलदार असतो त्याची दिनचर्या तुम्ही कधी जवळून पाहिली आहे काय ? तो सकाळी उठतो तोच मुळी मोठा अधिकारी म्हणून. उठल्याबरोबर त्याच्या दर्जाचे लोक ज्या तऱ्हेचा पोषाख करतात, तो न करता एक तरी सकाळ तो घालवू शकेल काय ? पण या बाह्य कृतींना फारसे महत्त्व नाही. त्याच्याकडे जे लोक भेटण्याकरिता येतात, त्यांच्याशी तो कसा रुबाबात अथवा कुर्ऱ्यात बोलतो, हे तुम्ही कधी पाहिले आहे काय ? लोकांच्या जीवनात महत्त्वाची उलथापालथ घडविणारे निर्णय मी कसा लीलेने एका मिनि-

टात घेऊ शकतो ते पाहा, असेच नाही का त्याची मुद्रा तुम्हांला सांगत ? यात जो अहंभाव डोकावतो तो तुमच्या नजरेला येत नाही का ? पण वरिष्ठ अंमलदाराची खरी परीक्षा त्याच्या कनिष्ठांशी, विशेषतः अगदी खालच्या पायरीवरच्या कनिष्ठांशी बोलताना होते. त्या कनिष्ठाने बायकोच्या आजारीपणामुळे रजा मागितली तर तो वरिष्ठ कसा बोलतो माहीत आहे ? "इथे आम्ही काय करावे ? तुम्ही एखादी नर्स ठेवा" हे उद्गार फार सौम्य आहेत. काही वेळा नको ते शब्द ऐकू येतात. सबंध दिवसभर घरी अथवा ऑफिसात तो जे जे बोलतो, करतो अथवा सांगतो, त्यांतून 'मी कलेक्टर आहे,' असा ध्वनी सारखा निघत असतो. एकप्रकारचे कवच पांघरूनच तो वावरत असतो. हे कवच कर्णाच्या कवचाप्रमाणे त्याच्या मानसशरीराशी अगदी एकजीव झालेले असते. ही प्रतिमा व्यवसायामुळे उत्पन्न होते. या प्रतिमेतच माणूस जगू लागतो. मग होते काय ? पती म्हणून, पिता म्हणून त्याची जी सुखदुःखे असतात त्यांना एक विशिष्ट रंग चढतो. नुसता त्याचा मुलगा आजारी नसतो, तर कलेक्टरचा मुलगा आजारी असतो ! हे आजारीपण इतरांच्या आजारीपणापेक्षा निराळे आहे असा भास त्याला व त्यांच्या कुटुंबियांना सारखा होत असतो. आत तोही माणूसच असतो. काही वेळा त्याची ही माणुसकी बाहेर डोकावते. पण लगेच स्वतःला सावरून ती झाकण्याचा प्रयत्न केला जातो. नोकरीच्या व्यवसायाचा एक परिणाम तर जीवनावर कायमचाच ठसा उमटवतो. बढती ( promotion ) हेच प्रत्येक नोकराचे जीवनाचे ध्येय बनते. पुढची जागा मी केव्हा मिळवीन अशी तळमळ त्याला रात्रंदिवस वाटत असते. त्याकरिता काय युक्त्या योजाव्यात याचेच चिंतन अहर्निश चाललेले असते. माझ्या ओळखीच्या एका बड्या ऑफिसरवर वयाच्या पन्नासाव्या वर्षी आलेला हा प्रसंग पाहा. आता आपण खात्याचा प्रमुख बनणार, ही एकच गोष्ट रोज तो मला

महिनाभर सांगत होता. दोनदोन तास आम्ही बोलत असू. पण गप्पांचा विषय इतर कोणताही असला तरी पाचदहा मिनिटांत, बोलण्याची गाडी तो प्रमोशनकडेच वळवीत असे. " मी रात्रंदिवस कसा राबतो, किती कष्ट केले, माझी हुशारी वरिष्ठांच्या नजरेला वेळोवेळी कशी आली, " या सर्व हकीकतींचा इतका बारीकसारीक तपशील मला ऐकावा लागे की बोलता सोय नाही. आणि मग एके दिवशी असे कळले की तो एकाएकी फार आजारी पडला आहे. मी त्याला भेटायला गेलो तेव्हा तो ढसढसा रडला. मला वाटले की कसली तरी भलतीच आपत्ती ओढवली असावी. पण झाले होते एवढेच की, दृष्टिपथात आलेले प्रमोशन दूर पळाले होते, त्याच्या खालच्या ऑफिसरची वर्णी लागली होती. निराशेने त्याचा चेहरा काळवंडला होता. " जगण्यात आता काही अर्थ उरला नाही," असे अगदी कळवळून तो सांगत होता. तसे म्हटले तर आताही त्याचा पगार चांगला होता. आर्थिक अडचण अजिबात नव्हती. पण ध्येय भंगले होते व म्हणूनच तो सारखा खंगत चालला होता. पुढे त्याचा अकाली अंत झाला.

नोकरवर्गातल्या कितीतरी लोकांचे हे प्रातिनिधिक चित्र आहे. प्रगतिगंड अथवा ( hierarchieal attitude ) असे या वृत्तीला नाव देता येईल. " माझी पुढच्या जागेकडे वाटचाल होत आहे ना ? " या एकाच निकषावर सारे जीवन सतत तपासले जाते. आत्मगौरवाची सवय या लोकांना इतकी लागते की काही वेळा घृणा येते. अंगात नसलेले गुण अथवा थोडया प्रमाणात असलेले गुण इतके वाढवून सांगितले जातात की, उघड दिसणारी अतिशयोक्तीही त्यांच्या लक्षात येत नाही. यातच मग मत्सर, हेवेदावे, द्वेष यांची निर्मिती होते. घरात रोज जे घडते त्याकडे अजिबात लक्ष नसणारे कितीतरी लोक मोठ्या जागांवरच्या अधिकाऱ्यांत, यशस्वी वकिलांत, अथवा डॉक्टर-

वर्गात आढळतात. ते बोलतात स्वतःविषयीच. इतर लोक त्यांच्या खिजगणतीतच नसतात. इतरांचा जन्म जणू काय त्यांचा गुणगौरव ऐकून घेण्याकरिताच असतो ! व्यवसायाचा चित्तावर होणारा हा परिणाम लक्षात घेतला पाहिजे. जीवनाकडे मोठा वकील म्हणून, बडा डॉक्टर म्हणून अथवा क्लास वन ऑफिसर म्हणूनच पाहण्याची सवय एकदा लागली की खरे जीवन संपतेच. मग फक्त मी आणि माझे ऑफिस. मी मागे टाकलेले कनिष्ठ – ' नाहीतरी ते नालायकच होते ! ' – अथवा खरोखर नालायक असलेले पण नशिबाने वरच्या जागांवर असलेले वरिष्ठ, एवढेच जीवनात उरते. हा चष्मा कायमचा डोळ्यांस लावलेला, त्यातून जे काय दिसेल ते माझे जीवन, अशी धारणा व्यवसायाचे गुलाम बनलेल्या माणसांची असते. जीवनाचे हे खरे स्वरूप आहे काय ? जीवनातला आनंद कधीच आम्हांस मिळत नाही याचे हे तर कारण नसेल ?

व्यवसाय करायचा तर हे सर्व करावेच लागते, अशी एक ठराविक सबब अनेक धंद्यांतले लोक पुढे करीत असतात. धंद्यातले काम नीट करणे जरूर आहे, पण ' प्रगतीचे ' हे ध्येय सतत उराशी बाळगणे अपरिहार्य आहे काय ? त्याकरता कराव्या लागणाऱ्या खटपटी, लटपटी टाळता येणार नाहीत काय ? सतत चालणारे व्यवसायचिंतन जरूरच आहे काय ? निर्वाहाकरिता हा सारा उपद्व्याप करावाच लागतो काय ? आता हे खरे की, मोठा माणूस होण्याचे ध्येय गाठावयाचेच असले तर मग हा सारा उद्योग करावा लागेल. पण ही ध्येयपूजा, ही महत्त्वाकांक्षा सतत जवळ बाळगूनही समाधान आम्हांला मिळत नसले तर कोठेतरी चूक होत आहे, हे उघड नाही का ? ही चूक करावयाचीच असली तर हृदयातला भकासपणा जात नाही ही तक्रार तरी का करता ? असा कृष्णमूर्तींचा सवाल आहे :–

" Sirs, what do we mean by livelihood ? It is the earning of one's needs, food, clothing and shelter, is it not ? The difficulty of livelihood arises ouly when we use the essentials of life-food, clothing and shelter as a means of psychological aggression. That is, when I use the needs, the necessities, as a means of self-aggrandizement, then the problem of livelihood arises; and our Society is essentially based, not ou supplying the essentials, but on psychological aggrandizement, using the essentials as a psychological expansion of oneself. Sirs, you have to think it out a little bit.... Because no one is satisfied with food, clothing and shelter, each one wants something more; and put in different words, the more' is power. But it would be brutish merely to be satisfied with needs. We will be satisfied with needs in the true sense which is freedom from the desire for power, only when we have found inner treasure which is imperishable; which you call God, truth or what you will. If yon can find those imperishable riches within yourself, then you are satisfied with few things, which few things can be supplied. But, unfortunately, we are carried away by sense values. The values of the senses have become more important than the values of the real.

( Talks in India, 1948, Series II, p. 66 ).

सारांश पुढीलप्रमाणे :–

" आपल्या जीवनपद्धतीतला मुख्य दोष हा आहे की, अन्न, वस्त्र आणि आसरा एवढ्यावरच आपण थांबत नाही. खरे म्हणजे निर्वाह चालला पाहिजे, याचा अर्थ या प्राथमिक गरजा भागल्या पाहिजेत एवढाच आहे. पण होते असे की, या गरजांचे निमित्त सांगून आपण आपला 'अहम्'

वाढवू लागतो, त्याला नवे नवे खाद्य देऊ लागतो. मग व्यवसायाची समस्या अत्यंत जटिल असते. आणखी असे की, आपली समाजरचना या हव्यासावरच आधारलेली आहे. ती माणसाच्या खऱ्या गरजांवर आधारलेली नाही. काय गंमत आहे पाहा, अन्नवस्त्रासारख्या माझ्या गरजा भागू लागल्या की तेवढ्यामुळेच मी इतरांपेक्षा स्वतःला श्रेष्ठ समजू लागतो. पाहा, जरा विचार करा. असेच नाही का होत ? अन्न-वस्त्रासारख्या किमान गरजा भागल्या तरी कुणीच तेवढ्यावर समाधान मानीत नाही. प्रत्येकाला आणखी काहीतरी पाहिजे असते. हे अधिक म्हणजे सत्ता होय. मुद्याची गोष्ट अशी आहे की, सत्ताप्रेम अथवा हव्यास चित्तातून केव्हा जाईल हे ओळखले पाहिजे. जेव्हा चिरंतन टिकणारा आनंदाचा अमूल्य ठेवा माणसाला सापडेल – मग त्याला ईश्वर म्हणा, सत्य म्हणा, काहीही म्हणा – तेव्हाच त्याच्या गरजा फार थोड्या अशा राहतील. मग या थोडया गरजा भागविणे कठीण वाटणार नाही. पण सुखलोलुपतेने चित्ताचा कबजा केला की सर्वच प्रश्न बिकट होतात. मग खरी मूल्येच कळेनाशी होतात."

एकूण प्रकार असा दिसतो की, परिस्थितीवर अवलंबून नसणारा असा कोणतातरी आनंद सापडला नाही तर माणूस आपल्या गरजा सारख्या वाढवू लागतो. या गरजा शरीराच्या नसतात, मनाच्या असतात. व्यवसायाने माझ्या शरीराच्याच नव्हे, तर मनाच्याही गरजा पुरवाव्यात अशी अपेक्षा मग मी करू लागतो. व्यवसायाने मला मोठेपणा द्यावा, समाजात मानमान्यता द्यावी, लोकांवर सत्ता गाजविण्याची संधी द्यावी, अशा अपेक्षा जर मी करू लागलो तर होईल काय ? दोन गोष्टी होतील. एक गोष्ट अशी की, या अपेक्षांना अंत राहणार नाही. या अपेक्षांचे स्वरूपच असे आहे की, एकीतून दुसरी, दुसरीतून तिसरी अशी मालिका चालूच राहणार. दुसरी गोष्ट अशी की, इतरांच्या अपेक्षांचा

माझ्या अपेक्षापूर्तीशी कधीच मेळ बसणे शक्य नाही. म्हणूनच चढाओढ, उच्चस्थानाकरिता धडपड, अपयश आले की निराशा, उद्वेग, मग त्यातून मत्सर, द्वेष, सूड या अनर्थपरंपरेत अडकलेली अशीच माणसे सर्व व्यवसायांत दिसतात. नोकरीचा व्यवसाय, व्यापार, वकिली, कारखानदारी, कोणतेही क्षेत्र घ्या. प्रत्येकजण 'मी दुसऱ्याला मागे केव्हा टाकीन' याच विवंचनेत आहे. माझ्या गुणांना स्वतंत्र असे तेज नाही; त्यांच्या मदतीने मी इतर कुणालातरी मागे ढकलू शकलो, तरच त्या गुणांचे खरे महत्त्व असे मला वाटते. साहजिकच मग लबाड्या, युक्त्या–प्रयुक्त्या यांना ऊत येतो.

पुष्कळांना असे वाटते की, मत्सर, बेदिली व संघर्ष यांनी भरलेले व्यवसाय फक्त मागासलेल्या देशांत आहेत. देश भरभराटीस आला, कारखानदारी वाढली, समाज समृद्ध झाला की, व्यवसायात उत्पन्न होणारे हे प्रश्न आपोआप वितळतील. सर्वांना द्रव्यसंपादनाची भरपूर संधी असली की हेवेदावे, तसेच पैशाकरिता होणाऱ्या लबाड्या नाहीशा होतील, अशी आशा काहीजणांना वाटते. पण या भ्रमाचा निरास करणारी कितीतरी उदाहरणे आता आपल्यापुढे येत आहेत. दारिद्र्यामुळेच माणसे लबाड्या करतात असे नाही. एका प्रख्यात ग्रंथकाराचे बनावट आत्मचरित्र प्रकाशकाला विकून लाखो रुपयांची कमाई करणाऱ्या अमेरिकन विद्वानाची हकीकत वाचकांनी वाचली असेल. नुकतीच आलेली 'अपोलो १९' या यानाच्या कॅप्टनबद्दलची बातमी जास्ती उद्‌बोधक आहे. समाजात मानमान्यता व पैसा भरपूर जरी मिळाला तरी धनाशा संपेलच याची खात्री नाही. कारण, जे मिळाले आहे – मग ते किती का असेना – त्यापेक्षाही अधिक काहीतरी मिळविण्याकरिता पैसाच उपयोगी पडतो. वरील कॅप्टनला काय कमी होते ? पण त्यानेसुद्धा तो चंद्रावर उतरला असताना ज्यांच्यावर शिक्के मारले होते अशी पाकिटे, प्रत्येक

पाकिटाला पंधराशे डॉलर या दराने विकून अमाप पैसा मिळविला. व्यवसायाची, प्रपंचातल्या सर्व गरजा उत्तम रीतीने भागण्याची हमी असली तरीही लोभ माणसाला स्वस्थ बसू देत नाही. व्यवसायात एकमेकांशी वागताना वरून सभ्यपणा अथवा सहकार्य दिसत असले, तरी अंतःकरणात स्नेह असेलच अशी खात्री देता येत नाही. सहकार्याने, मोठ्या समुदायात कार्य करून, कारखाने वगैरे उत्तम चालविणारी माणसे तृप्त व समाधानी असतात असे थोडेच आहे ? कृष्णमूर्तींचे पुढील उद्गार समाज प्रगत झाला की सर्व समस्या मिटतील हा आपला भ्रम नाहीसा करतात :-

You know if you observe, there are those Societies, which through necessity, co-operate. Through necessity, through compulsion, through an industrial revolution, people must live together; they must co-operate, they must confirm, they must follow a pattern. And in that Society, as one can observe there are still conflicts; each man is still against the other, because he is ambitious, he is compe. titive, though he may talk about the love of the neighbour By force, he must co-operate but through that assertion of loving the neighbour, he is competitive, ruthless, ambitious. Therefore, such a pattern of Society brings about its owu destruction.

( Talks in Iudia, 1965, p. 53 )

व्यवसायातून ज्या समस्या उत्पन्न होतात त्यांपैकी फक्त एकीचा विचार आता राहिला आहे. व्यवसायाच्या सुरुवातीला तिची चाहूल इतकी हळू असते की ती ऐकूच येत नाही. पण लवकरच आपल्या

सबंध जीवनाचाच ती ग्रास करते. आश्चर्य असे की, व्यवसाय संपल्यावरही तिचा परिणाम जीवनावर फार खोल असा राहतो. व्यवसायाचे ठराविक काम ठराविक वेळात, वर्षांनुवर्षे करावे लागत असल्यामुळे आयुष्य कंटाळवाणे होते. यामुळे जीवनाबद्दल जी उदासीन वृत्ती ( boredom ) होते, ती ही समस्या होय. महिन्याच्या शेवटी मिळणाऱ्या पगाराकडेच फक्त दृष्टी देऊन कितीतरी कारकून, पोलीस शिपाई, सैनिक अत्यंत नीरस असे आयुष्य कंठीत असतात. पण हा नीरसपणा बहुतेक सर्व धंद्यांत आढळतो; त्याचे प्रमाण कमी-जास्ती असते एवढेच. हा नीरसपणा कामाचे तास कमी करून शक्य तेवढा अल्पकालीन करणे एवढेच काही देशांत साधता आले आहे. पण कामाचे स्वरूप, कामगारांच्या प्रज्ञेला वाव देईल असे करणे, हा या समस्येवर एकच प्रभावी असा उपाय आहे. "Stones of Venice" या पुस्तकात रस्किन या प्रख्यात ग्रंथकाराने हा उपाय सुचविला आहे. पण अजूनही ही सुधारणा फार दूर आहे. गणकयंत्रासारखी यंत्रे जास्त प्रमाणात वापरात आली तर बरेचसे कंटाळवाणे काम त्यांच्याकडे सोपविता येईल. पण तोपर्यंत हजारो लोकांचे व्यवसाय अगदी नीरस, तीच ती क्रिया पुन्हा पुन्हा सतत करावी लागल्यामुळे कंटाळवाणे, केव्हा तर उबग आणणारे असेच राहतील असे दिसते. समाजात क्रांती घडेपर्यंत वाट पाहा, असा सल्ला कृष्णमूर्ती कधीच देत नाहीत. या प्रश्नावरही त्यांचे विचार अगदी नवी दिशा दाखविणारे असेच आहेत. त्यांचे म्हणणे असे की, व्यवसायाच्या कामात किती जरी काळ जात असला, तरी मधूनमधून थोडातरी वेळ असा सापडतोच की, जेव्हा स्वतःच्या मनाकडे माणसाला पाहता येते.

If he begins to give some time during the day, five minutes, ten minutes, haif an hour, in order to reflect

upon these matters, then that very reflection brings longer periods in which he will have time to think, to delve .... There is something for more important which is to find out the operation of the mind, the ways of our own thinking, the motlves, the urges, the memories, the traditions, in which the mind is caught. And we can do that while we are earning our livelihood – so that we become fully conscious of ourselves and our peculiarities, Then I think it is possible for the mind to be really quiet, and so to find that which is beyond its own projections. "

( Talks in Europe, 1955, p. 25 ).

व्यवसायाचा नित्यक्रम ( routine ) कंटाळवाणा बनल्यामुळे माणसे अगतिक व शुष्क होऊन जातात. पण हे अगदी अपरिहार्य आहे काय ? जेव्हा मी स्वतःला सतत दुर्दैवी समजून मागच्या तासांत काय घडले याचाच विचार या तासात करू लागतो तेव्हा हा कंटाळवाणेपणा जाणवतो. हे एक महत्त्वाचे सत्य आहे. जे करणे जरूर आहे त्याचा रूक्षपणा चित्तात सारखा घोळत बसण्याची सवय आपणा सर्वांनाच लागलेली आहे. कामाकडे संपूर्ण लक्ष नसतेच ते कसेबसे उरकावे असेच आपण ठरविलेले असते. आपल्या मनाचा जो जागृत भाग ( Conseious mind ) असतो तो या चर्वितचर्वणात सतत गुंतलेला असतो. कृष्णमूर्तींचे म्हणणे असे आहे की, ज्या ज्या क्षणांत हातातले काम तुमचे सगळे लक्ष आपल्याकडे ओढून घेत नाही, ते ते क्षण या अशा चिंतनात का घालविता ? रिकामे क्षण मधूनमधून कितीतरी येतात. त्या क्षणांत आपल्या मनाच्या एकंदर हालचालींचा अभ्यास करण्यास आपण शिकले पाहिजे. हा अभ्यास खेळकर वृत्तीने झाला पाहिजे. मनातले हेतू, प्रेरणा पाहिल्या पाहिजेत. गतकालातच

मन केस रुतलेले असते हे जरा बाजूला जाऊन दुरून पाहिले पाहिजे. समोर असणाऱ्या यंत्राचे सर्व भाग कसे काम करतात हे कामगार जसा लांबून पाहतो, तसेच मनाकडेही मधून मधून पाहणे जरूर आहे. मग मन शांत होते, स्वनिर्मित आकृतिबंधांच्या ( Projections ) पलीकडे जे आहे त्याचा स्पर्श त्याला होतो. हा परतत्त्वाचा स्पर्श मनाला सारखे ताजेतवाने करतो, असे सांगण्याचा कृष्णमूर्तींचा हेतू आहे. हा प्रयोग करून पाहिला पाहिजे. मग जे काम हातून होत राहते, त्याच्याकडे पाहण्याची दृष्टी बदलते. ' नको असणारे पण न टळणारे काम ' हे स्वरूप पालटते. हल्ली काय होते ? प्रत्येक काम तें पैसा किती देते या एकाच निकषावर तपासले जाते. ते जास्त पैसा देणार असले तर "माझा धंदा मला आवडतो" असे मी म्हणू लागतो. धंदा मला आवडत नसतो; पैसा अथवा प्रतिष्ठाच मला खरोखर प्रिय असते.

जो असेल तो व्यवसाय करताना ज्या समस्या उद्भवतात त्यांचा परामर्श आपण येथवर घेतला. पण व्यवसायाची निवड करण्याचे स्वातंत्र्य ज्या थोड्या लोकांना आहे, ते तरी हे निवड कशी करतात ? " व्यवसायामुळेच श्रेष्ठता मला समाजात प्राप्त होईल ना ? " हाच प्रश्न प्रत्येकजण आपल्या डोळ्यांपुढे ठेवतो. या श्रेष्ठतेला काय अर्थ आहे, हे मागे एका प्रकरणात आपण पाहिले आहे. तथाकथित श्रेष्ठतेचा मोह तर बाजूला ठेवला पाहिजेच, पण जो व्यवसाय आपण करतो तो समाजात कशाची निर्मिती करतो इकडेही लक्ष देणे जरूर आहे. तसेच, काही व्यवसाय असे असतात की, त्यांतले दैनंदिन काम चित्तात अनेक प्रकारच्या दुष्ट प्रवृत्तींचा परिपोष करते.

महाभारतातली व्याधाची गोष्ट प्रसिद्ध आहे. समाजाने काही धंदे हीन मानले म्हणून त्यांतला प्रत्येक मनुष्य कायमचा क्षुद्रवृत्तीचाच राहणार अशी जी समजूत आजसुद्धा ठिकठिकाणी दिसते, ती किती

अज्ञानमूलक आहे हे त्या प्राचीन काळातही भारतीयांनी ओळखले होते. एका तपस्वी ब्राह्मणाला, " वेदान्ताचे धडे घेण्याकरिता त्या व्याधाकडे जा," असे त्या गोष्टीतल्या चतुर स्त्रीने सांगितले होते. पण व्याधाच्या धंद्यातली हिंसा निराळी व या सुधारलेल्या जगातले हिंसेचे घृणास्पद प्रकार निराळे. धंद्याच्या निमित्ताने आपण काय काय करतो इकडे आपले लक्षच नसते. " व्यवहार आहे हा ! " असे म्हणून हात झटकून आपण मोकळे होतो. धंदा रोज करावा लागत असल्यामुळे चित्तावर एकप्रकारचा लेप चढत जातो. माणूस जागरूक असला तर या लेपाचा थर जरा पातळ होईल इतकेच. म्हणूनच धंद्याची निवड करणे शक्य होण्यासारखी परिस्थिती ज्यांची आहे, ते खरे भाग्यवान होत.

लहान वाटणाऱ्या गोष्टीपासून सुरुवात करू. कित्येक धंदे असे असतात की, काम करणाऱ्या लोकांना कर्कश आवाज सतत ऐकावा लागतो. अशा आवाजाने कामगारांच्या मेंदूवर कायमचा परिणाम कसा होतो, याबद्दलचे संशोधन अलीकडे प्रगत झाले आहे. पण हे आवाज सर्वच कारखान्यांतून कमी होण्याचा दिवस जेव्हा उगवेल तोपर्यंत करावयाचे काय ? मोठा अथवा लहान पण किरकिर आवाज कानांत सतत घुमल्यामुळे माणसे बहिरी होतात हे तर सिद्धच झाले आहे. पण त्यांची एकंदर संवेदनाशक्तीच ( sensitivity ) कमी होते. जीवनात क्षणोक्षणी उभ्या राहणाऱ्या समस्यांचे ग्रहणच त्यांना होत नाही. काही वेळा भलताच विपरीत ग्रह ते करून घेतात व विनाकारण मर्यादेबाहेर संतापतात. यातून मग नव्या समस्या निर्माण होतात. पण मधूनमधून चित्त मोकळे करण्याचा परिपाठ ठेवला तर हे सर्व दुष्परिणाम कमी होतात. आणखी असे की, नको असलेल्या आवाजाशी युद्ध करण्याची सवय आपल्या मनाला लागलेली आहे. पण त्या आवाजाबरोबर सहकार्य केले, त्या आवाजाच्या प्रवाहाबरोबर वाहत गेले, तर कसलाच

उपद्रव होत नाही, असे कृष्णमूर्तींचे सांगणे आहे. अवधान देण्याची कला ( art of listening ) म्हणून ते जी सांगतात तिचा हा एक महत्त्वाचा भाग आहे. घरी बसले असतानासुद्धा इतके आवाज – विशेषत: मोठ्या शहरांत आपल्या कानांवर आदळतात की आपण नेहमी अस्वस्थ होतो, संतापतो. या अस्वस्थतेच्या वेळी वरील प्रयोग करून पाहण्यासारखा आहे.

व्यवसाय कोणताच उच्च अथवा नीच नाही. सर्व काही व्यवसाय करणाऱ्यावर अवलंबून असते हे तत्त्व जरी खरे असले, तरी मुक्त जीवनाकडे वाटचाल करणाऱ्या माणसाने काही व्यवसाय आवर्जून टाळले पाहिजेत. आपल्या जुन्या अध्यात्मग्रंथात ‘ वाणिज्य ’ हा एक अनिष्ट व्यवसाय म्हणून सांगितला आहे. त्या धंद्यात चित्ताचे अवधान सतत तपशिलात व क्षुद्र गोष्टींत ठेवावे लागत असल्यामुळे ते लहान व संकुचित बनते. व्यापक विचार हाच सत्यदर्शन घडवू शकतो, हे आपण विसरत चाललो आहोत. ज्या व्यवसायात मनाला क्षुद्र गोष्टींत रमण्याची सवय लागते असे कितीतरी व्यवसाय या आधुनिक युगात उदय पावले आहेत. या व्यवसायातून निवृत्त झाल्यावरही त्या माणसाचे मन लहान गोष्टींचा, तपशिलाचाच विचार करीत बसते. इतका कायमचा ठसा चित्तावर उमटलेला असतो. जन्मभर ज्याने आणे – पैंचाच हिशेब केला अशा सावकाराला वृद्धावस्थेत, मुलाने केलेला ‘ वावगा खर्च ’ पाहून संताप न झाला तरच आश्चर्य! काही विशिष्ट व्यवसायांतली माणसे एकमार्गी बनतात, असे दिसते. तपशिलात न शिरणेच बरे. ज्याने त्याने आपले प्रतिबिंब मनाच्या आरशात पाहावे म्हणजे झाले !

काही व्यवसाय खोटेपणातच माणसाला रस घ्यायला लावतात. त्या धंद्यातली प्रत्येक क्रिया, बोलावा लागणारा प्रत्येक शब्द असत्यातून

उगम पावतो. नटाचे उदाहरण एके ठिकाणी कृष्णमूर्तींनी दिले आहे. अगोदर सर्वच माणसे स्वतःची खोटी प्रतिमा ( image ) हृदयाशी बाळगतात. 'खोटी' याचा अर्थ गतघटनांच्या केवळ स्मृतींतून उदय पावलेली. ही प्रतिमा म्हणजेच 'मी' असे समजून ती सांगेल त्याबरहुकूम माणसे वागत असतात. या प्रतिमेवरही आणखी एक खोटी प्रतिमा जेव्हा नटाकडून लादली जाते, तेव्हा लोक जरी टाळ्या बाजवीत असले तरी त्या नटाच्या चित्ताचे काय होते हे पाहावयास नको का ? ते चित्त आपली नैसर्गिक संवेदनक्षमता ( sensitivity ) गमावते काय हा खरा प्रश्न आहे. ( Commentaries on Living II, P. 202 पाहा. ) अर्थात हा शोध ज्याचा त्यानेच घ्यावयाचा आहे. कृष्णमूर्तींचे शब्दही बाजूला ठेवले पाहिजेत. त्यांचा उपयोग फक्त सावध होण्याकरिताच आहे.

वकिलीचा अथवा सैनिकाचा धंदा चांगला का वाईट हे कसे ठरवायचे ? १९४८ मधल्या भारतातल्या प्रवचनामधले कृष्णमूर्तींचे पुढील विधान कित्येकांना धक्का देईल :–

" Sirs, surely we can see what is a wrong profession. To be a soldier, a policeman, a lawyer is obviously a wrong profession, because they thrive on conflict, on dissension; and the big businessman, the Capitalist thrives on exploitation ... And as Society is based on the army, the police the law, the big bnsinessman, that is on the principle of dissension, exploitation and violence, how can you and 1, who want a decent right profession, survive ? .. . Given this situation of exploitation of a Society built on dissension, how are you going to find a right livelihood ? 1t is almost

impossible, is it not ? .... To seek as an individual, a right livelihood is good, is excellent, but that does not solve the vast problem. The vast problem is solved only when you and 1 are not seeking security. There is no such thing as security . .. To discover what is false, you must be aware of it, you must observe everything that yon are doing, thinking and feeling; and out of that there will come a new vitality, a new energy and that energy will dictate what kind of work to do or not to do. ( P. 68 and 69 ).

समाजाची रचनाच जर भेदभावनेवर आधारलेली असली तर करावे तरी काय ? समाजाने स्वतःची रचना कायम राहावी, याकरिता उत्पन्न केलेले धंदे टाकाऊ म्हणून टाळता येतील का ? फार अवघड असा हा प्रश्न आहे. जवळ जवळ सर्वच व्यवसाय या ना त्या रूपात हिंसेला उत्तेजन देत असले, मत्सर, क्रोध यांचाच परिपोष करीत असले, तर सुस्थितीतल्या अल्पसंख्यांनी तरी निवड कशी करावी ? कृष्णमूर्तींना या पेचाची पूर्ण जाणीव आहे. म्हणून ते एवढेच म्हणतात की, "तुम्ही स्वतः कसल्या तरी सुरक्षेच्या (security) मागे नाहीत ना ? जगात नित्य असे काहीच नाही हे तुम्हांला उमगले आहे ना ? तुमचे चित्त सुरक्षेच्या हव्यासात गुंतले नसले तर त्याच्या अंगी असे काही सामर्थ्य येईल की, जे तुम्हांला अचूक मार्गदर्शन करील. लोभ, प्रगतीची हाव, मत्सर या गोष्टी तुमच्यापासून दूर राहतील. कोणते काम करावे व कोणते करू नये, हे तुमचे तुम्हांला मग सहज कळू लागेल."

या प्रकरणाच्या सुरुवातीच्या उताऱ्यातला इशाराच मला महत्त्वाचा वाटतो. आपल्या चित्तात ज्या आकांक्षा असतील त्याच नकळत आपणांला ठराविक व्यवसायाकडे ओढून नेतील. त्या आकांक्षा आधी तपा-

सल्या पाहिजेत. मग भोवतालच्या परिस्थितीकडे पाहिले पाहिजे. पण कशाकरता जगायचे हे आधी ठरविले पाहिजे. खऱ्या जीवनाकडे पाठ फिरवून प्रतिष्ठा, संपत्ती वगैरेंनाच महत्त्व द्यावयाचे ठरले की, मग व्यवसायाचा प्रश्न निराळ्याच स्वरूपात आपणांपुढे उभा राहतो. पण मुक्त जीवनाकडे जावयाचे असले तर प्रश्न निराळ्या रीतीने सोडवावा लागतो. "काय हवे" हे स्पष्ट असले तर नुसत्या समाजरचनेला दूषणे लावण्यात आपण काळाचा अपव्यय करणार नाही.

▱ ▱ ▱

impossible, is it not ? .... To seek as an individual, a right livelihood is good, is excellent, but that does not solve the vast problem. The vast problem is solved only when you and 1 are not seeking security. There is no such thing as security . .. To discover what is false, you must be aware of it, you must observe everything that yon are doing, thinking and feeling; and out of that there will come a new vitality, a new energy and that energy will dictate what kind of work to do or not to do. ( P. 68 and 69 ).

समाजाची रचनाच जर भेदभावनेवर आधारलेली असली तर करावे तरी काय ? समाजाने स्वतःची रचना कायम राहावी, याकरिता उत्पन्न केलेले धंदे टाकाऊ म्हणून टाळता येतील का ? फार अवघड असा हा प्रश्न आहे. जवळ जवळ सर्वच व्यवसाय या ना त्या रूपात हिंसेला उत्तेजन देत असले, मत्सर, क्रोध यांचाच परिपोष करीत असले, तर सुस्थितीतल्या अल्पसंख्यांनी तरी निवड कशी करावी ? कृष्णमूर्तींना या पेचाची पूर्ण जाणीव आहे. म्हणून ते एवढेच म्हणतात की, "तुम्ही स्वतः कसल्या तरी सुरक्षेच्या (security) मागे नाहीत ना ? जगात नित्य असे काहीच नाही हे तुम्हांला उमगले आहे ना ? तुमचे चित्त सुरक्षेच्या हव्यासात गुंतले नसले तर त्याच्या अंगी असे काही सामर्थ्य येईल की, जे तुम्हांला अचूक मार्गदर्शन करील. लोभ, प्रगतीची हाव, मत्सर या गोष्टी तुमच्यापासून दूर राहतील. कोणते काम करावे व कोणते करू नये, हे तुमचे तुम्हांला मग सहज कळू लागेल."

या प्रकरणाच्या सुरुवातीच्या उताऱ्यातला इशाराच मला महत्त्वाचा वाटतो. आपल्या चित्तात ज्या आकांक्षा असतील त्याच नकळत आपणांला ठराविक व्यवसायाकडे ओढून नेतील. त्या आकांक्षा आधी तपा-

सल्या पाहिजेत. मग भोवतालच्या परिस्थितीकडे पाहिले पाहिजे. पण कशाकरता जगायचे हे आधी ठरविले पाहिजे. खऱ्या जीवनाकडे पाठ फिरवून प्रतिष्ठा, संपत्ती वगैरेंनाच महत्त्व द्यावयाचे ठरले की, मग व्यवसायाचा प्रश्न निराळ्याच स्वरूपात आपणांपुढे उभा राहतो. पण मुक्त जीवनाकडे जावयाचे असले तर प्रश्न निराळ्या रीतीने सोडवावा लागतो. " काय हवे " हे स्पष्ट असले तर नुसत्या समाजरचनेला दूषणे लावण्यात आपण काळाचा अपव्यय करणार नाही.

□ □ □

८

# मी व माझी प्रतिभा

कवी, चित्रकार, गायक, शिल्पकार वगैरे कलावंतांबद्दल समाजाला फार मोठे कुतूहल असते. त्यांच्या ठिकाणी आढळून येणारी प्रतिभा ही एक दैवी देणगी आहे असे समाजाला वाटते व त्यांचा गौरव हरतऱ्हेने केला जातो. काही कलावंतांना अमाप पैसा व भरपूर प्रसिद्धी मिळते, तर काही त्या वाटेवर असतात. अंगात कला असूनही समाजाने तिचे चीज केले नाही तर कलावंताला होणारे दुःख एवढे मोठे असते की, ते त्याच्या जीवनावर कायमचा ठसा उमटविते. एकवेळ पैसा मिळाला नाही तरी चालेल, पण आपली प्रतिभा लोकांत मान्यता पावली नाही, याची खंत प्रतिभावंताला जन्मभर चैन पडू देत नाही.

प्रतिभावंत अशी माणसे अगोदरच फार थोडी असतात. त्यांतली कित्येक प्रकाशात येत नाहीत; कारण त्यांना आपली कला समाजापर्यंत पोचविण्याचे माध्यम हस्तगत झालेले नसते. हे माध्यम सापडणे कलावंताला त्याची कला व्यक्त करण्याचे शिक्षण किती मिळते यावर अवलंबून आहे. शिवाय जी कला अंगी आहे तिचे महत्त्व समाजाला

वाटण्याला काळही अनुकूल असावा लागतो. इतिहासाकडे पाहिले तर विशिष्ट कालखंडात विशिष्ट कलांनाच बहर आलेला दिसतो.

प्रकाशात आलेल्या प्रतिभावंतांची संख्या या सर्व कारणांमुळे एवढी अल्प असताना या विषयाचा विचार कशाला, अशी शंका काही वाचकांना येईल. पण या विषयाच्या निमित्ताने, प्रत्येकाच्या जीवनातली जी मुख्य समस्या अहंनिर्मितीची आहे, तिचे दर्शन आपणांला घेता येईल. शिवाय असे की, सौंदर्याचा शोध प्रत्येक माणूस आपापल्या तऱ्हेने सतत घेत असतो. जीवनात सौंदर्य कुठेतरी दडलेले आहे अशी जाणीव प्रत्येकाला असते. तक्रार एवढीच असते की, त्याची अनुभूती म्हणावी तशी येत नाही. सौंदर्य म्हणजे आहे तरी काय हे समजावे, असे कोणाला वाटत नाही ? कलावंताच्या जीवनातली प्रतिभेची समस्या समजून घेताना कदाचित् सुंदरता ( beauty ) आणि आपले जीवन यांच्यामधला खरा संबंध ( relationship ) आपणांला कळून येईल. कितीही निकृष्ट जीवन ( ? ) असेना, त्याचा सौंदर्याच्या अनुभूतीशी फार निकटचा संबंध असतो, हे विसरता येत नाही.

'प्रतिभा' म्हणजे तरी काय ? कलावंताच्या जीवनात प्रत्येक क्षणाला ती त्याच्याजवळ असते, का मधूनमधून क्वचित् त्याला दर्शन देते ? असे अनेक प्रश्न उत्पन्न होतात. पण अगोदर प्रतिभा म्हणजे काय नाही, हे पाहू. अनेक व्यवसाय असे आहेत की, ते चांगल्या रीतीने करण्याकरिता विशेष कौशल्य लागते. हे कौशल्य काही व्यक्तींना लवकर प्राप्त होते तर काहींना उशीर लागतो. वकिलांचा धंदा घ्या. या धंद्यातले कौशल्य म्हणजे काय ? आपल्या पक्षकाराची बाजू कोठे लंगडी आहे हे, तसेच त्याला यश देणारे मुद्दे कोणते आहेत हे चटकन लक्षात येणे हा एक भाग त्या कौशल्याचा आहे. दुसरा भाग असा की, पोषक असणारे मुद्दे न्यायाधीशाला चांगले पटवून देण्याकरिता जरूर

ते वक्तृत्व अथवा लाघवीपणा ( Persuasiveness ) अंगी असणे. पण हे सर्व कौशल्य जवळ असले तरी वकिलाला कोणी कलावंत म्हणत नाही. आता असे होणे शक्य आहे की, वकिलाच्या भाषणातला काही भाग इतका मोहक असेल की, जणू एखादे काव्यच ऐकत आहो, असा भास न्यायाधीशाला व्हावा. मग त्या वकिलाच्या ठिकाणी कवीचे गुण आहेत असे लोक म्हणतील. पण वकिलीतल्या नैपुण्याला कवीच्या प्रतिभेची प्रतिष्ठा लाभणार नाही. हे असे का व्हावे ? हा विचार करण्यासारखा प्रश्न आहे. समाज वकिलाची उपयुक्तता मान्य करीत नाही असेही नाही. त्यालाही धन व कीर्ती यांचा लाभ होतो. पण कवी तो कवी व वकील म्हणजे वकीलच !

या प्रश्नाच्या मुळाशी गेले तर असे दिसते की, एकप्रकारच्या आनंदाची प्राप्ती आपणांला व्हावी, अशी अपेक्षा समाज कलावंताकडून करीत असतो. आपले काम वकिलाकडून यशस्वी व्हावे, इंजीनियरकडून आपले घर चांगले बांधून व्हावे, असेही लोकांना वाटत असते. नाही असे नाही. पण ही अपेक्षा खालच्या प्रतीची आहे. जीवनाच्या अंतर्भागाला ( core ) तिचा स्पर्श होत नाही, अशी मनोमन जाणीव सामान्यांतल्या सामान्य माणसालाही असते. याचाच अर्थ असा की, रस्त्यातला कोणताही मनुष्य घेतला तरी त्याला आनंदाची किंमत उपयुक्ततेपेक्षा अधिक वाटते. गिरणीतल्या मजुराला कलेचा आनंद उपभोगायला सहसा वेळ मिळत नाही हे खरे; पण थोडीजरी सवड सापडली तरी तो रस्त्यात थांबून अलगुजाचे मधुर स्वर ऐकत उभा राहतो, हे आपण पाहतो. कलेची अभिरुची काही समाजांत कमी व काही समाजांत जास्त अशी का दिसते, तिचा संबंध आर्थिक परिस्थितीशी कितपत आहे, जिला आपण हीन अभिरुची म्हणतो तिच्यात सौंदर्यदृष्टी अजिबात नसते काय, असे अनेक प्रश्न उत्पन्न

होतात. पण त्याकडे आपणांला वळायचे नाही. कलावंताची प्रतिभा ( creativity ) म्हणजे काय, एवढेच आपण प्रथम समजून घेऊ. नंतर ती कलावंताच्या जीवनाला कोणता आकार देते हे पाहू. हे पाहताना आपल्या जीवनावर काही प्रकाश पडतो का ते पाहू. हा शोध घेत असताना सौन्दर्य म्हणजे काय याची थोडीबहुत कल्पना आपणांला येईल असे वाटते.

वर सांगितलेच आहे की, कौशल्य म्हणजे प्रतिभा नव्हे. कौशल्य आणि प्रतिभा ही केव्हा केव्हा एकत्र आढळतील; पण तरीसुद्धा या दोन गोष्टी अगदी भिन्न आहेत. कार्य सफल झाल्याचा आनंद कुशल कारागिराला अथवा त्याच्याकडून काम करून घेणाऱ्याला होईल. पण हा आनंद व कलावंताला अथवा रसिकाला होणारा आनंद यांत जमीन-अस्मानाचे अंतर आहे. त्या दोघांची जातच निराळी आहे. कौशल्याचा संबंध नेहमीच कोणत्यातरी व्यवसायाशी असतो; म्हणजे कौशल्य हे कसलेतरी उपयुक्त असे कार्य करते, जीवनातली कसली तरी गरज भागविते. ही गरज प्राथमिक गरजांपैकीच असावी असा नियम नाही. पण तिचा संबंध धनसंपादनाशी असतो असे विधान करण्यास हरकत नाही. पण कलावंताच्या प्रतिभेकडून जी गरज भागते, ज्या मागणीची पूर्ती होते ती अगदी नैसर्गिक व मूलभूत असली पाहिजे. प्रत्येकाचे हृदय जीवनातला आनंद शोधीत असते. हा आनंद, प्रतिभावंताची कला साक्षात् पुढे आणून उभा करते. हा आनंद देऊ केला तरी तो घेण्यास सर्वच माणसे अगदी तयार असतात, असे नाही. पण तरी-सुद्धा प्रत्येक जागृत माणसाला या आनंदाची तहान लागलेली असते, यात संशय नाही. काही माणसे झोपलेली असतात म्हणून ती या आनंदाकडे डोळे उघडून पाहत नाहीत. काहींची ही भूक मंदावलेली असते, क्वचित् नष्टही झालेली असते. त्यांनी जीवनात भलत्याच गोष्टींना इतके महत्त्व दिलेले असते की, कलाप्रेमाला त्यांच्या अंतःकरणात जागाच

राहिलेली नसते. पण अपवाद सोडले तर, प्रत्येक माणूस हृदयाच्या तळाशी रसिक असतो. वाण असते खऱ्या कलावंताची अस्सल प्रतिभा असलेल्या कवींची अथवा चित्रकारांची.

प्रतिभा आणि कौशल्य यांच्यामधला फरक वाचकांच्या लक्षात आता आला असेल. कौशल्य, ठराविक काम ज्याला करून घ्यावयाचे आहे त्यालाच महत्त्वाचे वाटते. पण प्रतिभा अशी सकाम नसते. तिचा आविष्कार होताना कलावंत आणि रसिक दोघेही निष्काम असतात. फक्त आनंदाच्या अनुभूतीने आकृष्ट झालेले असतात. मला वाटते की, प्रतिभा तिलाच म्हणावे की, जी कोणत्यातरी लाभाच्या हेतूने लोकांचा अनुनय करीत नाही. जीवनातले सौंदर्य अगर सृष्टीतले सौन्दर्य ( या दोन गोष्टी नसाव्यात ) अनुभवले एवढ्याच कारणाने जो त्याची अभिव्यक्ती करतो तोच अस्सल कलावंत, आणि या अभिव्यक्तीशी केवळ आनंदा-करिता समरस होणारे तेच खरे रसिक. दोघांचा हा परस्परसंबंध लक्षात घेतला पाहिजे. " रसिक " हाही प्रकृतीने कवीच अथवा कलाकार असतो असे जे म्हणतात त्याचा अर्थ हा असा आहे.

प्रतिभावंत व रसिक यांचा हा अन्योन्यसंबंध समजून घेतला, तर प्रतिभा म्हणजे काय हे समजण्यास मदत होईल असे वाटते. जीवनाच्या अनुभूतीमध्येच एक भाग अशा आनंदाचा आहे की, जो अगदी अंतःकरणाचा ठाव घेतो. त्या आनंदाचे जे क्षण असतात त्या क्षणांत मन विशाल बनते; रोजच्या जीवनातली सुखदुःखे विसरतात. सर्व तक्रारी, क्लेश क्षणभर अंतर्धान पावतात. या आनंदाच्या प्रांतात ज्याचा बरेच वेळा प्रवेश होतो, व तो आनंद व्यक्त करण्याची कला ज्याच्याजवळ असते त्याला ' प्रतिभावंत ' म्हणतात. हा आनंद जेव्हा प्रतिभावंत व्यक्त करू लागतो तेव्हा त्याचे सामर्थ्य असे असते की, रसिकालाही त्या आनंदाचा अनुभव येऊ लागतो व तो डोलू लागतो.

दोघांचा अनुभव एकाच प्रकारचा असतो. काही वेळा रसिकाच्या अनुभूतीची खोली अथवा व्यापकता कलावंताच्या तोडीची नसेल. पण एकच तार दोघांच्या हृदयात छेडली जाते, यात संशय नाही. असा काहीतरी प्रवाह कलावंताकडून रसिकाच्या हृदयापर्यंत सुरू होतो की, ज्यामुळे एकच संवेदना दोघांनाही होते. ही संवेदना आत्मकेंद्रित नसलेली व अत्यंत व्यापक अशी असते. ती आत्मकेंद्रित नसते यातच तिच्यापासूनचा आनंद साठवलेला आहे. पिंजऱ्यात कोंडलेल्या पक्ष्याचा आनंद ज्याप्रमाणे मुक्त होण्यातच आहे, त्याप्रमाणे ' मी ' चे बंधन सुटण्यातच आनंद आहे. प्रतिभेचा आविष्कार जेव्हा होतो तेव्हा तो कलावंत आणि रसिक देहभान विसरतात. याचाच अर्थ ते ' मी ' चा प्रांत सोडून दूर जातात. ज्या शक्तीमुळे ' मी ', मावळून व्यापकतेचा अनुभव येतो, त्या शक्तीला ' जीवनातले अनेकविध सौंदर्य पाहण्याची शक्ती ' असे नाव आपण देऊ. जीवनात अनेक ठिकाणी अनपेक्षित आनंद देणारी सौंदर्यस्थाने आहेत. कदाचित् आनंद व सौंदर्य ही एकाच सत्याची दोन नावे असतील. पण ते कसेही असले तरीं, हे सौन्दर्य अनुभविण्याकरिता 'मी' सोडावा लागतो. 'मी' सहज अनपेक्षित रीतीने ज्यांचा सुटतो व अलगद जे एका निराळ्याच प्रांतात उतरतात त्यांनाच कवी, चित्रकार, गायक, शिल्पकार अशी नावे प्राप्त होतात; प्रतिभावंत त्यांना म्हणतात. निसर्गाचे हे वरदान फारच थोड्या लोकांना लाभते असे दिसते. म्हणूनच, ' कवी जन्मावा लागतो ' असे म्हणतात.

पण कलावंत जन्मावा लागतो तसेच रसिकाचे आहे काय ? तसे दिसत नाही. तसे असते तर कवी, चित्रकार यांची निर्मिती वायाच गेली असती. फारच थोडे भाऊबंद त्यांना भेटले असते. त्यांच्या मैफली ओस पडल्या असत्या ! पण कवी, गायक, चित्रकार यांच्या कृतीचे (creation) कौतुक हजारो सामान्य माणसे करीत असताना दिसतात. नुसते

कौतुक तितकेसे महत्त्वाचे नाही; पण कलावंताप्रमाणेच श्रोते अथवा प्रेक्षक जेव्हा तल्लीन झालेले दिसतात, तेव्हा त्याचा अर्थ काय असावा? रसिकांची व कलावंताची अनुभूती कोठेतरी संलग्न होत आहे, कोठेतरी दोन प्रवाह एकमेकात मिसळून त्यांचा एकच प्रवाह होत आहे, असा याचा अर्थ आहे. ही समान अनुभूती एकाच सौंदर्याची असली पाहिजे, यात शंका नाही. स्वतः जलपान करून दुसऱ्यांनाही पाणी पाजणारा मनुष्य ध्यानात आणा. जलपानाचा आनंद त्याला जो मिळाला तोच आनंद इतर तृषितांना नाही का मिळत? त्या दोन्ही आनंदांची जात एकच आहे. कलेपासून होणाऱ्या आनंदाची गोष्ट अशीच आहे. फरक एवढाच की, देणाऱ्याला व घेणाऱ्याला एकाच वेळी हा आनंद उपभोगता येतो. एका अर्थाने, कलावंत हा रसिकापेक्षा फार श्रेष्ठ नसतो. त्याचे श्रेष्ठत्व कशात आहे, हे आपण पुढे पाहू. पण खरे श्रेष्ठत्व अथवा महत्त्व, "जीवनात सौंदर्य आहे" या सत्याला आहे. हे सौंदर्य सगळीकडे पसरलेले आहे. पण तरी त्याच्याशी संपर्क आपल्याला साधता येत नाही. कलावंत अशी काही जादू करतो की, त्याचा स्वतःचा व त्याच्या रसिकांचा एकदम त्या सौंदर्याच्या प्रांतातच प्रवेश होतो. या प्रांतात प्रवेश झाल्यावर कोण श्रेष्ठ व कोण कनिष्ठ? सगळे सौंदर्याचे उपासकच!

कृष्णमूर्ती अवधान देण्याची कला (art of listening) जिला म्हणतात, ती मला वाटते खऱ्या रसिकाचीच अवस्था आहे. जेव्हा एखाद्या प्रतिभावंत गायकाचे गायन चाललेले असते, व समोर फक्त रसिकजनच असतात, तेव्हा त्या दिवाणखान्यात फक्त गाणे व आनंदाची लयलूट एवढेच असते. गाणाराला 'मी गातो आहे' व ऐकणारांना 'आम्ही ऐकत आहोत' अशी जाणीव नसते. ही स्वरसमाधी ज्यांनी अनुभविली असेल त्यांना प्रतिभा (creativity) या शब्दाचा अर्थ

काय असावा याची कल्पना येईल. ‘मी’ जागृत असताना कसले कवित्व व कसले रसग्रहण ? कृष्णमूर्तींचे प्रवचन ऐकताना श्रोत्यांची अशी अवधानवृत्ती (State of Listening) झाली तर तेथे कृष्णमूर्ती अथवा श्रोते राहात नाहीत तर नुसते ज्ञान (understanding) उरते. कलावंतांच्या बाबतीतही असेच घडते, अगर घडावयास पाहिजे. पण ही अशी अवस्था नेहमी अनुभवास येत नाही. फार क्वचित् प्रसंगी कलावंताचे अथवा कलेचे असे भाग्य उघडते.

प्रतिभावंत हा, त्याला झालेले सौंदर्यदर्शन शब्दांच्या अथवा इतर माध्यमांच्या मदतीने रसिकापर्यंत पोचवू शकतो. हे माध्यम सापडणे अथवा कौशल्याने वापरता येणे ही जन्मानेच काही थोड्या व्यक्तींना मिळणारी एक देणगी आहे. प्रयासाने असे माध्यम ज्यांनी आत्मसात् केले, अशी कलावंतांची काही विरळ उदाहरणे आहेत. पण एक गोष्ट मात्र नक्की. ती अशी की, सौंदर्याची व्यापक अनुभूती ज्या काळात आली तो काळ महत्त्वाचा, हे कलावंतही विसरू लागतो. ही अनुभूती ज्या प्रसंगात रसिक श्रोत्यांना येऊ लागते तो प्रसंग महत्त्वाचा, हे श्रोतेही विसरतात. (जास्त बिनचूक बोलायचे तर, ती अनुभूतीच महत्त्वाची; तिचा काळही नव्हे.) कलावंत त्याला झालेले सौंदर्यदर्शन ज्या माध्यमातून व्यक्त होते त्या माध्यमालाच (medium of expression) भलते महत्त्व देऊ लागतो. म्हणजे, “मी कसे सुंदर शब्द वापरले, किती मधुर स्वर मला काढता आले,” याचेच चिंतन तो करू लागतो. श्रोतेही या त्याच्या नैपुण्याचीच महती गाऊ लागतात. कलेचा जो मुख्य गाभा सौंदर्यदर्शनाचा क्षण अथवा अनुभूती तिच्याकडे दोघांचेही दुर्लक्ष होऊ लागते. सुज्ञ वाचकांच्या ध्यानात आले असेल की, मुख्य घटना बाजूला जाते व तिच्या स्मृतीचीच पूजा सुरू होते. प्रतिभेच्या

ऐवजी प्रतिभावंताचेच महत्त्व लोकांना वाटू लागते. लोकांचे राहू द्या; खरी शोकांतिका ही आहे की, कलावंतालाच आपली स्वतःची पूजा लोकांनी – मग त्यांत खरे रसिक असोत अगर नसोत – करावी असे वाटू लागते. तोही आपल्या अभिव्यक्तीला, शब्दांना वाजवीपेक्षा अधिक महत्त्व देऊ लागतो. कृष्णमूर्ती म्हणतात :–

Talent may become a curse. The self may use and entrench itself in capacities and then talent becomes the way and the glory of the self. The gifted man may offer his gifts to God, knowing the danger of them; but he is conscious of his gifts, otherwise he would not offer them, and it is this consciousness of being or having something, that must be understood. The offering up of what one is or has in order to be humble, is Vanity.

( Commentaries on Living II, P. 204–205)

मराठीत रूपांतर पुढीलप्रमाणे :–

" जिला आपण वरदान समजतो ती कलावंताची प्रतिभा शापसुद्धा ठरण्याचा संभव असतो. माणसाचा 'अहम्' त्याला निसर्गाकडून मिळालेल्या देणगीमध्येच घर करून असतो. मग या देणगीचा उपयोग हरतऱ्हेने आत्मगौरवाकरिता केला जातो. हा धोका ओळखून काही प्रतिभावंत आपली प्रतिभा ईश्वराच्या चरणी अर्पण करतात. पण हे समर्पण होत असतानासुद्धा, त्या प्रतिभावंतांना आपल्या अंगच्या शक्तीची जाणीव असते. अशी जाणीव नसती तर अर्पणाचा प्रश्नच येतो कुठे ? आपण कोणीतरी विशेष आहोत, आपल्या अंगी इतरांजवळ नसलेले असे काहीतरी आहे, ही भावनाच नीट समजून घेतली पाहिजे. या भावनेने केली जाणारी समर्पणाची क्रिया, विनीतभावातून होत नाही, अहंभावनेतूनच होते.

'मी' रहित असलेल्या प्रांतात प्रवेश करून सौन्दर्याची अनुभूती घेण्याची कला अथवा देणगी प्रतिभावंताजवळ असते. येवढेच नव्हे, तर सौन्दर्याचे जे दर्शन झाले, ते शब्दांकित, स्वरांकित, अथवा रेखांकित करण्याचीही कला त्याच्याजवळ असते. या दोन्हींपैकी पहिली जी शक्ती आहे, ती कलावंताला बहुतेक त्याच्या जन्माबरोबरच मिळत असावी. दुसऱ्या शक्तीबद्दल निश्चित असे काही सांगता येत नाही. पण दोन्ही शक्ती जवळ असल्या तरच 'प्रतिभावंत' हा जगापुढे येऊ शकतो. लहान अगर मोठ्या समाजात 'प्रतिभावंत' म्हणून एकदा का स्थान लाभले की त्या माणसाला स्वतःचे भलतेच कौतुक वाटू लागते. जवळ असणारे गुण निसर्गदत्त असोत अगर प्रयासप्राप्त असोत, अभिमान उत्पन्न करण्याचे काम दोन्हीही सारखेच करीत असतात. फक्त, "इतर बऱ्याच लोकांजवळ नाही असे सामर्थ्य मजजवळ आहे ना?" एवढीच पृच्छा मन करीत असते. या प्रश्नाला होकारार्थी उत्तर मिळाले की गर्वाला सुरुवात होते. कलावंताला पैसा व कीर्ती मिळू लागली की मग तो आपल्या अभिव्यक्तीच्या सामर्थ्याला फारच महत्त्व देऊ लागतो. मग सौन्दर्यापेक्षा स्वतःच्या शब्दांवर अथवा कलाकृतींवरच जास्त प्रेम तो करू लागतो. यामुळे स्वतःबद्दलची जी प्रतिमा ( Image ) त्याच्या चित्तात निर्माण होते तिचे संरक्षण व संवर्धन करण्यातच त्याचा जन्म जातो. सौन्दर्यपूजेचे रूपांतर मग आत्मपूजेत होते. हे असे झाले की कित्येकदा प्रतिभाही त्याला सोडून जाते.

कलावंताच्या जीवनात उत्पन्न होणारी ही एक अवघड समस्या आहे. कृष्णमूर्ती म्हणतात :–

"The man who plays the violin with artistry and keeps his eye on his fame, is not interested in the violin.

he is only exploiting it to be famous, the me is far more important than the music and so it is with the writer or the painter, with an eye on the fame. The musician identifies his me with what he considers to be beautiful music.

(Urgency of Change, P. 115).

कलावंताचे लक्ष कलेकडून कीर्तीकडे अथवा धनप्राप्तीकडे केव्हा वळेल, हे सांगता येत नाही. एका दृष्टीने असेही म्हणता येईल की, त्याचा अधःपात त्याचे पूजकच घडवून आणतात. ते त्याच्या भाषेला, लकबींना, फार काय त्याच्या पोषाखाला व इतर बाह्य कृतींनाही इतके महत्त्व देऊ लागतात की, " आपण देवदूतच आहोत " असे त्याला वाटू लागते. सौन्दर्याची अनुभूती मग कलावंताच्या व त्याच्या भक्तांच्या, दोघांच्याही हृदयांतून नाहीशीच झालेली असते. कलावंताचा अधःपात दुहेरी असतो. जे वरदान त्याला प्राप्त झालेले असते, त्यामुळेच तो इतर प्राकृत जनांपेक्षा स्वतःला श्रेष्ठ समजू लागतो. या श्रेष्ठतेचा उपयोग तो पैसा अगर प्रसिद्धी मिळविण्याकरिता जाणूनबुजून करू लागतो. मग इतर कलावंतांचा मत्सर, अपमान, त्यांच्या खऱ्या गुणांचे अवमूलन करणे, वगैरे प्रकार सुरू होतात. यामुळे त्याच्या जीवनातही अनेक नवे संघर्ष सुरू होतात. सामान्य माणसाच्या जीवनात संपत्तीच्या कमीजास्तपणामुळे असे हेवेदावे, धडपड, यशाने हुरळून जाणे अथवा अपयशाने खचून जाणे वगैरे प्रकार होतात. अगदी तसेच प्रकार त्याच्या जीवनातही सुरू होतात. तो इतरांसारखाच क्षुद्र बनतो. इतका की, केव्हा केव्हा 'सौन्दर्याची दिव्य अनुभूती आलेला इसम हाच का?' असा संभ्रम त्याच्या चहात्यांना पडतो. कलावंताची अहंमन्यता इतरेजनांच्या मानाने अधिक दाहक असते की काय, असा संशय काही उदाहरणें पाहून मला येतो. केव्हा केव्हा असे होत असावे की, कवी,

गायक, चित्रकार हे स्वतःला देवलोकाचे रहिवासी समजत असावेत; व मृत्युलोकातील हीनजनांवर कृपेचा वर्षाव करण्याकरिताच आपला अवतार आहे, अशी त्यांची समजूत असावी ! ही अतिशयोक्ती नाही. जनसंमर्दापुढे येताना, पाहा ना त्यांचा रुबाब व कृपादृष्टीची चर्या ! श्रोतेलोकांचा समुदाय जेवढा मोठा तेवढी त्या कलावंताची शानही मोठी. त्यांच्या मुद्रेवर अशा प्रसंगी जे समाधान दिसते ते कशामुळे असते ? लोकांची अभिरुची अधिक उन्नत होत चालली आहे ते जास्त रसिक होत आहेत म्हणून, की दुसऱ्या काही कारणाने ? या प्रश्नाचे खरे उत्तर त्या कलावंतालाच ठाऊक असते.

धन व कीर्ती यांच्या प्राप्तीच्या हेतूनेच जो कलेचा आविष्कार करतो त्याचे जीवन व कलावंत नसलेल्या लोकांचे जीवन एकाच पातळीवर सदैव असते, असे समजण्यास हरकत नाही. सामान्यांच्या समस्या याच त्याच्याही असतात. पण कृष्णमूर्तींच्या पहिल्या उताऱ्यात उत्पन्न केलेला प्रश्न फार मूलगामी आहे. ज्या प्रतिभावंताला आपल्या अंगी विशिष्ट प्रकारची प्रतिभा आहे अशी जाणीव असते, तोही आत्मकेंद्रितच असतो असे कृष्णमूर्ती म्हणतात. ही जाणीव असताना समर्पणाच्या अवस्थेत देखील तो कलावंत ‘ मी ’पासून मुक्त होत नाही, असे ते बजावतात. ते असा आग्रह का धरतात, याचा शोध घेतला पाहिजे. हा शोध, सौन्दर्याची अनुभूती म्हणजे काय, या विषयावर प्रकाश टाकील. एवढेच नव्हे, तर त्या शोधातून या अनुभूतीचे द्वार, कलावंत म्हणून जे जन्मले नाहीत त्या आपल्यासारख्या सामान्य लोकांकरताही उघडण्याचा संभव आहे.

सौंदर्य कशाला म्हणावे, हेच आपणांला समजत नाही. सौंदर्याचा अनुभव येऊन गेल्यानंतर तो कसा होता याबद्दल जी अभिव्यक्ती (expression) आपण करतो, तिलाच आपण ‘ सौंदर्य ’ म्हणून कवटाळतो. मदुरेचे

मीनाक्षीमंदिर पाहून आलेल्या मित्राचे वर्णन आपण ऐकत आहोत, अशी कल्पना करू या. ती सुंदर उत्तुंग गोपुरे, मंदिराच्या भिंतीवरले शिल्प व विशेषतः मीनाक्षीदेवीच्या मूर्तीचे सौंदर्य, हे सर्व तो शब्दांच्या मदतीने जणू हुबेहुब आपल्यापुढे उभे करू शकला, अशीही कल्पना करू. मीनाक्षी-मंदिराचे सौंदर्य याप्रमाणे आपल्या मनःश्चक्षूंपुढे साक्षात् उभे राहिले असा भास झाला, तरी प्रत्यक्ष डोळ्यांनी ते मंदिर पाहणाराला जी अनुभूती येते तिची सर या अनुभवाला येईल काय? या दोन अनुभवांमध्ये जेवढे अंतर आहे, तेवढेच अंतर त्या शिल्पकारांच्या हृदयातल्या सुंदरतेमध्ये आणि प्रत्यक्ष घडलेल्या मूर्तींच्या सुंदरतेमध्ये आहे. सौन्दर्याची अनुभूती जी कलावंताच्या हृदयात असते, तिला खरे महत्त्व आहे. त्याच्या चित्ताची अवस्था या अनुभूतीच्या वेळी जी होते, जी विशाल अथवा निर्हेतुक संवेदनक्षमता त्याच्या मनात प्रवेश करते, ती महत्त्वाची आहे. मग याचा अर्थ असा होतो की, अभिव्यक्ती ( Expression ) म्हणजे प्रतिभा ( creativity ) नव्हे. प्रतिभेचा खरा अर्थ सौन्दर्यदृष्टी ( Sense of beauty ) असा आहे. ' सुंदर वस्तू हाताने अथवा इतर साधनांनी निर्माण करण्याची कला ' हिलाच आपण ' नवनिर्मितीची शक्ती ' समजतो. यात आपली चूक होत आहे. अचाट कामे करून थक्क करून सोडणारा मल्ल डोळ्यांपुढे आणा. त्याचे ते पुष्ट दंड, भरलेली छाती, त्यांचा आकार अथवा डौलदारपणा, यांनाच त्या मल्लाची शक्ती म्हणता येईल काय? त्या अदृश्य शक्तीची जाणीव न ठेवता, नुसत्या त्या स्नायूंच्या आकारांचेच कोडकौतुक केले तर ते योग्य होईल काय? मल्लाच्या बाबतीत ही चूक सहसा कोणी करीत नाही; पण कलावंत आणि त्याचे पूजक एकच चूक नेहमी करतात. हृदयात जी संवेदना अनुभवाच्या वेळी असते ती बाजूला सारून ती ज्या शब्दांनी, स्वरांनी अथवा आकृतींनी व्यक्त होते, तिलाच ते

'नवनिर्मिती ( creation )' समजतात. बाहेरच्या शब्दांना अथवा कलाकृतीना असे गैरवाजवी महत्त्व आले की मग त्यातून आत्मपूजेची प्रवृत्ती मूळ धरू लागते. मग, 'माझी कविता श्रेष्ठ,' 'तुझी हलक्या दर्जाची,' 'मी ज्येष्ठ कलाकार,' 'तू अगदीच नवशिका, अपरिपक्व,' असा प्रकार सुरू होतो. मग, 'मला दिसले म्हणूनच ते सौन्दर्य' असाही आग्रह धरला जातो. मग प्रतिष्ठा कोणाची जास्त, हा वाद सुरू होतो. थोडक्यात सारांश असा की, सौन्दर्याची अनुभूती घेणाऱ्यालाच महत्त्व प्राप्त होते. त्याचे शब्दच आगळे वाटू लागतात. पण आगळेपणा, चित्त विशाल व संवेदनानुकूल होण्यात आहे. हे वरदान सर्वच माणसांना दिलेले आहे. जागृत अवस्थेत राहण्याचे जो ठरवील त्या प्रत्येकाला, 'दिव्य अनुभूती' येणे शक्य आहे. या अनुभूतीच्या मर्यादा व्यक्तिविशेषावर अवलंबून नाहीत. फक्त 'मी'चा पडदा दूर झाला पाहिजे.

कृष्णमूर्तींनी एका अर्थाने कलावंतांची मिरासदारी नष्ट केली आहे. नाही तरी, रसिक आणि कलावंत यांच्यामध्ये मूलभूत असा फरक नसतो, हे आपण वर पाहिलेच आहे. पण सौन्दर्याची अनुभूती कशातून येते, याबद्दल दोघांचाही गैरसमज सगळीकडेच दिसतो. कृष्णमूर्तींचे पुढील विवेचन फारच मोलाचे आहे :-

It's a lovely morning. The Sun-light is clear on the mountains, the new grass is coming up, and you see very clearly the beauty of the land. As one looks at all this extraordinary beauty and colour and light, there is a joy, there is a sense of freedom; and naturally one asks : What is beauty ? Is it something that is the outcome of some stimulation, an appreciation of an object, of a movement

of light, among the leaves ? And does it depend on one's mood, on one's education, or on one's own state of mind ?

Is beauty awakened by an object, or is beauty something entirely different ? Is there a state of mind which is awakened to beauty without the object, not the appreciation of a man-made thing or of nature, but is there beauty without the object ? Is there a sense of beauty, not only physical but much more deeply psychological, inward ? Without these mountains, without the light, without that clarity which exists especially in California – is there beauty beyond all that ? That sense of beauty can come only when the mind is completely at rest, quiet, undisturbed, and is not provoked or induced by circumstances, by social environment and education. And is that beauty personal ? Is not beauty something that comes when there is freedom, total freedom ? Without freedom, obviously, there is no peace. (Talks in U. S. A., 1966, P. 88)

मराठीत सारांश पुढीलप्रमाणे :-

सभोवारच्या या निसर्गसौन्दर्याकडे पाहत असताना आनंदाने अंतःकरण भरून येते. सर्व बंधनातून मोकळे झाल्याची भावना होते. मग सहजच यातून प्रश्न उत्पन्न होतो की, सौन्दर्य म्हणजे तरी काय ? बाहेरच्या कोणत्या तरी वस्तूमुळे चित्तात उद्‌भवणारा प्रक्षोभ, अगर या पर्णपुष्पांवर पडलेल्या प्रकाशासारख्या कोणत्यातरी वस्तूचे गुणग्रहण यांपैकी काहीतरी म्हणजे सौन्दर्य आहे काय ? या सौन्दर्याची अनुभूती स्वतःच्या त्या क्षणातल्या लहरीवर का अवलंबून आहे ? का ती संस्कारावर अवलंबून आहे ? का जन्मजात मनोवृत्तीमुळेच ती मिळू शकेल ?

सुंदर वस्तू पुढे असली तरच ही अनुभूती मिळू शकते, असे का आहे ? का या अनुभूतीमध्ये आगळेच काहीतरी आहे ? जीत मन गेले असताना वस्तुनिरपेक्ष अशी सौन्दर्याची अनुभूती त्याला येते, अशी एखादी अवस्था आहे का ? इंद्रियांकडून वस्तूच्या सौन्दर्याचा अनुभव येतो, पण त्यापेक्षा अधिक खोल असा फक्त मनालाच येणारा सुंदरतेचा अनुभव आणखी निराळा आहे काय ? ही समोर दिसणारी पर्वतराजी, डोळ्यांना सुखविणारा हा आल्हाददायक सूर्यप्रकाश --ज्याचे तेज कॅलिफोर्नियात विशेष असते तो – हे सगळे समोर दिसत आहे. पण त्यापलीकडचे असे सौन्दर्य आहे काय ? होय. असेही एक प्रकारचे सौन्दर्य आहे. पण त्याचे ग्रहण केव्हा होईल ? जेव्हा मन विश्रब्ध, शांत, अविचलित, असे असेल आणि त्यावर परिस्थितीचा, समाजाचा, अथवा शिक्षणाचा, कसलाही संस्कार राहिलेला नसेल, तेव्हाच त्या मनाला हे ग्रहण होईल. आणखी प्रश्न असा की, या सौन्दर्याची अनुभूती व्यक्तिगत आहे काय ? व्यक्तिमत्त्वाचे संपूर्ण बंध तुटतील, जेव्हा माणूस सर्व बाजूंनी स्वतंत्र होईल, तेव्हाच या नव्या सौन्दर्याचा अनुभव त्याला येईल; आणि हे तर उघड आहे की, पूर्ण स्वातंत्र्य प्राप्त झाल्याखेरीज मनाला शांती नाही.

ज्या सौन्दर्याची अनुभूती कृष्णमूर्तींना अभिप्रेत आहे, तिचा स्पर्श आपणाला परिचित असलेल्या श्रेष्ठ कलावंतांना होत असला पाहिजे, यात संशय नाही. पण त्या अनुभूतीचे क्षण संपताच हे कलावंत पुढे काय करतात, हे महत्त्वाचे आहे. "मला जो दिव्य अनुभव आला तो जगात इतर कोणाला येत नाही. म्हणूनच मी एक श्रेष्ठ मानव आहे" अशी भावना त्यांची होते; व त्या येऊन गेलेल्या अपरूप अनुभवाची उजळणी ते स्मृतीच्या मदतीने करू लागतात. गत अनुभवाचे पुन्हा होणारे हे स्मरण काही वेळा शब्दांकित केले जाते. क्वचित् प्रसंगी

असेही होत असेल की, अनुभव चालू असतानाच तो शब्दांकित अथवा रेखांकित केला जातो. पण नंतर गंमत अशी होते की, या अभिव्यक्तीलाच कवी अथवा चित्रकार भलते महत्त्व देऊ लागतो. कलाकृती जी त्याच्याकडून निर्माण होते तिच्याविषयी त्याला फार आसक्ती वाटू लागते. "तिचा निर्माता मी" ही भावना लगोलग आलीच! मग मूळच्या सौन्दर्यानुभूतीची जागा 'काव्य व कवी' अगर 'चित्र व चित्रकार' हे घेतात. अनुभूती तर केव्हाच निघून गेलेली असते. त्या अनुभूतीच्या प्रवाहातले काहीसे जलसिंचन रसिकांवर केले जाते, व ते स्वतः जर संवेदनाशील असले तर अनुभूतीच्या प्रांतात जाऊ शकतात. पण कलावंत व रसिक दोघेही समजतात की, शब्दात, चित्रात, अथवा शिल्पात सौन्दर्य आहे. ही अगदी चुकीची समजूत आहे. सौन्दर्याची फक्त अनुभूती असू शकते, ते वस्तूत नसतेच, असे कृष्णमूर्तींनी वरील उताऱ्यात अगदी ठामपणाने सांगितले आहे.

'कला व कलावंत' याबद्दलच्या आपल्या कल्पनांना धक्का देणारी ही सौन्दर्यसमीक्षा आहे. 'मी' रहित असलेल्या प्रांतात प्रवेश करून परत आल्यानंतर कलावंतांचे जीवन कोणत्या प्रकारचे होते या प्रश्नाकडे आजवर आपण फारसे लक्षच दिलेले नाही. खुद्द कलावंतालाही या संशोधनाची गरज कित्येकदा वाटत नाही. लोकांकडून त्याच्यावर होणारा स्तुतीचा वर्षाव, त्याची व्यक्तिपूजा यांतच तो मशगूल होऊन जातो. ( काही हीन कलावंत तर धनाचा व कीर्तीचा पाठलाग करण्यातच धन्यता मानतात. ) पण खरी शोकांतिका ही आहे की, ज्या माध्यमातून कलेची अभिव्यक्ती होते, तीच आपली कला असे कलावंतही समजू लागतो. तो येथेही थांबत नाही. आपले शब्द, आपले काव्य व इतर कलाकृती यांच्यावर तो कमालीचे प्रेम करू लागतो. त्यांच्यावर ही अशी आसक्ती एकदा जडली की, कलाकाराच्या 'अहम् - पोषणा'ची

भरपूर व्यवस्था झाली, असे समजण्यास हरकत नाही. म्हणून प्रतिभावंत माणसे, विशेष गर्विष्ठ व अधिक मत्सरी असल्याचे केव्हा केव्हा आढळते. अर्थात् याला काही अपवादही असतात. मुद्दयाची गोष्ट ही आहे की, माझी प्रतिभा मग माझी संपत्ती ( property ) बनते. तिची तुलना इतरांच्या प्रतिभेशी सुरू होते; एवढेच नव्हे, तर ' ती जाईल का काय ? ' अशी भीतीही व्यथित करू लागते. मग तो कलावंत आणि आम्ही सामान्यजन एकाच पातळीवर येतो. कलावंताच्या जीवनातल्या समस्या आमच्यासारख्याच होतात.

कलेने जे आत्मविस्मृतीचे दार उघडले जाते ते बंद करून, आत्म-केंद्रित होण्याची जी घाई कलावंताला होते तिने त्याच्या कलेचा रसिक जनांवरचा प्रभावही कमी कमी होऊ लागतो. नंतर तो कलावंत आपल्या पूर्वीच्या दिवसांच्या आठवणींवरच जगू लागतो.

सौन्दर्याची अनुभूती म्हणजेच प्रेमाची अनुभूती, असे कृष्णमूर्ती सांगतात येवढेच नव्हे, तर प्रेम हृदयात उत्पन्न न झाले तर ते जगणेच नव्हे, असेही ते सामान्यजनांना व कलावंतांना बजावतात. सामान्यांची काय व कलावंतांची काय, चूक एकच होत आहे, असे दिसते. ती अशी की, गत अनुभवांना गच्च धरून ठेवणे. पण यामुळे नित्यनूतन सौन्दर्याची अनुभूती दोघांनाही मिळत नाही. कृष्णमूर्तींचे शब्द असे आहेत :-

" Dying everyday to everything that we know is love, otherwise one cannot love ... ... .. ... And it is only when you die to everything, to every experience that you have had, that you are living. Then living is a movement, fresh, new, innocent, every minute of the day fresh; and to die to the past is to live totally at altogether a different dimension. (Talks in U. S. A., 1966, P. 78)

प्रतिभावंताचे लेणे अपरूप तर खरेच, पण नित्यनूतन अशा जीवन-प्रवाहात स्वतःला लोटून देणे, हे त्याहूनही मोलाचे आहे. प्रतिभावंता-जवळच सौन्दर्याचा अमूल्य ठेवा असतो, अशातला भाग नाही. निसर्गाने त्याच्यावर जरा अधिक कृपा केलेली असते, एवढेच. पण ही कृपा तो पायदळी तुडवू शकतो. उलटपक्षी, जन्माने कलावंत नसलेले आपण जर जागरूक झालो, तर आपलाही प्रवेश त्या दिव्य अनुभूतीच्या जगात होऊ शकेल. कृष्णमूर्तींचा संदेश हा असा आहे.

□ □ □

## १

# मी व माझे एकलेपण

रंगभूमीवरचा स्वगत भाषणांचा काळ फार दिवसांपूर्वीच संपला. त्याच्या योगाने कलेची हानी होते असे वाटले असावे. पण मला स्वगत भाषणे फार आवडत. अशाकरता की, अशी भाषणे प्रत्येकजण दिवसाच्या बऱ्याचशा भागात सारखी करीतच असतो. मात्र ती इतरांना ऐकू येत नाहीत. पुढे दिल्याप्रमाणे स्वगत भाषणे होत नाहीत, असे का वाचकांना म्हणावयाचे आहे ?

एका श्रीमंत माणसाचे स्वतःशीच चालणारे हे चिंतन पाहा :–

" लोकांना वाटते, मला काही कमी नाही. खुळे बिचारे ! माझे दुःख त्यांना काय माहीत ? नौकरचाकर आहेत, बायकामुले आहेत, माझ्याजवळ पैसा असल्यामुळे पुढेपुढे करणारे नातेवाईक आहेत, सर्व काही आहे. मोटारगाड्या आहेत, राजवाड्यासारखा बंगला आहे, उंची फर्निचर आहे, सर्व काही भरपूर आहे. पण तरीसुद्धा कसला तरी उणे-पणा चित्तात आहे. कुठेच मन लागत नाही, जिवाला चैन पडत नाही. का बरे असे व्हावे ? काही कळत नाही. छट् ! उगीच वेडयासारखे विचार

मनात आणीत बसलो. चला, क्लबात जावे हेच बरे. त्याशिवाय हे विचार जाणार नाहीत. " मग ते श्रीमंत गृहस्थ शोफरला बोलावतात, मोटार काढायला सांगतात. ती काळ्या रंगाची ' इंपाला गाडी ' मोठ्या रुबाबात गॅरेजमधून बाहेर येते. नुकतीच घेतलेली ती कोरी करकरीत गाडी शेठजींच्या डोळ्यांसमोर येते. तिच्याकडे पाहत असताना शेठजींच्या मुद्रेवर स्मित दिसू लागते. मघाचे विचार विसरतात. पण पुन्हा ते येतील या भीतीने जरा घाईनेच ते गाडीत बसतात; व " जोरात चल, " म्हणून ड्रायव्हरला सांगतात. क्लबात गेल्यावर मात्र ते फारच खुषीत येतात. सगळेच, " या शेठजी, या शेठजी " असे म्हणतात; व नेहमी त्यांच्याबरोबर पत्ते खेळणारे ठराविक तीन इसम त्यांना एका कोपऱ्यातल्या टेबलाकडे नेतात व डाव सुरू होतो.

दरिद्री माणसाचे, एका कंपनीतल्या कारकुनाचे, हे स्वगत पाहा :–

" काय करावे, जिवाला स्वस्थता नाही. काय माझ्या जिण्यात अर्थ आहे ! मरमर काम करावे, पण तरीसुद्धा धड पोटाला अन्न व अंगभर वस्त्र मिळत नाही. आता कालच पगार झाला आहे हे खरे. आठ-पंधरा दिवस तशी काही पंचाईत नाही. पण माझेच नशीब असे फुटके का ? माझ्याबरोबरचा तो जगदाळे, वर्गात असताना किती ' ढ ' होता ! पण आता तो झाला आहे मंत्र्याचा पी. ए. ! पगारही पाचशेच्यापुढे आहे. शिवाय जागा फुकट. काय चैन आहे बेट्याची ! छे, फारच उदास वाटायला लागले. घरात बायको आहे, दोन मुले आहेत, पण असे काही विचार आले की कुणाशीच बोलू नये वाटते. नाहीतरी कोण कुणाचे असते ? ' सगळे दिल्याघेतल्या 'चे म्हणतात, ते काही खोटे नाही. आमचे सासरे तर आमच्याकडे ढुंकून बघत नाहीत. त्यांना आमचे साडूच फार प्रिय आहेत. दर रविवारी मोटारीतून एक खेप त्यांच्याकडे मारतातच. बरोबर आहे. त्यांना पगार आहे सातशे व

मला रुपये अडीचशे. मग असे होणारच. पण पत्नीने तरी संसाराला हातभार लावावा ! तेही नाही. श्रीमंताची लेक, शिवाय नौकरी करणे म्हणे तिच्या जुन्या मताच्या वडिलांना आवडत नाही. शेजारच्या करवंद्यांची मंडळी नाही का नौकरी करीत ? आणि बोलण्यात तरी किती चतुर आहे ती बाई ! आणि मी हे रत्न गळ्यात बांधून घेतले ! जाऊ द्या, डोके फारच भणाणू लागले. आता सिनेमाला जावे, म्हणजे थोडे बरे वाटेल. "

रस्त्याच्या कडेला बसलेला, रोजगार मिळण्याची वाट पाहणारा हमाल फारच खिन्न दिसत होता. त्याचेही काहीतरी स्वगत चाललेच असले पाहिजे. पण ते इतके लांब नसावे. शेजारीच बसलेल्या दुसऱ्या हमालाला अचानक काम मिळालेले पाहताच त्याच्या कपाळाला आठ्या पडल्या. बस्स, हेच त्याचे स्वगत !

दहा वर्षे सतत मुख्यमंत्रीपदावर असलेल्या माणसाचे स्वगत कसे असेल ?

" आजचा दिवस फारच कंटाळवाणा चालला बुवा ! कुठेच मन रमत नाही. निवडणुकीची धमाल चालू असली म्हणजे बरे असते. मनाला काहीतरी व्याप असतो. आता वेळतरी कसा घालवावा ? मंत्रि-मंडळावर पहिल्या वर्षात केवढी गंडान्तरे आली होती ! पण हे दुसरे वर्ष आता संपत आले. कसली धावपळ नाही, धांदल नाही, काही नाही. आज काही कामही नाही. चिठ्ठयाचपाट्या नाहीत, शिष्टमंडळे नाहीत, मोर्चे नाहीत. सर्व काही शांत आहे. पण मनात काही प्रश्न डोकावतातच. कशाला या भानगडीत मी पडलो ? मी मिळविले तरी काय ? राजकारणात प्रथम जेव्हा मी पडलो तेव्हा केवढ्या आशा मी बाळगल्या होत्या ! माझे मोहक वक्तृत्व व बुद्धिमत्ता यांचा उपयोग करून एक नमुनेदार समाज निदान या राज्यात तरी मी निर्माण करीनच, असे मला वाटले होते. पण

कसचे काय अन् कसचे काय! समाज आहे तिथेच आहे. नुसता वाईटपणा मात्र माझ्या पदरात पडला आहे. माझे सबंध आयुष्य वायाच गेले असे मला वाटते. फक्त मी अनेक शत्रू मात्र मिळविले आहेत. विधिमंडळात, सचिवालयात तोंड भरून माझी स्तुती करणारेच सदा भेटतात. पण माझ्या अंतःकरणातली व्यथा कुणाजवळ बोलण्याची सुद्धा सोय नाही. हा सगळा फापटपसारा बाजूला केला, तर माझ्या जीवनात उरतेच काय? निव्वळ भकासपणा, अंधार, वैफल्य, दुसरे काही नाही. मला कुणी मित्र नाहीत, हितचिंतक नाहीत. मी कुणाचा नाही व कुणी माझे नाही. जिव्हाळा, आपलेपणा कुठे दिसतच नाही. आज अगदी एकेकटेच वाटू लागले आहे. 'एकलेपणाची आग' काय असते याची मला आज जाणीव होत आहे. इतके दिवस हा उदासपणा डोकावू लागताच मी त्याला बुडवून टाकीत असे. कुठेतरी दौरा काढ अगर उद्घाटनाला जा, असे मी करीत असे. ते मला जमत असे. पण आता ही आग अगदी असह्य होत आहे. तिच्यापासून दूर कसे पळून जावे, हेच मला समजेनासे झाले आहे. सच्चिदानंदबाबांच्या मठात गेल्याखेरीज चित्त शांत होणार नाही."

स्वगताच्या वरील सर्व प्रकारांत कितीतरी साम्य आहे! माणूस उच्चपदावर असो अगर समाजाच्या अगदी खालच्या थरात असो, त्याला केव्हातरी अशी जाणीव होते की, आयुष्यभर जमा केलेली नाती निरर्थक आहेत! जिचा एवढ्या हिरीरीने संग्रह केला ती संपत्ती अथवा सत्ता, जीवनाचा मुख्य भाग केव्हाच होऊ शकत नाही. भोवताली किती जरी उंची झालर लावली, तरी जीवनाचे वस्त्र जीर्ण, फाटके-तुटके असेच राहते. कसलीतरी उणीव जीवनात राहातेच. ही उणीव खरे पाहिले असता मनाच्या आंगचीच असते. ती मनाच्या यंत्रणेतच असते. पण तिची जाणीव होऊ लागताच माणूस तिची कारणे शोधू

लागतो, आणि भरपूर कारणे त्याला सापडतातही. कुणाला आपले बालपणीचे सोबती पुढे गेले असे वाटते, व आपलीच आर्थिक परिस्थिती इतकी क्रूर कशी, असा आक्रोश चित्त करू लागते. तुलनेमध्ये सर्व जगाच्या मागे आपण कसे पडलो हा सवाल मनात उठतो. त्या क्षणाला प्रत्यक्ष बोच जरी कोणत्या खऱ्या दुःखाची नसली, तरी भूत व भविष्य यांची मदत घेऊन व विशेषतः इतरांकडे पाहून स्वतःच्या वेदनेचे, उदासपणाचे मूळ कारण सापडले असा भास माणसाला उभा करता येतो. पण बहुतेक सर्वजण एकलेपणाच्या व्यथेचे एवढे दर्शन झाले की पलायन ( escape ) करू लागतात. मनाला कशात तरी बुडवून टाकू पाहतात. मग तो एखादा छंद, व्यसन असेल अगर समारंभ असेल.

कृष्णमूर्तींचे वर्णन किती समर्पक आहे, पाहा :

"What a strange thing is loneliness, and, how frightening it is; we never allow ourselves to get too close to it; and if by chance we do, we quickly run away from it. We will do anything to escape from loneliness, to cover it up. Our conscious and unconscious preoccupation seems to be to avoid it or to overcome it. Avoiding and overcoming loneliness are equally futile; though suppressed or neglected, the pain, the problem is still there. You may lose yourself in a crowd, and yet be utterly lonely; you may be intensely active but loneliness silently creeps upon you; put the book down and it is there. Amusements and drinks cannot drown loneliness; you may temporarily evade it, but when the laughter and the effects of alcohol are over, the fear of loneliness returns. You may be ambitious and successful, you may have vast power over others, you may be rich in

knowledge, you may worship and forget yourself in the rigmarole of rituals, but do what you will, the ache of loneliness continues. You may exist only for your son, for the Master, for the expression of your talent; but like the darkness, loneliness covers you ....... Loneliness is the awareness of complete isolation; and are not our activities Self-enclosing? ...... Is not our whole tendency to isolate ourselves, to divide and separate? The very activity of the self, at whatever level, is the way of isolation; and loneliness is the consciousness of the self without activity. Activity, whether physical or psychological, becomes a means of self-expansion; and when there is no activity of any kind, there is an awareness of the emptiness of the self. It is this emptiness that we seek to fill and in filling it we spend our life, whether at a noble or ignoble level......... There is no entity separate from craving; there is only craving, there in no one who craves..........The entity who tries to fill or run away from emptiness, incompleteness, loneliness, is not different from that which he is avoiding; he is it. He cannot run away from himself; all that he can do is to understand himself. He is his loneliness, his emptiness; and as long as he regards it as something separate from himself, he will be in illusion and endless conflict.

( Commentaries on Living I, P. 103, 104, 105 ).

मराठीत सारांश पुढीलप्रमाणे :–

" एकलेपणाची व्यथा झाकून ठेवण्याकरिता हरतऱ्हेचे प्रयत्न आपण करतो. म्हणजे ती हृदयात उद्‌भवली की तिच्यापासून आपण पलायन करतो. पण आपण हे विसरतो की हा सर्व प्रयत्न व्यर्थ आहे. ती

व्यथा मग तळाशी जाते. तुम्ही हजारो लोकांच्या समुदायात जरी असला तरी खरे तुम्ही एकटेच असता. तुम्ही करमणुकीत मनाला गुंतविले, नशेत बुडविले, तरी एकलेपणाची आग विझत नाही. पुन्हा ती डोके वर काढतेच. स्वतःच्या मुलाकरिता, गुरूकरिता अथवा कलेच्या अभिव्यक्तीकरिता तुम्ही सर्वस्व जरी अर्पण केले असले, निव्वळ त्याकरताच जीवन जरी वाहिले असले तरी एकलेपणाची व्यथा तुम्हांला सोडीत नाही. रात्र पडली की नकळत अंधार येतो, तशी ती आपली छाया तुमच्यावर टाकतेच. ही एकलेपणाची व्यथा म्हणजे आहे तरी काय? सर्व जगापासून फटकून राहण्याची वृत्ती, आत्मकेंद्रित होण्याची वृत्ती आपणा सर्वांमध्ये असते. एकलेपणाची व्यथा ही त्या वृत्तीचाच परिपाक आहे. आपला 'अहम्' कोणत्या जरी पातळीवर असला तरी त्याला एकच कार्य करता येते. ते कार्य म्हणजे स्वतःला वेगळे पाडण्याचे. जेव्हा हा 'अहम्' मनात संपूर्ण जागृत असतो पण क्रियारत नसतो, तेव्हा एकलेपणाची भावना उदय पावते. जेव्हा आपण शरीराने अथवा मनाने क्रियाशील असतो तेव्हासुद्धा 'अहम्'चाच परिपोष होत असतो; व जेव्हा ही क्रिया थांबलेली असते तेव्हा 'अहम्'चा पोकळपणा आपल्या लक्षात येतो. ही पोकळी भरून काढण्याकरिता जन्मभर आपण नानाप्रकारचे खटाटोप करीत असतो. पण हे सर्व जरी खरे असले, तरी पोकळी भरून काढीन म्हणणारा अगर पलायन करणारा हा त्या पोकळीपासून भिन्न नसतो. पोकळी आणि ती भरून काढणारा एकच असतो. म्हणूनच एकलेपणापासून दूर जाता येत नाही. यावर उपाय एकच आहे. 'अहम्'ने स्वतःलाच समजून घेणे हा तो उपाय होय. 'तो' आणि 'त्याचा एकलेपणा' या दोन गोष्टी नाहीत. जोपर्यंत ही द्वैतभावना कायम आहे, तोपर्यंत अनेक भ्रमांची उत्पत्ती व विविध संघर्ष अटळ आहेत."

कृष्णमूर्तींच्या शब्दांची मदत घेऊन आपण आपल्या एकलेपणाकडे अवधान दिले पाहिजे. एकलेपणाचा प्रादुर्भाव होताच त्याच्याकडे पाठ फिरवून धूम ठोकण्याची सवय आपणांला लागली आहे. जरा थांबून, " हा एकलेपणा आहे तरी काय ? असा प्रश्न आपण कधीच विचारीत नाही. मग व्यसनांकडे वळ, नाहीतर गिरिकंदरात जाऊन बैस, एवढेच आपणांला माहीत आहे. याने एकलेपणा दृष्टीआड झाल्यासारखा वाटतो. पण आपल्या खोलीतच कोणत्यातरी बिळात लपलेला साप जसा केव्हा बाहेर येईल याचा नेम नसतो, तसे या एकलेपणाचे आहे. तो आपली छाया पुन्हा केव्हा टाकील हे सांगता येत नाही. मग पुन्हा पलायन, दुसरे काय ? पलायनाचा प्रकार बदलून हे संकट टळते का, असेही केव्हा केव्हा पाहिले जाते.

एकलेपणाशी सामना करण्याची गरज पडू नये, याकरताच व्यसनाकडे धाव घेण्याची प्रवृत्ती माणसात उत्पन्न होते. हे जर खरे असले तर मला वाटते की हा शोध फारच महत्त्वाचा आहे. अर्थात् कृष्णमूर्ती म्हणतात म्हणून नव्हे; तर व्यसनाकडे वळताना निरीक्षण करून हा असा शोध लागतो का, हे ज्याचे त्याने पाहिले पाहिजे. निव्वळ अज्ञानामुळे अथवा भ्रमामुळे एखाद्या संकटाला भिऊन आपण पळत होतो असे जर माणसाला कळले तर त्याचे भय नाहीसे होईल, नाही का ? भय नष्ट झाले तर त्यातूनच उद्भवणारी व्यसनप्रवृत्ती आपोआपच विलयास जाईल, नाही का ? व्यसनापासून माणसांचे रक्षण कसे करावे ही आधुनिक युगात वरचेवर अधिकच कठीण होत चाललेली समस्या यामुळे सुटण्याच्या मार्गाला लागेल, अशी खात्री वाटते. एकलेपणाबद्दलचे कृष्णमूर्तींचे संपूर्ण विवेचन समजण्यास जरा कठीण आहे. पण या विवेचनाचा वरील एक भाग जरी समजला - म्हणजे उमजला - तरी बराच कार्यभाग होईल असे वाटते.

'मी' आणि 'माझा एकलेपणा,' असा भेद उत्पन्न झाला की पुन्हा अडचणी उत्पन्न होतात. 'मी' आणि 'माझी वासना,' या दोन वस्तू मानल्या की दमनाखेरीज दुसरा उपायच राहत नाही· दमनाने संपूर्ण वासना ( all craving ) विलयास जात नाही, तिच्या जागी दुसरी वासना येते; नाही तर कधीही न संपणारा संघर्ष सुरू होतो. वासनेच्या बाबतीत जे होते, अगदी तेच एकलेपणाच्या भावनेबद्दलही अनुभवाला येते. ही भावना जागृत होणे, हे एका दृष्टीने वरदान आहे. इतर आव्हाने माणसाला फारसे जागृत करीत नाहीत. पण, "मी कुणाचा नाही व माझे कोणी नाही, मी अगदी एकटा आहे," अशी जाणीव जर खरोखरच तीव्र स्वरूपात झाली, तर सत्य आणि स्मृती यांच्यामधला विवेक माणसात प्रकट होणे अगदी शक्य आहे. कारण, पलायन हे नेहमी असत्याकडे असते; ते स्मृतीतून पुढे येणाऱ्या भूत-कालाकडे अथवा भविष्याकडे असते. नाहीतर गतानुभवाच्या पुनरा-वृत्तीतून अपेक्षिल्या जाणाऱ्या सुखाकडे (pleasure) ते असते. पला-यनाची व्यर्थता जर एकलेपणाच्या अनुभूतीने आपणांला दाखविली, तर यापेक्षा आणखी चांगली गोष्ट कोणती ?

एकलेपणाची समोरासमोर गाठ घेतली व त्या अवस्थेत सहजगत्या राहिले की त्या अवस्थेचेच एकाकीपणात ( aloneness ) रूपांतर होते, असे कृष्णमूर्तींना सांगावयाचे आहे. माणसाने एकलकोंडे नव्हे, पण एकाकी जीवन जगण्यास शिकले पाहिजे. हे 'एकाकीपण' संन्यासामधून जन्माला येत नाही. आत्मक्लेशाचाही त्याच्याशी संबंध नाही. सर्व हेतूंची निवृत्ती झाल्यावर, वासनांच्या मागे धावणे संपल्यावर, सर्व ध्येयांची परिसमाप्ती झाल्यावर जी अवस्था येते ती ही एकाकी अवस्था (State of aloneness) होय. एखादा विशाल वृक्ष अगर सुंदर फूल नुसते जगते, तशी ही अवस्था आहे. त्या अवस्थेत कुणाचा अथवा

कशाचाही विरह ( separation ) नसतो. कारण, जीवनातली द्वैतभावनाच मावळलेली असते. त्या अवस्थेचा अज्ञात अशा सर्वव्यापी सत्याशी साक्षात् संबंध जोडला जातो. हेच कृष्णमूर्तींनी हृदयाचा ठाव घेणाऱ्या पुढील शब्दांत सांगितले आहे :-

" This aloneness is not aching, fearsome loneliness. It is the aloneness of being it is uncorrupted, rich, complete. That tamarind tree has no existence other than being itself. So is this aloneness. One is alone, like the fire, like the flower, but one is not aware of its purity and of its immensity. One can truly communicate only when there is aloneness. Being alone is not the outcome of denial, of self-enclosure. Aloneness is the purgation of all motives, of all pursuits of desire, of all ends........................Aloneness is indivisible and loneliness is separation. That which is alone is pliable and so enduring. Only the alone can commune with that which is causeless, the immeasurable. To the alone, life is eternal; to the alone there is no death. The alone can never cease to be.

( Commentaries on Living I, P. 17 and 18 ).

□ □ □

# १०

# जेव्हा नाती संपतात तेव्हा!

अतिशय आजारी असलेल्या दोन माणसांना भेटण्याकरिता मी एकाच दिवशी गेलो होतो. सकाळी ज्यांच्याकडे गेलो ते चिंतूकाका वयाने सत्तरीच्या पुढे होते. चिंतूकाकांचा प्रपंच म्हणजे एक नमुनेदार प्रपंच, असे उद्‌गार आमच्या शहरातल्या बऱ्याच लोकांच्या तोंडून ऐकायला मिळत; आणि ते खरेही होते. चिंतूकाकांचा पिढीजात धंदा सावकारीचा होता, पण त्याला कापडाच्या व्यापारांची जोड त्यांनी पूर्ववयातच दिली होती. शिवाय, अनेक कंपन्यांच्या एजन्सीज् त्यांनी मिळविल्या होत्या. होता होता व्याप इतका वाढला की, 'यांच्या पश्चात् हे सर्व संभाळणार कोण ?' असा प्रश्न काही हितचिंतक एकमेकांना विचारीत. पण त्यांचे दोन्हीही मुलगे सुविद्य व कर्तबगार होते. घरच्या सर्व धंद्यांत त्यांचे चांगले लक्ष होते. चिंतूकाकांच्यापेक्षाही अधिक दक्षतेने ते सर्व व्यवसाय सांभाळीत होते. थोडक्यात सांगायचे म्हणजे चिंतूकाकांना कसलीही काळजी नव्हती.

चिंतूकाकांचा आजार मात्र घरच्या सर्वच माणसांची काळजी वाढवीत

होता. वेदना अशा नव्हत्या, पण चिंतूकाका इतके खंगत चालले होते की, पक्षी पिंजऱ्यातून केव्हा उडून जाईल याचा नेम नव्हता. वाईट असे होते की, खुद्द चिंतूकाकांनाच याची कल्पना आली होती. मला ते म्हणाले, " दोन दिवस फिरकला नाहीत ? आज तुम्ही आला नसता तर उद्या गाठ पडली नसती. " हे शब्द उच्चारताना त्यांचा चेहरा फटफटीत पडला व अंगाला थरकाप सुटला. ' काहीतरी भयंकर असे लवकरच होणार आहे, ' असे त्यांची मुद्रा सांगत होती. माझ्या मनात विचार आले, " या गृहस्थाला मृत्यू नको का वाटतो ? आपल्या मृत्यूने इतर कुणाची हानी होईल म्हणून, का स्वतःची होईल म्हणून ? " चिंतूकाकांच्या पश्चात् त्यांच्या घरात कसलाही गोंधळ, कसलीही अव्यवस्था उत्पन्न होण्याचा अजिबात संभव नव्हता. मग हे दुःख का ? चिंतूकाकांचे स्वतःचेच कसले तरी नुकसान होण्याची भीती त्यांना वाटत असावी. का मृत्यूनंतरची अवस्था त्यांना भयप्रद वाटत होती ?

संध्याकाळी मी ज्यांच्याकडे गेलो ते सदूभाऊ माझे बालमित्र. अत्यंत दुर्दैवी माणूस; पण करारी स्वभाव आणि कष्टाळू शरीर यांच्या मदतीने खस्ता खात खात त्यांनीही साठी मागेच ओलांडली होती. त्यांची पत्नी दोन मुलगे त्यांना देऊन ऐन तिशीतच वारली. नंतर त्यांनी लग्न केले नाही. " माझे कसे का होईना, पण मुलांचे वाटोळे होऊ देणार नाही. " असे उद्‌गार त्यांनी त्या वेळी काढले होते. त्या वेळची त्यांच्या डोळ्यांतली चमक माझ्या अजून लक्षात होती. त्या मुलांना त्यांनी आईचे कष्ट व जिव्हाळा दिला व बापाचा आधार दिला. त्यांचे संगोपन, शिक्षण त्यांनी आपल्या कुवतीप्रमाणे नव्हे, शक्तीच्या बाहेर खपून पुरे केले. त्यापायी त्यांना कर्ज झाले, नाही ती मानहानी सोसावी लागली. श्रमांमुळे शरीर रोगग्रस्त झाले, अर्धांग निकामी झाले. या अशा अवस्थेत ते गेली पाचसहा वर्षे अंथरुणाला खिळून होते. पण ही

पाचसहा वर्षे त्यांनी कंठली कशी, याचेच मला नवल वाटत असे. कारण त्यांचे दोन्ही मुलगे त्यांना सांभाळीत नव्हते. ते नौकरीच्या गावी राहत होते व त्यांच्याशी इतके फटकून वागत की, पत्राने देखील क्षेमकुशल कळवीत नसत किंवा विचारीत नसत. सदूभाऊंनी एक म्हातारा नौकर स्वतःची देखभाल करण्याकरिता नुकताच ठेवलेला दिसत होता. कारण आधीच्या खेपेला तो नव्हता. त्याच्या अगोदर, त्यांच्या चुलतबहिणीचा एक मुलगा त्यांच्याजवळ मधूनमधून दिसत असे. पण तेच सांगत की तो अत्यंत उनाड होता. त्यांची देखभाल मर्जीला आली तर व येईल तशी तो करीत होता. कित्येक दिवस तो बेपत्ता असे; आणि विशेष असे की, त्याच्या आईबापांच्या इच्छेच्या विरुद्ध तो येथे राहत असे. कारण, सदूभाऊंसारख्या निर्धन माणसाची सेवा करण्यात त्या मुलाने आपले अमूल्य आयुष्य वाया घालवू नये, असे त्याच्या आईबापांचे मत होते. कसेतरी रखडत, धडपडत सदूभाऊ आपले दिवस कंठीत होते. मी गेलो त्या वेळीच सदूभाऊंच्या घरातून एक सावकार बाहेर पडला. जाताना त्याने उच्चारलेले अपशब्द ऐकून मला कसेसेच वाटले. मी आत गेलो तेव्हा सदूभाऊंनी तोंडावर पांघरूण घेतले होते. मी आल्याचे कळताच त्यांनी पांघरूण बाजूला केले व डोळ्यांतून पाझरणारे अश्रू चटकन पुसून टाकले. सदुभाऊंशी बराच वेळ मी बोलत बसलो. सावकाराबद्दलचा विषय मी काढला नाही, व सदूभाऊंनीही त्याला स्पर्श केला नाही. सदूभाऊ एकच गोष्ट पुन्हा पुन्हा बोलत होते. ते म्हणाले, " काल डॉक्टर आले होते, त्यांनी सगळी आशा सोडली. मला ते म्हणाले की, तुम्ही एकटे आहात म्हणून तुम्हांलाच सांगितले पाहिजे की, काही निरवानिरव करायची असली तर लवकर करून टाका. तुम्ही आता दोनतीन दिवसांचे सोबती आहात. हे ऐकल्यापासून माझ्या जिवाला चैन नाही. छाती

सारखी धडधडते आहे. इतक्या लवकर माझी अखेरची वेळ येईल असे मला कधीच वाटले नव्हते. मला आयुष्यात कधीच सुख मिळाले नाही. माझ्या वाट्याला कष्ट व अश्रू यांखेरीज काही आलेच नाही. पण ' हे सर्व सोडून जावे, ' असे वाटत नाही. मरणाचे दुःख माझ्यासारख्या माणसाला का व्हावे, हेच कळत नाही. "

खरोखरच, " वरील दोघांनाही मरणाचे दुःख का व्हावे ? " हा प्रश्न वाटतो तितका सोपा नाही. मुले लहान आहेत, संसार अर्ध्यावर आला आहे, अशा वेळी मरण समोर दिसेल तर त्याच्या परिणामाने मनाचा थरकाप होणे अगदी साहजिक आहे. एखाद्या महान देशाची जबाबदारी शिरावर आहे, देश आणीबाणीच्या अवस्थेतून जात आहे, देशावर प्राणापलीकडे प्रेम आहे, अशा एखाद्या नेत्याला मरण समोर पाहून, ' आता देशाचे कसे होईल ' ही घोर चिंता लागणे स्वाभाविक आहे. तसेच एखादा अडाणी माणूस, ' शरीर हेही यंत्र आहे व सर्व यंत्रे झिजतात व मोडकळीस येतात ' हे न समजल्यामुळे मरणाच्या कल्पनेमुळे घाबरा होणे शक्य आहे. पण चिंतूकाकांच्या सर्व जबाबदाऱ्या उत्तम रीतीने पार पडल्या असताना त्यांनी मरणाचा धसका का घ्यावा ? तसेच, ज्यांच्या जीवनात संग्रह फक्त हालअपेष्टांचाच झाला, त्या सदूभाऊंनी ते हाल संपविणाऱ्या क्षणाचे आनंदाने स्वागत का करू नये ? कुणीच मरणाच्या भीतीपासून मुक्त नाही, असे का ?

मरणाबद्दल जेव्हा जेव्हा चर्चा निघते तेव्हा पुनर्जन्म, स्वर्गप्राप्ती अशा शब्दांचा उच्चार होतो. प्रघात असा आहे की, ' मरणानंतर कोणत्या अवस्थेत आपले दिवस जातील एवढीच काय ती काळजी माणसाला आहे, ' असे गृहीत धरून या विषयाबद्दल बोलावयाचे. पण मरणोत्तर स्थितीबद्दल कुतूहल असणे निराळे, व ते येऊन ठेपल्यानंतर शांतपणे त्याचा स्वीकार करणे निराळे. या स्थितीबद्दल चर्चा होते ती बहुधा

निरोगी अवस्थेत. तो क्षण प्रत्यक्ष आला असताना माणूस गडबडल्याशिवाय राहत नाही. काही वेळा तर असे दिसते की, परलोकगमनाबद्दलची शास्त्रवचने तोंडाने म्हणत असताना देखील चित्त भयग्रस्तच असते. या भयाची तीव्रता त्या वचनांनी काही कमी होते, असे सुद्धा दिसत नाही. म्हणूनच ' मरणानंतर प्रत्येक माणसाचे काय होते, ' याबद्दलची नक्की ( ? ) माहिती मिळविण्यापेक्षा, मरणाचे भय का वाटते, याचाच फक्त विचार आपण करू.

खरे म्हटले तर हा विचार मरणोन्मुख माणसानेच करावयास पाहिजे. पण त्या अवस्थेत हे होणे नाही. मरण समोर दिसणाऱ्या माणसाला त्याचे भय का वाटते, हे ज्याला ते दिसत नाही त्याला कधीतरी समजेल काय ? पण एवढे खास की, प्रत्येकाला आपले जीवन प्यार वाटते. कुणालाच ते संपावे असे वाटत नाही. इतर लोक, एखाद्याचे जीवन सुखी अगर हालाचे, कसेही समजोत, त्या माणसाला काही ते टाकाऊ वाटत नाही. आयुष्यात काय घडले अथवा घडत आहे इकडे फार लक्ष न देता प्रत्येक माणूस असलेले आयुष्य सोडायला तयार होत नाही, हेच खरे. असलेले सोडायचे नाही, मग ते कसे का असेना असा आग्रह माणूस का धरतो ?

जे काय जवळ असते व जे सोडायला माणूस तयार नसतो त्याचे नक्की स्वरूप तरी काय आहे ? हे संशोधन मरण जवळ आल्यावर करता येत नाही, हे तर खरेच. पण मरणाची घटना पाहिल्यावर अथवा स्वतःला मरणाची भीती वाटल्यावर जी जाग येते, तिची फार जरूरी आहे. कारण, असा काही धक्का न बसता जो विचार होतो तो अगदीच उथळ असतो. तर्काच्या मदतीने काही निर्दोष (?) वाटणारी अनुमाने काढणे म्हणजे मरणाचे दर्शन घेणे नव्हे. प्रत्यक्ष डोळ्यांनी एखादी वस्तू पाहिल्याखेरीज ।तिचे खरे ज्ञान झाले असे म्हणता येईल

काय? मरणाच्या घटनेचे तीन भाग पडतात. पहिला भाग शरीराचे यंत्र बंद पडण्याचा. शरीराचे व्यापार चालू राहावेत याकरिता शरीरच सतत खटपट करीत असते. रोग होताक्षणीच तो बरा करण्याची क्रियाही शरीरात सुरू होते. (काही वेळेला बाहेरच्या औषधांची मदत होते) पण जेव्हा कोणताच इलाज रोगाचा अथवा वार्धक्याचा हल्ला परतवू शकत नाही तेव्हा मरणाचा क्षण जवळ येतो. पण हे असे होणे क्रमप्राप्त आहे. याबद्दल प्रत्येकाची एवढी खात्री असते की, याबद्दल ज्याला आपण 'दुःख' म्हणतो ते फारसे वाटत नाही. मृत्यूच्या अगोदर शरीराला ज्या वेदना होतात त्यांपासून होणारे दुःख हे फक्त शरीराचे आहे असे विधान करता येईल. 'या वेदना होतील, त्या फार भयंकर असतील' अशीही भीती वाटत असते. पण मरणाची भीती म्हणजे ही नव्हे, हे सहज पटण्यासारखे आहे. या वेदना म्हणजे मरणाच्या घटनेचा दुसरा भाग असे आपण म्हणू. पण पुढील तिसरा भाग सर्वांत महत्त्वाचा आहे. "मरण नको" असे जे वाटते ते या तिसऱ्या भागामुळे. "आयुष्यभर जे काय जमा केलेले आहे ते सोडावयास नको वाटणे," असे या भागाचे स्वरूप आहे. माणसाच्या आयुष्यात मरणाच्या घटकेपर्यंत काहीतरी जमा करण्याचा उद्योग सतत चालू असतो. मरण ही एकच घटना अशी आहे की, ती घडते तेव्हा जमा केलेले सर्व फेकून द्यावे लागते. 'हा त्याग केव्हातरी करावा लागणार,' असा नुसता विचारही जिवाचा थरकाप करतो. तो करण्याची वेळ जवळ आली आहे असे दिसले तर माणूस भयाने अगदी विव्हल होऊन जातो.

आता प्रश्न असा उत्पन्न होतो की, जन्मभर जी नाती जोडली जातात त्यांचा खरा अर्थ तरी काय आहे? व्यक्तींशी, घराशी, संपत्तीशी, संपादन केलेल्या कीर्तीशी, पुऱ्या केलेल्या कामगिरीशी आपला जो संबंध असतो व जो सोडायला आपणांला नको वाटते त्याचे

सत्यस्वरूप काय आहे ? हे सर्व संबंध आपण मानतो त्या स्वरूपात खरे असले, तर ते मृत्यूने तुटावेत का ? आपण जगतो त्या पद्धतीचे जीवन खरे असले तर ते मृत्यूने संपावेच का ? जीवनाच्या टोकाला होणारी ही मृत्यूची घटना अगोदरच्या सबंध जीवनाचाच अर्थ नाहीसा करते, असे का ? जीवनात घडणाऱ्या इतर घटना व मृत्यू यांच्यामध्ये जी विसंगती दिसते, ती कशामुळे ? का मृत्यूसह सर्वच घटना एका विशिष्ट पद्धतीने घडत असताना आमचेच काहीतरी चुकत आहे ?

वरवर पाहिले असता हे असे प्रश्न उपस्थितच होत नाहीत, असे वाटते. फक्त 'मृत्यू म्हणजे काय ?' एवढा एकच प्रश्न आपणांला महत्त्वाचा वाटतो. त्या प्रश्नाचे उत्तर तेवढे आम्हांला कोणीतरी द्यावे, एवढी एकच अपेक्षा आपली असते. जीवन जगतानाच एखादी मूलभूत चूक आपल्या हातून घडत असेल असे आपल्या स्वप्नातही येत नाही.

मृत्यूचे दुःख सर्वांनाच का वाटते या प्रश्नाचे उत्तर न शोधता, आपण नेहमी वैयक्तिक दृष्टिकोणातून या विषयाकडे पाहत असतो. 'मृत्यू' शब्द उच्चारताच स्वतःचा संभवनीय मृत्यू अथवा इतर कोणा आप्ताचा घडलेला मृत्यू डोळ्यांपुढे उभा राहतो. स्वतःच्या मृत्यूचे विचार डोक्यात आले की आपण विशेष अस्वस्थ होतो. पण हे विचार म्हणजे असतात तरी काय ? सुरू केलेली कामे अर्धवट राहतील का ? आपले जीवन यशस्वी झाले असे लोक म्हणतील का ? तितकी कर्तबगारी घडली आहे ना, का कमी पडत आहे ? जीवनात किती सुखे आपणांला मिळाली नाहीत अथवा अपुरी मिळाली ? आपल्या यशाच्या कोण केव्हा आड आले ? घरात आपल्याशी कोण कसे वागले ? कुटुंबियांचे पुढे कसे होईल ? मुलांपैकी एखादा मुलगा ठळकपणाने नजरेपुढे येतो, व "त्याने डॉक्टरीचे शिक्षण पुरे केले असते तर बरे नसते का झाले ?" असा विचार डोक्यात सारखा

घोळू लागतो. आपण केलेल्या चुका, व्यर्थ दवडलेल्या सुवर्णसंधीच्या वेळा, या मग आठवू लागतात. केव्हा हे असे विचार बराच वेळ चालू राहतात; तर केव्हा यातला एखादाच विचार स्वत:भोवती भोवऱ्यासारखा फिरू लागतो. इतका की डोके भणाणू लागते. ज्यांचे जीवन अयशस्वी अथवा दु:खी झाले असे म्हणण्याचा प्रघात आहे, त्यांना असा अनुभव येतो की, क्लेश देणारे विचार व मृत्यूची भीती या एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत.

सुज्ञ वाचकांच्या लक्षात आले असेल की, मरणाचा अर्थ समजून घेण्याचा जेव्हा जेव्हा आपण प्रयत्न करतो, तेव्हा 'माझ्या जीवनात काय काय घडले,' इकडेच आपले चित्त धावू लागते. याला मरणाबद्दलचे संशोधन म्हणता येईल काय ? दुसरा प्रकार असा आहे की, मरणाचा अर्थ समजून घेण्याकरिता ग्रंथ वाचणे अथवा अधिकारी लोकांची प्रवचने ऐकणे. या प्रकारात मरणोत्तर स्थितीची जी वर्णने असतात, तिकडेच आपले सारे लक्ष असते. काही आश्वासन मरणानंतरही सुखप्राप्तीबद्दलचे मिळते का, हे आपण पाहत असतो. मग आपण हा ग्रंथ, तो ग्रंथ यांची तुलना करू लागतो; व जो जास्त तर्कशुद्ध वाटेल तोच खरा असे ठरवून टाकतो. पण 'तर्क' म्हणजे काय ? जो तर्क आपल्याला प्रिय अथवा शक्य कोटीत बाटणारा निष्कर्ष देऊ शकतो, त्यालाच शास्त्रशुद्ध तर्क असे म्हणण्याची रीत आहे. ते कसेही असले तरी, ग्रंथ आणि तर्क यांच्या मदतीने मरणाबद्दलचे जे चित्र डोळ्यांपुढे आपण उभे करतो, ते नुसते पाहत राहणे म्हणजे मरणाबद्दलचा अनुभव घेणे नव्हे, हे आपल्या लक्षातच येत नाही. मरण ही खुद्द आपणांला केव्हा तरी प्राप्त होणारी अवस्था आहे हे जर खरे असले, तर तिचे खरे ज्ञान मिळविण्याचा हा मार्ग नव्हे. इतरांना आलेला अनुभव व त्यांनी काढलेली अनुमाने हे प्रत्यक्ष सत्य होऊ शकत नाही. डॉक्टरांनी

केलेले मृत्यूचे वर्णन हे सुद्धा खरा अनुभव देऊ शकणार नाही. हे आणखी उघड करण्याची जरूर नाही. एकूण सारांश असा की, साखरेच्या गोडीबद्दलची अनुमाने व निष्कर्ष ( inferences and conclusions ) यावर न भागविता, ती स्वतः चाखली तरच तिची खरी गोडी कळणे शक्य आहे. निदान जी अवस्था स्वतःला प्राप्त व्हावयाची, तिचे ज्ञान मिळविण्याला दुसरा मार्गच नाही.

आता एक अडचण उघड आहे. ती अशी की, मरणाच्या अवस्थेत गेल्यावर तिचे ज्ञान करून घेऊ असा बेत करून काहीच उपयोग नाही. हा 'वदतोव्याघात ' आहे. मग करावे तरी काय ?

स्वतःला काय होते हे मरणाच्या दारी गेल्यावर जर समजत नाही आणि इतरांची – शास्त्रज्ञांचीसुद्धा – वर्णने ऐकून उपयोग नाही; तर हा विषयच सोडून द्यावा हे खरे, असे वाटू लागते. बहुजन हाच मार्ग अनुसरत. म्हणूनच मरणावर लिहिलेली पुस्तके फारशी खपत नाहीत. माझे एक मित्र आहेत. त्यांना जेव्हा, " सिनेमाला चला " असे मी म्हणतो तेव्हा ते एक अट न विसरता घालतात. ती अशी की, कथानकाचा शेवट दुःखात नसला पाहिजे. त्यांचे म्हणणे असे की, जीवनात सगळीकडे भरपूर दुःख भरलेले असताना पडद्यावर आणखी ते पाहा कशाला ? दुःखाचे दर्शन समोरासमोर घेण्याचें सर्व माणसे टाळीत असतात. पण त्यामुळे दुःख तर समजत नाहीच. पण सुखाच्या कल्पनेतही जन्मभर चूक राहून जाते. " दुःख नको " म्हणून ते कपाळाचे चुकत नाही. दुःखाने झडप घातलेली असतानासुद्धा कोणते-तरी कवच पांघरून घेऊन त्या दुःखापासून पलायन ( escape ) करता येते. या पलायनात एकप्रकारचे सांत्वन ( consolation ) निदान तात्पुरती सुटका असते; व सर्व माणसे या एकाच हेतूने पुनर्जन्माबद्दल अथवा मरणोत्तर स्थितीबद्दल चौकशी करीत असतात.

चिंतूकाकांना मरणाचे एवढे दुःख का वाटावे, तसेच सदूभाऊंना केवळ दुःखांनीच भरलेले आयुष्यही सोडून जाऊ नये असे का वाटावे हे अवघड वाटणारे कोडे आता उलगडेल असे वाटते. या दोघांनाही, एकीला जोडलेली दुसरी, तिला चिकटलेली तिसरी, तिला लागलेली चौथी, अशा घटनांची साखळी असलेले जीवन संपणार, ही साखळी आता तुटणार, ही कल्पनाच घाबरी करते. यात आश्चर्य वाटण्यासारखे काहीच नाही. कारण जे काल होते ते आज कायम राहणे ( Continuity ) म्हणजेच जीवन, अशी चिंतूकाका, सदूभाऊ, विसूभाऊ, रामभाऊ या सर्वांची, आपलीसुद्धा समजूत असते. ही समजूत मनापासून दूर धरून, तिच्याकडे पाहतो कोण ? तिला दूर केले की मी जागेवर राहत नाही ही शंका येते ना ? साखळी तुटेल ही भीती वाटते ना ?

If you think about your wife, about your house, about your children, or about your job all the time, you have established a continuity, have you not ? If you have a grudge, a fear, a sense of guilt, and if you think about it off and on, reero-call, rember, bring it out of the past, you have established a continuity. And our minds function in that continuity, all our thinking is that continuity. Psychologically you are violent; and you think about not being violent, the ideal; so, through your thinking about not being violent, you have established the continuity of being violent. Please, this is important to understand, it is very simple once you see this thing : that thought, thinking about something, gives it continuity, whether it is pleasant or

unpleasant, whether it gives you joy or gives you pain, whether it is something past or something that is going to take place tomorrow or next week.

So it is thought that establishes continuity in action – as going to the office day after day, month after month, for thirty years till your mind is a dead mind. And you equally establish a continuity with your family. You say, 'It is my family;' you think about it; you try to protect it; you try to build a structure, a psychological protection on it and around yourself. And so the family becomes extraordinarily important, and you are destroyed............ So psychologically, inwardly, the desire for continuity is the way of time, and time breeds fear; and thought as time dreads death. ............That is, if every minute of the day thought does not give continuity to either pleasure or pain, to fulfilment or to lack of fulfilment, to praise, to everything to which thought gives attention, then there is death every minute. One must die every minute, not theoretically.............Thought is merely a response, a reflex of the past; It has no validity, as the tree has which you see – actually.

( Talks in India, 1962, P. 146 ).

सारांश पुढीलप्रमाणे आहे :–

" पत्नी, घर, मुले, ऑफिसचे काम यांबद्दलचा विचार तुम्ही सतत चालू ठेवला तर एक प्रकारची साखळी मनात तयार होते. कुणाबद्दल

तुमच्या मनात तक्रार असली, कुणाचे भय वाटत असले, अथवा स्वतःच्या अपराधाची जाणीव असली आणि तुम्ही सतत त्याबद्दल विचार करीत असला तर काय होते, माहीत आहे ? मनात एक धागा तयार होतो, आणि मग या धाग्याला धरूनच मनाचे सर्व व्यापार होऊ लागतात. आमचा जो एकूण एक विचार (thinking) आहे, तो हा धागाच आहे. त्यात नवे असे काही समजतच नाही. समजा, तुमच्या मनात हिंसेची भावना उद्‌भवली आहे. मग तुम्ही काय करता ? अहिंसा या ध्येयाचा तुम्ही विचार करू लागता. पण, 'हिंसा करू नये' या विचारातूनच तुम्ही हिंसेचा धागा अधिक बळकट करता, नाही का ? ज्या कशाचे तुम्ही चिंतन करता, मग ते सुखद असो, दुःखद असो, ते भूतकालातले असो, अगर उद्या किंवा पुढच्या आठवड्यात घडणारे असो, ते चिंतनाने अधिकच मजबूत होत जाते.

मनातली ही साखळी कायम राहावी अशी जी मागणी असते, तेच चित्ताला व्यापून राहणाऱ्या कालाचे (psychological time) स्वरूप आहे. हा कालच भयाची उत्पत्ती करतो. याचाच अर्थ असा की, चिंतनच मरणाच्या भीतीला जन्म देते. कसले का होईना, चिंतन चालू राहिले पाहिजे, असा आग्रह जोपर्यंत आहे तोपर्यंत मरण नको वाटणारच. पण सुख अथवा दुःख, तृप्ती अथवा अतृप्ती, अपमान अगर मान, जे काय असेल ते, मागच्या क्षणातून पुढच्या क्षणात चिंतनाने नेलेच नाही, तर खऱ्या अर्थाने प्रत्येक क्षणाला मरणच आहे. अशा तऱ्हेने खरोखरच – नुसत्या तर्काने नव्हे – प्रत्येकाने दर क्षणाला मेले पाहिजे...

........ज्या विचाराला आपण एवढे कवटाळून बसतो, तो आहे तरी काय ? ती एक प्रतिक्रिया आहे. भूतकालात घडलेल्या घटनेचे स्मृतीत उमटलेले ते एक चित्र आहे. समोर दिसणाऱ्या झाडासारखा खरेपणा त्याला आहे का ?"

वर वर्णन केलेल्या साखळीत चित्त सदैव अडकल्यामुळे व तिच्या-बाहेर जीवन नाहीच अशी समजूत करून घेतल्यामुळे श्रीमंत माणसांना, दरिद्री माणसांना, मुलेवाळे असणारांना, तसेच निपुत्रिकांना, सत्तेच्या शिखरावर आरूढ झालेल्यांना, तसेच जुलमाच्या यातना भोगीत असणारांना, – सर्वांनाच मरणाचे दुःख सारखेच हैराण करते. पुष्कळदा आपण अशी समजूत करून घेतो की, जे कोणी महाभाग व्यवस्थित तऱ्हेने आपल्या आयुष्याची आखणी करून घेत असतील व तिची कार्यवाही बिनचूकपणे करीत असतील, त्यांना सुखाने मरण येत असावे. तसे दिसत नाही. असेही आढळत नाही की, दैववशात् ज्यांना प्रेमळ पती, पत्नी, अगर पुत्र लाभले ते अगदी सुखाने मरणास तयार झाले. उलट ज्यांचा अतोनात छळ झाला, सर्वांनीच ज्यांना ठोकरले व कुणीही दाद घेतली नाही, त्यांनाही मरण म्हणजे ‘ सुटका ’ असे वाटत नाही.

मरणाच्या घटनेचा हा अन्वयार्थ फक्त शेवटच्या दिवसांतच उपयोगी पडेल, असे नाही. कारण, जन्मभर एका ठराविक पद्धतीने उत्पन्न होणारे असत्यच विषनिर्मिती करीत असले, तर ते कोणत्याही निमित्ताने उमगले तर उपकारकच आहे. “ केवळ वृद्धांनीच ‘ मरण ’ या घटनेचा विचार करावा. ‘ मी ’ कसा निर्माण होतो व तो खरा का खोटा, हा विषय तरुणांकरिता नाही. कृष्णमूर्तींसारखे तत्त्वज्ञ पूर्वायुष्यात काय उपयोगी ? ” असा एक विचारप्रवाह आहे. पण पूर्वायुष्यातले जीवन हे सुद्धा वर सांगितलेल्या धाग्याभोवतीच जगले जाते. पुनरावृत्तीचा शाप तरुण, प्रौढ, वृद्ध सर्वांनाच जाळीत आहे. सर्वांनाच या नव्या दृष्टीची गरज आहे. वरील प्रवचनातच कृष्णमूर्ती म्हणतात :–

I like something and I think about it; the thinking about it establishes a relationship between what has been

— the thought which thinks about it — and the fact that I would like to have it again.

ज्या कोणाला काही हवे असे वाटते – मग तो तरुण असो अगर वृद्ध असो – त्याने स्वतःला असे विचारले पाहिजे की, तो स्वतः आणि हवी असणारी वस्तू यांच्या दरम्यानचे नाते ( relationship ) कसले आहे ? कृष्णमूर्ती म्हणतात की, हे नाते फक्त चिंतनामुळे निर्माण होते. जे खरोखर संपलेले असते त्याच्या विचारांतूनच जर अनेक गोष्टी हव्याशा वाटू लागल्या, तर आपले कुठेतरी चुकत आहे अशी शंका सर्व वयाच्या व सर्वच वर्गातल्या वाचकांना यावयास नको काय ?

□ □ □

REFBK-0018411

प्रसाद
प्रकाशन

# प्रसाद रौप्यमहोत्सवी प्रकाशने

## य. गो. जोशी लिखित

**कादंबऱ्या**

- वहिनींच्या बांगड्या
- शेवग्याच्या शेंगा
- सुपारी
- श्रीकांत, त्रिदोष ( एकत्र )
- साहित्यिकांची सफर
- पडसाद
- होमकुंड
- अनंता परत आला
- हिरकणी

**मुलाखती**

- अनौपचारिक मुलाखती

**नाटके**

- श्रीमुखात
- भोळा शंकर } एकत्र
- बोलका सिनेमा } एकत्र

**चरित्रात्मक**

- दुधाची घागर

किंमत प्रत्येकी

सा

रु

- **अध्यात्मशास्त्राची मूलतत्त्वे**
  वै. ह. भ. प. शं. वा. दांडेकर
- **सार्थ एकनाथी हरिपाठ**
  ह. भ. प. धुंडामहाराज देगलूरकर
- **कथारूप संक्षिप्त विष्णुपुराण**
  पं. दा. प्र. पाठकशास्त्री
- **संस्कार महिमा**
  स. कृ. देवधर
- **धर्म आणि व्यवहार**
  द. श्री. मराठे
- **जीवनातील अनेक नाती**
  चं. गु. जोशी
- **ज्ञानेश्वरांचे जीवनदर्शन**
  प्र. न. जोशी
- **सूर्यकांत**
  स. आ. जोगळेकर
- **स्वातंत्र्याची पंचवीस वर्षे**
  डॉ. प्र. चिं. शेजवलकर
- **बिल्वदले**
  प्रफुल्ल दत्त
- **श्रीसमर्थ चरित्रवाङ्मय व संप्रदाय**
  न. र. फाटक
- **जुने दोरे नवे धागे**
  प्र. न. जोशी

प्रसाद प्र पदाशिव, पुणे ३०